# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## दूर शिक्षण केंद्र

# आर्थिक विचारांचा इतिहास

**History of Economic Thoughts**

बी. ए. भाग–३

अर्थशास्त्र : ऐच्छिक पेपर ९ व १४

सेमिस्टर ५ : पेपर ९

सेमिस्टर ६ : पेपर १४

© **कुलसचिव,** शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र)
**प्रथमावृत्ती :** २०१५
**द्वितीय आवृत्ती :** २०१७
बी. ए. (आर्थिक विचारांचा इतिहास) भाग - ३ करिता
सर्व हक्क स्वाधीन. शिवाजी विद्यापीठाच्या परवानगीशिवाय कोणत्याही प्रकाराने नक्कल करता येणार नाही.

**प्रती :** ५००

**प्रकाशक :**
**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

**मुद्रक :**
**श्री. बी. पी. पाटील**
अधीक्षक,
शिवाजी विद्यापीठ मुद्रणालय,
कोल्हापूर - ४१६ ००४.

■

ISBN-987-81-8486-617-9

★ दूरशिक्षण केंद्र आणि शिवाजी विद्यापीठ याबद्दलची माहिती पुढील पत्त्यावर मिळू शकेल.
शिवाजी विद्यापीठ, विद्यानगर, कोल्हापूर-४१६ ००४ (भारत)

★ दूर शिक्षण विभाग-विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांच्या विकसन अनुदानातून या साहित्याची निर्मिती केली आहे.

## दूर शिक्षण केंद्र, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


### सल्लागार समिती

**प्रा. (डॉ.) डी. बी. शिंदे**
मा. कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) डी. टी. शिर्के**
प्र-कुलगुरू,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. एम. साळुंखे**
माजी कुलगुरू,
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

**प्रा. (डॉ.) के. एस. रंगाप्पा**
माजी कुलगुरू,
म्हैसूर विद्यापीठ, म्हैसूर

**प्रा. पी. प्रकाश**
अतिरिक्त सचिव-II
विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली

**प्रा. (डॉ.) सीमा येवले**
गीत-गोविंद, फ्लॅट नं. २,
११३९ साईक्स एक्स्टेंशन,
कोल्हापूर-४१६००१

**प्रा. (डॉ.) पी. एस. पाटील**
I/c अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) ए. एम. गुरव**
I/c अधिष्ठाता, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) भारती पाटील**
I/c अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) पी. डी. राऊत**
I/c अधिष्ठाता, आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**डॉ. व्ही. डी. नांदवडेकर**
कुलसचिव,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. एम. ए. काकडे**
संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**श्री. ए. बी. चौगुले**
प्रभारी वित्त व लेखा अधिकारी,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

**प्रा. (डॉ.) एम. ए. अनुसे** (सदस्य सचिव)
संचालक, दूरशिक्षण केंद्र,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

### अर्थशास्त्र समन्वय समिती

अध्यक्ष - **डॉ. पी. एस. कांबळे**
अर्थशास्त्र अधिविभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

- **डॉ. तेजस्विनी मुडेकर**
  कमला कॉलेज, कोल्हापूर
- **डॉ. वाय. एस. गायकवाड**
  विलिंग्डन कॉलेज, विश्रामबाग, सांगली.

## अभ्यास घटकांचे लेखक

| लेखन सहभाग | सत्र–५ घटक क्रमांक | सत्र–६ घटक क्रमांक |
|---|---|---|
| **श्री. एस. डी. साळुंखे**<br>श्री शिव–शाहू महाविद्यालय, सरुड | १ | – |
| **श्री. जी. डी. जाधव**<br>बळवंत कॉलेज, विटा | २ | – |
| **श्री. आर. एम. घाटगे**<br>एस. बी. आर. कॉलेज, म्हसवड | ३ | – |
| **डॉ. सुभाष आत्माराम जाधव**<br>डी. आर. माने महाविद्यालय, कागल. | ४ | – |
| **प्रा. एन. एच. कटरे**<br>राजाराम कॉलेज, कोल्हापूर | – | १ |
| **प्रा. डॉ. श्रीनिवास नाईक**<br>आजरा महाविद्यालय, आजरा | – | २, ३ |
| **डॉ. एम. एन. शिंदे**<br>के. बी. पी. कॉलेज, उरुण–इस्लामपूर<br>**डॉ. आनंद लोदाडे**<br>शहाजीराजे महाविद्यालय, खटाव | –<br><br>– | २<br><br>२ |
| **डॉ. एस. एस. रूपे**<br>देवचंद कॉलेज, अर्जुननगर, ता. कालग, जि. कोल्हापूर | – | ४ |

**■ संपादक ■**

**डॉ. आर. जी. कोरबू**
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर

**डॉ. श्री. तु. नाईक**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आजरा महाविद्यालय, आजरा

# प्रस्तावना

शिवाजी विद्यापीठाच्या तृतीय वर्ष बी.ए. भाग ३ च्या अर्थशास्त्र (विशेष) या जून २०१५ पासून होणाऱ्या अभ्यासक्रमातील पेपर क्रं. ९ व १४ 'आर्थिक विचारांचा इतिहास' सत्र ५ व सत्र ६ या विषयासाठी हे पुस्तक उपयुक्त आहे. आर्थिक विचारांचा इतिहास या पुस्तकात आर्थिक विचारांचा विकास कसा होत आला याची मालिका कशी विकसित झाली याची माहिती या पुस्तकातून विद्यार्थ्यांना होईल त्यामुळे हे पुस्तक आधिक उपयुक्त ठरेल.

या पुस्तकात सत्र ५ साठी व्यापारवाद, निसर्गवाद, ॲडम स्मिथ यांचा मूल्य सिद्धांत व कर कसोट्या, डेव्हिड रिकार्डो यांचा मूल्य सिद्धांत व विभाजन संबंधीचे विचार, थॉमस माल्थस यांचे लोकसंख्या विषयक सिद्धांत व आर्थिक अरिष्ट्ये यासंबंधीचे विचार हे अभिजातवादी अर्थतज्ञ होत. जर्मन राष्ट्रवादी फ्रेडरिक लिस्ट यांचे आर्थिक विचार यामध्ये आर्थिक अभिवृद्धीचे टप्पे, राष्ट्रवाद, संरक्षण सिद्धांत आणि कार्ल मार्क्स यांची साम्यवादी आर्थिक विचारसरणी यामध्ये श्रम मूल्य सिद्धांत अतिरिक्त मूल्य सिद्धांत व घटत्या नफ्याचा दर हे महत्त्वाचे घटक समाविष्ट केले आहेत.

सत्र ६ साठी नव सनातनवादी आर्थिक विचार अल्फ्रेड मार्शल यांचा मूल्य सिद्धांत, प्रातनिधीक उद्योग संस्थेची संकल्पना, मागणीची लवचिकता, आभास खंड, भारतीय आर्थिक विचारवंत महात्मा फुले यांचे शेतीविषयक व शिक्षण विषयक विचार, राजर्षी शाहू महाराज यांचे शेती विकास धोरण व जल व्यवस्थापन, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेती विषयक व विकास धोरण दादा भाई नौरोजी यांचा निस्सारण सिद्धांत, महात्मा गांधी यांचे खेड्यांचा विकास संकल्पना, केंद्रीकरणाचे महत्त्व, विकासाची मूलभूत तत्वे, ग्राम स्वराज्य संकल्पना, आधुनिक आर्थिक विचारवंत डॉ. डी. आर. गाडगीळ यांचे सहकारी विकास, सत्तेचे केंद्रीकरण व डॉ. अर्मत्य सेन यांचे सामाजिक निवड आणि कल्याण, दारिद्रय हे आर्थिक विचार समाविष्ट केले आहेत.

आर्थिक विचारांचा इतिहास या पुस्तकासाठी श्री. एस. डी. साळुंखे, श्री. जी. डी. जाधव, श्री. आर. एम. घाडगे, डॉ. सुभाष आत्माराम जाधव, डॉ. एन. एच. कटरे, डॉ. एम्. एन्. शिंदे, डॉ. आनंद लोदाडे व डॉ. एस. एस. रूपे या घटक लेखकांनी आपले लिखाण वेळेत सादर केले त्याबद्दल त्यांना धन्यवाद देत आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या बहिस्थ विद्यार्थ्यांसाठी स्वयं अध्ययन साहित्याची मांडणी एका विशिष्ट पद्धतीने केली आहे. त्याचे तंतोतंत पालन करून सदरचे पुस्तक अद्यावत करण्याचा प्रयत्न आम्ही केला आहे. याशिवाय विद्यार्थी व वाचकांना वस्तुनिष्ठ प्रश्नोत्तरे व स्वयं अध्ययनाचे स्वाध्याय देवून त्याचे मूल्यमापन करता येईल अशी रचना केलेली आहे.

सदर पुस्तकात अचुकता व नीटनेटकेपणा आणण्याचा आम्ही जातीने प्रयत्न केलेला आहे. तरी वाचक व विद्यार्थ्यांकडून आलेल्या सूचनांचे स्वागत करू. या पुस्तकाच्या प्रकाशनासाठी दूर शिक्षण केंद्रातील सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, मुद्रण कामातील सर्व कर्मचाऱ्यांनी घेतलेले परिश्रम याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करीत आहोत.

**■ संपादक ■**

**डॉ. आर. जी. कोरबू**
व्यावसायिक अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
डी. डी. शिंदे सरकार कॉलेज, कोल्हापूर

**डॉ. श्री. तु. नाईक**
अर्थशास्त्र विभाग प्रमुख,
आजरा महाविद्यालय, आजरा

# अनुक्रमणिका


| घटक क्रमांक | घटकाचे शीर्षक | पान क्रमांक |
|---|---|---|
| | **सेमिस्टर–५**<br>**आर्थिक विचारांचा इतिहास (भाग–१)**<br>**पेपर क्रमांक – ९** | |
| १. | अ) व्यापारवाद : वैशिष्ट्ये/विचार | १ |
| | ब) निसर्गवाद | १२ |
| २. | सनातनवाद्यांचा कालखंड | २९ |
| ३. | फ्रेडरिक लिस्ट | ५५ |
| ४. | कार्ल मार्क्स | ७८ |
| | **सेमिस्टर–६**<br>**आर्थिक विचारांचा इतिहास (भाग–२)**<br>**पेपर क्रमांक – १४** | |
| १. | नव–सनातनी आर्थिक विचार – अल्फ्रेड मार्शल | ११३ |
| २. | भारतीय आर्थिक विचारवंत | १३० |
| ३. | महात्मा गांधी | १५३ |
| ४. | आधुनिक अर्थशास्त्रज्ञांचे आर्थिक विचार | १५९ |

## ■ विद्यार्थ्यांना सूचना

प्रत्येक घटकाची सुरुवात उद्दिष्टांनी होईल. उद्दिष्टे दिशादर्शक आणि पुढील बाबी स्पष्ट करणारी असतील.

१. घटकामध्ये काय दिलेले आहे.

२. तुमच्याकडून काय अपेक्षित आहे.

३. विशिष्ट घटकावरील कार्य पूर्ण केल्यानंतर तुम्हाला काय माहीत होण्याची अपेक्षा आहे.

स्वयं मूल्यमापनासाठी प्रश्न दिलेले असून त्यांची अपेक्षित उत्तरेही देण्यात आलेली आहेत. त्यामुळे घटकाचा अभ्यास योग्य दिशेने होईल. तुमची उत्तरे लिहून झाल्यानंतरच स्वयं अध्ययन साहित्यामध्ये दिलेली उत्तरे पाहा. ही तुमची उत्तरे (किंवा स्वाध्याय) आमच्याकडे मूल्यमापनासाठी पाठवायची नाहीत. तुम्ही योग्य दिशेने अभ्यास करावा, यासाठी ही उत्तरे 'अभ्यास साधन' (Study Tool) म्हणून उपयुक्त ठरतील.

प्रिय विद्यार्थी,

हे स्वयंअध्ययन साहित्य या पेपरसाठी एक पूरक अभ्याससाहित्य म्हणून आहे. असे सूचित करण्यात येते की, विद्यार्थ्यांनी २०१५-१६ पासून तयार केलेला नवीन अभ्यासक्रम पाहून त्याप्रमाणे या पेपरच्या सखोल अभ्यासासाठी संदर्भपुस्तके व इतर साहित्याचा अभ्यास करावा.

# घटक : १

# १.१ (अ) व्यापारवाद : वैशिष्ट्ये / विचार

**अनुक्रमणिका**


१.१.० उद्दिष्टे

१.१.१ प्रास्ताविक

१.१.२ विषय विवेचन

- १.१.२.१ व्यापारवाद
- १.१.२.२ व्यापारवादाचे विचार, धोरण व वैशिष्ट्ये
- १.१.२.३ व्यापारवादातील इतर विचार
- १.१.२.४ व्यापारवादी विचारसणीचे मूल्यमापन

१.१.३ सारांश

१.१.४ पारिभाषिक शब्दाचे अर्थ

१.१.५ स्वयंअध्ययन प्रश्न

१.१.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.१.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला;

- अर्थशास्त्रीय विचाराच्या इतिहासाचा अभ्यास म्हणजे काय हे समजेल.
- अर्थशास्त्रीय विचाराचा उगम व विकास कसा झाला हे सांगता येईल.
- व्यापारवाद म्हणजे काय ? हे सांगता येईल.
- व्यापारवादाची वैशिष्ट्ये/विचार समजतील.
- व्यापारवादी विचारातील दोष समजतील.

## १.१.१ प्रास्ताविक

अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास अतिशय जूना आहे. तथापि, अर्थशास्त्राचा इतिहास मात्र त्या मानाने नवीन आहे. शास्त्र म्हणून या विषयाची सुरवात १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात, म्हणजेच १७७६ मध्ये ॲडम स्मिथने लिहिलेल्या 'राष्ट्राची संपत्ती' या ग्रंथापासून झाली. १७७६ च्या पूर्वी आर्थिक विचार तुरळक व विस्कळित स्वरूपाचे होते.

आर्थिक विचारांच्या इतिहासाचा अभ्यास करताना साधारणपणे तीन कालखंड पाडले जातात. प्राचीन काळ, मध्यमयुगीन काळ आणि आधुनिक काळ. प्राचीन आर्थिक विचारात प्रामुख्याने हिंदू संस्कृतीमधील वर्तनाचे नियम, कायदे किंवा संकेत यांचा समावेश आहे. मध्ययुगीन आर्थिक विचारावर प्रामुख्याने नैतिक मुल्यांचा प्रभाव होता. प्रा. हॅने यांनी या काळातील अर्थविचार अतिशय मोजक्या शब्दात पुढीलप्रमाणे सांगितला आहे. ''न्याय किंमतीच्या तत्त्वात (Just Price) या काळातील आर्थिक विचार सामावले आहेत.'' आधुनिक काळ, मध्ययुगीन काळातील विचाराला इ. स. १५०० पर्यंत विरोध झाला नाही. मात्र हळूहळू या जुन्या व्यवस्थेला विरोध सुरू झाला व आर्थिक जीवनाची पूनर्रचना करण्याचा काळ सुरू झाला. वाणिज्य पद्धतीने, कोल्बर्टवाद, व्यापार पद्धत, व्यापारवाद इत्यादी अनेक नावांनी ओळखले जाणारे विचार व धोरणे याच काळात पुढे आली. म्हणूनच व्यापारवादाचा उल्लेख करताना प्रा. हॅने यांनी त्यामागे 'आधुनिक अर्थ-विचाराची पहाट' (The Dawn of Modern Economic thought) असे शब्द जोडले आहेत.

## १.१.२ विषय विवेचन

### १.१.२.१ व्यापारवाद (Mercantilism)

मध्ययुगाच्या काळात वस्तुविनिमय पद्धती अस्तित्वात होती. याच काळात युरोपातील विविध राष्ट्रांत व्यापारी लोकांचा एक नवा वर्ग उदयास येत होता. संपत्ती प्राप्त करणे हे या वर्गाचे उद्दिष्ट होते. त्यामुळे मध्ययुगातील राजे व नव्याने उदयास येवू लागलेला व्यापारी वर्ग यांचे समान उद्दिष्ट बनले, ते म्हणजे संपत्ती प्राप्त करणे.

मध्ययुगाच्या काळात युरोपातील विविध राष्ट्रात कॅथॉलिक पंथाचा प्रभाव होता. व्यक्तीने पैसा व भौतिक वस्तूशी फारसा संबंध ठेवू नये असा या पंथाचा विचार होता. मात्र कॅथॉलिक पंथाच्या विचाराला विरोध करणारा प्रोटेस्टंट पंथ उदयास आला. या पंथाने व्यक्तिस्वातंत्र्य, व्यक्तीच्या जीवनातील पैशाचे महत्त्व मान्य केले. या काळात प्रोटेस्टंट पंथाचे विचार मानणारे लोक, व्यापारी वर्ग, राजे इत्यादींनी राष्ट्राच्या संपत्तीत वाढ कशी करावी यासंबंधी जे विचार मांडले त्यालाच व्यापारवादी विचारसरणी किंवा व्यापारवाद म्हणतात.

**व्यापारवादाची व्याख्या**

व्यापारवादाची व्याख्या करणे बरेच अवघड आहे; कारण ही विचारसरणी विशिष्ट देशात एका ठराविक विचाराने प्रेरित होवून कोण्या एका व्यक्तीने मांडली नाही. मध्ययुगाचा शेवट झाल्यावर युरोपातील अनेक राष्ट्रात विविध आर्थिक समस्या निर्माण झाल्या. त्या समस्या व्यवहारिक भूमिकेतून कशा सोडविता येतील हा दृष्टिकोण समोर ठेवून या लोकांनी आपले विचार मांडले. या विचारातून व्यापारवादाचा जन्म झाला.

प्रा. एल. एच. हॅने यांच्या मते, ''सोळाव्या शतकापासून ते आठराव्या शतकाच्या उत्तरार्धापर्यंत युरोपातील राजकारणी लोकांमध्ये जे अर्थशास्त्रीय विचार प्रचलित होते त्या सर्व विचाराला एकत्रितरित्या व्यापारवाद असे म्हणतात.''

इमॉलर यांच्या मते, ''व्यापारवाद म्हणजे केवळ राज्याची निर्मिती किंवा आर्थिक बाजूने राज्याची निर्मिती होय.'

प्रा. लॅक्चमन यांच्या मते, ''व्यापारवाद म्हणजे मार्ग रोखणाऱ्या मध्ययुगीन विचाराविरुद्ध व रूढी विरुद्ध केलेले बंड होय.''

प्रा. स्पॅन यांच्या मते, ''त्या काळाच्या आर्थिक जीवनात, राज्यकर्ते आणि व्यापारी यांनी ज्या तत्त्वांचा प्रत्यक्ष व्यवहारात उपयोग केला त्यांचा एकत्रितपणे निर्देश करण्यासाठी स्थूलमानाने व्यापारवाद हा शब्दप्रयोग केला जातो.''

वरील व्याख्या अभ्यासल्यावर व्यापारवादी विचारासंबंधी पुढील गोष्टी लक्षात येतात.

- १६ ते १८ व्या शतकातील युरोपमधील हे आर्थिक विचार होते.
- व्यापारवादी विचार हे मध्ययुगीन विचाराविरुद्ध होते.
- व्यापारवादी विचार आर्थिक दृष्टिकोणातून मांडण्यात आले.
- युरोपातील राजकारणी, उद्योगपती, व्यापारी लोकांचा यात अधिक सहभाग होता.

**१.१.२.२ व्यापारवादाची विचार, धोरण व वैशिष्ट्ये**

व्यापारवादी विचार वेगवेगळ्या देशात वेगवेगळ्या विचारवंताकडून मांडले गेले. त्यामुळे विचारात भिन्नता असली तरी काही विचार व धोरणे समान होती. त्याचे स्वरूप पुढील वैशिष्ट्यातून व्यक्त करता येईल.

## १) पैसा किंवा मौल्यवान धातू हिच राष्ट्राची संपत्ती

राष्ट्राची संपत्ती म्हणजे पैसा किंवा पैशाची निर्मिती करण्यासाठी आवश्यक असलेले सोने, चांदी यासारख्या वस्तू होत. राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यवान व प्रभावशाली करणे हा त्यांच्या धोरणातील प्रमुख उद्देश होता. जर राज्याची सत्ता व अधिकार वाढवावयाचे असतील तर त्यासाठी संपत्ती आवश्यक आहे. संपत्ती वाढविण्यासाठी अधिक सोन्याची (मौल्यवान धातूंची) गरज आहे; म्हणून 'अधिक सुवर्ण - अधिक संपत्ती - अधिक सत्ता' असे त्तत्व व्यापारवाद्यांनी मांडले. इतर कोणत्याही वस्तू किंवा सेवांपेक्षा संपत्तीचे सर्वोत्तम रूप म्हणजे सोने किंवा चांदी असल्याने या धातूंचा साठा वाढविणे हेच खरे उद्दिष्ट आहे.

याच काळात विनिमयाचे माध्यम म्हणून पैशाला अतिशय महत्त्व प्राप्त झाले. कामगारांना मोबदला, सैनिकांना पगार, विनिमयासाठी पैशाची आवश्यकता यातून पैशाचे महत्त्व पदोपदी जाणवत असल्यामुळे पैसा म्हणजेच संपत्ती असे त्याचे मत स्वाभाविक होते. त्यांच्या मते व्यापाराचे उद्दिष्ट पैसे देवून वस्तू मिळविणे हे नसून त्या वस्तू विकून अधिक पैसे मिळविणे हेच होते. म्हणूनच 'पैसा हिच संपत्ती, पैसा व संपत्ती एकरूप होत', अशी विधाने त्यानी केलेली आढळतात.

## २) राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यवान करण्यासाठी मौल्यवान धातूचा संचय करणे

मध्ययुगाच्या अस्ताबरोबर सरंजामशाहीचा प्रभाव कमी झाला आणि त्यांच्या जागी राजे लोक प्रभावी झाले. त्यामुळे राजांनी प्रजेची काळजी घेणे, त्यांचे कल्याण करणे ही त्यांची महत्त्वाची जबाबदारी ठरली. ही जबाबदारी पार पाडण्यासाठी राजाला म्हणजेच पर्यायाने राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यवान होणे आवश्यक ठरले. त्याचप्रमाणे राष्ट्राला संरक्षणासाठी दक्ष राहण्यासाठी आपले लष्करी सामर्थ्य वाढविणे आवश्यक होते. व्यापारवाद्यांच्या मते, ''राज्यात सोन्या-चांदीची विपूलता असणे हे राजा व प्रजा दोघांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वपूर्ण आहे. थॉमसमन या व्यापारवादी विचारवंताच्या मते सर्व आर्थिक धोरणाचे उद्दिष्ट राज्याचा खजिना वाढविणे हेच असले पाहिजे.''

राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यवान बनविण्यासाठी काय करता येवू शकेल यासंबंधी व्यापारवाद्यांनी विचार मांडले. राष्ट्राला शक्तीशाली करण्यासाठी राष्ट्राच्या संपत्तीत पर्यायाने सोने, चांदी यासारख्या मौल्यवान धातूचा साठा वाढविला पाहिजे. त्या काळात एखाद्या राष्ट्राजवळ जेवढे सोने, चांदी अधिक तेवढे राष्ट्र आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यवान समजले जात असे. म्हणूनच व्यापारवाद्यांनी सोने, चांदी सारख्या मौल्यवान धातूचा संचय करणाऱ्या धोरणांचा पुरस्कार केला. वस्तू विनिमय पद्धतीचा लोप होवून त्याच्या जागी सोने व चांदी या धातूवर आधारलेला पैसा अस्तित्वात आला. पैसा अस्तित्वात आल्यामुळे मजुरांचे वेतन, राजांचा कर, युद्ध खर्च यासाठी पैशाचा वापर होवू लागला; त्यामुळे राष्ट्र बलवान करण्यासाठी पैसारूपी संपत्ती आवश्यक ठरली.

## ३) संपत्ती संचयासाठी अनुकूल व्यापारतोल

राष्ट्राजवळील मौल्यवान धातूचा साठा वाढवून राष्ट्र संपन्न बनविणे हे उद्दिष्ट नजरेसमोर असल्यामुळे संपत्तीचा साठा वाढविण्यासाठी काय करता येईल. याचा विचार व्यापारवाद्यांनी व्यक्त केला आहे. ज्या

देशात मौल्यवान धातूच्या खाणी असतील त्यानी खाणीतून या धातूंचे अधिकाधिक उत्पादन करावे. त्या धातूच्या निर्यातीवर बंदी घालून सुवर्ण साठे वाढवावेत. मात्र ज्या देशाकडे असे साठे नसतील त्यांनी आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या माध्यमातून मौल्यवान धातू मिळवावेत.

आंतरराष्ट्रीय व्यापारांकडे बघण्याचा व्यापारवाद्यांचा दृष्टिकोण वेगळा आहे. त्यांच्या दृष्टीने देशाची निर्यात जास्त व आयात शक्य तितकी कमी असेल तर विकलेल्या मालाची किंमत सुवर्णरूपात देशात येईल. यालाच त्यानी 'अनुकूल व्यापार शेष' म्हटले आहे. थॉमस मन याना तर पूर्ण विश्वास होता की ज्या देशात सोन्या-चांदीच्या खाणी नाहीत, त्यांना संपत्ती मिळविण्यासाठी एकमेव मार्ग विदेशी व्यापार (अर्थात् अनुकूल व्यापारतोल) हाच आहे. आयातीपेक्षा निर्यात जास्त झाली पाहिजे कारण देशात मौल्यवान धातूंचे साठे वाढविण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे. आधुनिक अर्थशास्त्रात निर्यात व आयात यातील फरक 'व्यापारशेष' या पारिभाषिक शब्दाने व्यक्त केला जातो. व्यापारशेष आधिक्य निर्माण करण्यासाठी राष्ट्राने जास्तीत जास्त वस्तूंची निर्मिती करावी. व्यापारात दृष्य वस्तू बरोबरच अदृश्य वस्तू अथवा सेवा यांची सुद्धा निर्यात करावी. थोडक्यात, वस्तुरूप निर्यातीचाच विचार न करता वहातुकीच्या माध्यमातून मिळणाऱ्या सेवारूप उत्पन्नाचाही विचार करावा.

व्यापारातून होणारा फायदा हा टिकाऊ स्वरूपाचा असतो, असे व्यापारवाद्यांचे मत होते. अर्थात इतर क्षेत्राला त्यानी कमी महत्त्व दिले. विल्यम पेटीने तर 'सर्वश्रेष्ठ व्यापार, दुय्यम यंत्रोत्पादन आणि कनिष्ठ शेती असा क्रम लावला आहे. थोडक्यात व्यापारवाद्यांना संपत्तीचे व तिचे प्रतिनिधित्व करणाऱ्या मौल्यवान धातूंचे अधिक आकर्षण असल्यामुळे त्यानी व्यापारतोलाच्या अनुकूलतेला महत्त्व दिले.

### ४) उद्योग व्यापारावर नियंत्रण

व्यापारतोल अनुकूल करण्याच्या धोरणाचा पुरस्कार व्यापारवाद्यांनी केला. निर्यात व आयात ही शेवटी उद्योग व व्यापारावर अवलंबून असते. त्यावर सरकारचे नियंत्रण असावे असे धोरण त्यांचे होते. सरकारच्या नियंत्रणाचे त्यांनी दोन भाग केले होते. (अ) अंतर्गत (ब) बाह्य नियंत्रण.

**(अ) अंतर्गत नियंत्रण :** यामध्ये देशांतर्गत केले जाणारे मूल्य नियंत्रण, उत्पादित वस्तूचा दर्जा, श्रम नियंत्रण व अवगुण वस्तू कायदे इत्यादींचा समावेश होतो. मूल्य नियंत्रणाचे उदाहरण म्हणून इंग्लंडच्या 'कॉर्न लॉज' (Corn Laws) चा उल्लेख करता येईल. म्हणजेच धान्याची किंमत एका मर्यादेपुढे वाढल्यास त्याची आयात करणे होय. निर्यात वाढीसाठी दर्जेदार वस्तूची निर्मिती याकडे त्यांनी लक्ष दिले. त्यादृष्टीने फ्रान्समध्ये कोल्बर्टची नियमावली किचकट होती. तसेच श्रमिकांची गतिक्षमता आणि त्यांचे वेतन यांच्यावर निर्बंध घालणारे नियमसुद्धा होते. अवगुण वस्तू कायद्याचे काम खाजगी उपभोग मर्यादित करणे व त्याला विशिष्ट दिशेने वळविणे हे होते. इंग्लंडमध्ये तंबाखू, चहा, सारख्या वस्तूचा उपभोगसुद्धा मर्यादित करण्याचा प्रयत्न या कायद्याने केला. कारण त्याच्या आयातीमुळे खर्च वाढतो व देशाची संपत्ती कमी होते.

**(ब) बाह्य नियंत्रण :** यामध्ये प्रामुख्याने सागरी वाहतूक विषयक कायदे आणि जकाती व अनुदानांचा समावेश केला. इंग्लंडमधील कायद्याचा उद्देश स्वत:ची सागरी सेवा वाढविणे इतकाच नव्हता; तर इतर राष्ट्राच्या सेवेवर मर्यादा घालण्याचा होता. कारण या सेवेपासून मिळणारे उत्पन्न म्हणजे 'फायदाच फायदा' असे त्यांचे मत होते. आयात कमी करण्यासाठी जकाती भरपूर होत्या; कारण व्यापारवाद्यांना व्यापारशेषांचे आधिक्य हे सर्वाधिक महत्त्वाचे होते. याच न्यायाने निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी अर्थसहाय्य देण्याची पद्धत स्वीकारली होती.

एकंदरीत देशहितासाठी प्रजेच्या खाजगी जीवनात जेथे-जेथे सरकारला हस्तक्षेप करण्याची आवश्यकता वाटेल तेथे तेथे हस्तक्षेप करण्याची सरकारला मुभा होती.

### १.१.२.३ व्यापारवादातील इतर विचार

**(i) मूल्यविषयक विचार :** मध्ययुगीन कालखंडात वस्तुमूल्य ठरविण्यासाठी धर्मतत्त्वाचा, नीतितत्त्वाचा व वस्तूच्या अंगभूत मूल्याचा विचार केला जात असे. मध्ययुगात 'न्याय्य किंमत', सूयोग्य किंमत (Just Price) ही वस्तूच्या मूल्याविषयी एक नैतिक-धार्मिक संकल्पना होती. परंतु विनिमय व पैशाचा प्रभाव जसजसा वाढत गेला तसतसी ही कल्पना बदलली. उचित किंमतीची कल्पना बाजारातील प्रत्यक्ष किंमतीपासून वेगळी करण्यात आली. थोडक्यात मूल्य म्हणजे वस्तूचा एक अंगभूत (Intrinsic) गुणधर्म न मानता विनिमयावर अवलंबून असलेला वस्तूबाह्य (Extrinsic) घटक मानन्यात येवू लागला.

व्यापारवाद्यांनी नैसर्गिक मूल्य (सामान्य मूल्य) हे खर्चावर तर बाजारमूल्य हे मागणी व दुर्मिळतेवर अवलंबून असते, असे मत व्यक्त केले. लॉक यांच्या मते, मूल्य ठरविणारा जवळपास एकमेव घटक म्हणजे श्रम हाच आहे. उपयोगिता मूल्याकडून बाजारमूल्याकडे वाटचाल हा व्यापारवादी कालखंडातील महत्त्वाचा बदल होय.

**(ii) विभाजन विषयक विचार :** व्यापारवाद्यांनी विभाजनाकडे दुर्लक्ष केले तरी त्यांच्या लेखनात विभाजन विषयक विचार तुरळकपणे आढळतात. श्रमांची किंमत श्रमिकाने उत्पादन केलेल्या वस्तूवरून ठरते, असे मत त्यांनी व्यक्त केले. वेतनाचे दर कमी राहिले तर उत्पादन खर्च कमी येईल व त्यामुळे वस्तूंची किंमत कमी राहिल. परिणामी निर्यात वाढेल व देश संपन्न बनेल. व्यापारवादी विचारवंतानी व्याजाचे समर्थन केले आहे. भांडवल वृद्धीसाठी बचत वाढली पाहिजे व बचत वाढीसाठी व्याज आवश्यक आहे. मात्र व्याजावर नियंत्रण असावे असे त्यांचे मत होते.

**(iii) कर विषयक विचार :** राज्यसंस्थेपासून प्रत्येक व्यक्तीला ज्या प्रमाणात लाभ मिळतो त्या प्रमाणात त्या व्यक्तीवर कर लादले जावेत असे व्यापारवाद्यांचे मत होते. सर विल्यम पेट्टी यांच्या मते, सार्वजनिक उत्पन्नात भर टाकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे पण त्यासाठी करारोपण करताना व्यक्तिची

मालमत्ता व श्रीमंती, पात्रता यांचा विचार होणे आवश्यक आहे. निर्यातीवर कमी, मात्र चैनीच्या वस्तूंचा उपभोग कमी व्हावा यासाठी आयातीवर कर आकारावेत.

**(iv) लोकसंख्या विषयक विचार :** व्यापारवाद्यांनी लोकसंख्येच्या विपूलतेचा पुरस्कार केला होता. त्यांच्या मते लोकसंख्येतून दोन गोष्टींची उपलब्धता होते. एक म्हणजे विपूल लोकसंख्येमुळे श्रमपुरवठा वाढतो. त्यामुळे कमी खर्चात अथवा वेतनात उत्पादन केले जाते. दुसरी गोष्ट म्हणजे विपूल लोकसंख्येमुळे राष्ट्राला आपल्या लष्करी सामर्थ्यात वाढ करता येते. त्यामुळे युद्धे जिंकण्यासाठी, नवीन वसाहती निर्माण करण्यासाठी लष्कर उपयुक्त ठरते. राष्ट्राला हक्काच्या बाजारपेठा निर्माण होतात व बाजारपेठातून समृद्धी निर्माण होते.

उत्पादन घटक व उत्पादनास मागणी करणारा घटक या दोन्ही अंगांनी लोकसंख्येचा विचार केला. चाईल्ड यांनी 'वाढती लोकसंख्या हेच देशाचे खरे सामर्थ्य होय' असे विधान केले आहे.

**(v) व्यवसायांच्या महत्त्वानुसार क्रम :** चलनाचा वापर व विनिमय प्रधान अर्थव्यवस्थेचा विकास या वैशिष्ट्यामुळे 'व्यापार' या व्यवसायाला त्यानी प्रथम स्थान दिले. त्यांच्या मते, व्यापार हा राष्ट्रातील सर्वश्रेष्ठ व सर्वात अधिक उत्पादक घटक आहे. व्यापारातही त्यांनी देशांतर्गत व्यापारापेक्षा विदेशी व्यापाराला अग्रक्रम दिला. व्यापारवाद्यांनी दुसरा क्रमांक कारागिरांना दिला. त्यांच्या मते, लोकांचे श्रम व कष्टाळूपणा हेच संपत्तीचे उत्पत्तीस्थान होय. व्यापारवाद्यांनी तिसरा क्रमांक शेतीला दिला. शेतीतून लोकांच्या अन्नधान्याची गरज भागते एवढेच त्यांचे मत होते.

वरील सर्व विचार अंमलात आणण्यासाठी व्यापारवाद्यांनी प्रबळ शासनाची आवश्यकता प्रतिपादन केली. त्याशिवाय व्यक्तीचे कल्याण होणे शक्य नाही; यामुळे प्रबळ राज्याची कल्पना पुढे आली.

### १.१.२.४ व्यापारवादी विचारसरणीचे मूल्यमापन

'व्यापारवादी विचारशाखा' ही खरे पाहता एखादी शास्त्रीय विचारशाखा नव्हती. मूल्यमापन करताना त्या विचारांना कोणत्या परिस्थितीची पार्श्वभूमी होती याचा संदर्भ लक्षात घ्यायला हवा. तत्कालीन परिस्थिती ही भांडवलशाहीच्या उदयाचा कालखंड होता. तेव्हा त्या परिस्थितीत त्यांनी मांडलेले विचार योग्य असतील; मात्र पुढील परिस्थितीत ते योग्य ठरतील असे नाही. व्यापारवादी अर्थतज्ज्ञ नव्हते केवळ व्यावहारिक भूमिकेतून त्या काळातील प्रश्न सोडविण्याचा दृष्टीने त्यानी विचार मांडले आहेत. युरोपमधील भिन्न देशातील भिन्न लोकांनी व्यापाऱ्यांनी, राजकारणी लोकांनी त्यांचे धोरण व्यक्त केले आहे. अशा भिन्न-भिन्न विचारवंतांच्या विचारातील समान सूत्र शोधून व्यापारवादी म्हणून नामकरण करण्याचे काम अर्थशास्त्राचा जनक ॲडम स्मिथनेच केले आहे. त्यांनीच व्यापारवादी धोरणावर प्रखर टीकाही केली. व्यापारवादी विचारसरणीतील काही दोष व उणीवा पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **पैसा म्हणजे संपत्ती :** पैसा म्हणजे संपत्ती असा विचार व्यापारवाद्यांनी मांडला. स्मिथच्या मते वस्तू व सेवा म्हणजे संपत्ती होय. पैसा विनिमय माध्यम आहे, साध्य नव्हे. परंतु व्यारवाद्यांनी पैशालाच संपत्ती मानली. म्हणजेच त्यांनी साधनालाच साध्य मानले.

२) **धातूचा कल्याणाशी संबंध :** व्यापारवाद्यांनी सोने व चांदीसारख्या धातूला अतिरेकी महत्त्व दिले. सोन्यासारख्या धातूशी राष्ट्राच्या कल्याणाचा संबंध तर्कशुद्ध वाटत नाही.

३) **विदेशी व्यापाराला सर्वोच्च प्राधान्य :** अनुकूल विदेशी व्यापाराला सर्वोच्च स्थान देताना त्यांनी इतर क्षेत्राला विशेषता शेतीला न्याय दिला नाही.

४) **अनुकूल व्यापारतोल :** परकीय व्यापाराबाबत त्यांची भूमिका योग्य नव्हती. अनुकूल विदेशी व्यापारशेष म्हणजे राष्ट्राचा दीर्घकालीन फायदा हे तत्त्व आज मान्य होत नाही. शिवाय विकसनशील देशांच्या संदर्भात हे तत्त्व अव्यवहार्य आहे.

५) **व्याज :** व्याजाबाबत व्यापारवाद्यांचे विचार स्पष्ट नव्हते. त्यांना असे वाटत होते की, व्याज हा घटक शासनाने निर्धारण करण्याची गोष्ट आहे.

६) **अनियंत्रित राजेशाही :** व्यापारवाद्यांनी राष्ट्र सामर्थ्यवान करण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची आवश्यकता प्रतिपादन केली. मात्र राजाला अथवा सरकारला अमर्याद अधिकार देणे समाजाच्या दृष्टीने अयोग्य आहे.

७) **संरक्षण धोरणाचा अधिकार :** व्यापारवाद्यांनी निर्यात वृद्धीसाठी अनुदान व आयात कमी करण्यासाठी बंधने (जकाती) लादावित असे मत व्यक्त केले. मात्र ॲडम स्मिथने खुल्या व्यापारी धोरणांचा पुरस्कार केला. खुला व्यापार हेच सर्वश्रेष्ठ तत्त्व असून ते सर्वच देशांना फायदेशीर ठरते, असे मत व्यक्त केले.

८) **मूल्य :** व्यापारवाद्यांनी बाजारमूल्याला अधिक महत्त्व दिले मात्र अंगभूत मूल्य ही कल्पना पूर्णपणे विसरू शकले नाहीत.

## १.१.३ सारांश

मध्ययुगीन युरोपमध्ये व्यापारवादाचा उदय होण्यापूर्वी सरंजामशाही अस्तित्वात होती. नगरराज्याच्या कारभारात रोमन कॅथॉलिक चर्चचा प्रभाव होता. या संपूर्णपणे विस्कळीत व परावलंबी रचनेला एकसंघ स्वावलंबी व सशक्त करण्याचा प्रयत्न व्यापारवादाच्या रूपाने झाला. या अर्थाने व्यापारवाद ही मध्ययुगीन व्यवस्थेविरुद्धची प्रतिक्रिया होती. सरंजामशाही अवस्थेला व्यापारी भांडवलशाहीचे रूप देण्याचा व राष्ट्र प्रबळ बनविण्याचा हा प्रयत्न होता. अर्थशास्त्रीय विचाराच्या इतिहासात एक प्रमुख सुवर्ण पायरी म्हणून व्यापारवादाचा उल्लेख करता येईल.

व्यापारवादी विचारवंत राष्ट्राच्या सामर्थ्याचा व त्यासाठी सुबत्तेचा विचार करीत होते. हे सामर्थ्य मिळविण्याचा महत्त्वाचा मार्ग म्हणून मौल्यवान धातूच्या संचयाला त्यांनी अग्रस्थान दिले. त्यासाठी देशात मौल्यवान धातूच्या खाणी असतील तर ठिक नाहीतर आंतरराष्ट्रीय व्यापार हा एकमेव मार्ग त्यांनी स्वीकारला. अनुकूल व्यापारतोल निर्माण करून देशाला सामर्थ्यशील बनवावे असे त्यांचे मत होते. म्हणून तत्कालिन परिस्थितीच्या संदर्भात तसेच काही अंशी आजच्या संदर्भात व्यापारवादी धोरणांचे समर्थन करणे योग्य होईल.

## १.१.४पारिभाषिक शब्दांचे अर्थ

**न्याय किंमत** - योग्य किंमत, न्याय्य किंमत

**वस्तूविनिमय पद्धती** - वस्तूच्या बदल्यात वस्तूची देवाणघेवाण

**भौतिक वस्तू** - जडवस्तू/आपल्या सुख समाधानाच्या वस्तू

**सरंजामदार** - जमीनीचा मालक/जमिनदार

**सार्वभौमत्व** - सर्वंकष सत्ता

## १.१.५स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

**अ) चूक की बरोबर ते सांगा.**

१. मध्ययुगीन काळात वस्तूची किंमत न्याय/धर्मतत्त्वावर ठरली जात होती.

२. कॅथॉलिक पंथीयांनी पैसा व भौतिक वस्तूशी संबंध ठेवला होता.

३. व्यापारवादी विचारसरणी उदयास येण्यास राजकारणी, व्यापारी, उद्योगपती कारणीभूत ठरले.

४. राष्ट्राला सामर्थ्यशाली बनविण्यासाठी मौल्यवान धातूंचा संचय आवश्यक आहे, असे मत व्यापारवाद्यांनी मांडले.

५. अनुकूल व्यापार म्हणजे निर्यात कमी व आयात जास्त होय.

**ब) योग्य पर्याय निवडा.**

१) .......... पंथाने ऐहिक सुखात पैशाला व भौतिक वस्तूला महत्त्व दिले.

(अ) कॅथॉलिक (ब) प्रोटेस्टंट (क) सनातन

२)	.......... विचार हे मध्ययुगीन विचाराविरुद्ध प्रतिक्रिया होय.

(अ) निसर्गवादी	(ब) धार्मिक	(क) व्यापारवादी

३)	व्यापारवाद्यांनी .......... क्षेत्राला सर्वश्रेष्ठ व्यवसायाचा दर्जा दिला.

(अ) व्यापार	(ब) शेती	(क) यंत्रोत्पादन

४)	अनुकूल व्यापारशेष निर्माण करण्यासाठी निर्यातीपेक्षा आयात .......... असली पाहिजे.

(अ) कमी	(ब) जास्त	(क) वाढ

५)	राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या बलवान करण्यासाठी राष्ट्राच्या संपत्तीत पर्यायाने .......... साठा वाढविला पाहिजे.

(अ) अन्नधान्याचा	(ब) मौल्यवान धातूचा	(क) वस्तूंचा

**क)	एका वाक्यात उत्तरे द्या.**

१)	व्यापारवादी विचाराची प्रमुख दोन उद्दिष्टे कोणती ?

२)	विपुल लोकसंख्येचे समर्थन व्यापारवाद्यांनी का केले होते ?

३)	व्यापारवाद्यांच्या मते राष्ट्राची खरी संपत्ती कोणती ?

४)	कॅथॉलिक पंथाची शिकवण कशी होती ?

५)	व्यापारवाद्यांनी व्यवसायाचा क्रम कसा मानला ?

## १.१.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ)**	१) बरोबर	२) चूक	३) बरोबर	४) बरोबर	५) चूक

**ब)**	१) प्रोटेस्टंट	२) व्यापारवादी	३) शेती	४) कमी	५) मौल्यवान धातूचा

**क)**	१) राष्ट्राला आर्थिकदृष्ट्या सामर्थ्यशाली करणे व संपत्ती संचयासाठी अनुकूल व्यापारतोल निर्माण करणे.

२) विपुल लोकसंख्येमुळे श्रमसंख्या वाढते व राष्ट्राचे लष्करी सामर्थ्य वाढविता येते.

३) पैसा किंवा मौल्यवान धातू (सोने, चांदी) हीच राष्ट्राची खरी संपत्ती होय.

४) व्यक्तीने भौतिक सुखापासून व पैशापासून दूर राहावे अशी शिकवण या पंथाची होती.

५) सर्वोत्तम व्यापार, मध्यम कारागिर व कनिष्ठ शेती व्यवसाय असा क्रम लावला.

## १.१.७ सरावासाठी स्वाध्याय

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. व्यापारवाद म्हणजे काय ते सांगून व्यापारवादाची पार्श्वभूमी स्पष्ट करा.

२. व्यापारवादी विचारांची वैशिष्ट्ये सांगा.

३. व्यापारवाद म्हणजे काय ? व्यापारवादी विचाराचे मूल्यमापन करा.

**ब) टीपा लिहा**

१. व्यापारवादी विचाराची वैशिष्ट्ये

२. उद्योग व्यापारावर नियंत्रण व अनुकूल व्यापार तोल.

## १.१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. अर्थशास्त्रीय मतप्रणालीचा इतिहास - डॉ. श्री. वि. खांदेवाले, प्रा. सौ. अमरजा नेरूरकर

२. आर्थिक विचारांचा विकास - डॉ. विजय कविमंडन

३. आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा. ए. आर. रायखेलकर

# १.१ (ब) : निसर्गवाद

अनुक्रमणिका


१.० उद्दिष्टे

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ निसर्गवाद

१.२.२ निसर्गवादातील प्रमुख विचार

१) निसर्गव्यवस्था

२) शेतीचे श्रेष्ठत्व / निव्वळ उत्पादन

३) संपत्ती संचलनाचा आराखडा

४) निसर्गवादातील इतर विचार

१.३ सारांश

१.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

१.५ स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न

१.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.७ सरावासाठी स्वाध्याय

१.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


## १.० उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला :

- निसर्गवाद म्हणजे काय ते समजेल.
- निसर्गवादी विचाराची पार्श्वभूमी समजेल.

- निसर्गवाद्यांची निसर्गव्यवस्था ही कल्पना स्पष्ट होईल.
- निसर्गवादातील शेतीचे महत्त्व किंवा निव्वळ उत्पादन ही कल्पना अधिक स्पष्ट होईल.
- डॉ. क्वेनेचा आर्थिक आराखडा लक्षात येईल.
- निसर्गवादी विचाराची धोरणे समजतील
- निसर्गवादी विचाराचे महत्त्व स्पष्ट करता येईल.

## १.१ प्रास्ताविक

व्यापारवादी विचारसणीचा प्रभाव युरोपमधील अनेक देशांत दीर्घकाळ टिकून राहिला. त्याचा फायदा इंग्लंड सारख्या राष्ट्राला झाला. मात्र फ्रान्ससारख्या राष्ट्राचे नुकसान झाले. श्री. कोलबर्ट, फ्रान्सचा अर्थमंत्री हा व्यापारवादी तत्त्वाचा पुरस्कर्ता होता. त्याने व्यापारवादी तत्त्वाचा स्वीकार केल्यामुळे शेतीकडे दुर्लक्ष झाले. परिणामी, फ्रान्सच्या अर्थव्यवस्थेची दुरावस्था झाली. व्यापारवादी तत्त्वे आपल्या देशाला निरुपयोगी आहेत. त्याचा त्याग केला पाहिजे, याची जाणीव फ्रान्मधील विचारवंतांना झाली. त्यामुळे व्यापारवादाविरुद्ध विचार मांडण्यात येवू लागले.

निसर्गवादी विचाराची सुरुवात १८ व्या शतकाच्या मध्यकाळापासून झाली. अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने शेती व्यवसाय सर्वाधिक महत्त्वाचा आहे, असे मानणाऱ्या या विचाराला ॲडम स्मिथने 'कृषिवादी संप्रदाय' असे नाव दिले. ज्याप्रमाणे व्यापारवाद ही मध्ययुगीन रचनेविरुद्धची प्रतिक्रिया होती त्याचप्रमाणे निसर्गवाद ही व्यापारवादाविरुद्ध प्रतिक्रिया होती.

**निसर्गवादाची पार्श्वभूमी आणि उदय**

फ्रान्समधील विचारवंतानी निसर्गवादी तत्त्वज्ञानाची उभारणी केली. त्यात प्रामुख्याने डॉ. क्वेने, तुर्गो, मिराबु, रिव्हियर या सारख्या विचारवंतांचा समावेश होता. १८ व्या शतकाच्या सुरुवातीला जी परिस्थिती फ्रान्समध्ये होती ती निसर्गवादाच्या उदयाला कारणीभूत ठरली. तत्कालीन फ्रान्सचा अर्थमंत्री कोलबर्ट याने व्यापारवादी तत्त्वे, धोरणे प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे फ्रान्सच्या शेतीचे नुकसान झाले. व्यापारवादी निती फ्रान्समध्ये निष्फळ ठरली. या अपयशी धोरणामुळे निसर्गवादी विचार पुढे आले. एखादी वाकलेली काठी सरळ करण्यासाठी ती जशी उलट बाजूने तितकीच वाकवावी लागते, त्या नियमानुसार व्यापारवाद्यांच्या निर्बंधाच्या विचारसरणीला उत्तर म्हणून संपूर्ण निर्हस्तक्षेपाचे तत्त्व पुढे आणले.

फ्रेंच सरकारची तत्कालीन कर पद्धती अन्यायकारक होती. राजांच्या विलासीवृत्तींमुळे व युद्ध खर्चामुळे प्रचंड खर्च होत असे. हा खर्च भागविण्यासाठी शेतकरी व सामान्य वर्गावर अवाजवी, अन्यायकारक कर लादल्यामुळे लोकांच्यात असंतोष वाढला. १८ व्या शतकात फ्रान्सची आर्थिक स्थिती अतिशय खालावलेली होती. शेतकऱ्यांची दुरावस्था होती. डॉ. क्वेने यानी असे मत मांडले की, शेती हे संपत्ती निर्मितीचे साधन

असल्यामुळे शेतीच्या विकासावरच फ्रान्सचा विकास होवू शकतो. याच काळत फ्रेंचमध्ये वैचारिक क्रांतीचे वारे वाहू लागले. त्यामुळे फ्रान्समध्ये अनियंत्रित राजेशाहीचा अस्त झाला. व्यक्तिस्वातंत्र्य, समता व न्यायाच्या तत्त्वावर नवीन समाज निर्माण करण्याच्या कल्पनेचा जोर वाढू लागला. १७५६ ते १७७६ हा निसर्गवादाच्या प्रभावाचा कालखंड मानला जातो. निसर्गवादाचे प्रणेते डॉ. क्वेने यांच्या १७५६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या शेतीविषयक लेखाबरोबर निसर्गवादाची सुरुवात झाली असे मानले जाते.

## १.२ विषय विवेचन

**निसर्गवाद (Physiocracy)**

निसर्गवाद ही खऱ्या अर्थाने एक विचारशाखा होती. निसर्गवादाचा अभ्यास करताना निसर्गवादाची तात्त्विक बैठक पाहणे आवश्यक ठरते. व्यापारवादाचा प्रभाव १८ व्या शतकाच्या मध्यापर्यंत टिकून राहिला. मात्र फ्रेंच विचारवंतांच्या प्रयत्नामुळे आर्थिक क्षेत्रात एक नवीन विचारप्रणाली उदयास आली. त्यांच्या मते निसर्गनियमानुसार चालणारी व्यवस्था आदर्श असते.

**निसर्गवादाची व्याख्या**

निसर्गवादाच्या व्याख्या अभ्यासल्यानंतर निसर्गवादाचे खरे स्वरूप काय आहे हे सहज समजू शकते.

अ) ''निसर्गवाद म्हणजे नैसर्गिक व्यवस्थेचे किंवा नैसर्गिक पद्धतीचे शास्त्र होय,'' अशी व्याख्या ड्यूपाँट दमूर यांनी केली आहे.

ब) ''निसर्गवाद म्हणजे फ्रेंचांनी व्यापारवादाविरुद्ध उभारलेले बंड होय,'' अशी व्याख्या प्रा. एल. एच्. हॅने यांनी केली आहे.

वरील व्याख्यावरून पुढील गोष्टी स्पष्ट होतात.

- फ्रेंच लोकांनी व्यापारवादाविरुद्ध उभारलेले वैचारिक बंड होय.
- निसर्गवाद हे नैसर्गिक नियमांचे अथवा व्यवस्थेचे पालन करणारे शास्त्र होय.

### २.२.२ निसर्गवादातील प्रमुख विचार

निसर्गवादी विचारसरणीचे प्रमुख विचार किंवा तत्त्वे डॉ. क्वेने यांच्या ग्रंथात आढळतात. डॉ. क्वेने यांच्या अनुयायांनी त्या विचारांचा व तत्त्वांचा विकास व प्रचार केला. ती तत्त्वे पुढीलप्रमाणे - (१) निसर्गव्यवस्था (२) शेतीचे श्रेष्ठत्व वा निव्वळ उत्पादन (३) संपत्तीचा आराखडा.

## १) नैसर्गिक व्यवस्था (Natural Order)

निसर्गवादाला नैसर्गिक व्यवस्थेचे शास्त्र मानले जात असल्यामुळे त्यांची ही संकल्पना मध्यवर्ती स्वरूपाची आहे. या मध्यवर्ती कल्पनेवर सर्व निसर्गवाद्यांचा प्रचंड विश्वास होता. या कल्पनेला तत्कालीन तत्त्ववेत्यांचा प्रामुख्याने रुसोच्या विचाराचा प्रभाव दिसून येतो. या जगात निरनिराळ्या घटकांची एक आदर्श व्यवस्था असते व तिचे नियम निसर्गाने किंवा ईश्वराने केलेले असतात; हीच निसर्गव्यवस्था (Natural Order) होय. ती अतिशय पवित्र व शाश्वत आहे. मानवजातीच्या सुखासाठी ती ईश्वराने निर्माण केली आहे. अर्थात निसर्गव्यवस्था सुरक्षित ठेवणारे नैसर्गिक नियम देवानेच केलेले असल्यामुळे ते बदलणारे नसतात. शेवटी प्रत्येकाचा प्रयत्न हाच असतो की सुख मिळायला हवे मग निसर्गव्यवस्था जर त्यासाठीच आहे तर तिच्या नियमामध्ये हस्तक्षेप करण्याची गरज नाही.

Physocratie या फ्रेंच शब्दाची उत्पत्ती ग्रीक शब्दापासून झाली आहे. त्याचा अर्थ 'निसर्गसत्ता किंवा निसर्गाचे राज्य' असा होतो. मानवी जीवन सुखी करण्यासाठी निसर्गसत्ता कार्यरत असते. त्यामुळे निसर्गव्यवस्था सर्वव्यापी व अपरिवर्तनीय असते. त्यांच्या मते निसर्गव्यवस्थेमुळे समाज जीवनाचे सुरळीतपणे नियमन होत असल्यामुळे राज्यसंस्थेने नागरी जीवनावर बंधने घालू नयेत. त्यांच्या मते, नियम दोन प्रकारचे असतात (i) नैसर्गिक नियम (ii) मानवी नियम.

**(i) नैसर्गिक नियम :** जे नियम ईश्वराने निर्माण केले आहेत ते नैसर्गिक नियम होत. संपूर्ण सृष्टीचा एक भाग म्हणून निसर्ग नियम हे प्रथम दर्जाचे आहेत. मनुष्यही त्याच सृष्टीचा भाग असल्याने त्यालाही हे नियम लागू आहेत. निसर्गनियम सृष्टीच्या कल्याणासाठी व मानवी सुखासाठी आहेत. म्हणून या नियमामध्ये शक्यतो हस्तक्षेप करू नये असे निसर्गवाद्यांनी म्हटले आहे. निसर्गवादी विचारवंत रिव्हियर असे म्हणतो की, ''नियम बनविण्याचे काम ईश्वराने इतर कोणाकडेही सोपविले नाही. शासनाचे काम इतकेच की निसर्गाचे नियम ओळखून त्यांचे पालन करून घ्यावे. त्यापलीकडे जाण्याचा प्रयत्न म्हणजे विनाशाला आमंत्रण होय.''

**(ii) मानवी नियम :** मानवी नियमही निसर्ग नियमानुसार तयार केलेले असतात. मात्र ते दुय्यम दर्जाचे होत. शासनाने मानवी हितासाठीच काही नियम व कायदे केलेले असतात. त्याचे पालन मानवाने करावे. शासनाने लोकांच्या जीविताचे रक्षण करावे. स्वातंत्र्य व मालमत्ता यांचे रक्षण करावे. निसर्ग नियमाला जुळणारी सामाजिक व्यवस्था निर्माण करावी. अन्यथा लोकांना हाल-अपेष्टा सहन कराव्या लागतील.

## निसर्गव्यवस्थेची आर्थिक बाजू व पैलू

निसर्गव्यवस्थेतून कोणती आर्थिक बाजू प्रतिबिंबित होते हा महत्त्वाचा भाग आहे. त्या काळात युरोपातील राष्ट्रांमध्ये व्यापारवादी धोरणामुळे शासकिय नियंत्रणाचा अतिरेक होवून व्यक्तीस्वातंत्र्य मर्यादित झाले होते. या विरुद्धची प्रतिक्रिया म्हणून नैसर्गिक व्यवस्थेतून निर्हस्तक्षेपाचे आणि व्यक्तीवादाचे तत्त्व समोर आले. निसर्गवाद्यांनी व्यक्ती स्वातंत्र्यावर भर दिला. मात्र व्यक्तिस्वातंत्र्याचा गैरवापर होत असेल तर

शासनाने हस्तक्षेप करावा; ही गोष्ट निसर्गवाद्यांना मान्य होती. तथापि, व्यक्तीचे हित आणि समाजाचे हित यामध्ये विसंगती असू शकत नाही यावर त्यांचा विश्वास होता.

नैसर्गिक व्यवस्थेतून निसर्गवाद्यांचे व्यावहारिक धोरणही स्पष्ट होते. फ्रान्समध्ये वाढलेल्या दारिद्र्याची कारण मीमांसा त्यांनी केली. त्यांच्या मते, ''शेतकरी दरिद्री असल्यामुळे राज्य गरीब राहील व राज्य गरीब असल्यामुळे राजासुद्धा गरीब राहील.'' या दुरावस्थेचा उपाय म्हणजे नैसर्गिक नियमांचे पालन हाच होय. त्याच्या मते, नैसर्गिक व्यवस्था ही ईश्वरनिर्मित असून तिची माहिती करून घेणे हे मानवाचे प्रथम कर्तव्य आहे. त्यानुसार आचरण करणे हे दुसरे कर्तव्य होय.

**निसर्गव्यवस्था या तत्त्वाचे परीक्षण**

निसर्गवाद्यांनी मांडेलेली निसर्ग व्यवस्थेची कल्पना आदर्श व उपयुक्त वाटत असली तरी ती परिपूर्ण वाटत नाही. ॲडम स्मिथने जरी या कल्पनेला पाठिंबा दिला असला तरी या तत्त्वावर अर्थतज्ज्ञांनी पुढील प्रमाणे टीका केल्या आहेत.

१) **काल्पनिक कल्पना :** निसर्गवाद्यांनी निसर्गव्यवस्थेचे केलेले वर्णन स्वप्नवत वाटते. परमेश्वराचे चिंतन, मनन केल्याने निसर्गव्यवस्थेची कल्पना समजू शकते; असे निसर्गवादी सांगतात. परंतु परमेश्वराच्या अस्तित्वाचा निश्चित असा आधार नाही. त्यामुळे परमेश्वरावर विसंबून राहण्याची कल्पना अनाकलनीय वाटते.

२) **व्यक्तिहित आणि समाजहित यांच्यात संघर्ष :** निसर्गवाद्यांनी व्यक्तिहित आणि समाजहित यांच्यात संघर्ष नसतो, असे मत मांडले आहे. मात्र प्रत्यक्षात व्यक्ती आणि समाज अथवा व्यक्ती आणि व्यक्ती यांच्यात हितसंबंधावर आधारित संघर्ष अथवा विसंगती चालू असते, याकडे त्यांचे दुर्लक्ष झाले.

३) **निसर्ग नियमावर अवास्तव श्रद्धा :** निसर्गवाद्यांच्या मते निसर्ग नियम मानवी हिताचे आहेत. प्रत्येकाला स्वत:चे हित कशात आहे हे समजते. जर सर्वांना स्वहित समजत असेल तर सर्वांनी आपले हित साध्य करून घेतले असते आणि त्यामुळे समाजात दु:खेच राहिली नसती.

४) **शासनाचे स्वरूप :** एका बाजूने व्यक्तिस्वातंत्र्याचे समर्थन व निर्हस्तक्षेपाचा पुरस्कार करताना निसर्गवाद्यांनी राजेशाहीचे समर्थन केले आहे. राजा देवाचा प्रतिनिधी असून निसर्गनियमाची अंमलबजावणी करणारा असतो. परंतु राजेशाही जुलमी व अन्यायी असते. मुळात 'उदात्त राजेशाही'ची कल्पना अव्यवहार्य आहे.

थोडक्यात, निसर्गवाद्यांच्या निसर्गव्यवस्थेवर वरीलप्रमाणे टीका केल्या गेल्या तरी या कल्पनेचे महत्त्व मान्य करावेच लागते. कारण निसर्गवाद्यांनी, व्यापारवाद्यांनी मांडलेल्या नियंत्रण तत्त्वाला, त्याच्या हस्तक्षेपाच्या धोरणाला विरोध केला. एवढेच नव्हे तर व्यक्तिस्वातंत्र्याचा पुरस्कार केला.

## २) शेतीचे श्रेष्ठत्त्व (Primacy of Agriculture)

### निव्वळ उत्पादन (Net Product)

निसर्गवाद्यांनी मांडलेली ही दुसरी महत्त्वाची कल्पना आहे. निसर्गवाद म्हणजे व्यापारवादाविरुद्ध निर्माण झालेली प्रतिक्रिया होय. त्यामुळे व्यापारापेक्षा निसर्गवाद्यांनी शेतीला महत्त्वाचे स्थान दिले. त्यांच्या मते निसर्गाच्या सहकार्याने चालणाऱ्या शेतीक्षेत्रातच निव्वळ उत्पादन शक्य आहे. शेतीमुळेच राष्ट्राच्या संपत्तीत वाढ होते.

निव्वळ उत्पादनाची संकल्पना स्पष्ट समजावून घेण्यासाठी त्यांची निव्वळ उत्पादनाची व्याख्या समजावून घेणे आवश्यक आहे. सामान्यत: उपयोगिता आणि मूल्य यांची निर्मिती म्हणजे उत्पादन असे आपण समजतो. मात्र निसर्गवादी विचारवंताच्या मते, ''उत्पादन म्हणजे वाढाव्याची निर्मिती.'' ज्या निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तूपेक्षा तयार होणारा माल जास्त असतो व पर्यायाने राष्ट्राच्या संपत्तीत भर पडते तो व्यवसाय खऱ्या अर्थाने उत्पादक व्यवसाय होय.


**(Production means creations of surplus)**

### शेती हा एकमेव उत्पादक व्यवसाय

निसर्गवाद्यांच्या मते, शेती हाच एकमेव व्यवसाय असा आहे की जो आधिक्य निर्माण करू शकतो. कारण शेती व्यवसायात श्रमिकाबरोबर निसर्गसुद्धा काम करतो. निसर्गकृपेमुळे शेती व्यवसायात इतके उत्पादन निघते की जे श्रमिकांना तर पूरतेच शिवाय समाजातील इतर वर्गाना जगवू शकते. या ठिकाणी शेती म्हणजे केवळ शेती लागवड नसून मासेमारी, खाण उद्योग व इतर व्यवसायाचा समावेश होतो. शेतीतून शेतकऱ्यांच्या गरजेपेक्षा जास्त उत्पादन होते. म्हणूनच व्यापाराची व उद्योगाची वाढ होते.

निसर्गवाद्यांनी शेतीचे श्रेष्ठत्व इतके मान्य केले की त्यानी इतर सर्व व्यवसायाला अनुत्पादक व्यवसाय मानले. कारण तेथे आधिक्य निर्माण होत नाही. व्यापार व कारखानदारी हे वस्तूचे हस्तांतर वा रूपांतर करण्यापुरतेच मर्यादित कार्य करतात. नवीन संपत्ती निर्माण होत असताना किंवा उत्पादन होत असताना अस्तित्वात असलेल्या संपत्तीचा काही भाग नष्ट होत असतो. एकूण उत्पादनातून नष्ट झालेली संपत्ती वजा केली असता जी संपत्ती किंवा उत्पादन राहते ते म्हणजे निव्वळ उत्पन्न होय. अशा प्रकारचे निव्वळ उत्पन्न फक्त शेती व्यवसायातच प्राप्त होते. व्यापारात अथवा कारखानदारीत मुळ मालाच्या किंमतीत वाढ होते. मात्र ती श्रमाच्या व भांडवलाच्या मोबदल्या इतकीच असते. उदाहरणार्थ, सुताराने लाकडापासून खूर्ची तयार केली. शेतीत मात्र तसे होत नाही. तर शेतात मूठभर पेरले तर पोतेभर उगवते. त्यांच्या मते उद्योग व्यापार हे व्यवसाय मूल्यांची बेरीज करतात. मूल्यांची निर्मिती करीत नाहीत. हे मत स्पष्ट करण्यासाठी बेरीज म्हणजे गुणाकार नव्हे'' अशी प्रभावी शब्दरचना त्यांनी केली आहे.

खालील आकृतीद्वारे निव्वळ उत्पादनाची संकल्पना अधिक स्पष्ट होईल.




वरील आकृतीत OX शेती हा उत्पादक घटक मोजलाआहे. OY अक्षावर उत्पन्न व खर्च मोजला आहे. शेतीतील एकूण उत्पादन OPN इतके आहे. सरासरी खर्च OC इतका आहे. उत्पादनाचा एकूण खर्च OCDN इतका आहे. त्यामुळे निव्वळ उत्पादन CPD (OPN-OCDN) इतके आहे. निसर्गवाद्यांच्या मते शेती हाच उत्पादक व्यवसाय आहे कारण तो वाढाव्याची निर्मिती करतो.

एकंदरीत निसर्गवाद्यांनी शेतीला एकमेव उत्पादक व्यवसाय म्हणून सर्वश्रेष्ठ स्थान दिले. त्यांच्या मते, संपूर्ण राष्ट्राची सुबत्ता शेतीवर अवलंबून आहे. त्यामुळे शेतीत जास्तीत जास्त भांडवल गुंतवणूक करून जास्तीत जास्त आधिक्य निर्माण करावे. सरकारचे धोरणसुद्धा त्याला अनुसरूनच असावे. शेतीवर लावले जाणारे कर शक्यतो कमी असावेत (व्यापारवादी काळात ते जास्त होते) निसर्गकृपेमुळे शेतीतूनच 'निव्वळ उत्पादन' शक्य असते. निसर्गवादी विचारवंत ड्युपॉ म्हणतात, ''मनुष्यजातीचे वैभव हे जास्तीत जास्त निव्वळ उत्पादनाशी निगडीत आहे.''

निसर्गवाद्यांनी शेतीचे श्रेष्ठत्व मान्य करून उद्योग व्यापाराला अनुक्रमे मध्यम व कनिष्ठ दर्जा दिला. उद्योग व व्यापार नफा मिळवितात. नफा निर्माण करीत नाहीत. शेती व्यवसायात निर्माण होणारी संपत्ती इतर व्यवसायात खेचून आणण्याचे काम व्यापारी व उद्योगपती करतात. उद्योगात कच्च्या मालाचे रूपांतर पक्क्या मालामध्ये केले जाते. व्यापारातसुद्धा इकडील माल तिकडे व तिकडील माल इकडे आणला जातो. त्यामुळे उत्पन्न मिळते पण वाढावा नाही. म्हणून हा व्यवसाय अनुत्पादक व व्यवसायात गुंतलेले श्रमसुद्धा अनुत्पादक होत.

**मूल्यमापन**

फ्रान्समधील तत्कालीन परिस्थितीचा विचार करता व्यापारवादी विचाराविरुद्ध झालेली प्रतिक्रिया अतिशय तीव्र होती. व्यापारवाद्यांनी वाणिज्य व्यवसाय श्रेष्ठ मानून शेतीला कनिष्ठ स्थान दिले तर निसर्गवाद्यांनी शेतीला श्रेष्ठ मानून व्यापाराला कनिष्ठ स्थान दिले. यातून त्यांनी मांडलेले विचार एकांगी व सदोष आहेत हे पुढीलप्रमाणे सांगता येईल.

१) **उत्पादनाची सदोष व्याख्या :** निसर्गवाद्यांनी उत्पादन म्हणजे वाढाव्याची निर्मिती असे सांगितले. परंतु आज आपण उत्पादन म्हणजे उपयोगितेची निर्मिती अशी व्याख्या करतो.

२) **शेतीव्यतिरिक्त इतर व्यवसाय अनुत्पादक समजणे चुकीचे :** निसर्गाचा प्रभाव असतो म्हणून केवळ शेतीला उत्पादक व्यवसाय मानून इतर व्यवसायाला व त्यातील श्रमिकांना अनुत्पादक मानणे चुकीचे आहे. वास्तविक शेती, उद्योग व व्यापार हे एकमेकावर अवलंबून असून परस्परपूरक आहेत.

३) **निव्वळ उत्पादन ही भ्रामक कल्पना :** निव्वळ उत्पादनाची कल्पना मांडताना एकूण उत्पादन खर्च व तयार मालाचे मूल्य यातील आंतर म्हणजे निव्वळ उत्पादन असे त्यांनी मांडले. टीकाकारांच्या मते, जगात कशाचीही निर्मिती होत नाही आणि कशाचाही नाश होत नाही. परंतु एका प्रकारच्या शक्तीचे दुसऱ्या प्रकारच्या शक्तीत केवळ रूपांतर होत असते. उदाहरणार्थ, जसे ढगांचे रूपांतर पावसात होते.

४) **किंमतीचा प्रश्न :** आधिक्याची निर्मिती शेतीमधून होते असे समजल्यास ज्यावेळी बाजारात धान्यांची किंमत कमी होते तेव्हा ते आधिक्य नष्ट होईल त्याचे काय? आधिक्य निश्चित होण्यासाठी बाजाराचा प्रभाव नाकारता येत नाही व तो मान्य केल्यास इतर क्षेत्रातही आधिक्य निर्माण होवू शकते हे मानावे लागेल.

थोडक्यात, निसर्गवाद्यांनी मांडलेल्या कल्पनेत दोष असले तरीही ती कल्पना निरुपयोगी आहे असे म्हणता येत नाही. या कल्पनेमुळे अनेक नवीन विचाराला चालना मिळाली. परराष्ट्रीय व्यापार वाढवून परदेशातून संपत्ती मिळविण्यापेक्षा देशातील उत्पादन वाढवून संपत्ती मिळविणे जास्त महत्त्वाचे आहे.

**संपत्ती संचालनाचा आराखडा (Tableau Economique)**

**संपत्तीचे वितरण (The Circulation of wealth)**

**डॉ. क्वेनेचा आर्थिक तक्ता**

समाजातील सर्व संपत्तीचे उत्पादन शेतीत होत असते. हे निसर्गवाद्यांच्या निव्वळ उत्पादनाच्या कल्पनेचे सार होते. प्रसिद्ध निसर्गवादी अर्थतज्ज्ञ डॉ. क्वेने (Quesney) यांनी संपत्तीच्या संचलनाची कल्पना मांडली व हे स्पष्ट करण्यासाठी एक तक्ता किंवा आराखडाच तयार केला. १७५८ मध्ये त्याने तो तक्ता फ्रान्सचा राजा १५ वा लुई यांना सादर केला.

डॉ. क्वेने यांनी आकडेवारीच्या साहाय्याने संपत्तीचा प्रवाह समाजातील भिन्न वर्गात फिरून शेतकऱ्याकडेच परत कसा येतो याचे सविस्तर वर्णन केले. मिरॉब्यूच्या मते, ''जगात तीन महान शोध लागले - १) लेखनकलेचा २) पैशाचा ३) क्वेनेचा आराखडा.''

संपत्तीच्या संचलनामागील मुलभूत कल्पना अशी आहे की, ज्याप्रमाणे मानवी शरीरात रक्ताचे संचलन चालू असते आणि त्यामुळे शरीराचे स्वास्थ्य व कार्यक्षमता टिकून राहाते; त्याचप्रमाणे राष्ट्रात संपत्तीचे संचलन होत असल्याने राष्ट्र किंवा समाज कार्यक्षम राहू शकतो. एवढेच नव्हे तर आपल्या शरीरात रक्ताचे संचलन एखाद्या ठिकाणाहून सुरू होते व ते शरीरात फिरून पुन्हा येवून रक्ताच्या संचलनाची सुरुवात झालेली असते तेथेच येवून मिळते. त्याचप्रमाणे शेतीमध्ये जी संपत्ती निर्माण होते ती समाजातील विविध वर्गात फिरून पुन्हा शेतीत येवून मिळते. हे स्पष्ट करण्यासाठी डॉ. क्वेने यांनी समाजातील तीन वर्ग विचारात घेतले आहेत.

### समाजाची विभागणी तीन वर्गात

१) **उत्पादक वर्ग :** या वर्गात शेतीमध्ये काम करणाऱ्या शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला. शेती व्यवसाय उत्पादक असल्याने शेतकरी उत्पादक श्रम होत. या व्यतिरिक्त कोळी, खाणीमध्ये काम करणारे कामगार यांचाही समावेश उत्पादक वर्गात केला आहे.

२) **जमीनदार वर्ग :** हा अंशत: उत्पादक वर्ग होय. या वर्गाने जमिनीच्या विकासासाठी व लागवडीयोग्य करण्यासाठी श्रम व पैसा खर्च केला आहे.

३) **अनुत्पादक वर्ग :** या वर्गात व्यापारी, उद्योगपती, कारागिर, मजूर आणि इतर व्यवसायिकांचा समावेश केला आहे. हा वर्ग उत्पादक नाही कारण आधिक्याची निर्मिती होत नाही.

प्रतिवर्षी देशातील शेती व्यवसायापासून जो संपत्तीचा ओघ निर्माण होतो तो समजातील इतर वर्गापर्यंत पोहोच होतो व पुन्हा जेथून निर्माण झाला त्याच ठिकाणी परत येतो. याचा अर्थ संपत्तीचा चक्राकार प्रवाह निसर्गवाद्यांनी स्पष्ट केला आहे.

### आर्थिक तक्ता अथवा संपत्तीचे संचलन

राष्ट्रात निर्माण होणाऱ्या संपत्तीचे समाजातील विविध वर्गात कसे वितरण होते; या बाबत डॉ. क्वेने यांनी आर्थिक तक्ता किंवा संपत्तीच्या संचालनाचा आराखडा मांडला. शेतीतील उत्पादन मुख्यत: जमीनदार वर्गामुळे शक्य होते असे क्वेने मानतात. कारण या वर्गाने जमीन लागवडी लायक करण्यासाठी मुळात परिश्रम घेतलेले असतात. समजा समाजातील उत्पादक वर्गांनी म्हणजे शेतकऱ्यांनी ५ कोटी रुपयांची संपत्ती निर्माण केली यापैकी २ कोटी रुपये शेतकरी वर्ग स्वत:च्या व गुराढोरांच्या उपजीविकेसाठी व पुढील वर्षांच्या बियाण्यासाठी बाजूला ठेवतो. परिणामी, या रक्कमेचा उपयोग संचलनासाठी होणार नाही. उरलेले ३ कोटी रुपयाचा समावेश संचलनासाठी करता येईल.

उत्पादक वर्ग स्वत:जवळ उरलेल्या ३ कोटी रुपयापैकी २ कोटी खंड व कर रूपाने जमीनदाराला देईल व १ कोटी रुपयाचे अनुत्पादक वर्गाकडून शेतीला लागणारे साहित्य, औद्योगिक वस्तू खरेदी करेल. अशा रितीने संपत्तीचे वितरण पुढीलप्रकारे होईल.

२ कोटी उत्पादक वर्ग + २ कोटी जमीनदार वर्ग + १ कोटी अनुत्पादक वर्ग.

संपत्ती वितरणाच्या तिसऱ्या टप्प्यात जमीनदाराकडे २ कोटी रुपये खंड व कररूपाने आलेली आहे. यापैकी १ कोटी रुपये तो आपल्यासाठी आवश्यक असलेले धान्य शेतकऱ्याकडून खरेदी करेल व राहिलेले १ कोटी रुपये अनुत्पादक वर्गाकडून कापड, साखर, औद्योगिक माल खरेदी करेल. त्यामुळे जमीनदाराकडे काहीच शिल्लक राहणार नाही. त्यामुळे संपत्तीची विभागणी पुढीलप्रमाणे होईल. उत्पादक वर्ग ३ कोटी रुपये + जमीनदार ० कोटी रुपये + अनुत्पादक वर्ग २ कोटी रुपये.


संपत्ती वितरणाच्या चौथ्या टप्प्यात अनुत्पादक वर्गाकडे २ कोटी रुपये रक्कम जमा आहे. या २ कोटी पैकी १ कोटी रुपयाचे तो शेतकऱ्याकडून धान्य खरेदी करेल व १ कोटी रुपयाचा कच्चामाल उत्पादक वर्गाकडून खरेदी करेल. परिणामी, अनुत्पादक वर्गाकडे आता काहीच शिल्लक नाही. म्हणजेच संपत्तीचे वितरण पुढीलप्रमाणे होईल. उत्पादक वर्ग ५ कोटी + जमीनदार ० कोटी + अनुत्पादक वर्ग ० कोटी.

संक्षिप्त रुपाने आर्थिक तक्ता पुढीलप्रमाणे :

| अवस्था/टप्पा | उत्पादक वर्ग | जमीनदार वर्ग | अनुत्पादक वर्ग |
|---|---|---|---|
| I | ५ कोटी | ० | ० |
| II | २ कोटी (स्वत:साठी) | २ कोटी (खंड/कर) | १ कोटी (व्यापारी वस्तू) |
| | १ कोटी | | १ कोटी |
| III | ३ कोटी | ० कोटी | २ कोटी |
| | २ कोटी | | |
| IV | ५ कोटी | ० कोटी | ० कोटी |

वरील प्रमाणे संपत्तीचे संचलन होत असते. उत्पादक वर्गाकडे पुन्हा ५ कोटी जमा होतील. म्हणजेच संपत्ती ज्या वर्गाने तयार केली तेथून ती समाजातील इतर वर्गात फिरून पुन्हा ज्या वर्गाने तयार केली त्या वर्गाकडे परत येते. त्यामुळे हा तक्ता नागमोडी वक्र म्हणूनही ओळखला जातो.

वरील कोष्टक पुढील आकृतीच्या स्वरूपातही स्पष्ट करता येते.




वरील प्रमाणे संपत्तीचा चक्राकार प्रवाह सतत चालू असतो, असे डॉ. क्वेने यांनी स्पष्ट केले आहे.

**मूल्यमापन**

डॉ. क्वेने यांनी मांडलेली संपत्तीच्या संचलनाची कल्पना महत्त्वाची असली तरी ती इतकी सरळ सोपी नाही; तर गुंतागुंतीची आहे. तार्किक आधारावर ती अजिबात टिकत नाही.

१) **काल्पनिक तक्ता :** या तक्त्याद्वारे किती संपत्ती निर्माण होते, प्रत्येक वर्गाचा वाटा कसा ठरतो; याची चर्चा नाही. केवळ काल्पनिक हिस्सा ठरविला आहे; म्हणून वास्तव वाटत नाही.

२) **वर्गवारी चुकीची :** निसर्गवाद्यांनी समाजाची वर्गवारी तीन वर्गात केली आहे. ज्यात जमीनदाराना उत्पादक वर्ग म्हटले आहे. वास्तविक तो उत्पादनात कोणतीच भर घालीत नाही. या उलट कारखानदार, कारागिरी याना अनुत्पादक वर्गात टाकले आहे. वास्तविक हा वर्ग उत्पादनात भर टाकतो. जमीनदारासारख्या परोपजीवी वर्गाला मानाचे स्थान व मेहनत, कष्ट करणाऱ्या कामगाराला अनुत्पादक मानले आहे.

३) **किंमतीतील बदलाचा विचार नाही :** निसर्गवाद्यांनी किंमतीतील बदलाचा व नैसर्गिक आपत्तीचा विचार केला नाही.

४) **श्रमाला महत्त्व दिले नाही :** श्रमिकाला महत्त्व न देता निसर्गाला महत्त्व देवून त्यांनी श्रमिकाला कमी लेखले आहे.

थोडक्यात, निसर्गवादी विचारवंतानी मांडलेल्या या कल्पनेमुळे पुढे श्रममूल्य सिद्धांताला व अतिरिक्त मूल्य कल्पनेला चालना मिळाली, असे एरिक रोलने म्हटले आहे. शिवाय क्वेनेचा हा आराखडा म्हणजे आधुनिक अर्थशास्त्रातील अर्थमिती (Econometrics) या नवीन शाखेची पूर्वसूचना होय असे मानले जाते.

**४) निसर्गवादातील इतर विचार**

१) **व्यापारविषयक विचार :** निसर्गवाद्यांच्या मते, व्यापारामध्ये नवीन काहीही निर्माण होत नाही. फक्त समान मूल्यांची देवाणघेवाण होत असते. शेती हा एकमेव उत्पादक व्यवसाय होय. व्यापार हा अनुत्पादक व्यवसाय आहे. निसर्गवाद्यांचा खरा विरोध व्यापाराला नव्हता तर व्यापारवादी धोरणांचा जो अतिरेक झाला त्याच्या विरोधात त्यांनी मत मांडले. ज्या वस्तू आपल्या देशात तयार होत नाहीत त्यांची आयात करावी व अतिरिक्त वस्तूंची निर्यात करावी याची जाणीव त्यांना होती. आयात-निर्यातीवर बंधने असू नयेत याचाच अर्थ खुल्या व्यापाराच्या धोरणाचा पुरस्कार त्यानी केला. सरकारने हस्तक्षेप करू नये असे त्याचे मत होते.

२) **करविषयक विचार :** निसर्गवाद्यांच्या मते, शासनाचा खर्च चालविण्यासाठी कर लागू करणे आवश्यक आहे मात्र शासनाने केवळ शिक्षण, सार्वजनिक कामे व लोकांच्या मालमत्तेचे रक्षण एवढीच कामे करावीत. त्यामुळे कमीत कमी कराची आकारणी करावी. कर तो ३/१० इतका असावा. त्यांच्या मते शेती हाच उत्पादक व्यवसाय असल्यामुळे शेतीमधून निव्वळ उत्पादन वा आधिक्य निर्माण होते. मात्र ते तीन वर्गात प्रवाहित होत असते. त्यामुळे तीन पैकी फक्त एकाच वर्गावर कर लादावा तो वर्ग म्हणजे जमीनदार वर्ग होय. कारण शेतकऱ्यावर कर आकारला तर कर दिल्यामुळे निव्वळ गुंतवणूक कमी होईल. त्याचा परिणाम निव्वळ उत्पादन कमी होईल. तसेच व्यापारी, कारागिर यांच्यावर कर लादण्याचा प्रश्नच येत नाही. कारण तो अनुत्पादक वर्ग असतो. त्यामुळे कर फक्त जमीनदारच देवू शकतो. करारोपना बाबत त्यानी एकल कर (Single tax) सुचविला. शिवाय हा प्रत्यक्ष कर असल्यामुळे टाळला जाण्याची शक्यता नाही त्यामुळे कर वसूलीचा खर्च कमी होईल.

३) **राज्यसंस्थेची कर्तव्ये :** निसर्गवाद्यांच्या मते, नैसर्गिक व्यवस्थेचे अस्तित्व असल्यामुळे निसर्गाच्या नियमाचे पालन करणे हे राज्यसंस्थेचे प्रमुख कर्तव्य आहे. शासन कायदे करणारे नसून अंमलात आणणारे असते, असे त्याचे पक्के मत होते. तरीही राजाने पुढील कामे करावीत.

अ) नैसर्गिक व्यवस्थेचे पालन करावे.

ब) खाजगी मालमत्तेचे रक्षण करावे.

क) नैसर्गिक व्यवस्थेचे ज्ञान सर्वांना मिळण्यासाठी शिक्षणाचा प्रसार करावा.

ड) सार्वजनिक कामे सरकारने करावीत उदाहरणार्थ, रस्ते, धोरण, कालवे.

इ) देशातील वर्ग जाती जमाती यातील कृत्रिम भेद नष्ट झाले पाहिजेत. यासाठी सरकारने प्रयत्न करावा.

४) **मूल्यविषयक विचार :** निसर्गवाद्यांनी मूल्याबाबत सविस्तर विचार मांडले नाहीत. मात्र टर्गोचे विचार बरेचसे शास्त्रीय आहेत. शेतमालाला योग्य भाव मिळावा हे त्यांचे मत होते. वस्तूचे मूल्य तिच्या उपयोगितेवर अवलंबून असते असे त्यांचे मत होते. सामान्यत: निसर्गवाद्यांनी मूल्य हा वस्तूचा अंगभूत भाग मानला नाही. मूल्य प्रश्नांची चर्चा करताना उत्पादन खर्च, मागणी, पुरवठा, दुर्मिळता, विपुलता इत्यादी भिन्न गोष्टीचा उल्लेख त्यांच्या लिखानात आलेला आहे.

५) **वेतन व लोकसंख्या बाबत विचार :** श्रमिकांना किती वेतन ध्यावे हा निर्णय मालकाचा असतो. तथापि, मजूरामध्ये स्पर्धा असल्यामुळे त्याना मिळणारे वेतन निर्वाह पातळीचे राहील असे टर्गोचे मत आहे. हेच नैसर्गिक वेतन असे त्यांनी मांडले. लोकसंख्या वाढते हा नैसर्गिक व्यवस्थेचा भाग आहे, असे त्यानी मान्य केले. त्यामुळे अतिरिक्त लोकसंख्येची भीती त्याना वाटत नव्हती.

## १.३ सारांश

१८ व्या शतकाच्या मध्यापासून व्यापारवादी विचाराविरुद्ध फ्रान्समध्ये जी विचारसरणी उदयास आली त्या विचारसरणीस निसर्गवादी विचारसरणी असे ओळखले जाते. निसर्गवादी विचारवंतानी ईश्वरी प्रेरणेने स्थापन केलेल्या निसर्गव्यवस्थेला प्राधान्य दिले व त्या नियमांचे पालन करणे मनुष्याच्या हिताचे आहे, असे मत व्यक्त केले. यालाच त्यांनी निसर्गव्यवस्था असे म्हटले आहे. निसर्गव्यवस्थेत समाजाचे आपोआपच नियमन होत असते. त्यामुळे राज्य संस्थेने समाजजीवनात ढवळाढवळ करू नये.

उत्पादन खर्च व उत्पन्न यातील फरक म्हणजेच वाढावा किंवा निव्वळ उत्पादन होय; ही निसर्गवाद्यांची कल्पना अर्थशाास्त्राच्या विकासाच्या दृष्टीने उपयुक्त ठरली. व्यापारवाद्यांनी शेतीला कनिष्ठ स्थान दिले. निसर्गवाद्यांनी शेतीचे महत्त्व स्पष्ट करण्यासाठी निसर्गवादी दुसऱ्या टोकाला गेले. त्यांनी शेती हाच उत्पादक व्यवसाय मानला व उद्योग, व्यापार याना अनुत्पादक व्यवसाय ठरविले.

डॉ. क्वेने यांनी संपत्ती संचलनाचा आर्थिक तक्ता देवून राष्ट्रीय उत्पन्नाचे वितरण व आर्थिक प्रश्नांचा संख्याशास्त्रीय अभ्यास करून महत्त्वाचे निष्कर्ष काढले. त्यात -

१) अर्थव्यवस्थेत संपत्तीचा चक्राकार प्रवाह असतो. उदाहरणार्थ, उत्पन्न = खर्च = उत्पन्न.

२) अर्थव्यवस्थेतील आर्थिक जीवनात अनेक परस्परावलंबी आणि परिवर्तनीय प्रवाहाचा समावेश असतो. त्यापैकी एकात बदल झाल्यास त्याचा परिणाम उरलेल्या सर्व क्षेत्रावर होतो.

३) अर्थव्यवस्थेत परिवर्तनीय घटकात अंतिमता समतोल प्रस्थापित होतो व तो सर्वोत्तम असतो. तसेच तो आपोआप होतो.

## १.४ पारिभाषिक शब्द - शब्दार्थ

**१)** **कृषीवादी संप्रदाय -** शेतीक्षेत्राला अधिक महत्त्व देणारा वर्ग अथवा पंथ

**२)** **निर्हस्तक्षेप निती -** आर्थिक बाबीमध्ये सरकारने हस्तक्षेप न करणे

**३)** **निसर्गसत्ता -** परमेश्वराने मानवी कल्याणासाठी केलेले नियम

**४)** **आधिक्य -** वाढवा अथवा जादा निर्मिती

**५)** **करारोपन -** सरकारने जनतेवर लादलेले कर

**६)** **दमन -** दाबून ठेवलेली किंवा दबलेली

**७)** **विसंगती -** विरोध

## १.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) पुढील विधाने चूक की बरोबर सांगा.**

१) निसर्गवाद ही व्यापारवादाच्या विरुद्धची प्रतिक्रिया होय.

२) निसर्गवादी विचारांचा उदय फ्रान्समध्ये झाला.

३) निसर्गवादी विचारवंतांनी व्यापाराला महत्त्वाचे स्थान दिले.

४) निसर्गव्यवस्थेचे पालन न केल्यास मनुष्याला हालअपेष्ठा सहन कराव्या लागतील.

५) फ्रान्समधील कोल्बर्ट हा निसर्गवादी विचारवंत होता.

६) निसर्गव्यवस्था अतिशय पवित्र व शाश्वत आहे असे मत निसर्गवाद्यांनी मांडले.

७) डॉ. क्वेने यांचा संपत्ती संचलनाचा आराखडा राष्ट्रातील संपत्तीची विभागणी कशी होईल हे सांगतो.

८) राज्यसंस्थेने व्यापारावर निर्बंध लादावेत असे निसर्गवाद्यांना वाटते.

९) निसर्गवाद्यांच्या मते उद्योगात, व्यापारात निव्वळ उत्पादन शक्य आहे.

१०) मानवी नियम प्रथम दर्जाचे आहेत असे निसर्गवाद्यांनी म्हटले आहे.

**ब) एका वाक्यात उत्तरे द्या.**

१) ॲडम स्मिथने 'कृषीवादी संप्रदाय' असे नाव कोणत्या विचाराला दिले ?

२) निसर्गवादी विचाराचे प्रणेते कोण ?

३) निसर्गवादी विचारप्रणाली पूर्वी, फ्रान्समध्ये कोणती विचारप्रणाली प्रभावी होती ?

४) निसर्ग नियम म्हणजे काय ?

५) निसर्गवाद्यांच्या मते मानवाचे पहिले कर्तव्य कोणते ?

६) निसर्गवाद्यांच्या मते कोणता व्यवसाय उत्पादक व्यवसाय होय ?

७) निसर्गवाद्यांनी समाजाची विभागणी कोणत्या तीन वर्गात केली ?

८) निसर्गवाद्यांनी व्यापाराबाबत कोणत्या धोरणाचे समर्थन केले ?

९) मिरॉब्युच्या मते जगातील कोणते तीन शोध महत्त्वाचे आहेत ?

१०) निसर्गवाद्यांनी संपत्तीच्या कोणत्या रूपाला मान्यता दिली ?

**क) योग्य पर्याय निवडून (✳) अशी खूण करा.**

१) निसर्गवाद ही .......... मध्ये उदयास आलेली विचारसरणी होय.

(अ) इंग्लंड (ब) फ्रान्स (क) जर्मनी (ड) जपान

२) .......... हा निसर्गवादाच्या प्रभावाचा कालखंड समजण्यात येतो.

(अ) १६५६ ते १६७६ (ब) १८५६ ते १८७६

(क) १७५६ ते १७७६ (ड) १७७६ ते १७९६

३) निसर्गवाद्यांच्या मते आधिक्य अथवा वाढावा फक्त .......... मध्येच निर्माण होते.

(अ) शेती (ब) व्यापार (क) उद्योग (ड) कारखाना

४) निसर्गवाद म्हणजे नैसर्गिक व्यवस्थेचे शास्त्र होय अशी व्याख्या .......... यांनी केली.

(अ) प्रा. हॅने (ब) ड्युपॉट दमूर (क) मिरॉब्यु (ड) क्वेने

५) निसर्गव्यवस्थेत निसर्ग नियम .......... ने निर्माण केलेले असतात.

(अ) ईश्वराने (ब) मानवाने (क) शासनाने (ड) जनतेने

६) निसर्गवाद्यांच्या मते .......... व्यवसायच उत्पादक व्यवसाय होय.

(अ) व्यापार (ब) शेती (क) यंत्रोद्योग (ड) सूतार

७) निसर्गवाद्यांनी समाजाची विभागणी .......... वर्गात केली.

(अ) तीन (ब) दोन (क) चार (ड) पाच

८) निसर्गवाद्यांनी .......... वर्गावर कर आकारावा असे सुचविले.

(अ) व्यापारी (ब) जमीनदार (क) शेतकरी (ड) कारागिरी

९) शेतीतून निर्माण होणारी संपत्ती खंड व कर रूपाने .......... वर्गाकडे जाते.

(अ) व्यापारी (ब) शेतकरी (क) जमीनदार (ड) कारागिरी

१०) निसर्गवाद्यांनी .......... या कल्पनेला अधिक महत्त्व दिले.

(अ) व्यक्तिस्वातंत्र्य (ब) अनियंत्रित राजेशाही

(क) संरक्षित व्यापार (ड) कर पद्धती

## १.६ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ)** १) बरोबर २) बरोबर ३) चूक ४) बरोबर ५) चूक

६) बरोबर ७) बरोबर ८) चूक ९) चूक १०) चूक

**ब)** १) अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने शेती हा महत्त्वाचा व्यवसाय आहे असे मानणाऱ्या विचाराला स्मिथने 'कृषिवादी संप्रदाय' असे नाव दिले.

२) डॉ. क्वेने निसर्गवादी विचाराचे प्रणेते होत.

३) व्यापारवादी विचारप्रणाली फ्रान्समध्ये प्रभावी होती.

४) ईश्वराने निर्माण केलेले नियम हे निसर्ग नियम होत.

५) निसर्गव्यवस्थेचे ज्ञान करून घेणे हे मानवाचे पहिले कर्तव्य होय.

६) निसर्गवाद्यांच्या मते शेती व्यवसाय, मच्छेमारी, खाण व्यवसाय हे उत्पादक व्यवसाय होत.

७) निसर्गवाद्यांनी समाजाची विभागणी तीन वर्गात केली.

१. उत्पादक वर्ग, २. जमीनदार वर्ग, ३. अनुत्पादक वर्ग.

८) निसर्गवाद्यांनी खुल्या व्यापाराच्या धोरणाचे समर्थन केले.

९) १. लेखनकला, २. पैशाचा ३. क्वेनेचा संपत्ती संचलनाचा आराखडा.

१०) निसर्गवाद्यांनी संपत्तीच्या वास्तव (अन्नधान्य) स्वरूपाला मान्यता दिली.

**(क)** १) ब     ६) ब
२) क     ७) अ
३) अ     ८) ब
४) ब     ९) क
५) अ     १०) अ

## १.७ सरावासाठी स्वाध्याय

**पुढील प्रश्नांची उत्तरे ६० ते ७० ओळींत लिहा.**

**प्रश्न १ :** निसर्गवाद्यांनी मांडलेल्या पुढील कल्पना स्पष्ट करा.
(अ) निसर्गव्यवस्था (ब) राज्यसंस्थेची कार्ये

**प्रश्न २ :** निसर्गवाद्यांची शेतीचे श्रेष्ठत्व कल्पना सविस्तर स्पष्ट करा.

**प्रश्न ३ :** डॉ. क्वेने यांनी मांडलेल्या संपत्ती संचलनाच्या कल्पनेचे परीक्षण करा.

**प्रश्न ४ :** टीपा लिहा.

१) निसर्गव्यवस्था
२) निव्वळ उत्पादन
३) निसर्गवादाची पार्श्वभूमी

## १.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

१) आर्थिक विचारांचा विकास - प्रा. विजय कविमंडन
२) आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा. ए. आर. रायखेलकर
३) अर्थशास्त्रीय मतप्रणालीचा इतिहास - डॉ. श्री. वी. खांदेवाले, प्रा. सौ. अमरजा नेरूरकर
४) History of Economic Thought by H. L. Bhatia
५) Concise History of Economic thought by B. N. Ghosh, Rama Ghosh.

◈◈◈

# घटक : २

# सनातनवाद्यांचा कालखंड (Classical Period)

**अनुक्रमणिका**

२.० उद्दिष्ट्ये

२.१ प्रास्ताविक

२.२ विषय विवेचन

२.२.१ ॲडम स्मिथ - मूल्य सिद्धांत, कर कसोट्या

२.२.२ डेव्हिड रिकार्डो - मूल्य सिद्धांत, विभाजन

२.२.३ थॉमस माल्थस - लोकसंख्या सिद्धांत, अतिरिक्त उत्पादन व आर्थिक अरिष्ठे याविषयी विचार

२.३ सारांश

२.४ पारिभाषिक शब्द

२.५ स्वयंअध्ययन प्रश्न

२.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

२.७ सरावासाठी स्वाध्याय

२.८ अधिक वाचनासाठी संदर्भ

## २.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला :

- सनातन कालखंड व सनातनवादी संप्रदायाचा अर्थ समजून घेता येईल.
- सनातवादी अर्थतंज्ञाची ओळख करून घेता येईल.
- ॲडम स्मिथचा मूल्य सिद्धांत अभ्यासता येईल.
- ॲडम स्मिथच्या कर कसोट्या समजून घेता येतील.
- मूल्य सिद्धांताविषयी डेव्हिड रिकार्डोचे विचार स्पष्ट करता येतील.

- रिकार्डोचे विभाजनविषयक विचार विशद करता येतील.
- लोकसंख्या सिद्धांताबाबत थॉमस माल्थसचे विचार अभ्यासता येतील.
- अतिरिक्त उत्पादन व आर्थिक आरिष्ठाविषयी माल्थसची मते अभ्यासता येतील.

## २.१ प्रास्ताविक

अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास अभ्यासताना प्राचीन काळातील विचार, मध्ययुगीन आर्थिक विचार आणि आधुनिक काळातील आर्थिक विचार असा क्रम लावावा लागेल. प्राचीन काळातील अभ्यासमध्ये विशेषत कौटिल्य, ॲरिस्टॉटल, प्लेटो यांच्या विचारांचा समावेश होतो. इ. स. ५०० ते १५०० या कालखंडातील विचार म्हणजे मध्ययुगातील आर्थिक विचार होत. साधारणत: व्यापारवादी विचारसरणी ही मध्ययुगीन विचारसरणीच्या विरुद्धचे बंड असून आधुनिक काळातील विचारसरणीची सुरवात होय. आधुनिक आर्थिक विचारांचा काळ हा सोळाव्या शतकापासून ते विसाव्या शतकापर्यंतचा म्हणजे ५०० वर्षांचा काळ आहे. या आधुनिक काळातील व्यापारवाद व निसर्गवादानंतरचा कालखंड म्हणजेस सनातन कालखंड होय. ॲडम स्मिथच्या आर्थिक विचारापासून सनातन कालखंडाची सुरवात होते म्हणून तर ॲडमस्मिथ यास आधुनिक अर्थशास्त्राचा जनक असे म्हणतात. तेव्हा १७७६ ते १८४८ हा कालखंड म्हणजे सनातन आर्थिक विचारांचा कालखंड होय.

सनातनवादी संप्रदाय किंवा पंथ (Classical School) व्यापारवाद व निसर्गवाद यानंतर म्हणजे १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात युरोपखंडात आर्थिक, राजकिय व सामाजिक क्षेत्रात जे अनेक बदल घडून आले. नवे शोध, नवी उत्पादन पद्धती इत्यादिमुळे औद्योगिक उत्पादनात वाढ झाली. इंग्लंडच्या शेतीत बदल झाला. या सर्वांचा परिणाम आर्थिक विचारावरही होत होता. म्हणजे पूर्वीचे आर्थिक विचार मागे पडून जे नवीन आर्थिक विचार मांडले जाऊ लागले. त्या नवीन आर्थिक विचार प्रणालीलाच सनातनवाद किंवा सनातन विचाराचा कालखंड असे म्हणतात. तर ते सनातनवादी विचार मांडणाऱ्या अर्थतंज्ज्ञांना किंवा त्यांच्या गटाला एकत्रितपणे ‘सनातनवादी संप्रदाय’ किंवा ‘सनातनवादी पंथ’ असे म्हणतात. ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो, थॉमस माल्थस, प्रा. पिगु, जे. बी. से, जे. एस. मिल इत्यादी अर्थतज्ज्ञांच्या यामध्ये समावेश होतो. सनातन संप्रदायाची सुरवात ॲडम स्मिथने केली तर जे. एस. मिल हा अखेरचा सनातनवादी होय. डॉ. मार्शल व लॉर्ड केन्स यांचे सुरवातीचे विचारही सनातन वाद्यांशी जवळीक साधणारे होते. सनातनवाद किंवा सनातनवादी अर्थशास्त्र यातील सनातन हा शब्द ‘अभिजात’ (Classical) किंवा उत्कृष्ट या अर्थाचा आहे. मागासलेल्या किंवा बुरसटलेला असा नव्हे.

## २.२ विषय-विवेचन

या घटकात आपण सनातन संप्रदायातील ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो व थॉमस माल्थस या प्रमुख अर्थतंज्ञांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणार आहोत. क्रमश: त्यांचा जीवन परिचय, त्यांचे प्रमुख आर्थिक विचार व त्यावरील मर्यादा प्रस्तुत घटकात आपणास अभ्यासता येतील.

### २.२.१ ॲडम स्मिथ

**जीवन परिचय :** ॲडम स्मिथचा जन्म ५ जून, १७२३ मध्ये इंग्लंडमधील किरकॅल्डी या खेड्यामध्ये झाला. तो लहान असतानाच त्याचे वडिल वारले होते व त्याचा सांभाळ आईनेच केलेल होता. स्थानिक शाळेतच प्राथमिक शिक्षण झाले. सन १७३७ ते १७४० या काळात त्याने ग्लासगो विद्यापीठात अभ्यास केला. त्यानंतर त्याने ऑक्सफर्ड विद्यापीठात १७४० ते १७४६ पर्यंत शिक्षण घेतले. पुढे १७४८ मध्ये तो एडिंबर्ग विद्यापीठात गेला. १८४८ ते १७४९ या दोन वर्षांत त्याने तत्त्वज्ञानावर व्याख्याने दिली. पुढे १७५९ ते १७६३ या काळात ग्लासगो विद्यापीठात तर्कशास्त्र व तत्त्वज्ञान या विषयाचा प्राध्यापक म्हणून काम केले. १७६२ मध्ये ग्लासगो विद्यापीठाने त्याला 'डॉक्टर ऑफ लॉज' ही पदवी दिली. सन १७५९ मध्ये त्याने 'Theory of Moral Sentiments' हे पहिले पुस्तक लिहले. या पुस्तकाने त्याला फारच प्रसिद्धी मिळाली. या पुस्तकाने प्रभावित चार्लस टाऊनशेंड यांनी स्मिथला ड्यूकचा टूटर म्हणून नेमले. त्यामुळे १७६४ ते १७६६ या काळात ड्यूकबरोबर युरोप खंडाची सफर करण्याची संधी मिळाली व या प्रवासात फ्रान्समध्ये व्होल्टेअर, क्वेस्ने, तुर्गो, नेकर इत्यादी अर्थतज्ज्ञांची भेट झाली व ड्यूकबरोबर प्रवासात असताना भरपूर वेळ मिळाला. त्यामुळे या काळात त्याने एक पुस्तक लिहावयास घेतले. हे पुस्तक म्हणजेच अर्थशास्त्रातील पहिले सुप्रसिद्ध पुस्तक 'राष्ट्रांची संपत्ती' (Wealth of Nations) हे होय. हे पुस्तक १७७६ मध्ये प्रकाशित झाले. या पुस्तकाचे पूर्ण नाव 'राष्ट्रांच्या संपत्तीच्या स्वरूपाची व कारणांची चौकशी' (An Inquiry in to the Nature and Causes of the wealth of Nations) असे आहे. हे पुस्तक फारच प्रसिद्ध झाले व जगातील अनेक भाषांत भाषांतरे झाली. या पुस्तकामुळेच अर्थशास्त्राला एक वेगळे शास्त्र म्हणून मान्यता मिळाली व या पुस्तकामुळेच स्मिथला 'अर्थशास्त्राचा जनक' म्हणून मान्यता मिळाली.

**मूल्यसिद्धात (Theory of Value)**

वस्तूचे मूल्य किंवा किंमत कशी ठरेते याबाबतच्या त्याच्या विचारात गोंधळ झाल्याचे दिसून येते. त्याच्या या वैचारिक गोंधळामुळेच वस्तूच्या मूल्यासंबंधी त्याने दोन सिद्धांत मांडल्याचे दिसून येते. त्यातील एक म्हणजे मूल्याचा श्रम सिद्धांत व दुसरा म्हणजे मूल्याचा उत्पादन खर्चाचा सिद्धांत होय.

स्मिथने मूल्याचे दोन अर्थ घेतल्याचे आढळते.

१) **उपयोगिता मूल्य :** वस्तूच्या उपयोगितेवरून जे मूल्य ठरते त्याला उपयोगिता मूल्य असे म्हणतात. उदा. हवा, पाणी, प्रकाश.

२) **विनिमय मूल्य :** एखाद्या वस्तूच्या मोबदल्यात इतर वस्तूचे किती नग मिळतात यावरून जे मूल्य ठरते त्याला त्याने विनिमय मूल्य असे म्हटले आहे.

परंतु, स्मिथ पुढे असे ही म्हणतो की, वस्तूचे मूल्य वस्तूच्या उपयोगीतेवरून ठरत नाही, कारण 'ज्या वस्तूंना मोठे उपयोगिता मूल्य असते त्याना विनिमय मूल्य असतेच असे नाही व ज्या वस्तूंना मोठे विनिमय मूल्य असते त्याना उपयोगिता मूल्य असत नाही' हे सिद्ध करण्यासाठी त्याने पाणी व हिरा याची तुलना केलेली आहे. उपयोगितेच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे असणारे पाणी विनिमयाच्या दृष्टीने अत्यंत निरुपयोगी ठरते तर उपयोगितेच्या दृष्टीने कमी महत्त्वाच्या असलेल्या हिऱ्याला विनिमय मूल्य जास्त आहे. यावरून त्याने असा निष्कर्ष काढला की, ज्या वस्तूंना सर्वात जास्त उपयोगिता मूल्य असते, त्याना काहीच विनिमय मूल्य नसते. याउलट, ज्यांना सर्वात जास्त विनिमय मूल्य असते त्याना उपयोगिता मूल्य असत नाही. म्हणून त्याने उपयोगी मूल्याकडे पूर्ण दुर्लक्ष केले आणि वस्तूचे विनिमय मूल्य कसे ठरते याकडेच अधिक लक्ष केंद्रित केले.

### श्रम मूल्य सिद्धांत (Labour Theory of Value)

स्मिथने श्रमास अधिक महत्त्व दिलेले आहे. व्यापारवाद्यांच्या मते राष्ट्राच्या संपत्तीचे उगमस्थान परराष्ट्रीय व्यापारात, निसर्गवाद्यांच्या मते शेती तर स्मिथच्या मते उत्पादक श्रम हेच संपत्तीचे उगमस्थान आहे. त्याने श्रमाचे उत्पादक श्रम, अनुत्पादक श्रम असे दोन प्रकार केले आहेत. ज्या श्रमातून मूर्त वस्तूचे उत्पादन होते ते उत्पादक श्रम होत. उदा. टेबल, खुर्ची, यंत्रे वगैरे तर ज्या श्रमातून भौतिक/मूर्त वस्तूचे उत्पादन होत नाही ते अनुत्पादक श्रम होत. उदा. डॉक्टर, वकिल, शिक्षक, गायक वगैरे. परंतु आज अभौतिक किंवा अमूर्त श्रमच अधिक उत्पादक ठरत आहेत.

स्मिथच्या मते वस्तूच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या श्रमावरूनच वस्तूचे विनिमय मूल्य ठरते. श्रम हेच विनिमय मूल्य मोजण्याचे साधन आहे. याचा अर्थ एखादी वस्तू तयार करण्यासाठी जेवढे श्रम खर्ची पडतात त्यावरून त्याची किंमत ठरविली जावी. समजा, एखादी वस्तू तयार करण्यासाठी जेवढे श्रम लागले असतील त्याच्या दुप्पट श्रम दुसरी वस्तू तयार करण्यासाठी लागले असतील तर दुसऱ्या वस्तूला पहिल्या वस्तूपेक्षा बाजारात दुप्पट किंमत मिळेल. उदा. समजा, सुतारास एक खुर्ची तयार करण्यासाठी ६ तास लागतात व एक टेबल तयार करण्यासाठी १२ तास लागतात म्हणजेच एका टेबलाची किंमत २ खुर्च्या होय. कारण टेबल तयार करण्यासाठी खुर्चीच्या दुप्पट वेळ लागतो. श्रमाच्या मोजमापावरून टेबल व खुर्चीची किंमत ठरविली जाते. त्यावरून श्रम हे मूल्यनिर्मितीचे कारण आणि मूल्य ठरविण्याचे साधन आहे.

स्मिथने श्रमाचे अनेक अर्थ सांगितलेले आहेत. त्यापैकी दोन अर्थावर अधिक भर दिला आहे. १) वस्तूच्या उत्पादनासाठी जेवढे श्रम खर्च झाले असतील त्यावरून त्या वस्तूचे मूल्य ठरते असे सांगून स्मिथने श्रम खर्च सिद्धांत मांडला. २) श्रम सत्ता सिद्धांत : एखाद्या वस्तूचे मूल्य हे त्या वस्तूच्या मोबदल्यात मिळणाऱ्या वस्तूत किती श्रम सामावलेले आहेत यावरून ठरते. स्मिथचा हा विचार मान्य केला तर स्मिथने श्रम सत्ता सिद्धांत मांडला असे म्हणता येईल. म्हणजे श्रमावर आधारित त्याने दोन सिद्धांत मांडले. त्याप्रमाणे अर्थव्यवस्थेच्या वेगवेगळ्या अवस्थेत वस्तूचे मूल्य कसे ठरते हे पुढीलप्रमाणे स्पष्ट केले.

१) **अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक अवस्थेत श्रम मूल्य सिद्धांत :** अर्थव्यवस्थेच्या प्राथमिक अवस्थेत भांडवल व उत्पादनाची अन्य साधने नसतील तर या कालखंडात श्रम हाच एकमेव उत्पादन घटक असतो. त्यामुळे या अवस्थेत वस्तूचे मूल्य केवळ श्रमावरून ठरते. म्हणून समाजाच्या प्राथमिक अवस्थेत श्रम मूल्य सिद्धांत खरा ठरतो.

२) **अर्थव्यवस्थेची प्रगत अवस्था व मूल्याचा उत्पादन खर्च सिद्धांत :** अर्थव्यवस्थेच्या प्रगत अवस्थेत भांडवलशाही प्रस्थापित होते. वस्तूच्या उत्पादनासाठी भांडवल, कच्चा माल, भूमी, मजूर या घटकांचा वापर करावा लागतो. या घटकावर वेगवेगळ्या लोकांची मालकी प्रस्थापित होते. त्यांना नफा खंड मजुरी यासारखे मोबदले द्यावे लागतात. म्हणजे उत्पादन खर्च करावा लागतो. म्हणजे स्मिथने समाजाच्या प्रगत अवस्थेत मूल्य ठरविण्यासाठी मूल्याचा उत्पादन खर्चाचा सिद्धांत मांडला.

स्मिथने स्वाभाविक मूल्य व बाजार मूल्य असाही फरक केलेला आहे.

१) **स्वाभाविक किंवा नैसर्गिक किंमत :** जेव्हा वस्तूंच्या किंमतीत खंड, वेतन, नफा यांचे दर समाविष्ट होतात तेव्हा त्या वस्तूची किंमत म्हणजे नैसर्गिक किंमत होय.

२) **बाजार किंमत :** बाजारातील ग्राहक व विक्रेत्यांच्या स्पर्धेतून आणि मागणी व पुरवठ्याच्या समतोलातून ठरणारी बाजार किंमत होय. ही किंमत नैसर्गिक किंमतीपेक्षा अधिक किंवा कमी असू शकते.

थोडक्यात, स्मिथने मूल्यविषयक अनेक सिद्धांत मांडून वैचारिक गोंधळ माजविलेला होता. त्याच्या मूल्य सिद्धांतात एक वाक्यता नव्हती. असे असले तरी स्मिथच्या मूल्य विषयक विचाराचा प्रभाव जवळजवळ १५० वर्षे टिकून होता.

**स्मिथच्या मूल्य सिद्धांताचे परिक्षण :**

ॲडम स्मिथच्या मूल्य सिद्धांतात पुढील काही दोष होते.

१) **उपयोगितेकडे दुर्लक्ष :** स्मिथने पाणी व हिऱ्याचे उदाहरण घेऊन वस्तूचे मूल्य उपयोगितेवर अवलंबून नसते असा निष्कर्ष काढून उपयोगितेस महत्त्व दिले नाही. त्याने उपयोगिता मूल्यापेक्षा विनिमय मूल्यावर अधिक लक्ष केंद्रित केले. म्हणजे उपयोगिता व सीमांत उपयोगीता याकडे दुर्लक्ष केले. पुढे डॉ. मार्शल यांनी सीमांत उपयोगितेच्या आधारे वस्तूच्या मागणी पुरवठ्यावरून वस्तूचे मूल्य ठरते असे सांगितले.

२) **विसंगती व परस्पर विरोध :** काही टिकाकारांच्या मते स्मिथच्या सिद्धांतात विसंगती व परस्पर विरोध दिसून येतो. त्याने एकाच वेळी श्रम मूल्य सिद्धांत आणि उत्पादन खर्च सिद्धांत असे परस्परविरोधी सिद्धांत मांडले. तसेच समाजाच्या प्राथमिक अवस्थेत श्रममूल्य सिद्धांत तर प्रगत अवस्थेत उत्पादन खर्च सिद्धांत लागू पडतो. तसेच उत्पादनासाठी आवश्यक श्रम आणि मोबदल्यात मिळणारे श्रम यातील फरक लक्षात आला नाही. तेव्हा वस्तूचे मूल्य कसे ठरते याबाबत नक्की काय म्हणावयाचे आहे हे समजत नाही. त्यामुळे त्याच्या विचारात विसंगती व विरोधाभास आढळतो.

३) **चक्रीय युक्तीवाद :** स्मिथने वस्तूचे मूल्य श्रमावरून ठरते असे सांगितले पण श्रमावरून ठरणाऱ्या मूल्याचे मोजमाप कसे करावयाचे ? तसेच श्रमावर किंमत अवलंबून असते की किंमतीवर श्रम अवलंबून असतात हे समजत नाही. एका ठिकाणी स्मिथ म्हणतो की, वस्तूची किंमत जास्त म्हणून ती तयार करण्यास श्रम जास्त लागतात तर दुसऱ्या बाजूने म्हणतो की श्रम जास्त म्हणून किंमत जास्त मोजावी लागते. अशा प्रकारच्या चक्रीय युक्तीवादामुळे विवेचन कमकुवत होते.

४) **पूर्ण स्पर्धेचे गृहीत चुकीचे :** स्मिथने मूल्य सिद्धांताच्या विवेचनासाठी पूर्ण स्पर्धेचे गृहीत मानले आहे. म्हणजे मक्तेदारीच्या बाजारात हा सिद्धांत लागू पडत नाही. याची जाणीव त्याला होती. मक्तेदारीत वेगळा सिद्धांत मांडला पाहिजे असे तो म्हणतो. परंतु टीकाकारांच्या मते हे चूक आहे.

५) **वैचारिक गोंधळ :** श्रमाचे वेगवेगळे अर्थ व वेगवेगळे मूल्य सिद्धांत मांडून त्याने वैचारिक गोंधळ केलेला आहे.

**कर कसोट्या (Canons of Taxation)**

स्मिथने 'राष्ट्राची संपत्ती' या त्याच्या ग्रंथाच्या पाचव्या भागात सार्वजनिक आयव्ययाची सविस्तर चर्चा केलेली आहे. सरकारने संरक्षण, अंतर्गत कायदा व सुव्यवस्था, शिक्षण, न्यायदान यासारखी मर्यादितच कार्ये पार पाडीत असताना काटकसरीचा तत्त्वाचा अवलंब करून कमीतकमी खर्च करावा. सरकारच्या मालकीचे कारखाने, जमीन यापासून उत्पन्न मिळत असले तरी कर आकारणी हाच महत्त्वाचा उत्पन्नाचा मार्ग असतो. तेव्हा कर आकारताना कोणत्या तत्त्वाचा वापर करावा याचे विवेचन करताना स्मिथने चार महत्त्वाच्या कसोट्या सांगितलेल्या आहेत.

१) **समता :** समता म्हणजे नागरिकांकडून सारखे कर घ्यावेत असा अर्थ नाही तर सर्व नागरिकांकडून उत्पन्नाच्या प्रमाणात व त्यांच्या कुवतीनुसार कर घ्यावेत. गरीबाकडून कमी दराने व श्रीमंताकडून जादा दराने कर घ्यावेत.

२) **निश्चितता :** कर निश्चित असावा. कर भरण्याची वेळ, पद्धती व दर यात निश्चितता असली पाहिजे. यामुळे लोकांची गैरसोय होत नाही व लाच लुचपतीस आळा बसतो.

३) **सोईस्करपणा :** कर भरण्याची वेळ, जागा, पद्धती कर भरण्याच्या दृष्टीने सोयीस्कर असावी.

४) **मितव्ययता :** मितव्ययता म्हणजे काटकसर होय. कर वसुलीचा खर्च कमी आणि कराद्वारे मिळणारे उत्पन्न जास्त असावे असे त्याचे मत होते. अशा रीतीने स्मिथने चार कर कसोट्या सांगितलेल्या असून सरकारने आपला खर्च भागविण्यासाठी नागरिकांच्या उत्पन्नावर कर आकारावेत असे म्हटले आहे. नफा व वेतनावर कर आकारू नये. खंडावर कर आकारावेत असे म्हटले आहे. कारण नफ्यावर कर आकारला तर तो किंमतीच्या स्वरूपात ग्राहकावर पडेल, वेतनावर कर बसविला तर कामगार वेतन वाढीची मागणी करतील व उत्पादन खर्चात वाढ होईल. परंतु जमीन न कसणाऱ्या जमिनदारावर जास्त कर आकारावेत असे म्हटले आहे.

ॲडम स्मिथ याने अशा रीतीने अर्थशास्त्र विषयक प्रथमच तर्कशुद्ध विचार मांडण्याचा प्रयत्न केला. म्हणूनच ॲडम स्मिथ हाच अर्थशास्त्राचा संस्थापक किंवा जनक होय.

### २.२.२ डेव्हिड रिकार्डो

**जीवन परिचय :** अर्थशास्त्राच्या इतिहासामध्ये सनातन पंथीयामध्ये स्मिथच्या खालोखाल डेव्हिड रिकार्डोस  मानाचे स्थान आहे. कारण त्याने सनातनवादी अर्थशास्त्राला गौरव प्राप्त करून दिला. रिकार्डो हा हॉलंडमधून इंग्लंडमध्ये येवून स्थायिक झालेल्या एका ज्यू व्यापाराचा मुलगा. १७७२ मध्ये त्याचा जन्म झाला. वयाच्या केवळ १४ व्या वर्षी त्याने वडिलांच्या रोखे बाजारातील दलालीचा व्यवसाय सुरू केला व वयाच्या ४२ व्या वर्षी भरपूर संपत्ती मिळविली. १७९९ मध्ये त्याने ॲडम स्मिथचा ग्रंथ वाचला व आपले लक्ष अर्थशास्त्राकडे वळविले. सन १८१७ मध्ये त्याचा "The Principles of Political Economy and Taxation" हा पहिला ग्रंथ प्रकाशित झाला. 'Protection to Agriculture' हे त्याचे पुस्तक फारच गाजले. १८१९ मध्ये ब्रिटिश पार्लमेंटमध्ये त्याची सभासद म्हणून निवड झाली. रिकार्डोने अर्थशास्त्रातील अनेक विषयावर आपले विचार मांडलेले असले तरी त्याचा खंड विषयक सिद्धांत जग प्रसिद्ध आहे. १८२३ म्हणजे वयाच्या ५१ व्या वर्षी तो मृत्यू पावला.

### रिकार्डोचे आर्थिक विचार

### रिकार्डोचा मूल्य सिद्धांत

रिकार्डोचा मूल्य सिद्धांत म्हणजे स्मिथच्या मूल्य सिद्धांताची सुधारित आवृत्ती होय. स्मिथने आपल्या मूल्य सिद्धांतात वस्तूचे मूल्य श्रमावरून ठरते असे सांगितले. परंतु हा विचार मांडताना केवळ समाजाच्या प्राथमिक अवस्थांचाच त्याने विचार केला. रिकार्डोने मात्र समाजाच्या प्राथमिक आणि प्रगत अवस्थेत वस्तूचे मूल्य श्रमावरून ठरते असे सांगितले.

ॲडम स्मिथने सांगितल्याप्रमाणे रिकार्डोनेही वस्तूला १) उपयोगिता मूल्य २) विनिमय मूल्य अशी दोन प्रकारची मूल्ये असतात हे मान्य केले आहे. वस्तूला विनिमय मूल्य प्राप्त होण्यासाठी त्या वस्तूमध्ये उपयोगिता असणे आवश्यक असते हेही त्याने मान्य केले. परंतु त्याने असे म्हटले आहे, ''विनिमय मूल्य प्राप्त होण्यासाठी उपयोगितेची गरज असली तरी उपयोगिता हे विनिमय मूल्य मोजण्याचे साधन होऊ शकत नाही.''

वस्तूचे विनिमय मूल्य जर उपयोगितेवर अवलंबून नसते तर मग कशावर अवलंबून असते ? या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी रिकार्डोने वस्तूंचे दोन गट पाडले आहेत.

१) **पुनरुत्पादन करणे शक्य नसणाऱ्या अशा दुर्मिळ वस्तूंचा गट :** अशा वस्तूंचे मूल्य त्यांच्या निर्मितीसाठी लागणाऱ्या श्रमावरून ठरत नाही तर त्या वस्तूंच्या दुर्मिळतेवरून ठरते. उदा. जुनी दुर्मिळ चित्रे, ग्रंथ, नाणी, जुने पुतळे, शिल्पाकृती वगैरे. महात्मा गांधी सारख्या मोठ्या व्यक्तींनी वापरलेल्या वस्तू अशा वस्तूंचा पुरवठा वाढविता येत नाही.

२) **पुनरुत्पादन करणे शक्य असणाऱ्या वस्तू :** या वस्तू म्हणजे ज्या वस्तूंच्या पुरवठ्यात वाढ करता येणे शक्य आहे. व अशा वस्तू म्हणजे व्यवहारात वापरल्या जाणाऱ्या दैनंदिन उपयोगाच्या वस्तू होत. या वस्तूचे मूल्य श्रमावरून ठरते. यासंबंधी त्याने सविस्तर सिद्धांत मांडला आहे.

**श्रमव्यय सिद्धांताचे स्पष्टीकरण**

ज्या वस्तूंच्या पुरवठ्यात वाढ करता येते त्या वस्तूंचे मूल्य श्रमावरून ठरते. समाजाच्या प्राथमिक व प्रगत अशा दोन्ही अवस्थेत वस्तूचे मूल्य श्रमावरून ठरते. रिकार्डोच्या मते समाज जेव्हा प्रगत अवस्थेत असतो तेव्हा वस्तूच्या उत्पादनासाठी श्रमाबरोबरच भूमी व भांडवल यासारख्या उत्पादन घटकाची गरज असते. म्हणजेच श्रम, भूमी भांडवल या तीन घटकांची गरज असते. परंतु भूमीचा मोबदला म्हणजे खंड याचा समावेश किंमतीत होत नाही. कारण त्याच्या खंडविषयक सिद्धांतात त्याने असे म्हटले आहे की, खंडामुळे किंमत ठरत नसून किंमतीमुळे खंड ठरतो. म्हणजेच खंडाचा किंमतीत किंवा मूल्यात समावेश होत नाही याचाच अर्थ मूल्य निश्चितीत खंडाची भूमिका नसते. म्हणून वस्तू उत्पादनात भांडवल व श्रम हे घटक महत्त्वाचे आहेत. भांडवल म्हणजे यंत्र, अवजारे इत्यादी होत. रिकार्डोच्या मते असे भांडवल भूतकाळात श्रम करून कोणी तरी निर्माण केलेले असतात. म्हणजे भांडवल हे संग्रहीत श्रम होत. त्यामुळे समाज प्रगत अवस्थेत असताना वस्तूचे उत्पादन हे वर्तमान काळातील श्रम व भूतकाळातील श्रम (संग्रहित) यांचा परिणाम असतो. म्हणून वस्तूंचे मूल्य केवळ श्रमावरूनच ठरते.

परंतु रिकार्डोने आपल्या ग्रंथात काही ठिकाणी वस्तूचे मूल्य उत्पादन खर्चावरून ठरते असेही सांगितले आहे. उत्पादन खर्च म्हणजे चालू काळातील व भूतकाळातील खर्च झालेले श्रम होत. रिकार्डोने वस्तूचे मूल्य चालू काळातील श्रम व भूतकाळातील संग्रहित श्रम (यंत्रे व अवजारे) यावरून ठरते असे सांगितले. रिकार्डो म्हणतो की, संचित श्रमावर (भांडवलावर) भांडवलदाराची मालकी असल्याने भांडवलदारास

वस्तूचे जे मूल्य मिळेल त्यातील काही भाग कामगारास वेतन देतो व राहिलेल्या भाग स्वत:स नफा म्हणून घेतो. अशा रीतीने उत्पादन खर्चावर आधारीत मूल्य सिद्धांत मांडून श्रम मूल्य सिद्धांताकडे दुर्लक्ष केले किंवा तो खोटा ठरविला, असा संभ्रम निर्माण होतो. परंतु वस्तूचे मूल्य श्रमावरूनच ठरते याच्याशी तो ठाम होता. या विचाराला बळकटी आणण्यासाठी त्याने श्रममूल्य सिद्धांतात पुढीलप्रमाणे अनेक दुरूस्त्या सुचविल्या.

**सिद्धांतातील दुरूस्त्या**

१) **श्रमाची गुणभिन्नता :** वस्तूचे मूल्य श्रमावरूनच ठरत असले तरी विविध श्रम हे गुणदृष्ट्या भिन्न असतात. त्यामुळे त्याचे मोजमाप कसे करावयाचे हा प्रश्न निर्माण होतो. यावर रिकार्डोचे असे मत आहे की, गुणाच्या दृष्टीने भिन्न असणाऱ्या श्रमाचे परस्पर मूल्यमापन बाजारात व्यावहारिकदृष्ट्या केले जाते आणि बहुतांशी ते अचूक असते. याविषयी उदाहरण देऊन रिकार्डो म्हणतो की, जवाहिऱ्याचे एक तासाचे श्रम हे सामान्य कामगाराच्या ५ तासाच्या श्रमाइतके असतात हे बाजारात व्यावहारिकदृष्ट्या आपोआप ठरते आणि ते अचूक असते.

२) **भांडवलाची गुणभिन्नता :** ज्याप्रमाणे कामगारांत गुणभिन्नता असते त्याप्रमाणे विविध प्रकारचे भांडवल म्हणजे यंत्रे, अवजारे यांच्यातही गुणभिन्नता असते. म्हणजेच विविध उद्योगातील यंत्रसामग्री व अवजारांची उत्पादनक्षमता सारखी असू शकत नाही. म्हणून या भांडवलाच्या गुणभिन्नतेचा परिणाम वस्तूच्या मूल्यावर होऊ शकतो. यावर रिकार्डोचे असे मत आहे की, ज्या दोन वस्तूच्या उत्पादनाकरीता लागणाऱ्या भांडवलाची उत्पादनक्षकता भिन्न असते. त्या दोन वस्तूंचे मूल्य सारखे होऊ शकेल.

३) **नफ्याचा समावेश :** वस्तूच्या मूल्यामध्ये नफ्याचा समावेश होत नाही. अशी रिकार्डोने भूमिका सुरुवातीस घेतलेली होती. या भूमिकेस माल्थसचा विरोध होता. परंतु पुढे रिकार्डोने आपल्या सिद्धांतात अशी दुरूस्ती केली की, वस्तूच्या मूल्यात वेतन व नफा या दोहोंचा समावेश होतो. याचा अर्थ वस्तूची किंमतही वेतन व नफा या दोहोंवरून ठरते.

मूळच्या मूल्य सिद्धांतात अनेक दुरूस्त्या व बदल करूनही आपल्या सिद्धांतात काही दोष आहेत हे त्याने मोठ्या मनाने मान्य केले होते व या सिद्धांताची योग्य पद्धतीने मांडणी करण्याची जबाबदारी माझ्यापेक्षा जेष्ठ लेखकाने स्वीकारावी असे सूचवून त्याने मूल्यविवेचनातून माघार घेतली होती.

**रिकार्डोच्या सिद्धांताचे मूल्यमापन**

रिकार्डोच्या मूल्य सिद्धांतात काही अर्थतज्ज्ञांनी पुढील दोष दाखवून दिलेले आहेत.

१) **उपयोगिकडे दुर्लक्ष :** मूल्यसिद्धांताच्य सुरुवातीस रिकार्डोने असे सांगितले की, वस्तूला मूल्य प्राप्त होण्यासाठी वस्तूमध्ये उपयोगिता असली पाहिजे. परंतु उपयोगिता ही काही वस्तूचे मूल्य मोजण्याचे साधन होऊ शकत नाही. परंतु सीमान्तवाद्यांच्या मते वस्तूंची मागणीही वस्तूच्या उपयोगितेवरून ठरत असल्याने उपयोगितेच्या संकल्पनेस महत्त्व आहे. परंतु रिकार्डोने याकडे दुर्लक्ष केले अशी सीमांतवाद्यांनी टीका केली.

२) **वस्तूंचे वर्गीकरण :** वस्तूचे मूल्य ठरविताना रिकार्डोने दुर्मिळ वस्तू व पुन्हा उत्पादन करता येणाऱ्या वस्तू असे वर्गीकरण केले आहे. रिकार्डोच्या मते दुर्मिळ वस्तूचे मूल्य त्या वस्तूच्या दुर्मिळतेवरून ठरते आणि ज्या वस्तूंच्या पुरवठ्यात वाढ करता येते अशा वस्तूंचे मूल्य श्रमावरून ठरते. परंतु टिकाकाऱ्यांच्या मते वस्तू कोणत्याही प्रकारची असली तरी मूल्य सिद्धांत एकच असला पाहिजे.

३) **भांडवलाचे स्थान :** उत्पादनासाठी भांडवलाची गरज आहे व अशा भांडवलाच्या उपयोगामुळे श्रमिकांची कार्यक्षमता वाढते हे मान्य करूनही किंमत ठरविण्याच्यादृष्टीने भांडवलाचे महत्त्व मान्य केले नाही. ही तात्वीक विसंगती आहे असे ही टीकाकारांचे मत आहे.

४) **अयोग्य गृहीते :** रिकार्डोने पूर्ण स्पर्धा हे अवास्तव गृहीत धरून आपला मूल्यसिद्धांत मांडला. परंतु मक्तेदारीमध्ये मूल्य कशे ठरते याचे स्पष्टीकरण रिकार्डोने केले नाही असे टिकाकारांचे मत आहे.

५) **अनेक दुरुस्त्या :** रिकार्डोच्या मूल्य सिद्धांतात वैचारिक गोंधळ झालेला आढळतो. सुरुवातीस श्रमामुळे वस्तूचे मूल्य ठरते असे सांगितले. नंतर त्यामध्ये सुधारणा करून नफ्याचा विचार मूल्य सिद्धांतात केला. शेवटी त्याने आपल्या श्रममूल्य सिद्धांताचा त्याग केला होता अशी टॉरेन्स या अर्थतज्ञाने टीका केली आहे.

## रिकार्डोचे विभाजनविषयक विचार

निसर्गवाद्यांनी विभाजनाचा विचारच केलेला नव्हता. ॲडम स्मिथने उत्पादनावर अधिक भर दिलेला होता. विभाजन विषयक जे विचार मांडले त्यात अपूर्णता व विसंगती होती. रिकार्डोच्या काळात इंग्लंडमध्ये औद्योगिक क्रांती होऊन उत्पादनात प्रचंड वाढ झालेली होती. तेव्हा वाढलेल्या प्रचंड उत्पन्नाचे विभाजन कोणामध्ये व कसे व्हायला हवे, ''विभाजन हे कोणत्या सिद्धांतानुसार होते हाच अर्थशास्त्राचा महत्त्वाचा प्रश्न आहे'' असे रिकार्डोचे मत होते. रिकार्डोने भूमी, मजूर व भांडवल हे तीन महत्त्वाचे घटक मानले व त्यांना मिळणाऱ्या मोबदल्यासंबंधी व्यापक व शास्त्रीय विवेचन केले आहे. तेव्हा रिकार्डोने विभाजनाची म्हणजेच खंड, वेतन व नफा यांची सविस्तर चर्चा पुढीलप्रमाणे केलेली आहे.

## (अ) रिकार्डोचा खंडविषयक सिद्धांत

रिकार्डोपूर्वी निसर्गवादी अर्थतज्ज्ञ तसेच ॲडम स्मिथ, जेम्स  अँडरसन व माल्थस यांनी खंडासंबंधी चर्चा केलेली होती. परंतु रिकार्डोच्या खंडविषयक विवेचनाइतके शास्त्रशुद्ध व सविस्तर विवेचन कोणीही केलेले नव्हते.

१९ व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये इंग्लंडमध्ये अन्नधान्याच्या किंमती वाढत होत्या व त्याचे कारण म्हणजे जमीनदार जास्त खंड घेतात असे काही लेखकांचे मत होते. परंतु रिकार्डोस हे कारण पटले नाही. म्हणून खंडाचा उद्‌भव कसा होतो, खंड व किंमत यांचा परस्पर संबंध कसा असतो हे त्याने प्रसिद्ध खंड विषयक सिद्धांत मांडून स्पष्ट केलेले आहे. खंडाची व्याख्या

‘‘जमिनीच्या एकूण उत्पादनापैकी जो भाग जमिनीच्या उपजत व अविनासी गुणांबद्दल जमीन मालकाला दिला जातो त्याला खंड असे म्हणतात.’’

खंडाचे व्याख्या दिल्यानंतर रिकार्डोने जमीनीची लागवड १) प्रकर्षित शेती पद्धती २) विस्तीर्ण किंवा व्यापक शेती अशा पद्धतीने करता येते असे म्हटले आहे व या दोन्ही पद्धतीत खंड निर्माण होतो. त्याच्या मते खंडाचा उद्‌भव जमीनीच्या गुणभिन्नतेमुळे होतो. काही जमीन सुपीक, मध्यम सुपीक व कमी सुपीक अशी असते. जमीनीच्या या सुपिकतेतील भिन्नतेमुळे खंडाचा उद्‌भव कसा होतो हे रिकार्डोने उदाहरणाने पटवून दिले.

रिकार्डो म्हणतो की, एखाद्या देशात लोक प्रथमच वसाहत करण्यासाठी गेले तर सुरुवातीस सुपीक जमीनीवर शेती करण्यास सुरवात करतील. या जमीनीवर १०० मण गव्हाचे उत्पादन झाले व त्यासाठी उत्पादन खर्च ५००० रु आला तर १ मण गव्हाचा उत्पादन खर्च ५० रु. येईल व बाजारात हा गहू ५० रु. मण याप्रमाणे विकला जाईल.

समजा, आता लोकसंख्येत वाढ झाली. सुपिक जमीनीवर पिकविलेला गहू अपुरा पडू लागला तर आता लोक मध्यम प्रतीची जमीन ही लागवडीखाली आणतील. या जमिनीवर ५००० रु. इतकाच उत्पादन खर्च करून ५० मण गहू पिकविला तर एक मण गव्हाचा उत्पादन खर्च १०० रु. इतका येईल व हा गहू बाजारात १०० रुपयास १ मण याप्रमाणे विकला जाईल. बाजारात पूर्ण स्पर्धा असल्याने गव्हाची एकच एक किंमत राहील. त्यामुळे सुपीक व मध्यम सुपीक जमीनीवरील गहू आता १०० रु. मण याप्रमाणे विकला जाईल. त्यामुळे सुपीक जमिनीच्या मालकाला प्रत्येक मणापाठीमागे ५० रु. जास्त मिळतील हाच खंड होय.

समजा, आता लोकसंख्या आणखी वाढली तर सुपीक व मध्यम सुपीक जमीनीवरील उत्पादित गहू पुरणार नाही. म्हणून कमी सुपीक जमीनही लागवडीखाली आणली जाईल. या जमीनीवर ५००० रु. खर्च करून २५ मण गहू उत्पादित केला तर १ मण गव्हाचा उत्पादन खर्च २०० रु. येईल व हा गहू बाजारात २०० रु. मण याप्रमाणे विकला जाईल. बाजारात पूर्ण स्पर्धा असल्याने बाजारात २०० रु. मण ही एकच किंमत राहील. या सीमांत किंवा शेवटच्या जमिनीच्या मालकाला खंड मिळणार नाही. सुपीक जमीनीच्या मालकाला मात्र (२०० रु.- ५० रु.) १५० रु. खंड मिळेल व मध्यम प्रतीच्या जमीनीच्या मलाकास (२०० रु. - १०० रु.) १०० रु. खंड मिळेल.

अशा रीतीने वरीलप्रमाणे विस्तृत शेती पद्धतीत सुपीक, मध्यम सुपीक, कमी सुपीक अशा जमीनी क्रमश: लागवडीखाली आणल्या जातात. अशा पद्धतीने शेती केली असता खंडाचा उद्‌भव कसा होतो ते आपण वरीलप्रमाणे पाहिले आहे. जमीनीचे क्षेत्रफळ आहे तेवढेच ठेवून श्रम व भांडवल यांचे प्रमाण वाढवित नेले की, त्याला सखोल शेती पद्धत असे म्हणतात. या पद्धतीच्या शेतीत पण खंडाचा उद्‌भव होतो; कारण सुरुवातीस श्रम व भांडवलाचे जे प्रमाण असेल त्यापासून उत्पादनात जास्त भर पडेल. नंतर श्रम व भांडवलाचे पूर्वीइतकेच प्रमाण क्रमश: वाढवीत नेण्यास, घटत्या फलाचा सिद्धांत प्रत्ययास येतो व प्रत्येक श्रम व

भांडवलापासून उत्पादनात पडणारी भर घटत जाते. त्यामुळे पूर्वीच्या श्रम व भांडवलाच्या प्रमाणाला खंड मिळत जाईल.

**खंड व किंमत यांचा संबंध**

वस्तूचे मूल्य ठरविताना रिकार्डोने खंडाचा समावेश किंमतीत केला नाही. कारण -

१) रिकार्डोच्या मते खंडावरून किंमत ठरत नसून किंमतीवरून खंड ठरतो. जमीनीच्या गुणभिन्नतेनुसार उत्पादन खर्च बदलतो व त्याचा परिणाम म्हणून सीमान्त पूर्व जमीन मालकास खंड मिळतो. म्हणजे अगोदर किंमत ठरते व नंतर खंड ठरतो.

२) तसेच खंडामुळे धान्याच्या किंमती वाढत नाहीत तर अगोदर धान्याच्या किंमती वाढतात व त्यामुळे खंडाचा उद्‌भव होतो. सीमान्त जमीनीस मात्र खंड मिळत नाही.

**खंड सिद्धांताचे निष्कर्ष**

रिकार्डोच्या खंड सिद्धांतावरून पुढील काही महत्त्वाचे निष्कर्ष निघतात.

**१) खंड हा वाढावा स्वरूपाचा असतो :** जमीनीच्या सुपीकतेतील फरकामुळे उत्पादन खर्च वेगवेगळा येतो व त्यामुळे सुपीक जमीन मालकाना खंड मिळतो व हा खंड म्हणजे वाढावा (Susplus) या स्वरूपाचा असतो.

**२) जमीनदाराचे महत्त्व घटते :** निसर्गवाद्यांचे असे मत होते की शेती हाच एक उत्पादक व्यवसाय आहे. त्यामुळे जमीनदारांस समाजात फार महत्त्व आले आहे. परंतु रिकार्डोने जमीनदारांना मिळालेला खंड समाजविघातक असल्याने दाखवून दिले त्यामुळे जमीनदारांचे समाजातील महत्त्व घटले. कारण जमीनदारांना मिळणारा खंड त्यांच्या श्रमाचे फळ नव्हे.

**३) खंडावर कर लादावा :** जमीनदारांना काहीही श्रम न करता त्यांना खंड मिळतो. खंड हे एक जास्तीचे उत्पन्न किंवा वाढावा आहे. म्हणून खंडावर कर लादावा असे रिकार्डोने सुचविलेले होते. कारण जमीनदार वर्ग म्हणजे इतरांचे शोषण करणारा व इतरांच्या उत्पन्नावर जगणारा ऐतखाऊ वर्ग आहे.

**खंड सिद्धांतावरील टीका**

**१) खंडाची व्याख्या व सिद्धांत यात अंतर्विरोध :** रिकार्डोच्या मते, खंड म्हणजे जमीनीच्या उपजत व अविनाशी गुणधर्माचा मोबदला होय. परंतु सिद्धांताचे स्पष्टीकरण करताना म्हणतो की सीमान्त जमीनीस खंड मिळत नाही. परंतु टीकाकारांच्या मते सीमान्त जमीनीत थोडेतरी उपजत गुण असणारच. मग तिला का खंड मिळत नाही हा एक अंतर्विरोध आहे.

**२) जमीनीचे उपजत किंवा अविनासी गुणधर्म नसतात :** रिकार्डोच्या मतानुसार जमीनीच्या उपजत व अविनाशी गुणधर्मामुळे जमीन मालकास खंड मिळतो. परंतु व्यवहारात असे दिसते की बऱ्याच जमीनी

नापीक असतात. त्यामध्ये सेंद्रीय व रासायनिक खते वापरून जमीनीची सुपिकता वाढविता येते. म्हणजे जमीनीची सुपीकता ही निसर्गनिर्मित नाही तर मानवनिर्मित आहे.

३) **खंडाचा उद्‌भव फक्त जमीनीत होतो :** रिकार्डोच्या मते जमीनीच्या उपजत गुणभिन्नतेमुळेच फक्त जमीनीस खंड मिळतो. परंतु आधुनिक अर्थतज्ज्ञांच्या मते खंडाचा उद्‌भव दुर्मिळतेमुळे होत असल्याने विशिष्ठ काळात सर्वच उत्पादन घटकांना खंड मिळतो.

४) **लागवडीखाली जमीन आणण्याचा क्रम चुकीचा :** रिकार्डोने सिद्धांतात प्रथम सुपीक जमीन, नंतर मध्यम सुपीक व शेवटी कमी सुपीक जमीन लागवडीखाली आणली जाते असे म्हटले आहे. परंतु टीकाकारांच्या मते यास कोणताही ऐतिहासिक पुरावा नसल्याने हे चूक आहे. अमेरिकेमध्ये वसाहतवाले असे वागल्याचे आढळत नाही.

५) **खंड जमीनीचा पुरवठा अलवचिक असल्यामुळे मिळतो :** टीकाकारांच्या मते जमीनीच्या उपजत गुणामुळे खंड मिळत नाही तर खंड मिळण्याचे खरे कारण जमिनीचा पुरवठा अलवचिक आहे हे आहे.

६) **सदोष गृहीतावर आधारित :** रिकार्डोचा खंड सिद्धांत बाजारात पूर्ण स्पर्धा असते, भूमी या घटकात घटत्या उत्पादन फळाचा प्रत्यय येतो यासारख्या गृहीतावर आधारित आहे. परंतु टीकाकारांच्या मते बाजारात पूर्ण स्पर्धा नसते तर अपूर्ण स्पर्धा असते तसेच खतांचा वापर करून उत्पादनात वाढ करता येते.

७) **जमीनीचा उपयोग केवळ अन्नधान्याच्या निर्मितीसाठीच :** हे रिकार्डोचे मत आज चुकीचे ठरले आहे. कारण औद्योगिक क्रांतीनंतर जमीनीचा वापर उद्योगासाठी केला जाऊ लागला आहे.

८) **खंडाचा समावेश किंमतीत होतो :** रिकार्डोच्या मते खंडाचा समावेश किंमतीत होत नाही. परंतु आधुनिक अर्थज्ज्ञांच्या मते खंडाचा समावेश उत्पादन खर्चात होतो आणि उत्पादन खर्चावरून किंमत ठरते, म्हणजेच खंडाचा समावेश किंमतीत होतो.

अशा रीतीने या सिद्धांतात काही दोष असले तरी समाजवादी अर्थशास्त्रज्ञ या सिद्धांताकडे आदराच्या भावनेने पाहतात. सिडने व वेब तर रिकार्डोचा खंडविषयक सिद्धांत सामुदायिक अर्थव्यवस्थेची कोनशिला मानतात.

### (ब) रिकार्डोचा वेतन सिद्धांत

रिकार्डोच्या वेतनविषयक सिद्धांतास खंड सिद्धांताप्रमाणे प्रसिद्धी मिळाली नाही. कारण पूर्वी निसर्गवादी अर्थतज्ज्ञ तुर्गो, नेकर व रॉबर्ट टोरेन्स यांनाही रिकार्डोच्या सिद्धांतासारखा सिद्धांत मांडलेला होता. स्मिथचा वेतनविषयक सिद्धांत आणि माल्थसचा लोकसंख्या सिद्धांत या सिद्धांताच्या आधारे त्याने त्याचा निर्वाह वेतन सिद्धांत मांडला आहे.

रिकार्डोच्या मते, श्रम हा एक उत्पादनाचा घटक असून त्याला मिळणारा मोबदला म्हणजे वेतन होय. तसेच इतर कोणत्याही वस्तूप्रमाणे श्रम ही एक वस्तू आहे व तिचा पुरवझा कमी जास्त होऊ शकतो.

श्रमाचे मूल्य म्हणजे वेतन होय. म्हणून इतर वस्तूप्रमाणे श्रमालासुद्धा पुढीलप्रमाणे दोन मूल्ये असतात. दोन प्रकारचे वेतन मिळते.

१) **श्रमाचे नैसर्गिक मूल्य किंवा वेतन :** उदरनिर्वाहासाठी आणि कामगरांच्या संख्येत वाढ अथवा घट होणार नाही अशा प्रकारे वंशवृद्धी चालू ठेवता यावी यासाठी कामगारांना जो मोबदला मिळणे आवश्यक असते. असा मोबदला म्हणजे नैसर्गिक वेतन होय. हे वेतन म्हणजे दीर्घकालीन वेतन होय.

२) **श्रमाचे बाजार मूल्य किंवा वेतन :** ''इतर वस्तूप्रमाणे मागणी व पुरवठ्यावरून श्रमाची ठरणारी किंमत म्हणजे श्रमाचे बाजार वेतन होय.'' हे नैसर्गिक वेतनापेक्षा कमी किंवा जास्त असू शकते. श्रमाचे अल्पकालीन मूल्य म्हणजे बाजार वेतन होय.

### रिकार्डोचा निर्वाह वेतन सिद्धांत

रिकार्डोने हा सिद्धांत माल्थसचा लोकसंख्या सिद्धांत आधारभूत मानून मांडलेला आहे. त्याच्या मते बाजार किंवा अल्पकालीन वेतनापेक्षा नैसर्गिक किंवा दीर्घकालीन वेतनच महत्त्वाचे आहे. त्यामुळे नैसर्गिक किंवा दीर्घकालीन वेतन कसे ठरते याचेच विवेचन या सिद्धांतात त्याने केलेले आहे.

या सिद्धातानुसार कामगारांना त्यांच्या उदरनिर्वाहापुरतेच वेतन मिळते. हे स्पष्ट करण्यासाठी तो म्हणतो की समजा, बाजार वेतन हे नैसर्गिक वेतनापेक्षा जास्त झाले की तो आवश्यक व सुखसोयीच्या अधिक वस्तू खरेदी करू शकतो, त्याचे राहणीमान उंचावते. आर्थिक परिस्थिती सुधारते. त्यामुळे ते मोठे कुटुंब पोसू शकतात त्यामुळे अधिक मुले होऊ दिली जातात त्यामुळे कामगारांचा पुरवठा वाढतो. त्यामुळे बाजार वेतन घटून ते नैसर्गिक वेतनाइतके म्हणजे निर्वाह वेतनाइतके होते.

अशा रीतीने जसजशी कामगार संख्या वाढत जाईल तसे बाजार वेतन निर्वाह वेतनापेक्षा कमी होत जाईल. त्यामुळे ते आवश्यक गरजा ही भागवू शकत नाहीत. त्यांचे राहणीमान कमी होते. परिणामत: होणाऱ्या मुलांची संख्या कमी केली जाते. पर्यायाने कामगारांचा पुरवठा घटून त्यांचे बाजार वेतन वाढते व ते निर्वाह वेतनाइतके होते. थोडक्यात, श्रमबाजारात वेतन कमी जास्त होत असले तरी दीर्घकाळात शेवटी वेतनपातळीची प्रवृत्ती नैसर्गिक किंवा निर्वाह वेतन पातळीवर येण्याची असते. रिकार्डोच्या मते निर्वाह वेतन म्हणजे सामाजिक चालीरीती, रूढी सवयीनुसार लागणाऱ्या वस्तू व सेवांचा पुरवठा करण्याइतपत वेतन होय. या विवेचनावरून निर्वाह वेतन म्हणजे कामगारांचे जीवनमान वेतनच होय.

### सिद्धांतात दुरूस्ती :

त्यांच्या मते, प्रगत देशात आर्थिक प्रगतीबरोबर भांडवल संचय, भांडवल गुंतवणूक वाढून उद्योगांचा विकास होतो व कामगारांची मागणी वाढते, बाजारवेतन निर्वाह वेतनापेक्षा वाढते, त्यामुळे प्रजोत्पादन वाढून कामगारांचा पुरवठा वाढतो. परंतु बाजार वेतन कमी होत नाही. कारण भांडवल पुरवठ्यात व उद्योगधंद्यात वाढ झाल्याने कामगारांची मागणी वाढलेली असते. त्यामुळे प्रगत देशात दीर्घकाळ पर्यंत बाजार वेतन निर्वाह वेतनाइतके कमी होण्याची प्रवृत्ती नसते तर बाजार वेतन निर्वाह वेतन पातळीपेक्षा जास्त राहू शकते.

**सिद्धांतावरील टीका :**

**१) मास्थसच्या लोकसंख्येचा आधार :** रिकार्डोचा निर्वाह वेतन सिद्धांत हा ज्या माल्थसच्या लोकसंख्या सिद्धांतावर आधारित आहे तोच सिद्धांत आज चुकीचा ठरला असल्याने हा सिद्धांत चुकीच्या सिद्धांतावर आधारित आहे अशी टीका केली जाते.

**२) कामगारांच्या कार्यक्षमतेकडे दुर्लक्ष :** रिकार्डोने पूर्ण स्पर्धेची परिस्थिती गृहीत धरून सर्वसामान्य कामगारांना निर्वाह वेतन कसे मिळते हे सांगितले आहे. परंतु कामगाराची कार्यक्षमता त्याची कुवत याचा वेतनावर काय परिणाम होतो याचा विचार केलेला नाही.

**३) कामगार संघटना व सौदाशक्तीचा विचार नाही :** मजूर संघटित झाले तर प्रबळ संघटनेच्या जोरावर ते आपल्या वेतनात वाढ घडवून आणू शकतात हा विचार रिकार्डोने केलेला नाही.

**४) वेतनवाढ - प्रजोत्पादनात वाढ - चुकीचे :** रिकार्डो म्हणतो की बाजार वेतन वाढले की त्या कामगाराची पोषणक्षमता वाढल्याने अधिक मुले होऊ दिली जातात. परंतु टीकाकारांच्या मते हे चुकीचे आहे. कारण वेतन वाढले की कामगार मुलांची संख्या वाढवत नाहीत तर राहणीमान वाढवितात व ते टिकवून ठेवण्याचा प्रयत्न केला जातो.

**५) मानवतावादी दृष्टिकोण :** टीकाकारांच्या मते रिकार्डोने या सिद्धांतात श्रमीकाला पोटापुरते मिळावे हा मानवतावादी दृष्टिकोण विचारात घेतला आहे. श्रमिक उत्पादक काम करतो व स्वत:ची मजुरी मिळवितो या विचारास या सिद्धांतात महत्त्व देण्यात आलेले नाही.

**(ब) रिकार्डोचा नफ्याविषयी विचार**

रिकार्डोचे नफ्याविषयी विचार अपूर्ण व असमाधानकारक असल्याने त्याला नफ्याचा सिद्धांत म्हणता येत नाही.

१) रिकार्डोने नफ्याचा विचार उद्योगाविषयी केलेला नाही तर शेतीविषयी केलेला आहे.

२) नफ्यामध्ये व्याजाचाही समावेश होतो. व्याजासंबंधी त्याचे स्वतंत्र विचार नाहीत.

**३) नफा व वेतन यांचे व्यस्त प्रमाण :** नफा व वेतन यांच्यात परस्परविरोधी संबंध असतो. वेतन कमी आहे की जास्त आहे यावर नफा अवलंबून असतो. अन्नधान्याच्या किंमती वाढल्या की वेतन वाढते व नफा कमी होतो.

**४) नफा घटत जाण्याची प्रवृत्ती :** नफ्यामध्ये नैसर्गिकरित्या घटत जाण्याची प्रवृत्ती असते. कारण समाजाच्या प्रगती बरोबर लोकसंख्या वाढते, अन्नधान्यास मागणी वाढते. कमी सुपीक जमीन वापराखाली आणावी लागते. उत्पादन खर्च वाढतो. कामगारांना जास्त वेतन द्यावे लागते व नफ्याचे प्रमाण घटत जाते.

**५) स्थितीशील अर्थव्यवस्थेची निर्मिती :** वरीलप्रमाणे नफ्याच्या घटत्या प्रवृत्तीमुळे भांडवल गुंतवणूक कमी होईल, शेवटी ती थांबेल, नवीन जमीन लागवडीखाली येणार नाही. उत्पादन वाढणार नाही व शेवटी स्थितीशील अर्थव्यवस्था निर्माण होईल.

**रिकार्डोच्या नफ्याच्या विचारावर टीका**

**१) नफ्याचे प्रमाण वेतनावर अवलंबून नसते :** रिकार्डोच्या मते नफा व वेतन यात परस्परविरोधी संबंध आहे. परंतु टीकाकारांच्या मते हे चूक आहे. कारण भांडवलशाही व प्रगतशील देशात नफा व वेतन या दोहोंतही वाढ होते.

**२) स्थितीशील अर्थव्यवस्थेची कल्पना :** रिकार्डोची नफा शून्य होण्याची व स्थितीशील अर्थव्यवस्थेची कल्पना टीकाकारांना मान्य नाही.

**३) नफ्यात व्याजाचा समावेश :** त्याने भांडवलदारांना मिळणाऱ्या व्याजाचा समावेश नफ्यामध्ये केला आहे हे योग्य नाही.

### २.२.३ थॉमस माल्थस

**जीवन परिचय :** सनातन संप्रदायातील तिसरा महत्त्वाचा अर्थतज्ञ म्हणजे थॉमस रॉबर्ट माल्थस होय. त्याचे नाव प्रामुख्याने त्याच्या लोकसंख्येच्या सिद्धांताशी जोडले जाते. शिवाय त्याचे भांडवलसंचय व अतिरिक्त उत्पादन या बाबतचे विचारही महत्त्वाचे आहेत. त्याचा जन्म १७६६ मध्ये इंग्लंडमध्ये झाला. त्याने वयाच्या १९ व्या वर्षी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेतला. १७८८ मध्ये पदवी प्राप्त केली तर १७९१ मध्ये तो एम. ए. झाला. तो गणितातील रँगनर (wrangner) होता. १७९८ मध्ये त्याने लोकसंख्येच्या समाजाच्या आगामी विकासावर जो परिणाम होतो त्यावरील तत्त्वाविषयक निबंध (An Essay on the Principles of Population at as it effects the Fature improvement of Society) प्रसिद्ध केला. सन १७९९ मध्ये त्याने स्वीडन, नॉर्वे, रशिया या देशांचा व सन १८०२ मध्ये फ्रान्सचा प्रवास केला. त्याने १८०५ ते मृत्यू येईपर्यंत म्हणजे १८३४ पर्यंत प्राध्यापक म्हणून काम केले. अर्थशास्त्राचा प्राध्यापक म्हणून नेमणूक झालेला तो पहिला अर्थशास्त्रज्ञ होय. त्याने अर्थशास्त्राची मूलतत्त्वे, धान्यासंबंधीच्या कायद्याचा अभ्यास, गरीबीबाबतचा कायदा, खंडाचे स्वरूप इत्यादी ग्रंथ लिहिले. माल्थसने जे अर्थशास्त्रीय विचार मांडले आहेत त्यात लोकसंख्याबाबतचा सिद्धांत आणि अतिरिक्त उत्पादनाबाबतचे विचार अधिक महत्त्वाचे आहेत.

**माल्थसचा लोकसंख्येचा सिद्धांत** (Mathusion Theory of Population)

माल्थसपूर्वी अनेक अर्थतज्ञांनी लोकसंख्याविषयी विचार मांडलेले होते. प्लेटो, ॲरिस्टॉटल यासारख्या विचारवंतांनी देशातील वाढती लोकसंख्या आणि अन्नधान्य यांचे योग्य प्रमाण राहू शकत नाही असे सांगितले होते. निसर्गवादी व व्यापारवादी यानी वाढत्या लोकसंख्येचे समर्थन केलेले होते. इंग्लंडच्या औद्योगिक

क्रांतीच्या काळात श्रमाचा स्वस्त पुरवठा होण्याच्या दृष्टीने वाढती लोकसंख्या मदतनीसच ठरत होती. पण औद्योगिक क्रांतीनंतर मात्र दुष्परिणाम जाणवू लागले. तेथील श्रमिकांना व नागरिकांना अनेक हालअपेष्टा भोगाव्या लागल्या. यातच १७९३ मध्ये गॉडविन यांनी जे एक पुस्तक लिहले होते त्या पुस्तकात त्याने असे प्रतिपादन केले की, इंग्लंडच्या दुरावस्थेस सरकार जबाबदार आहे. सरकार श्रीमंतांचा पाठपुरावा करते, त्यामुळे गरीबांना हाल सोसावे लागतात. तेव्हा गरीबांची गरीबी दूर करावयाची असेल तर शासनसंस्था नष्ट करून स्वातंत्र्य, समता व बंधुत्व या तत्त्वावर समाजाची उभारणी केली पाहिजे. तेव्हा गॉडविनच्या या विचाराला विरोध करण्यासाठी आणि इंग्लंडच्या वाढत्या दूरावस्थेस शासन जबाबदार नाही तर वाढती लोकसंख्या जबाबदार आहे, हे लोकांना पटवून देण्यासाठीच माल्थसने लोकसंख्येचा सिद्धांत मांडला. त्याने १७९८ मध्ये 'An Essay on Principles of Population' हा ग्रंथ लिहला. त्यात त्याने असे प्रतिपादन केले की, स्त्री पुरुषातील जबरदस्त लैंगिक आकर्षणातून लोकसंख्या सतत वाढत राहते व त्यामुळे उपसमार, रोगराई, दारिद्र्य, बेकारी, युद्धे, मारामाऱ्या इत्यादी समस्या उद्‌भवतात. म्हणून लोकसंख्येचे नियंत्रण केले पाहिजे असेही त्याचे मत होते.

**सिद्धांताचे विधान :** ''निसर्गत:च लोकसंख्या वाढीचा वेग अन्नधान्यवाडीच्या वेगापेक्षा अधिक असतो.''

**सिद्धांताची गृहीते :** १) स्त्री पुरुषात जबरदस्त लैंगिक आकर्षण असते, २) त्याना जगण्यासाठी अन्नधान्याची गरज असते, ३) लोकसंख्या भूमिती श्रणीने तर अन्नधान्य गणिती श्रेणीने वाढते.

**सिद्धांताचे स्पष्टीकरण :** माल्थसने लोकसंख्या सिद्धांताचे स्पष्टीकरण पाच मुद्यात केले आहे. पहिल्या तीन मुद्यांत लोकसंख्या का व कशी वाढते, अन्नधान्याचे उत्पादन कसे मागे पडते व त्याचे परिणाम काय होतात याची चर्चा केली आहे. तर शेवटच्या दोन मुद्यांत त्याने वाढत्या लोकसंख्येच्या नियंत्रणाचे उपाय सुचविले आहेत. त्याचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येते.

१) **लोकसंख्येतील वाढ :** स्त्री पुरुषांतील कायम राहणाऱ्या जबरदस्त लैंगिक आकर्षणामुळे लोकसंख्या १:२:४:८:१६:३२:६४.... अशी भूमितीश्रेणीने वाढत जाते. म्हणजे दर २५ वर्षांनी ती दुप्पट होते.

२) **अन्नधान्याची वाढ :** मनुष्याला जगण्यासाठी अन्नधान्याची गरज असते, परंतु अन्नधान्याची अमर्याद वाढ होत नाही. अन्नधान्याचे उत्पादन दर २५ वर्षांत १:२:३:४:५:६.... या गणिती श्रेणीप्रमाणे वाढत जाते. म्हणजे दर २५ वर्षांनी दुप्पट होत नाही.

३) **वाढत्या लोकंसख्येच्या समस्या :** लोकसंख्या भूमिती पद्धतीने व अन्नधान्य गणिती पद्धतीने वाढत असल्याने लोकसंख्यावाढ अन्नधान्याच्या वाढीला मागे टाकते. यामुळे ही लोकसंख्या वाढ समाजास अपायकारक ठरते आणि समजात उपासमार, दुष्काळ, दारिद्र्य, रोगराई, बेकारी, युद्ध, मारामाऱ्या यासारख्या समस्या निर्माण होतात. म्हणून लोकसंख्या वाढीचे नियंत्रण केले पाहिजे. तेव्हा वाढत्या लोकसंख्येस आळा घालण्याचे माल्थसने पुढीलप्रमाणे दोन उपाय सुचविले आहेत.

४) **प्रतिबंधक उपाय :** वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी नैतिक संयम पाळणे, ब्रह्मचर्य, उशिरा लग्न करणे, लग्नानंतर संयम पाळणे इत्यादी उपाय सुचविले. परंतु संतती नियमनाची साधने वापरणे त्याला मान्य नव्हते.

५) **नैसर्गिक उपाय :** मानवाने वाढत्या लोकसंख्येस आळा घातला नाही तर परमेश्वर किंवा निसर्ग लोकसंख्या कमी करण्यासाठी दुष्काळ, पूर, भूकंप, रोगराई, युद्धे यासारख्या उपाययाजना करेल. त्यात अनेक लोक मरण पावतील. त्यामुळे लोकसंख्या व अन्नधान्य यांचा मेळ घातला जाईल.

**सिद्धांतावरील टीका :**

१) **लोकसंख्या भूमीती श्रेणीपेक्षा कमी प्रमाणात वाढण्याचा अनुभव :** माल्थसने आपल्या सिद्धांतात लोकसंख्येची वाढ दर २५ वर्षांनी भूमिती श्रेणीने होते असे सांगितले होते. परंतु कोणत्याही देशात अशी वाढ झाल्याचे दिसून येत नाही. आज काही विकसनशील देशात लोकसंख्या वाढीचा दर जास्त असला तरी विकसित देशात लोकसंख्या फार वाढल्याचे आढळत नाही. माल्थसने नंतरच्या आवृत्तीत लोकसंख्या भूमिती श्रेणीने वाढते हे शब्द गाळून लोकसंख्येची वाढ अन्नधान्यवाढीपेक्षा जास्त होते असे म्हटलेले आहे.

२) **अन्नधान्य उत्पादन :** गणिती श्रेणीपेक्षा अधिक प्रमाणात वाढते. माल्थसने अन्नधान्य गणिती श्रेणीने वाढते असे प्रतिपादन केलेले होते. परंतु आज अनेक देशात हरित क्रांत्या झालेल्या आहेत. शेतीच्या तंत्रात बदल झालेले आहेत. आधुनिक यंत्रे, बियाणे, खते, किटकनाशके, पाणी वापर यामुळे वर्षातून दोन/तीन पिके घेता येऊ लागली आहेत त्यामुळे शेतीत घटत्या उत्पादन फलाऐवजी वाढते उत्पादन फल प्रत्ययास येऊ लागले आहे.

३) **लैंगिक आकर्षण कायम राहूनही लोकसंख्येत घट :** स्त्री पुरुषातील जबरदस्त आकर्षण हे लोकसंख्या वाढीचे प्रमुख कारण आहे, असे प्रतिपादन केलेले होते. परंतु आज विकसित देशात हे लैंगिक आकर्षण कायम असूनही छोटे कुटुंब, उच्च राहणीमान या उद्देशाने कृत्रिम साधनांचा वापर करून कमी मुले होऊ दिली जात आहेत. त्यामुळे तेथे लोकसंख्या वाढीचा दर कमालीचा घटला आहे. मुलांची संख्या त्यानी जाणीवपूर्वक मर्यादित ठेवली आहे. उदा. चीन, जपान वगैरे.

४) **लोकसंख्येची तुलना अन्नधान्याशी न करता राष्ट्रीय उत्पन्नाशी करावी :** माल्थसने लोकसंख्या आणि अन्नधान्य यांचा परस्पर संबंध असतो असे सांगण्यात चूक केली, असे टिकाकारांचे मत आहे. कारण आज विकसित व उद्योगप्रधान राष्ट्रांचा विचार केला तर त्यांचे राष्ट्रीय व दरडोई उत्पन्न जास्त आहे, ते देश अन्नधान्याचे उत्पादन कमी असले तरी अन्नधान्यची आयात करून समस्या सोडवू शकतात. त्यामुळे अन्नधान्य उत्पादन कमी असले तरी लोकसंख्येचा प्रश्न निर्माण होत नाही.

५) **लोकंसख्येत वाढ म्हणजे श्रमशक्तीत वाढ :** कॅनन म्हणतो, लोकंसख्या वाढली म्हणजे श्रमशक्ती वाढते व विकासात मदत होते हे माल्थसने विचारात घेतले नाही. आज चीन व भारत या देशांच्या

उदाहरणावरूनही दिसून येते की या देशांची लोकसंख्या अधिक असूनही आज जगात विकासाचा दर या देशांचाच अधिक आहे.

६) **लोकसंख्या रोखण्याचे माल्थसचे उपाय लोकांना न पेलणारे :** लोकसंख्या रोखण्यासाठी माल्थसने नैतिक संयम, ब्रह्मचर्य, उशिरा लग्न करणे यासारखे प्रतिबंधक उपाय सुचविले होते. पण हे उपाय लोकांना न पेलणारे होते. संतती नियमनाचा साधनाचा वापर करू नये असे त्याने म्हटले होते, परंतु आज या संतती नियमनाची कृत्रिम साधनेच लोकसंख्या वाढ रोखण्यासाठी अधिक यशस्वी ठरली आहेत.

७) **मनुष्य अन्नधान्याशिवाय जगू शकत नाही हा माल्थसचा विचार चुकिचा :** आज पाश्चिमात्त्य देशामध्ये दररोजच्या आहारात अन्नधान्याशिवाय, फळे, भाजीपाला, मांस, मासे, दूध, अंडी यांचा वापर अधिक आहे. त्यामुळे मनुष्य अन्नधान्याशिवाय जगू शकत नाही हे माल्थसचे मत चुकीचे ठरते.

८) **प्राणी शास्त्रज्ञांनी माल्थसचा सिद्धांत चुकीचा ठरविला :** प्राणीशास्त्रज्ञांचा असा दावा आहे की, मनुष्याची जसजशी सांस्कृतिक व आर्थिक प्रगती होत जाईल तसतसे प्रजोत्पादनही घटत जाईल. लोकसंख्येच्या संक्रमण सिद्धांताने ही हेच सांगितलेले आहे. आज विकसित देशात लोकसंख्या घटलेली दिसते.

९) **माल्थसचे नैसर्गिक उपाय अवास्तव :** मानवाने दूर दृष्टी ठेवून लोकसंख्येला आळा घतला नाही तर निसर्ग किंवा परमेश्वर रोगराई, भूकंप, वादळ, पूर, दुष्काळ, युद्धे याद्वारे लोकसंख्या व अन्नधान्ये यात मेळ घालीत, असे जे माल्थसने प्रतिपादन केले होते ते व्यवहार्य वाटत नाही. कारण ज्या देशात अन्नधान्य पुरवठा भरपूर आहे व लोकसंख्या कमी आहे अशा देशातही युद्धे, भूकंप, रोगराई, दुष्काळ अशी नैसर्गिक संकटे उद्भवतात.

१०) **एकांगी विचार :** माल्थसने वाढत्या लोकसंख्येचे अनेक दुष्परिणाम सांगितले. पण लोकसंख्येच्या रचनेतील बदल, न्यून लोकसंख्या, घटती लोकसंख्या ह्या पण समस्या ठरू शकतात. हा विचार माल्थसने केलेला नव्हता. आज जपानमध्ये वार्धक्यातील लोकसंख्या वाढत असल्याने भविष्यात विकास खुंटणार आहे; तर भारताची तरुण लोकसंख्या ही आज विकासास हातभार लावीत आहे. भारत २१ व्या शतकात जागतिक महासत्ता बणणार आहे, ते या तरुण लोकसंख्येच्या आधारावरच.

याबरोबरच, ११) इंग्लंडच्या तत्कालीन परिस्थितीवरून माल्थसने हा सिद्धांत मांडला. १२) प्रगत देशाच्या बाबतीत हा सिद्धांत कालबाह्य ठरला आहे. अशा काही टीका होत असल्या तरी ज्या काही विकसनशील देशात लोकसंख्येचा विस्फोट झालेला आहे तेथे माल्थसने सांगितलेल्या समस्या आढळून येतात. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाचे धोरण अनेक देशांना राबवावे लागल्याचे दिसते. त्यामुळे हा सिद्धांत पूर्णपणे चुकीचा आहे, असे म्हणता येणार नाही.

**माल्थसचे अतिरिक्त उत्पादन व आर्थिक अरिष्टे याबाबत विचार**

**किंवा**

**भांडवल संचयाबाबतचे विचार**

माल्थसचे अतिरिक्त उत्पादनाबाबतचे विचार अभ्यासण्यापूर्वी सनातन अर्थतज्ञ जे. बी. से चा बाजारपेठेचा सिद्धांत व रिकार्डोचे मत विचारात घ्यावे लागेल. कारण माल्थसच्या अतिरिक्त उत्पादनाचा सिद्धांत हा वरील दोन्ही तज्ञांच्या विचारावर टीका करणारा आहे; म्हणजे ते विचार कसे चुकीचे आहेत हे सांगण्यासाठीच माल्थसने हा विचार मांडलेला आहे.

**जे. बी. से. चा बाजारपेठेचा नियम**

'प्रत्येक पुरवठा आपली मागणी करतो' त्यामुळे बाजारात मागणी व पुरवठा यांचा समतोल टिकून राहतो. त्यामुळे सर्व वस्तूंचा अतिरिक्त साठा पडून राहिलेलाआहे. (A general gult) सर्वत्र जरूरीपेक्षा जास्त उत्पादन झालेले आहे, उत्पादन खर्चापेक्षा वस्तूच्या किंमती कमी झालेल्या आहेत, असे कधीही घडत नाही. म्हणजेच अर्थव्यवस्थेत अति उत्पादनाचे संकट येत नाही, असे जे. बी. से यांनी प्रतिपादन केलेले होते.

**रिकार्डोचे मत :** से च्या सिद्धांताचे समर्थन करून रिकार्डोने असे मत मांडलेले होते की, सर्वसाधारण अतिरिक्त उत्पादनाची स्थिती निर्माण होणे शक्य नाही. त्याअर्थी भांडवलाचा अतिरिक्त संचय (Glut of Capitell) होणेही शक्य नाही. कारण जेव्हा भांडवल संचय होऊ लागतो तेव्हा गुंतवणूक वाढते. श्रमांना मागणी वाढते, त्यामुळे वेतनाचे दर वाढतील व नफ्याचे प्रमाण कमी होईल. परंतु ही गोष्ट भांडवलदारांना परवडणारी नसते. त्यामुळे भांडवलदार जरुरीपेक्षा भांडवल संचय करीत नाहीत. म्हणजेच अतिरिक्त भांडवल संचय होत नाही व अर्थव्यवस्थेत एकूण पुरवठा व एकूण मागणी यांचा मेळ आपोआप घातला जात असल्याने अतिरिक्त उत्पादन व आर्थिक अरिष्ठ उद्‌भवत नाही.

**माल्थसचे अतिरिक्त उत्पादनाबाबत विचार :**

से व रिकार्डो यांचे वरील विचार हे औद्योगिक क्रांती व औद्योगिक विकास याला पोषक होते. कारण ते दोघेही भांडवलशाही अर्थव्यस्थेचे पुरस्कर्ते होते. परंतु माल्थसला हे विचार मान्य नव्हते. माल्थसला भांडवलशाही अर्थव्यवस्था व उद्योगांचा विकास मान्य नव्हता. तो शेतीप्रधान अर्थव्यवस्थेचा पुरस्कर्ता होता. त्याच्या मते, जमीनदार वर्ग, इतर व्यवसायात गुंतलेला कामगार वर्ग, सेवाकरणारा वर्ग हे सर्वजण मागणी पुरवठ्यात मेळ घालण्याच्या दृष्टीने महत्त्वाचे कार्य करतात.

माल्थसच्या मते भांडवल संचय, अति उत्पादन व न्यून उपभोग ही भांडवलशाही अर्थव्यवस्थेची खास वैशिष्ठ्ये आहेत. नफा मिळविणे हा भांडवलदारांचा प्रमुख उद्देश असतो. त्यामुळे ते भांडवल संचय सतत वाढवित असतात. भांडवलदार हे भांडवल गुंतवितात. उत्पादन प्रचंड प्रमाणात वाढते. परंतु सर्व वस्तूंना मागणी येत नाही. त्यामुळे मागणी पुरवठ्यात असमतोल निर्माण होतो, वस्तूंचे साठे पडून राहतात त्यामुळे

अतिरिक्त उत्पादनाची परिस्थिती (The general glut) निर्माण होते. यावरून असे दिसून येते की, अतिरिक्त उत्पादनाची परिस्थिती निर्माण होण्याची प्रमुख दोन कारणे आहेत -

१) भांडवलदारांचा मोठ्या प्रमाणात होणारा भांडवल संचय, मोठ्या प्रमाणात गुंतवणूक व त्यामुळे प्रचंड प्रमाणात होणारे उत्पादन हे एक कारण होय.

२) दुसरे महत्त्वाचे कारण म्हणजे न्यून उपभोग किंवा मागणीचा अभाव होय. मागणी कमी असण्याची पुन्हा दोन कारणे आहेत. (अ) भांडवलदार वर्ग अधिक नफा मिळविण्यासाठी कामगारांना कमी वेतन देतात, त्यामुळे त्यांची खरेदी शक्ती घडून एकूण मागणीचे प्रमाण कमी होते. (ब) भांडवलदार वर्ग मिळालेल्या नफ्याचा उपभोगासाठी वापर न करता बचत व भांडवल संचयासाठी करतात. त्यामुळे त्यांचा उपभोग घटतो व मागणी कमी होते.

अशा प्रकारे एका बाजूला सतत व प्रचंड प्रमाणावर होणारे उत्पादन (over production) व दुसऱ्या बाजूने न्यून उपभोग (under consumtion) अशा दुहेरी परिस्थितीमुळे अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाची परिस्थिती निर्माण होते.

**आर्थिक अरिष्ठे व मंदी :**

अतिरिक्त उत्पादन झाले की, वस्तूंच्या किंमती घटतात. उत्पादन खर्चापेक्षा किंमती कमी होणे, भांडवलदारांच्या नफ्यात घट होणे त्यामुळे उत्पादन कमी होणे, कारखाने बंद पडतील, कामगार बेकार होतील, कामगारांची खरेदी शक्ती व मागणी कमी होईल त्यामुळे अर्थव्यवस्थेत मंदी व आर्थिक आरिष्ठांची परिस्थिती निर्माण होते. परंतु ही मंदीची परिस्थिती फार काळ टिकून राहात नाही. कारण उत्पादक मंदीच्या काळात उत्पादन करणार नाहीत. त्यामुळे बाजारातील पूर्वीचे साठे कधीतरी संपतील व भांडवलदारांना पुन्हा उत्पादनाची प्रेरणा मिळते व मंदी दूर होते.

**आर्थिक अरिष्ठे दूर कण्यासाठी उपाय :**

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत भांडवलसंचय, अतिरिक्त उत्पादन, न्यून उपभोग, मंदी ही अरिष्ठे दूर करण्यासाठी माल्थसने खालील उपाय सुचविलेले आहेत.

**१) मजुरांचा वेतनात वाढ करणे :** कामगारांच्या वेतनात वाढ केली की, त्यांची खरेदीशक्ती वाढते व वस्तूंना मागणी वाढून वस्तूंच्या किंमती वाढतात व अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर पडते.

**२) उत्पादक व भांडवलदारांची बचत कमी करणे :** समाजातील उत्पादक वर्ग, व्यापारी, भांडवलदार यांनी बचत कमी करण्याची प्रवृत्ती वाढवून खर्च करण्याची प्रवृत्ती वाढविली की, मागणीत वाढ होईल आणि मागणी पुरवठ्यात समतोल साध्य होईल.

**३) भांडवलदारांनी उपाभोग वाढवावा :** भांडवलशाहीतील अतिरिक्त उत्पादनाची परिस्थिती टाळण्यासाठी भांडवलदारांनी स्वत:च उत्पादन केलेल्या वस्तूंचा उपभोग घ्यावा. परंतु हे भांडवलदारांच्या स्वभावाशी सुसंगत नाही हेही माल्थसला मान्य होते.

**४) सार्वजनिक खर्चात वाढ करणे :** आर्थिक आरिष्टे टाळण्यासाठी सार्वजनिक बांधकाम, विहिरी, रस्ते, तलावे यासारख्या सार्वजनिक कामावर खर्च करावा. त्यामुळे लोकांच्या हातातील पैसा वाढेल व मागणीत वाढ होईल.

**५) अनुत्पादक वर्गाचा उपभोग वाढविणे :** समाजात जमीनदार, श्रीमंत, सैनिक, डॉक्टर, वकिल, शिक्षक यासारखा जो वर्ग उत्पादन करीत नाही, पण विविध वस्तूंचा उपभोग घेतो. हा वर्ग म्हणजे अनुत्पादक वर्ग होय. असा वर्ग समाजात अधिक असेल तर त्यांचा उपभोग सतत चालू राहतो. त्यामुळे मागणी वाढून अर्थव्यवस्था मंदीतून बाहेर पडण्यास मदत होते.

## २.३ सारांश :

**२:१:** १) आधुनिक काळातील व्यापारवाद व निसर्गवाद्यानंतरचा कालखंड (१७७६ ते १८४८) म्हणजेच सनातन कालखंड होय. ॲडम स्मिथच्या आर्थिक विचारापासून सनातन कालखंडाची सुरुवात होते. ॲडम स्मिथला आधुनिक अर्थशास्त्राचा जनक असे म्हणतात.

२) आधुनिक आर्थिक विचार मांडणारा अर्थतज्ज्ञांचा समुदाय म्हणजे सनातनवादी संप्रदाय होय. यामध्ये ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो, थॉमस माल्थस, प्रा. पिगु, जे. बी. से, जे. एस. मिल यांचा समावेश होतो.

३) १७७६ मध्ये ॲडम स्मिथ याने 'राष्ट्रांची संपत्ती' या नावाचा जो प्रसिद्ध ग्रंथ लिहिला व या पुस्तकामुळेच अर्थशास्त्रला एक स्वतंत्र शास्त्र म्हणून मान्यता मिळाली.

४) श्रमविभागणी - समाजात उत्पादन करताना सामाजिक सहकार्याची जी एक पद्धत असते त्यास श्रमविभागणी असे म्हणतात. कार्यक्षकतेत वाढ, श्रम व वेळेची बचत, जलद व मोठ्या प्रमाणावर उत्पादन, संशोधनास चालना हे श्रमविभागणीचे फायदे असून कामात कंटाळा व गतीशीलतेत घट हे श्रमविभागणीचे तोटे आहेत.

५) स्मिथने वस्तूच्या मूल्य निश्चितीत श्रमाला अधिक महत्त्व दिलेले आहे. उत्पादक श्रम हेच संपत्तीचे उगमस्थान आहे असे प्रतिपादन करून वस्तूंच्या मूल्यासंबंधी श्रममूल्य सिद्धांत मांडला आहे.

६) स्मिथच्या मते सरकारने काटकसरीच्या वापर करून सार्वजनिक खर्च कमीत कमी करावा. कर आकारणी हेच सरकारच्या उत्पन्नाचे एक प्रमुख साधन असून कर आकारणी करताना समता, निश्चितता, सोईस्करपणा, मितव्ययता या प्रमुख चार कसोट्या सांगितलेल्या आहेत.

**२:२:** १) डेव्हिड रिकार्डो हा दुसरा प्रसिद्ध सनातनवादी अर्थतंज्ञ असून त्याचा खंडविषयक सिद्धांत अर्थशास्त्रीय विचारात प्रसिद्ध आहे.

२) 'जमिनीच्या एकूण उत्पादनापैकी जो भाग जमिनीच्या उपजत व अविनाशी गुणाबद्दल जमीन मालकाला दिला जातो, त्याला खंड असे म्हणतात.'

३) रिकार्डोच्या मते, अन्नधान्याच्या किंमती खंडावरून ठरत नाहीत तर किंमतीवरून खंड ठरतो; म्हणजेच खंडाचा समावेश किंमतीत होत नाही.

४) रिकार्डोचा आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक 'तौलनिक उत्पादन खर्चाचा सिद्धांत' ही अर्थशास्त्रीय विचारातील महत्त्वाची भर आहे.

**२:३:** १) सनातन संप्रदायातील थॉमस माल्थस हा प्रामुख्याने त्याच्या लोकसंख्याविषयक सिद्धांतावरून अर्थशास्त्रात प्रसिद्ध आहे.

२) लोकसंख्येतील वाढ भूमिती पद्धतीने होत असल्याने दर २५ वर्षांनी लोकसंख्या दुप्पट होते. परंतु अन्नधान्यातील उत्पादन गणिती पद्धतीने वाढत असल्याने उपासमार, बेकारी, दारिद्र्य यासारख्या लोकसंख्या विषयक समस्या निर्माण होतात. म्हणून वाढती लोकसंख्या रोखण्यासाठी प्रतिबंधक व नैसर्गिक उपाय योजले पाहिजेत.

३) माल्थसच्या मते भांडवल संचय, अति उत्पादन व न्यून उपभोग ही भांडवलशाहीची खास वैशिष्ट्ये असून अर्थव्यवस्थेत अतिरिक्त उत्पादनाचे साठे पडून राहिल्याने मंदी सारखी आर्थिक अरिष्टे निर्माण होतात.

## २.४ पारिभाषिक शब्द

| | |
|---|---|
| **सनातन** | - अभिजात किंवा उत्कृष्ठ |
| **सनातनवादी संप्रदाय** | - सनातनवादी विचार मांडणारा अर्थतज्ञांचा समूह किंवा गट |
| **व्यापारतोल** | - विशिष्ठ कालखंडातील एखाद्या देशाचा आयात निर्यात दर्शविणारा तक्ता |
| **खुला व्यापार** | - कररहित आयात निर्यात |
| **तौलनिक** | - तुलनात्मक |
| **मितव्ययता** | - काटकसर |
| **विस्तृत शेती** | - विस्तीर्ण किंवा व्यापक शेती |
| **सखोल शेती** | - जमीनीचे क्षेत्रफळ कायम ठेवून श्रम व भांडवलाचे प्रमाण वाढवून शेती करणे |

**भूमिती श्रेणी** - वाढीचे प्रमाण दुप्पट (१:२:४:८)

**गणिती श्रेणी** - वाढीचे प्रमाण सरळ (१:२:३:४)

## २.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) ॲडम स्मिथ यास आधुनिक अर्थशास्त्रांचा .......... असे म्हणतात.

२) अर्थशास्त्रातील पहिले सुप्रसिद्ध पुस्तक .......... हे होय.

३) भारतीय खेड्यातील ........... पद्धती हे श्रमविभागणीचे उत्तम उदाहरण आहे.

४) ॲडम स्मिथच्या मते ........... हेच संपत्तीचे उगमस्थान होय.

५) पुनरुत्पादन करता न येणाऱ्या वस्तूंचे मूल्य त्या वस्तूंच्या ........... वरून ठरते.

६) 'The Principles of Political Economy and Taxation' हा ग्रंथ ....... अर्थतज्ञाने लिहिला आहे.

७) जमिनीच्या ........... व ........... गुणाबद्दल जमीन मालकास उत्पादनापैकी दिल्या जाणाऱ्या काही भागास खंड म्हणतात.

८) आंतरराष्ट्रीय व्यापारविषयक तौलनिक उत्पादन खर्चाचा सिद्धांत ........... अर्थतज्ञाने मांडला आहे.

९) लोकसंख्येचा सिद्धांत ........... अर्थतज्ञाने मांडला आहे.

१०) माल्थसच्या मते लोकसंख्येतील वाढ ........... श्रेणीने होते.

**ब) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१) जे. एस. मिल हा अखेरचा सनातनवादी अर्थतज्ञ होय.

२) अर्थव्यवस्थेच्या प्रगत अवस्थेत श्रम मूल्य सिद्धांतच खरा ठरतो.

३) ॲडम स्मिथच्या कर कसोट्या चार इतक्या आहेत.

४) ॲडम स्मिथच्या मूल्य सिद्धांतात उपयोगिकडे दुर्लक्ष झालेले आहे.

५) सीमान्त जमीनीसही खंड मिळतो, असे रिकार्डोचे मत आहे.

६) सखोल शेती पद्धतीत खंडाचा उद्भव होत नाही.

७) खंडावरून किंमत ठरत नसून किंमतीवरून खंड ठरतो, असे रिकार्डोचे मत आहे.

८) रिकार्डोने निर्वाह वेतन सिद्धांत मांडला आहे.

९) रिकार्डोने खुल्या व्यापाराचे समर्थन केलेले आहे.

१०) माल्थसने लोकसंख्या नियंत्रणासाठी संतती नियमनाच्या कृत्रिम साधनांच्या वापरावर अधिक भर दिलेला होता.

## २.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| **(अ)** | १) जनक | ६) रिकार्डो |
| | २) राष्ट्राची संपत्ती | ७) उपजत व अविनासी |
| | ३) बारा बलुतेदार | ८) रिकार्डो |
| | ४) उत्पादक श्रम | ९) थॉमस माल्थस |
| | ५) दुर्मिळते | १०) भूमिती श्रेणीने |
| **(ब)** | १) बरोबर | ६) चूक |
| | २) चूक | ७) बरोबर |
| | ३) बरोबर | ८) बरोबर |
| | ४) बरोबर | ९) बरोबर |
| | ५) चूक | १०) चूक |

## २.७ सरावासाठी स्वाध्याय :

### अ) दीर्घोत्तरी प्रश्न

१) ॲडम स्मिथच्या मूल्यविषयक सिद्धांताचे परीक्षण करा.

२) ॲडम स्मिथची श्रमविभागणीची संकल्पना स्पष्ट करून तिचे फायदे व तोटे सांगा.

३) रिकार्डोच्या खंडविषयक सिद्धांताचे मूल्यमापन करा.

४) रिकार्डोच्या विदेशी व्यापारविषयक विचारांचा आढावा घ्या.

५) माल्थसच्या लोकसंख्या सिद्धांताचे स्पष्टीकरण करा.

६) माल्थसचे अतिरिक्त उत्पादन व आर्थिक अरिष्टे याविषयीचे विचार सविस्तर मांडा.

**ब) टीपा लिहा.**

१) स्मिथच्या कसोट्या

२) स्मिथचे श्रमविभागणीबाबत विचार

३) रिकार्डोचा मूल्य सिद्धांत

४) रिकार्डोचे व्यापारतोलाविषयी विचार

५) माल्थसचा लोकसंख्या सिद्धांत

६) माल्थसचे अतिरिक्त उत्पादनाबाबत विचार.

## २.८ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) प्रा. डॉ. जे. एफ. पाटील (संपादक) 'आर्थिक विचारांचा इतिहास' (२००५) फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२) प्रा. रायखेलकर ए. आर., 'आर्थिक विचारांचा इतिहास' (२००५) विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद.

३) प्रा. ठक्कर के. एच., 'आर्थिक कल्पनांचा विकास' (१९९४-९५) फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४) प्रा. गोखले आर. एम., 'अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास (१९७९) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे ३०

५) प्रा. गाडगीळ बाळ, 'अर्थशास्त्राचे शिल्पकार' (अनुवाद) (१९६९) मॅजेस्टिक बुक स्टॉल.

६) प्रा. देसाई स. श्री. मु. प्रा. येवलेकर चिं. त्र्यं., 'आर्थिक विचारांचा इतिहास (१९७१) ढोकळ प्रकाशन, लक्ष्मी रस्ता, पुणे ३०

७) Bhatnagar K. P. and Bahadur Satish, 'A History of Economic Thougst (1965) Kishore Publishing House, Kanpur.

८) Gide and Rist. - History of Economic Doctirines.

९) L. H. Haney - History of Economic Thought.

१०) प्रा. काटे के. बी., अर्थशास्त्रीय विचारांचा विकास.


◈◈◈

# घटक क्र. : ३

# फ्रेडरिक लिस्ट

**अनुक्रमणिका**

३.० उद्दिष्ट्ये

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

३.२.१ फ्रेडरिक लिस्टचा जीवन परिचय (१७८९-१८४६)

३.२.२ सनातनवादी संप्रदायावर लिस्टने केलेली टीका

३.२.३ लिस्टच्या आर्थिक विकासाच्या अवस्था

३.२.४ फ्रेडरिक लिस्टचा राष्ट्रवाद

३.२.५ फ्रेडरिक लिस्टचे संरक्षणाचे धोरण

३.२.६ फ्रेडरिक लिस्टच्या विचारसरणीचे मूल्यमापन

३.३ सारांश

३.४ पारिभाषिक शब्दांचे अर्थ

३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

३.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

३.७ सरावासाठी स्वाध्याय

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ ग्रंथ सूची

## ३.० उद्दिष्ट्ये (Objectives)

या घटकाच्या अभ्यासानंतर आपल्याला :

- फ्रेडरिक लिस्टचा जीवन-परिचय समजून घेता येईल.
- फ्रेडरिक लिस्टने सनातनवादी विचारसरणीवर केलेली टीका अभ्यासता येईल.
- फ्रेडरिक लिस्टच्या आर्थिक उत्क्रांतीचा सिद्धांत समजून घेता येईल.

- फ्रेडरिक लिस्टच्या आर्थिक उत्क्रांतीच्या सिद्धांताचे मूल्यमापन करता येईल.
- फ्रेडरिक लिस्टचा आर्थिक राष्ट्रवाद समजून घेता येईल.
- फ्रेडरिक लिस्टच्या संरक्षणाच्या धोरणाचा अभ्यास करता येईल.
- फ्रेडरिक लिस्टच्या संरक्षण धोरणाची वैशिष्ट्ये अभ्यासता येतील.
- फ्रेडरिक लिस्टच्या संरक्षण धोरणाचे मूल्यमापन करता येईल.
- फ्रेडरिक लिस्टच्या विचारसरणीचे मूल्यमापन करता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

पूर्वीच्या प्रकरणात आपण सनातन संप्रदायाच्या आर्थिक विचारांचा आढावा घेतला. सनातन संप्रदायातील स्मिथ, रिकार्डो, माल्थस इत्यादीच्या विचारांचा अभ्यास केला. संपूर्ण युरोपखंडावर या विचारसरणीचा बराच कालावधीपर्यंत प्रभाव होता. सनातन संप्रदायाचे अर्थशास्त्र हे व्यक्तिस्वातंत्र्य, निर्हस्तक्षेपाचे तत्व, खुली स्पर्धा, व्यक्ति व समाज यांचे समान हितसंबंध, खुला व्यापार इ. तत्वावर आधारलेले होते या सर्व तत्त्वांचा जर देशांनी स्वीकार केला तर त्या देशांचा वेगाने आर्थिक विकास होतो. इंग्लंडप्रमाणेच अनेक देशांनी या तत्त्वानुसार आपल्या देशाची उभारणी करण्यास सुरुवात केली होती.

सनातनवाद्यांच्या वरील तत्त्वानुसार काही देशांचा मात्र आर्थिक विकास झाला नाही. त्यामुळे सनातनवाद्यांच्या विचारांच्या उपयुक्ततेविषयी साशंकता निर्माण झाली व सनातनवाद्यांच्या विचारावर टीकेला सुरवात झाली. सनातनवाद्यांनी व्यक्ती व विश्व यांच्या विकासावर आपले सर्व लक्ष केंद्रित केले होते. त्यांनी आपल्या आर्थिक विचारात व्यक्तीवरून एकदम विश्वावर उडी घेतली होती. परंतु व्यक्ती व विश्व या दोघांना जोडणारा 'राष्ट्र' हा महत्त्वाचा दूवा असतो. परंतु राष्ट्र या संकल्पनेचा सनातनवाद्यांनी आपल्या आर्थिक विचारात विचार केला नाही. प्रत्येक राष्ट्राची भाषा, धर्म, वंश, संस्कृती, परंपरा, आर्थिक हितसंबंध वेगवेगळे असतात त्यामुळे प्रत्येक राष्ट्राला स्वत:चे एक वेगळे अस्तीत्व असते. म्हणून व्यक्ती व विश्व ह्यांच्यापेक्षा राष्ट्राला अधिक महत्त्व देणे आवश्यक आहे, असा विचार जोर धरू लागला व सनातनवाद्यांच्या विचारावर टीका होवू लागली. व्यक्तिकल्याण व विश्वकल्याणापेक्षा राष्ट्राच्या कल्याणाला अनन्यसाधारण महत्त्व असते. त्यामुळे राष्ट्राचे कल्याण कसे साधता येईल ह्याविषयी अनेक आर्थिक विचार मांडण्यात येवू लागले. त्यातूनच राष्ट्राला महत्त्व देणारी 'राष्ट्रवादी विचारसरणी' अनेक विचारवंत मांडू लागले. ह्या आर्थिक राष्ट्रवादाची मांडणी जॉन रे, लॉडरडेल, लिस्ट यांनी केली. त्यापैकी फ्रेडरिक लिस्ट हा अत्यंत महत्त्वाचा अर्थशास्त्रज्ञ होय. लिस्टच्या आर्थिक विचारांचा परिचय आपण या घटकात करणार आहोत.

## ३.२ विषय-विवेचन

या घटकात आपण फ्रेडरिक लिस्टच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणार आहोत. हा अभ्यास करताना फ्रेडरिक लिस्टने सनातनवादी विचारसरणीवर केलेल्या टीकेचाही परामर्श घेणार आहोत. लिस्टने मांडलेल्या आर्थिक कल्पनांचा उगम तत्कालिन जर्मन परिस्थितीनुसार झाला आहे, असे आपणास स्पष्ट करता येईल. लिस्टने मांडलेल्या आर्थिक विकासाच्या अवस्था, त्याची राष्ट्रवादी भूमिका तसेच त्याची संरक्षण नीती प्रस्तुत घटकात आपणास अभ्यासता येईल.

### ३.२.१ फ्रेडरिक लिस्टचा जीवन-परिचय

फ्रेडरिक लिस्टचा जन्म जर्मनीत सन १७८९ मध्ये झाला. सुरवातीस त्याने नोकरीत प्रवेश मिळविला आणि पुढे त्याने आपल्या हुषारीच्या व कर्तबगारीच्या जोरावर वरच्या दर्जाच्या अधिकारी पदापर्यंत पोहचला. त्याचवेळी विद्यापीठातील व्याख्याने ऐकण्याचा व अभ्यासण्याचा त्याचा कार्यक्रम चालू होता. त्यानंतर लिस्टने विद्यापीठात अर्थशास्त्र व राज्यशास्त्राचा प्राध्यापक म्हणून काम केले. परंतु जर्मन नोकरशाहीवर व राज्यसंस्थेवर टीका करणारे लिखान त्याने केल्याने त्या लिखानाबद्दल त्याला जाब विचारण्यात आला व त्यामुळे १८१९ मध्ये लिस्टने आपल्या नोकरीचा राजिनामा दिला. याच काळात जर्मनीतील सरकारने देशात अंतर्गत जकाती (कर) लादल्या होत्या. सरकारच्या या अंतर्गत कर बसविण्याच्या धोरणावर लिस्टने कडाडून टीका केली. त्याबद्दल लिस्टला दहा महिन्यांची शिक्षा झाली. परंतु देशाबाहेर जाण्याच्या अटीवर त्याची मुक्तता करण्यात आली.

सन १८२० मध्ये लिस्ट हा तेथील कायदेमंडळावर निवडून आला होता. त्याने सरकारच्या धोरणावर टीका करण्याबरोबरच अनेक आर्थिक सुधारणाही सुचविल्या होत्या. परंतु तरीही त्याला हा देश सोडावा लागला. त्यानंतर लिस्ट अमेरिकेत स्थायिक होण्याच्या उद्देशाने गेला. त्याच काळात लिस्टने फ्रान्स, स्वित्झर्लंड, इंग्लंड इ. देशांत जावून तेथील परिस्थितीचा अभ्यास केला. अमेरिकेत संपादक म्हणून लिस्टने आपल्या कामास सुरवात केली व तेथेही संरक्षणाच्या धोरणाचा पुरस्कार व प्रचार केला आणि ॲडम् स्मिथच्या खुल्या व्यापाराबद्दलचे सर्व विचार सन १८२७ मध्ये **Outline of American Political Economy** या ग्रंथात प्रसिद्ध केले.

सन १८३२ मध्ये अमेरिकन सरकारचा प्रतिनिधी म्हणून लिस्ट पुन्हा जर्मनीस आला. परंतु त्याचे मन त्यात रमले नाही. म्हणून शेवटी तो स्वदेशातच स्थायिक झाला. १८४१ मध्ये राष्ट्रवादी अर्थशास्त्र **(National System of Political Economy)** हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. या ग्रंथात त्याने स्मिथच्या खुल्या व्यापाराच्या धोरणावर जोरदार टीका केली व संरक्षणाच्या धोरणाचा पुरस्कार केला.

लिस्टने २२ मार्च, १८३३ मध्ये Zollvenien स्थापन करण्याचा निर्णय घेतला व १ जानेवारी, १८३४ पासून या नव्या योजनेस सुरवात केली. ऑस्ट्रिया सोडून इतर सर्व घटक राज्यानी त्यात भाग घेतला.

लिस्टचे जर्मनीचे व्यापारी एकीकरण करण्याचे स्वप्न पूर्ण झाले. अशा रीतीने जर्मनीच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि औद्योगिक प्रगतीसाठी जन्मभर तळमळीने कार्य करणाऱ्या या अर्थशास्त्रज्ञाला मात्र हयातीत योग्य वागणूक जर्मन लोकांकडून मिळाली नाही व शेवटपर्यंत त्याच्यावर विश्वास दाखविला नाही व शेवटी आर्थिक परिस्थिती व प्रकृती खालावल्याने निराश होवून सन १८४६ मध्ये त्याने आत्महत्त्या केली. त्याच्या मृत्युनंतर मात्र जर्मनीने त्याला अनेक पदव्या व मानसन्मान बहाल करून त्याच्या कार्याचा गौरव करण्याचा प्रयत्न केला.

### ३.२.२ सनातनवादी संप्रदायावर लिस्टने केलेली टीका

फ्रेडरिक लिस्टच्या काळातील जर्मनीची परिस्थिती समजून घेतल्यानंतर लिस्टने सनातनवादी विचारसरणीवर केलेल्या टीकेंचा आढावा घेता येईल. लिस्टने आपल्या ग्रंथात सुरवातीलाच सनातनवादी विचारसरणीवर जोरदार टीका केली आहे. सनातनवादी विचारसरणीचा उगम प्रामुख्याने इंग्लंडमध्ये झाला. सर्व देश समान आर्थिक पातळीवर असतात. त्यामुळे आपले सिद्धांत व धोरणे ही सर्वकाळ व सर्व ठिकाणी लागू पडतात, असे सनातनवाद्यांनी प्रतिपादन केले. व्यक्तिवरून विश्वाच्या विकासावर लक्ष केंद्रित करणाऱ्या सनातनवाद्यांनी 'राष्ट्र' या महत्त्वाच्या दूव्याकडे दुर्लक्ष केले. सनातनवाद्यांच्या विचारसरणीच्या अवलंबाने फ्रान्स, जर्मनी, अमेरिका या देशांची प्रगती इंग्लंडप्रमाणे झाली नाही. त्यामुळे राष्ट्रवादी विचारसरणीचा उगम झाला. या विचारसरणीचा खंदा पुरस्कर्ता लिस्ट याने सनातनवादी विचारसरणीवर प्रामुख्याने पुढीलप्रमाणे टीका केली आहे. तिचा परामर्श आपणास घेता येईल.

१) **काल्पनिक गृहिते :** सनातवाद्यांनी विशेषत: स्मिथ व त्यांच्या अनुयायांनी प्रत्यक्ष अस्तित्वात असणाऱ्या जगाकडे अगर निरनिराळ्या राष्ट्रातील परिस्थितीकडे लक्ष न देता अस्तित्वात नसलेल्या गोष्टी गृहित धरून आपले सिद्धांत मांडण्याचा प्रयत्न केला. उदा. जगातील निरनिराळी राष्ट्रे समान आर्थिक पातळीवर असून त्यांच्यात समानता प्रस्थापित झालेली आहे. तसेच जगात सर्वत्र शांतता नांदत असून युद्ध होण्याची भीती नाही. आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या तत्त्वाने जागतिक ऐक्य साधले जात आहे अशा काल्पनिक गृहितांचा सनातनवाद्यांनी आपल्या विवेचनात आधार घेतला आहे. आर्थिक प्रश्नांचा विचार करताना प्रत्यक्ष परिस्थिती विचारात न घेता अशा काल्पनिक गृहितांना स्थान देवू नये असे लिस्टने सनातनवाद्यांच्या विचारावर टीका करताना स्पष्ट केले.

२) **अर्थशास्त्रीय सिद्धांत स्थूल-काल-निरपेक्ष नसतात :** सनातनवाद्यांनी आपले सिद्धांत स्थल-काल-निरपेक्ष असून ते कायम स्वरूपाचे व नेहमी खरे ठरणारे असतात. असेच ते कोणत्याही देशाला लागू पडणारे असतात, असे प्रतिपादन केले. परंतु लिस्टच्या मते, कोणत्याही शास्त्राचे सिद्धांत चिरकाल टिकणारे नसतात. कारण परिस्थितीतील बदलाप्रमाणे त्यात बदल घडवून आणावा लागतो अन्यथा आज खरे ठरणारे सिद्धांत उद्या चुकीचे ठरतात. कारण काळाच्या ओघात कोणतीच गोष्ट कधीच चिरकाल खरी व उपयुक्त ठरणारी राहू शकत नाही. परिस्थितीतील बदलाप्रमाणे सिद्धांतात किंवा तत्त्वात योग्य बदल घडवून आणावा

लागतो व असा बदल घडवून आणला तरच हे सिद्धांत किंवा तत्त्वे उपयोगी पडतात अन्यथा त्यांच्या उपयुक्ततेविषयी मर्यादा पडते. त्यामुळे अर्थशास्त्रीय सिद्धांत हे कोठेही व केव्हाही खरे ठरणारे उपयुक्त आहेत हा सनातनवाद्यांचा दावा चूकीचा आहे, असे लिस्ट यांचे मत आहे.

३) **व्यक्तिवादी भूमिका :** स्मिथ, रिकार्डो इ. सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी आपल्या आर्थिक विचारात व्यक्तिस्वातंत्र्याला अवास्तव महत्त्व दिले आहे. त्यानंतर त्यांनी अखिल मानवजातीचा विचार केला आहे. प्रत्येक व्यक्तिला आर्थिक स्वातंत्र्य दिल्यास व्यक्तिहितातून समाजाचे म्हणजेच राष्ट्राचे हित साध्य होते. परंतु व्यवहारात व्यक्तीहितातून समाजहित साध्य होते, असे दिसून येत नाही. व्यक्तिहित व समाजहित यामध्ये बऱ्याचवेळा संघर्ष निर्माण होतो असे लिस्टने प्रतिपादन केले. लिस्टच्या मते, व्यक्तिहितापेक्षाही राष्ट्रहित महत्त्वाचे असते. तसेच व्यक्तीला भरपूर आर्थिक स्वातंत्र्य दिल्यास व्यक्तीचे हित होते ही कल्पना योग्य नाही. थोडक्यात, सनातनवाद्यांनी अत्यंतिक व्यक्तिवादाची भूमिका स्वीकारून व्यक्तिहित व व्यक्तीस्वातंत्र्य यांचेच अवास्तव महत्त्व मान्य केले आहे, अशी लिस्ट यांनी टीका केली आहे.

४) **'राष्ट्र' या कल्पनेकडे दुर्लक्ष :** सनातनवाद्यांनी व्यक्तीहिताच्या प्रश्नाकडून एकदम विश्वहिताच्या प्रश्नाकडे झेप घेतली आहे व यासाठी संपूर्ण विश्वातील संपूर्ण मानव समाज हा त्यांनी एक घटक मानला आहे. व्यक्तिवरून एकदम विश्वाचा विचार करताना 'राष्ट्र' या संकल्पनेचा सनातनवाद्यांनी विचार केला नाही, अशी लिस्ट यांची टीका आहे. सनातनवाद्यांनी व्यक्तीचा विचार करताना व्यक्ती व विश्व या दोहोंमधील महत्त्वाचा दूवा राष्ट्र या कल्पनेकडे दूर्लक्ष केले आहे. सनातनवाद्यांच्या मते, प्रत्येक व्यक्तीला स्वहित साधण्याची वृत्ती ही उपजतच असते. त्यामुळे व्यक्तीला सर्वप्रकारचे आर्थिक स्वातंत्र्य दिल्यास व्यक्तीचे हित साधले जाते. व्यक्तीचा अशा प्रकारे विचार केल्यावर त्यांनी एकदम विश्वावर उडी मारून विश्वाचा विचार केला. सनातनवाद्यांच्या मते, जर सर्व देशांनी खुल्याव्यापाराचे धोरण, निर्हस्तक्षेपाचे धोरण यांचा स्वीकार केला तर सर्व देशांचे पर्यायाने विश्वाचे कल्याण साधले जाईल.

लिस्टच्या मते, व्यक्तिच्या कल्याणावरून एकदम विश्वाच्या कल्याणाकडे झेप घेणाऱ्या सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांना व्यक्ती व विश्व यामध्ये असणाऱ्या 'राष्ट्र' नावाच्या महत्त्वाच्या दूव्याचा विसर पडला. सनातनवाद्यांनी राष्ट्र या घटकाकडे दूर्लक्ष करतानाच प्रत्येक राष्ट्राची आर्थिक परिस्थिती समान असते तसेच सर्व राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या समान पातळीवर असतात असे प्रतिपादन केले. परंतु लिस्टच्या मते, जगातील सर्व राष्ट्रांचा आर्थिक विकास सारखा झालेला नसल्याने ती समान आर्थिक पातळीवर नसतात. त्यामुळे जे आर्थिक धोरण एखाद्या राष्ट्राला उपकारक ठरते तेच धोरण दुसऱ्या राष्ट्राला उपकारक ठरेलच असे नाही. त्यामुळे लिस्टच्या मते, प्रत्येक देशाने आपल्या आर्थिक विकासाची पातळी लक्षात घेऊनच स्वतंत्र असे व योग्य आर्थिक धोरण आखणे हिताचे असते. अशी राष्ट्रवादी भूमिका पहिल्यांदाच लिस्टने मांडली. त्यामुळे लिस्टला 'राष्ट्रवादी अर्थशास्त्रज्ञ' म्हणतात. सनातनवादी विचारसरणीवर लिस्टने टीका करताना असे प्रतिपादन केले की, आर्थिक दृष्ट्या संपन्न असणाऱ्या राष्ट्रांनी खुल्या व्यापाराचे धोरण स्वीकारल्यास त्यांचा फायदा होईल. याउलट आर्थिकदृष्ट्या मागास देशांनी जर या धोरणाचा स्वीकार केला तर त्यांचा तोटा होईल.

यासाठी लिस्टच्या मते, अप्रगत देशांनी खुल्या धोरणाचा स्वीकार न करता संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार केला पाहिजे. कारण जगातील सर्व राष्ट्रे कमी अधिक प्रमाणात प्रगत असतात. त्यामुळे प्रत्येक राष्ट्राने आपला स्वतंत्रपणे विचार करून म्हणजेच राष्ट्र या घटकाला महत्त्व देवून आर्थिक धोरण आखावे.

५) **भौतिकवादी दृष्टिकोण :** सनातनवाद्यांनी विशेषत: स्मिथने मूल्य व संपत्तीच्या निर्मितीबाबत भूमिका मांडताना भौतिकवादी दृष्टिकोण स्वीकारला असे लिस्ट याने टीका करताना स्पष्ट केले. लिस्टच्या मते, सनातनवाद्यांनी भौतिकवादी भूमिका स्वीकारल्याने विनिमय मूल्य असलेल्या संपत्तीच्या उत्पादनावर लक्ष केंद्रित केले. परंतु वर्तमानकालीन व भविष्यकालीन पिढीच्या राजकिय हितसंबंधांकडे व नैतिक मूल्याकडे पूर्णपणे दूर्लक्ष केले. त्यामुळे राष्ट्राचे उत्पादनशक्ती वाढविण्याच्या आवश्यकतेच्या प्रश्नावर सनातनवाद्यांनी लक्ष दिले नाही. परंतु लिस्टच्या मते, संपत्तीच्या साठ्यापेक्षाही संपत्तीच्या निर्मितीची प्रक्रिया महत्त्वाची असते. याकडे स्मिथने दुर्लक्ष केले. लिस्टने असे प्रतिपादन केले की, राष्ट्राची संपत्ती निर्माण करण्याच्या सामर्थ्यावर व उत्पादनशक्तीवर भर देणे महत्त्वाचे असते. कारण जेवढा उपभोग तेवढ्याच वस्तूंची राष्ट्रात निर्मिती झाली तर राष्ट्र आहे त्या स्थितीत राहील. यासाठी संपत्तीच्या साठ्यापेक्षाही संपत्तीची निर्मिती करणारी उत्पादन शक्ती ही महत्त्वाची असते. परंतु स्मिथ व स्मिथच्या अनुयायांनी भौतिक दृष्टिकोणातूनच संपत्तीकडे पाहिले. परंतु संपत्ती निर्माण करणाऱ्या राष्ट्राच्या उत्पादनशक्तीकडे दुर्लक्ष केले.

६) **खुल्या व्यापार व निर्हस्तक्षेपी धोरण अयोग्य :** सनातवाद्यांनी पुरस्कार केलेल्या खुल्या व्यापाराच्या धोरणावर व निर्हस्तक्षेपी धोरणावर फ्रेडरिक लिस्टने जोरदार टीका केली आहे. लिस्टच्या मते, समान आर्थिक पातळीवर असणाऱ्या राष्ट्रांना खुल्या व्यापाराचे धोरण फायदेशीर ठरते. परंतु हेच धोरण अप्रगत देशांना तोट्याचे ठरते. म्हणजेच प्रगत व अप्रगत अशा दोन्ही देशांनी जर खुल्या व्यापारीधोरणाचा स्वीकार केला तर प्रगत देशांचा आणखी विकास होतो व अप्रगत देशांचा विकास रोखला जातो. यासाठी समान आर्थिक पातळीवर असणाऱ्या राष्ट्रातच समान आर्थिक धोरण योग्य ठरते. आर्थिक विकासाच्या असमान पातळीवर असणाऱ्या देशांनी जर समान धोरण (खुल्याव्यापाराचे) स्वीकरले तर गरीब देशांचा तोटाच होतो, असे लिस्ट यांचे मत आहे.

लिस्टच्या मते, सनातनवाद्यानी जगातील सर्व राष्ट्रे आर्थिक विकासाच्या एकाच पातळी वर असतात असे गृहित धरले. त्यामुळे त्यांच्यात युद्ध होण्याची भीती नाही. त्यांच्यात समानता व शांतता नांदत आहे म्हणूनच सर्व देशांनी खुल्या व्यापारीधोरणाचा स्वीकार करावा तसेच सनातनवाद्यांनी स्वहित साधण्याच्या नैसर्गिक प्रवृत्तीतून व्यक्तीविकास व त्यातून विश्वाचा विकास होतो, असे गृहित धरले व सरकारच्या निर्हस्तक्षेपी धोरणाचे समर्थन केले. परंतु लिस्टने सनातनवाद्यांच्या निर्हस्तक्षेपी धोरणावर टीका करताना असे प्रतिपादन केले की, सरकारने किंवा राज्यसंस्थेने कुंपनावर बसून लोकांच्या आर्थिक व्यवहाराकडे केवळ पहात बसणे योग्य नाही. राष्ट्राच्या विकासासाठी व देशाचे स्वतंत्र अस्तित्व टिकविण्यासाठी किंबहुना राष्ट्राचे भवितव्य उज्वल करण्यासाठी सरकारने लोकांच्या आर्थिक व्यवहारात हस्तक्षेप किंवा ढवळाढवळ करण्यास काहीच हरकत नाही. सरकारने निर्हस्तक्षेपी धोरणानुसार केवळ परकिय देशांच्या आक्रमणापासून देशांचे संरक्षण

करणे अंतर्गत शांता व सुव्यवस्था राखणे व न्यायदान ही केवळ मोजकीच कामे न करता राष्ट्राला आर्थिक दृष्ट्या संपन्न व समृद्ध बनविणे व त्यासाठी सरकारी हस्तक्षेपाची आवश्यकता असल्याचे लिस्टने प्रतिपादन केले.

अशाप्रकारे लिस्टने सनातनवादी विचारसरणीवर जरी जोरदार टीका केली असली तरी तो सनातनवाद्यांचा शत्रू मुळीच नव्हता. लिस्टची विचारसरणी व सनातन विचारसरणी यात मूलभूत यात मूलभूत असा फरक दिसून येत नाही. इरिक रोलच्या मते, ''स्मिथ; रिकार्डो यांच्या प्रमाणेच लिस्टही औद्योगिक भांडवलशाहीचा पुरस्कर्ता होता.'' लिस्टने जरी सनातनवादी विचारसरणीवर टीका केली असली तरी लिस्टची विचारसरणी सनातनवादी विचासरणीपेक्षा भिन्न आहे, असे म्हणता येत नाही. उलट लिस्टला इतर विचारसणीपेक्षा सनातनवादी विचारसरणी अधिक जवळची वाटत होती.

लिस्टने जरी खुल्या व्यापारीधोरणावर व निर्हस्तक्षेपीधोरणावर टीका केली असली तरी लिस्टला खुल्या व्यापाराचे धोरण अमान्य होते असे नाही. तर औद्योगिक विकासाबाबत त्यांची मते एकच आहेत. परंतु इंग्लंडची परिस्थिती जर्मनीच्या आर्थिक परिस्थितीपेक्षा वेगळी होती. इंग्लंडची औद्योगिक प्रगती झालेली असल्याने त्यांना वाढत्या उत्पादनाला बाजारपेठेची गरज होती. परंतु जर्मनीची स्थिती ह्याविरुद्ध असल्याने स्मिथ, रिकार्डो यांनी मांडलेल्या खुल्या धोरणाने जर्मनीचा विकास होणार नव्हता. याची लिस्टला जाणीव होती. म्हणून लिस्टने जर्मनीच्या बाबतीत संरक्षणाचे धोरणच योग्य असल्याचे प्रतिपादन केले. परंतु जर्मनीची स्थिती सुधारल्यावर म्हणजेच जर्मनी व इंग्लंड आर्थिक विकासाच्या समान टप्प्यात आल्यानंतर हे संरक्षणाचे धोरण न स्वीकारता जर्मनीने खुले धोरणच स्वीकारणे जर्मनीच्या हिताचे होईल, असे लिस्ट याने प्रतिपादन केले. म्हणजेच लिस्ट यांचे संरक्षण धोरण हे सुद्धा तात्पुरत्या स्वरूपाचे होते.

लिस्ट व सनातनवादी विचारसरणीत भिन्नता निर्माण होण्याचे कारण आर्थिक विकास ह्या एकाच ध्येयाप्रत पोहचण्याचे दोघांचे मार्ग वेगवेगळे होते. याचे कारण त्यांच्या राष्ट्रातील वेगवेगळी परिस्थिती हे आहे ही परिस्थितीतील भिन्नता सोडली तर सनातनवाद्यांचे सिद्धांत व लिस्टची विचारसरणी ह्यांच्यात बऱ्याच बाबतीत एकमत असल्याचे दिसते.

### ३.२.४ **लिस्टच्या आर्थिक विकासाच्या अवस्था** (लिस्टचा आर्थिक उत्क्रांतीचा सिद्धांत)

सनातनसंप्रदायावर लिस्टने केलेली टीका समजून घेतल्यानंतर लिस्टच्या आर्थिक विकासाच्या अवस्थांचा अभ्यास करता येईल.

जगातील निरनिराळ्या देशांच्या आर्थिक इतिहासाचा अभ्यास करून लिस्टने आपल्या ग्रंथाच्या पहिल्या खंडात आर्थिक विकासाच्या टप्प्यांचे किंवा विविध अवस्थांचे विवेचन केले आहे. लिस्टच्या मते, प्रत्येक देशाला आर्थिक प्रगतीच्या अगर विकासाच्या निरनिराळ्या अवस्थातून जावे लागते. लिस्टच्या आर्थिक विकासाच्या अवस्थांना 'लिस्टचा आर्थिक उत्क्रांतीचा सिद्धांत' असेही म्हणतात.

लिस्टच्या मते, जगातील निरनिराळे देश निरनिराळ्या आर्थिक पातळीवर अगर अवस्थेत असतात. राज्यकर्त्यांची ही जबाबदारी असते की, त्यांनी आपल्या देशाची आर्थिक प्रगती घडवून आणण्याच्या दृष्टीने विशिष्ट आर्थिक धोरण आखणे आवश्यक असते. सनातनवाद्यांनी सर्व देश एकाच आर्थिक पातळीवर असतात, असे प्रतिपादन केले होते हे लिस्टला मान्य नव्हते. जगातील देश वेगवेगळ्या आर्थिक विकासाच्या अवस्थेत असतात. म्हणजेच त्यांचा कमी-अधिक विकास झालेला असतो. त्यामुळे जगातील सर्वच देशांनी एकाच प्रकारच्या आर्थिक धोरणाचा स्वीकार करणे योग्य होणार नाही तर ज्या देशात आर्थिक विकासाची जी अवस्था असेल त्याला अनुसरून त्या देशाला आपले आर्थिक धोरण आखावे लागेल. कोणत्याही देशाला एकदम आर्थिक विकास शक्य नसतो. त्याला विकासाच्या वेगवेगळ्या अवस्थामधून जावे लागते, असे लिस्ट यांचे मत होते. म्हणूनच स्मिथने प्रतिपादन केलेल्या खुल्या व्यापारी धोरणावर लिस्टने टीका केली. स्मिथच्या मते, जगातील सर्व देश विकासाच्या समान पातळीवर असतात. त्यामुळे सर्व देशांनी आर्थिक विकासाबाबत खुल्या धोरणाचा विचार करावा त्यामुळे सर्व देशांचे हित साध्य होईल. परंतु लिस्टने जगातील विविध देशांच्या आर्थिक इतिहासाचा अभ्यास करून असा निष्कर्ष काढला की प्रत्येक देश विकासाच्या वेगवेगळ्या अवस्थेत असल्याने सर्व देशांनी खुले धोरण स्वीकारणे योग्य नाही तर प्रत्येक देशाने आपण विकासाच्या कोणत्या अवस्थेत आहे हे पाहूनच म्हणजे प्रसंगी विकासाच्या प्राथमिक अवस्थेत संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करूनच वरच्या अवस्थेत जावे.

लिस्टने सनातनवाद्यांच्या खुल्या धोरणावर टीका करतानाच आर्थिक विकासाचे पाच टप्पे किंवा अवस्था असतात असे प्रतिपादन केले आहे. त्या अवस्था किंवा टप्पे पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१) **शिकारी अवस्था :** लिस्टच्या मते, या अवस्थेत शिकारी टोळ्यांचा प्रदेश असे देशाचे स्वरूप असते या अवस्थेत लोक टोळ्या करून राहतात. हे सर्व लोक प्राथमिक अवस्थेतील जीवन जगत असतात. लोकांच्या मध्ये सहकार, संशोधनवृत्ती, उपक्रमशीलता यांचा अभाव असतो. या अवस्थेतील देशाने खुल्या व्यापारी धोरणाचा स्वीकार करावा व आपल्या गरजा वाढविण्याचे कार्य केले पाहिजे. समाजाच्या गरजा वाढल्याने देवघेवींची संख्या वाढून आर्थिक विकासाच्या दुसऱ्या अवस्थेत पोहचणे शक्य होईल.

२) **पशुपालन अगर गुराखी अवस्था :** या अवस्थेत पशुपालन हा लोकांचा मुख्य व्यवसाय असतो. त्यामुळे गुराखी समाजाचा प्रदेश असे देशाचे स्वरूप असते. याही अवस्थेत इतर सर्व परिस्थिती पहिल्या अवस्थेप्रमाणेच असते. त्यामुळे विकासाच्या याही अवस्थेत देशाने खुल्या व्यापारी धोरणाचा अवलंब करून आपल्या गरजा व देवघेवींची संख्या वाढविली तर देश आर्थिक विकासाच्या पुढच्या अवस्थेत प्रवेश करण्यास समर्थ बनतो, असे लिस्टने प्रतिपादन केले.

३) **शेतकी अवस्था :** आर्थिक विकासाच्या या वैशिष्ट्यपूर्ण अवस्थेत शेतीव्यवसायाचा देशात विकास झालेला असतो. देशात शेती व कच्च्या मालाचे उत्पादन वाढलेले असते. लोकांचे जीवन स्थिर झालेले असते. एक प्रकारचे सामाजिक स्थैर्य प्राप्त करण्याच्या दृष्टीने प्रयत्न या अवस्थेत केले जातात. देशातील शेती उत्पादनात वाढ होत असल्याने या शेतमालाची दुसऱ्या देशात निर्यात कारून त्याच्या बदल्यात इतर

देशाकडून तयार वस्तू मिळविणे आवश्यक असते. त्यामुळे या अवस्थेत देशाने खुल्या व्यापारी धोरणाचा स्वीकार करावा म्हणजे देशातील शेतमालाची निर्यात करून आपल्या देशाला आवश्यक असणाऱ्या इतर वस्तू मिळविणे शक्य होते. लिस्टच्या मते, अशा धोरणाने देशाला पुढच्या अवस्थेकडे वाटचाल करणे शक्य होते.

४) **शेती-कारखानदारी (उद्योगधंदे) अवस्थ :** या अवस्थेत शेतीबरोबर कारखानदारी किंवा उद्योगधंद्याची वाढ होण्यास सुरुवात होते. परंतु या अवस्थेतील देशातील उद्योगधंदे बाल्यावस्थेत असतात. देशात संघटित राज्यसंस्था स्थापण झालेली असते. त्यामुळे देशातील उद्योगधंद्यात वाढ घडवून आणण्यासाठी या अवस्थेत असणाऱ्या देशांनी खुल्या व्यापारी धोरणाऐवजी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करणे योग्य असते. लिस्टच्या मते, संरक्षणाच्या धोरणामुळेच देश आर्थिक विकासाच्या पुढच्या अवस्थेत पदार्पण करू शकतो.

५) **शेती-कारखानदारी आणि व्यापार अवस्था :** या अवस्थेत देशात शेती, उद्योगधंदे यांच्याबरोबर देशातील अंतर्गत व्यापार व आंतरराष्ट्रीय व्यापाराचाही विकास झालेला असतो. त्यामुळे या अवस्थेत देश असताना देशातील उद्योगधंद्यांना संरक्षण देण्याची गरज नसते. त्यामुळे लिस्टच्या मते, आर्थिक विकासाच्या या शेवटच्या किंवा पाचव्या अवस्थेत देशाला संरक्षण धोरणाची आवश्यकता नसते तर विकासाच्या या अवस्थेत किंवा टप्प्यात देशाने खुल्या व्यापारी धोरणाचाच स्वीकार केल्यास देशाचा सर्वांगीण विकास होण्यास मदत होते.

लिस्टच्या मते, देशाच्या आर्थिक विकासातील पाचवी (शेवटची) अवस्था ही सामान्य (Normal) असते व या अवस्थेत पोहचणे हेच प्रत्येक देशाचे उद्दिष्ट असते. या शेवटच्या अवस्थेत पोहचण्यासाठी प्रत्येक देशाला आर्थिक विकासाच्या इतर अवस्था मधून प्रवास करावा लागतो. आर्थिक विकासाच्या या प्रत्येक अवस्थेची परिस्थिती वेगवेगळी असल्यामुळे प्रत्येक अवस्थेत देशाचे आर्थिक व व्यापारविषक्षक धोरण हे नेहमी वेगवेगळे आखावे लागते. तरच देशाला आर्थिक विकासाच्या पुढच्या अवस्थेकडे मार्गक्रमण करणे शक्य होते. यासाठी प्रत्येक देशाने आर्थिक विकासाच्या अवस्थेचा विचार करूनच त्यास सुसंगत असे धोरण आखावे लागते.

जगातील सर्व देश आर्थिक विकासाच्या समान पातळीवर असतील तरच सनातनवाद्यांच्या मतानुसार सर्वांनी एकच आर्थिक व व्यापारी धोरण स्वीकारणे योग्य होईल. परंतु प्रत्यक्षात असे दिसते की प्रत्येक देश आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या अवस्थेत असतो. त्यामुळे आपल्या देशाची परिस्थिती पाहून त्यानुसार देशाने स्वतंत्र आर्थिक व व्यापारी धोरण ठरविणे सरकारचे कर्तव्य असते.

लिस्टच्या मते, इंग्लंडने आर्थिक विकासाच्या प्रगत अवस्थेत असल्याने त्याने खुल्या व्यापारी धोरणाचा स्वीकार करणे योग्य आहे. परंतु जर्मनी सध्या आर्थिक विकासाच्या चौथ्या अवस्थेत असल्याने जर्मनीने खुल्या व्यापारी धोरणाऐवजी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार केला पाहिजे तरच जर्मनीचा औद्योगिक व आर्थिक विकास वेगाने होईल व जर्मनीला आर्थिक विकासाची शेवटची अवस्था प्राप्त करता येईल.

शेवटी लिस्टने असे प्रतिपादन केले की, जर्मनीतील हवामान, नैसर्गिक साधनसंपत्ती, भरपूर भूप्रदेश व लोकसंख्या इ. वैशिष्ट्यामुळे जर्मनीने आर्थिक विकासाची शेवटीच अवस्था गाठण्यासाठी प्रयत्न करावा व अशी परिस्थिती असणाऱ्या उष्णकटिबंधीय देशांनीही शेतकी अवस्थेपर्यंत मजल मारावी व समशितोष्ण कटिंबधातील देशांनी शेतमालाची निर्यात करून त्याच्या बदल्यात औद्योगिक वस्तू आयात कराव्यात. अमेरिका, जर्मनी या देशांनी शेती उद्योगासाठी अनुकूल परिस्थिती असल्याने त्यानी खुल्या व्यापारी धोरणाऐवजी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करून शेवटची अवस्था गाठण्याचा प्रयत्न करावा असे लिस्ट यांनी प्रतिपादन केले.

**परीक्षण (मूल्यमापन)** (Criticism)

फ्रेडरिक लिस्ट याने जगातील विविध देशांच्या आर्थिक इतिहासाचा अभ्यास करून आर्थिक विकासाच्या पाच अवस्था (किंवा टप्पे) स्पष्ट केल्या आहेत. परंतु लिस्टच्या या आर्थिक विकासावर प्रामुख्याने पुढीलप्रमाणे टीका केल्या जातात त्याची माहिती आपणास समजून घेता येईल.

१) लिस्टने प्रतिपादन केलेल्या शिकारी व पशुपालन अवस्थांमध्ये फारसा फरक दिसत नाही. टीकाकारांच्या मते, शिकार करणे व पशुपालन करणे या दोन्ही गोष्टी एकाच अवस्थेतही केल्या जातात. कारण इतर परिस्थितीत या दोन्ही अवस्थेत समानता आढळते. त्यामुळे या दोन्ही अवस्थेत फार मोठा फरक दिसत नाही.

२) लिस्टने प्रतिपादन केलेल्या पाच अवस्थांपैकी शेवटच्या तीन अवस्थांचे उल्लेख स्मिथने भांडवल गुंतवणूकीच्या संदर्भात आपल्या ग्रंथात केला होता. स्मिथच्या मते, या अवस्था क्रमाने व नैसर्गिक रित्या अस्तित्वात येतात तर लिस्टने स्पष्ट केलेल्या शेवटच्या या तीन अवस्था जाणीवपूर्वक व विशिष्ट आर्थिक धोरण आखून प्राप्त होतात. म्हणजेच स्मिथने मांडलेल्या या अवस्था लिस्टने आपल्या सिद्धांतात मांडल्या आहेत.

३) लिस्टच्या मते, विकासाच्या शेवटच्या अवस्थेत पोहचलेला फक्त इंग्लंड हा एकच देश असून ही अवस्था म्हणजेच आर्थिक विकासातील सामान्य अवस्था होय. टीकाकरांच्या मते, अनेक देशांपैकी केवळ इंग्लंड हा एकच देश या अवस्थेपर्यंत पोचहू शकतो. इतरांना एवढी प्रगती करून घेता येत नाही. अशा अवस्थेचे वर्णन सामान्य ऐवजी असामान्य असेच केले पाहिजे.

४) लिस्टने निरनिराळ्या देशांच्या आर्थिक इतिहासाचा अभ्यास करून आर्थिक विकासाची शेवटीच अवस्था प्राप्त झालेल्या देशाजवळ प्रचंड आरमार, अनेक वसाहती व आंतरराष्ट्रीय व्यापार ही लक्षणे दिसतात, असे प्रतिपादन केले. पण हे मत ऐतिहासिक दृष्ट्या चूकीचे आहे. कारण इंग्लंडजवळ शेवटची अवस्था प्राप्त होण्यापूर्वीच प्रचंड आरमार वसाहती होत्या व त्यांचा व्यापारही मोठ्या प्रमाणावर वाढला होता.

५) लिस्टच्या मते, आर्थिक विकासातील शेवटची (आदर्श) अवस्था उष्ण कटिंबधातील देशांना साध्य करता येत नाही त्यांना केवळ शेतकी अवस्थेपर्यंतच पोहचणे शक्य होते. कारण उद्योगधंद्याच्या

विकासासाठी आवश्यक असणारी परिस्थिती अशा देशात नसते. परंतु इतिहासाने त्यांचे म्हणणे चुकीचे ठरविले आहे. कारण आज असे दिसून येते की, उष्णकटिबंधातील अनेक देशांनी आपली औद्योगिक प्रगती करून घेतली आहे.

६) लिस्टने सुचविलेल्या अवस्थानुसार देशाची प्रगती होते हेही चुकीचे आहे. लिस्टने असे प्रतिपादन केले की, प्रत्येक देशाच्या आर्थिक विकासाच्या पाच अवस्था असतात. देशाची आर्थिक प्रगती या क्रमानुसार किंवा अवस्थानुसार होते. परंतु टिकाकारांच्या मते, आपणास अशी उदाहरणे दाखविता येतात की शेतकी अवस्थेतून एकदम शेवटच्या अवस्थेला देश पोहचलेले आहेत. उदा. जपान, रशिया.

लिस्टच्या या उत्क्रांतीच्या सिद्धांतावर टीका करताना एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे ती म्हणजे जर्मनीचा औद्योगिक विकास झपाट्याने व्हावा हिच लिस्टची तीव्र इच्छा होती. इंग्लंडची मिरासदारी कमी व्हावी व जर्मनीची आर्थिक प्रगती व्हावी. या दृष्टीने योग्य असे वातावरण व विश्वास निर्माण व्हावा या हेतूने लिस्टने संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार जर्मनीने करावा असे विचार व्यक्त केले आहेत.

### ३.२.४ लिस्टचा 'आर्थिक राष्ट्रवाद'

सनातनवादी विचारसरणीवर टीका करताना लिस्टने असे प्रतिपादन केले की, मानवी सुधारणेच्या व संस्कृतीच्या इतिहासात राष्ट्र या घटकाची कामगिरी अत्यंत महत्त्वाची आहे. किंबहुणा राष्ट्रा-राष्टाच्या प्रगतीचा इतिहास म्हणजेच मानवी सुधारणेचा इतिहास असे म्हटल्यास ते वावगे ठरणार नाही. लिस्टच्या मते, प्रत्येक व्यक्ती ही मूलत: एखाद्या राष्ट्राची घटक या नात्यानेच आपले जीवन जगत असते. म्हणून व्यक्तीच्या जीवनात राष्ट्राला महत्त्वाचे स्थान प्राप्त होते. व्यक्ती व मानवसमाज यांना जोडणारा राष्ट्र हा महत्त्वाचा दूवा ठरतो.

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी व्यक्तीचा आणि सबंध विश्वाचा विचार करताना राष्ट्र या कल्पनेकडे दूर्लक्ष केले होते. त्यांनी अर्थशास्त्राचे खरे स्वरूप लक्षात न घेता विश्ववादी भूमिका स्वीकारली होती. म्हणून सनातनवाद्यांचे अर्थशास्त्र हे प्रत्यक्ष आर्थिक जीवनाशी सुसंगत राहिले नाही. व्यक्ति व अखिल मानव जात यामधील महत्त्वाचा दूवा म्हणजे राष्ट्र होय, हे मान्य करावे लागते व यावरच अर्थशास्त्राची उभारणी करावी लागते.

लिस्टने आपल्या ग्रंथात अर्थशास्त्राची व्याख्याही राष्ट्रवादी दृष्टिकोणातून केली आहे. सनातनवाद्यांच्या विचारसरणीवर टीका करताना लिस्टने असे प्रतिपादन केले की, आर्थिक सिद्धांत व कल्याणाची उभारणी करताना राष्ट्र या कल्पनेवर अधिक भर दिला पाहिजे. लिस्टच्या मते, व्यक्ती ह्या केवळ उत्पादक व अपभोक्तेच असत नाही तर त्या देशांच्या नागरिक असतात. त्यामुळे राष्ट्र या घटकाचे महत्त्व लक्षात घेवूनच आर्थिक विचार व्यक्त करणे आवश्यक असते. लिस्टच्या मते, व्यक्तीच्या उत्पादनशक्तीवर राष्ट्रातील सामाजिक व राजकीय परिस्थितीचा प्रभाव पडत असतो.

स्मिथ व इतर सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनी जगातील सर्व देश आर्थिक विकासाच्या समान पातळीवर असून जगातील लोकांत शांतता नांदत असते. व्यक्तीच्या कल्याणातून जगाचे (विश्वाचे) कल्याण साधले जाते, असे म्हटले आहे. परंतु सनातनवाद्यांचा हा विचार योग्य नसून जगातील निरनिराळे देश आर्थिक विकासाच्या वेगवेगळ्या अवस्थेत असतात. त्यांची प्रगती कमी-अधिक असते. त्यामुळे जगातील सर्व राष्ट्रांचे एक विश्वकुटुंब बनले आहे. त्यांच्यात शांतता नांदत असून युद्ध होण्याचा धोका नसतो. हे सनातनवाद्यांचे मत खरे नाही, असे लिस्टने स्पष्ट केले.

लिस्टच्या मते जगातील वेगवेगळ्या देशातील हितसंबंधही वेगवेगळे असल्याने त्याच्यात विरोध निर्माण होण्याची शक्यता असते. तसेच राष्ट्राचे स्वत:चे एक वेगळे अस्तित्व असते. स्वत:ची एक वेगळी भाषा, परंपरा असते. त्यांचा इतिहासही वेगवेगळा असतो. प्रत्येक देशाचे रितीरिवाज, कायदेही वेगवेगळे असतात. लिस्टच्या मते, प्रत्येक देशाला स्वत:चे हे अस्तित्व टिकवून ठेवणे व आपले स्वातंत्र्य आबाधित राखणे आवश्यक असते.

परंतु सनातनवाद्यांनी याचा विचार न करता प्रत्येक व्यक्ती कोणत्या तरी राष्ट्राचा घटक असते. व्यक्तीची प्रगती ही राष्ट्राच्या स्थितीवर अवलंबून असते, असे म्हटले आहे. उत्पादक व उपभोक्त एवढ्याच दृष्टिकोणातून सनातनवाद्यांनी व्यक्तीचा विचार केला. देशाचा नागरिक या नात्याने त्याच्याकडे पाहिले नाही. त्यामुळे राष्ट्राचे कल्याण व प्रगती याकडे दुर्लक्ष झाले. जगातील सर्व राष्ट्रे समान परिस्थितीत नसतात. काही राष्ट्रे प्रगत तर काही राष्ट्रे अप्रगत असतात. त्यामुळे अशा परिस्थितीत विश्वव्यापी भूमिका स्वीकारली तर व्यक्ती व अखिल मानवजात या दोघांचेही कल्याण होत नाही, असे लिस्ट याने स्पष्ट केले.

संपूर्ण जगाचे ऐक्य साध्य झाले व सर्वत्र शांतता प्रस्थापित झाली तर युद्ध होण्याची भीती नसते इ. सनातनवाद्यांचे विचार प्रत्यक्षात उपयुक्त नसतात. कारण आज अशी परिस्थिती दिसते की राष्ट्राराष्ट्रात तीव्र स्पर्धा दिसून येते. त्यांच्यात युद्धजन्य स्थिती पहावयास मिळते. तसेच कोणतेही राष्ट्र बाह्य संस्थेचे व सत्तेचे दडपण स्वीकारण्यास तयार नसते. अशा परिस्थितीत देशाचे राष्ट्रवादी दृष्टिकोणातून विचार करणे आवश्यक असते. लिस्टच्या मते, सर्व राष्टे एकाच आर्थिक पातळीवर आली. सर्वांना सहकार्याची आवश्यकता वाटू लागली. आर्थिकदृष्ट्या सर्व राष्ट्रे जर समबल झाली तरच विश्वबंधुत्व व विश्वकल्याण यांना अर्थ प्राप्त होवू शकेल आणि विश्वव्यापी विचारसरणी स्वीकारता येईल. याचा अर्थ लिस्टाचा राष्ट्रवाद हा एकांगी नव्हता. सर्व राष्ट्रांची प्रगती होईपर्यंत ही विश्वव्यापी भूमिका स्वीकारू नये, असे त्याचे मत होते. कारण त्यामुळे मागास देशांच्या आर्थिक विकासात अडथळा निर्माण होतो. प्रगत राष्ट्रे अप्रगत राष्ट्रांची पिळवणूक करतात. त्यामुळे सर्व राष्ट्रे समान आर्थिक पातळीवर आल्यानंतर विश्वव्यापी भूमिका स्वीकारणे योग्य ठरते, असे लिस्ट याने प्रतिपादन केले.

सनातनवाद्यांनी आंतरराष्ट्रीय जीवनाचा व निर्हस्तक्षेप नीतीचा स्वीकार केला पण लिस्टच्या मते, हे बरोबर नाही. कारण अर्थकारण हे राजकारणापासून अलिप्त राहू शकत नाही. यासाठीच लिस्टने आर्थिक राष्ट्रवादाला महत्त्वाचे स्थान मिळवून दिले.

### ३.२.५ फ्रेडरिक लिस्टचे संरक्षणाचे धोरण (लिस्टची संरक्षण नीती) (Protectionsim of List)

लिस्टच्या संरक्षणविषयक तत्त्वज्ञानाला किंवा धोरणाला लिस्टचा संरक्षणवाद असे म्हटले जाते. लिस्टने निरनिराळ्या देशांच्या आर्थिक इतिहासाचा अभ्यास करून सनातनवाद्यांच्या खुल्या व्यापाराच्या धोरणाला विरोध दर्शविण्यासाठी संरक्षणाच्या तत्त्वाचा पुढाकार केला. यास लिस्टची संरक्षणनीती असेही म्हणतात. लिस्टच्या मते, प्रत्येक देशाने आपली स्थिती आणि आर्थिक प्रगतीची अवस्था लक्षात घेवून विशिष्ट आर्थिक धोरण किंवा नीती स्वीकारावी. सनातनवाद्यांच्या मते, सर्व देशांनी सर्वकाळी लागू पडणारे आर्थिक धोरण स्वीकारावे. परंतु यावर लिस्टचा विश्वास नव्हता. लिस्टच्या मते, सर्व देशांना सर्व काळी लागू पडेल असे धोरण असू शकत नाही. विशिष्ट आर्थिक परिस्थितीत राष्ट्राने संरक्षणाचे धोरण स्वीकारणे योग्य होईल तर इतर परिस्थितीत खुल्या व्यापाराच्या धोरणाचा स्वीकार करणे योग्य ठरते.

लिस्टने आपल्या आर्थिक विचारात संरक्षण नीतीचा पुरस्कार केला. याचे कारण त्याकाळी जर्मनीतील आर्थिक व सामाजिक परिस्थिती या धोरणास कारणीभूत होती. जर्मनीतील उद्योग व व्यापाराच्या वाढीला त्याकाळची जर्मनीची परिस्थिती पोषक अशी होती. परंतु सनातनवाद्यांच्या विचारांच्या प्रभावाने अनेक देशांनी खुल्या धोरणाचा स्वीकार केला होता.

लिस्टच्या मते, जगातील सर्व राष्ट्रे एकाच पातळीवर असतील तर व सर्वांनी जर समान आर्थिक धोरणाचा स्वीकार केला असता तर आर्थिक विकासत अडचणी आल्या नसत्या. परंतु जर्मनीसारख्या देशाच्या अर्थव्यवस्था मागासलेल्या होत्या. त्यांच्या देशाच्या आर्थिक विकासाची अवस्था व इतर देशांच्या आर्थिक विकासाच्या अवस्था यात तफावत होती. त्यामुळे अशावेळी समान आर्थिक धोरणामुळे म्हणजेच सनातनवाद्यांच्या खुल्या धोरणाने प्रगत देशांची प्रगती आणखी होत होती तर मागस देशांच्या आर्थिक विकासावर या समान धोरणाचा प्रतिकूल परिणाम होत होता. म्हणून आर्थिक विकासाची समान पातळी गाठेपर्यंत जर्मनीसारख्या देशांनी तात्पुरत्या काळासाठी वेगळे धोरण स्वीकारणे गरजेचे होते आणि हे धोरण म्हणजेच लिस्टने प्रतिपादन केलेले संरक्षणाचे धोरण होय.

फ्रेडरिक लिस्टने आपल्या आर्थिक विचारातून सनातनवाद्यांच्या खुल्या धोरणावर जोरदार टीका केली. परंतु याचा अर्थ खुल्या व्यापारी धोरणातील दोष न दाखविता विशिष्ट परिस्थितीत खुल्या व्यापाराचे धोरणही उपयुक्त असणाऱ्या तत्त्वाला विश्वव्यापी स्वरूप देवून ते परिस्थिती निरपेक्ष आणि अखिल मानवजातीच्या हिताच्या दृष्टीने उपयुक्त ठरते, असा आभास निर्माण करण्याससुद्धा दोष दिला.

लिस्टने जरी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार केला असला तरी तो संरक्षणवादी होता असे म्हणता येणार नाही. कारण विशिष्ट परिस्थितीत संरक्षणाचे धोरण योग्य असते आणि परिस्थितीत बदल झाल्यास खुला व्यापारही आवश्यक असतो, असे त्याने स्पष्ट केले. जर्मनीच्या तत्कालीन परिस्थितीत लिस्टने जरी संरक्षणाच्या धोरणाचा पुरस्कार केला असला तरी जर्मनीच्या अर्थव्यवस्थेची आर्थिक प्रगती झाल्यानंतर हे संरक्षण रद्द करणे योग्य ठरते. याचाच अर्थ लिस्ट हा संरक्षणवादीही नव्हता आणि खुल्या व्यापारी धोरणाचा पुरस्कर्ताही नव्हता. ह्यापैकी कोणतेच धोरण हे साध्य नसून ती दोन्ही धोरणे केवळ साधने आहेत. त्यामुळे

यापैकी कोणते धोरण योग्य आहे हे देशाच्या विशिष्ट परिस्थितीच्या संदर्भातच ठरविले पाहिजे, अशी लिस्ट यांची स्पष्ट भूमिका होती.

जगातील सर्व राष्ट्रे आर्थिकदृष्ट्या समान अवस्थेत असतील किंवा ती आर्थिक विकासाच्या शेवटच्या अवस्थेत असतील तर लिस्टच्या मते त्यांच्यात खुला व्यापार असणे फायदेशीर ठरते. परंतु सध्या फक्त इंग्लंड या एकाच राष्ट्राने आर्थिक विकासाची शेवटची अवस्था प्राप्त केली आहे. फ्रान्स, जर्मनी यासारखे देश मागासलेले असून विकासाच्या दृष्टीने आवश्यक असणारी परिस्थिती असली तरी त्यांनी संरक्षण धोरणाचा स्वीकार करावा व विकासाची शेवटची अवस्था प्राप्त करून घ्यावी. याच संदर्भात लिस्ट असे म्हणतो की, ''मी जर इंग्लंडचा नागरिक असतो तर मी सुद्धा खुल्या व्यापाराचा पुरस्कर्ता झालो असतो.''

यावरून लिस्टचा संरक्षणवाद हा परिस्थितीतून निर्माण झालेला होता, हे दिसून येते. सनानवाद्यांनी जसा खुल्या व्यापारी धोरणाचा पुरस्कार एकांगीपणे केला तसा लिस्टचा दृष्टिकोण नव्हता, हे स्पष्ट होते. म्हणून लिस्टच्या संरक्षणनीतीला अनेक देशांनी आजही आपल्या आर्थिक धोरणात महत्त्वाचे स्थान दिल्याचे दिसते व या धोरणानुसारच अमेरिका सारख्या देशांनी जगात आपले स्थान बळकट केले आहे.

**लिस्टच्या संरक्षणधोरणाची वैशिष्ट्ये :**

लिस्टने प्रतिपादन केलेले संरक्षणाचे धोरण हे परिस्थिती सापेक्ष आणि तात्पुरत्या काळापुरते स्वीकारले जाणारे धोरण असते. ते सर्व देशांना सर्वच परिस्थितीत स्वीकारता येत नाही. तर कोणत्या परिस्थितीत संरक्षणाचे धोरण स्वीकारले पाहिजे याची लिस्टने चर्चा केली आहे. त्यालाच लिस्टच्या संरक्षणधोरणाची वैशिष्ट्ये असे म्हणतात. त्यांचा पुढीलप्रमाणे अभ्यास करू.

१) जेव्हा एखाद्या देशातील उद्योगधंदे बाल्यावस्थेत असतात व राष्ट्राची औद्योगिक प्रगती खुल्या व्यापाराच्या धोरणाने थोपविली जात असेल तेव्हा या संरक्षणाच्या धोरणाचा अवलंब करावा. म्हणजेच परिस्थिती अनुकूल असतानाही केवळ प्रगत देशांच्या स्पर्धेमुळे देशातील उद्योगधंद्यांच्या वाढीवर प्रतिकूल परिणाम होत असेल म्हणजेच औद्योगिक दृष्ट्या प्रगत राष्ट्रांच्या मालासमोर अप्रगत देशांचा माल टिकाव धरू शकत नसेल तर अशा वेळी देशाने खुल्या व्यापारी धोरणाचा स्वीकार न करता संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करावा.

लिस्टच्या मते, अशा खुल्या व्यापारी धोरणाने प्रगत देशांच्या वस्तूंपुढे अप्रगत देशांच्या वस्तू जर टिकाव धरू शकत नसतील तर अशा स्पर्धेपासून देशातील उद्योगधंद्यांना वाचविण्यासाठीच लिस्टने 'बाल्योद्योग' (Infant Industry) युक्तीवाद मांडला व बाल्यावस्थेतील उद्योगांना प्रगत उद्योगांच्या स्पर्धेपासून वाचविण्यासाठी लिस्टच्या मते, देशाने संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करावा.

२) लिस्टच्या मते, ज्या देशांची परिस्थिती वरीलप्रमाणे असेल त्यांनीच संरक्षणाच्या धोरणाचा अवलंब करावा, म्हणजे हे धोरण स्वीकारलेल्या देशाजवळ विस्तीर्ण भूप्रदेश, प्रचंड लोकसंख्या, नैसर्गिक साधनसामग्रीची विपूलता, प्रगत शेती व्यवसाय ही वैशिष्ट्ये असतील तर त्यांनीच संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करून

देशातील उद्योगधंद्याचा विकास करावा. लिस्टच्या मते, संरक्षण धोरण स्वीकारताना देशाने सांस्कृतिक व राजकीय विकासाची उच्चपातळी गाठली असली पाहिजे तसेच या देशाजवळ प्रबळ नाविक व लष्करी सामर्थ्य असले पाहिजे. याचाच अर्थ लहान राष्ट्रांनी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करू नये. वरील सर्व पात्रता ज्या देशाजवळ आहेत त्यांनीच संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करावा.

३) लिस्टच्या मते, संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करताना राष्ट्राला औद्योगिक शिक्षण Industrial Education मिळावे हा हेतू असला पाहिजे तरच ते धोरण योग्य ठरेल. कारण देशाचा विकास खालच्या अवस्थेपासून वरच्या अवस्थेपर्यंत पोहचविण्यासाठी औद्योगिक शिक्षणाची फार गरज असते. इंग्लंडसारख्या राष्ट्राचे औद्योगिक शिक्षण पूर्ण झालेले असल्यामुळे इंग्लंडने संरक्षणाचे धोरण स्वीकारू नये, असे लिस्टने प्रतिपादन केले.

४) ज्या देशाजवळ औद्योगिक विकासासाठी लागणारी आवश्यक सामग्री आणि पात्रता नसेल त्यांनी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करू नये असे लिस्टने प्रतिपादन केले. तसेच उष्ण कटिबंधातील देशांना आर्थिक विकासाची शेवटची अवस्था गाठणे शक्य नसल्याने त्यांनी संरक्षणाचे धोरण स्वीकारू नये तर समशितोष्ण कटिबंधातील देशांना हे शक्य असल्याने त्यांनी संरक्षणधोरणाचा अवलंब करावा, असेही लिस्टने म्हटले आहे.

५) लिस्टच्या मते, संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करणाऱ्या देशाजवळ भविष्यकाळात मोठ्या प्रमाणावर सुख मिळविण्यासाठी वर्तमान काळात स्वार्थाचा त्याग करण्याची तयारी जनतेची असली पाहिजे. राष्ट्रीय कर्जाच्या बाबतीत अशी भूमिका स्वीकारली जाते की चालू पिढीच्या हिताकरिता उभारलेल्या कर्जाचा भार पुढील पिढीवर काही प्रमाणात पडावा परंतु संरक्षणाच्या धोरणाच्या बाबतीत चालू पिढीने पुढच्या पिढीच्या हितासाठी थोडा भार सहन करणे आवश्यक असते.

६) लिस्टच्या मते, लहान राष्ट्रांनी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करू नये. कारण उत्पादनाच्या निरनिराळ्या शाखांची संपूर्ण प्रगती घडवून आणण्याइतकी संपत्ती व सामर्थ्य त्यांच्याजवळ नसते. तेव्हा अशा देशांनी प्रबळ राष्ट्रांची संबंध प्रस्थापित करून व मोठ्या प्रमाणावर त्यागाची भूमिका स्वीकारून आपले स्वतंत्र अस्तीत्व टिकवून ठेवावे हेच योग्य असते.

७) लिस्टच्या मते, शेती व्यवसायाला संरक्षण देवू नये. कारण उद्योगधंद्यांना संरक्षण दिले की आपोआपच शेती व्यवसायाला संरक्षण मिळते. तसेच शेतीला संरक्षण दिल्याने व कच्च्यामालाच्या व अन्नधान्याच्या किमती वाढतात. कामगारांच्या मजुरीच्या दरातही वाढ होते. त्यामुळे उद्योगधंद्याचा उत्पादन खर्च वाढून त्यांच्या वाढीला खीळ बसते. परिणामी, औद्योगिक प्रगती मंदावण्याची भीती असते. यासाठी शेती व्यवसायाला संरक्षण देवू नये. लिस्टच्या मते, शेती व्यवसायाला निसर्गाकडून आपोआप संरक्षण मिळत असते.

८) लिस्टच्या मते, उद्योगांना कायमचे संरक्षण देवू नये. देशातील उद्योगधंद्यांचा विकास होवून त्यांच्यात परकिय उद्योगाशी टक्कर देण्याची क्षमता निर्माण झाल्यावर म्हणजेच परकिय मालाशी स्पर्धा करण्याचे सामर्थ्य देशी उद्योगात निर्माण झाल्यानंतर त्यांना दिलेले संरक्षण काढून घेतले पाहिजे.

९)  लिस्टने असे प्रतिपादन केले की, देशातील सर्वच उद्योगांना संरक्षण देवू नये. काही महत्त्वाच्या उद्योगांना आवश्यक तेवढेच संरक्षण देणे ही भूमिका राष्ट्राने स्वीकारली पाहिजे. ज्या उद्योगांना उभारणीसाठी प्रचंड भांडवल, श्रम व तांत्रिक साहाय्य व कौशल्याची गरज असते व ज्या उद्योगातून मानवाच्या मूलभूत गरजांची पूर्तता केली जाते, अशा उद्योगांना संरक्षण द्यावे. त्यामुळे आपोआपच इतरही उद्योगांना संरक्षण मिळते.

१०)  लिस्टच्या मते, कच्च्या मालाच्या आयात-निर्यातीवर बंधने घालू नयेत. कारण त्यामुळे व्यक्ती व राष्ट्र या दोहोंचाही फायदा होतो. तसेच देशाला लागणारी यंत्रसामग्री जोपर्यंत देशात तयार होत नाही तोपर्यंत यंत्रसामग्रीच्या आयातीवर बंधणे घालू नयेत. जकातीच्या दरात हळूहळू वाढ करावी आणि क्रमाक्रमाणे त्यात घट करावी, असे लिस्टने सुचविले.

अशा प्रकारे लिस्टच्या संरक्षणाच्या धोरणाची वैशिष्ट्ये दिसून येतात. यातील सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे शेती व्यवसायाला संरक्षण देवू नये असे लिस्टने प्रतिपादन केले. म्हणजेच शेती व्यवसाय हा या धोरणाला अपवाद असल्याचे लिस्टने प्रतिपादन केले.

### ३.२.६ लिस्टच्या विचारसरणीचे मूल्यमापन

लिस्टने आपला ग्रंथ लिहिताना विशिष्ट हेतू नजरेसमोर ठेवला होता. जर्मनीचे आर्थिक एकीकरण व्हावे. जर्मनीची औद्योगिक प्रगती व्हावी तसेच राजकीय क्षेत्रातही जर्मनीला मानाचे स्थान प्राप्त व्हावे अशी लिस्टची इच्छा होती. त्यामुळे त्याने अत्यंत तळमळीने विचार केलेले दिसतात.

लिस्टच्या कार्याचे मूल्यमापन आपण पुढील महत्त्वाच्या मुद्द्यांच्या आधारे समजावून घेवू.

१)  **लिस्ट हा व्यापारवादी नाही :** लिस्टने देशातील उद्योगधंद्यांचा विकास व्हावा, परराष्ट्रीय व्यापाराच्या विकासाच्या आधारे राष्ट्र प्रगत व सामर्थ्यशाली व्हावे यासाठी संरक्षण धोरणाचा पुरस्कार केला होता. त्यांच्या विचारावर व्यापारवाद्यांचा नवा अवतार अशी टीका होवू लागली. परंतु त्यांची ही टीका खरी नाही कारण जरी लिस्टच्या विचारसरणीतील काही गोष्टी पुर्वीच्या व्यापारवाद्यांच्या विचारांशी जुळणाऱ्या असल्या तरी त्याने मांडलेली उत्पादनशक्ती विकासाची कल्पना ही व्यापारवाद्यांच्या विचारसरणीपासून पूर्णत: वेगळी आहे. तसेच संरक्षणाच्या धोरणाला लिस्टने केवळ एक साधन म्हणून मानले आहे. ते कोणत्याही राष्ट्राचे साध्य होवू शकत नाही. कारण लिस्टला ही अखेर संरक्षणाच्या धोरणाच्या साहाय्याने खुल्या व्यापाराकडेच जायचे होते. म्हणजेच लिस्टचे विचार व्यापारवाद्यापेक्षा वेगळे आहेत.

२)  **व्यापारवादापेक्षा सनातनवाद लिस्टला अधिक जवळचा :** सनातनवादी विचारसरणीवर लिस्टने जरी प्रखर टीका केली असली तरी व्यापारवादापेक्षा लिस्ट सनातनवाद्यांच्याच अधिक जवळ होता असे म्हणावे लागते. स्मिथप्रमाणेच लिस्ट हा औद्योगिक भांडवलशाहीचा पुरस्कर्ता होता. या भांडवलशाहीची जडणघडण इंग्लंडमध्ये आधीच झाली होती. तिचा अधिक विकास व्हावा यासाठी स्मिथ व रिकार्डो यांनी

खुल्या व्यापाराच्या धोरणाचा पुरस्कार केला होता. लिस्टच्या जर्मनीमध्ये भांडवलशाहीची स्थापना होवून तिला विकासाच्या पुढील अवस्थेत जायचे होते. परंतु खुल्या व्यापारामुळे इंग्लंड व फ्रान्सच्या स्पर्धेमुळे जर्मनीच्या औद्योगिक विकासाच्या मार्गात अडसर येत होता. हा अडसर दूर व्हावा व जर्मनीची सदृढ पायावर उभारणी करता यावी यासाठी लिस्टने संरक्षणाच्या धोरणाचा पुरस्कार केला.

थोडक्यात, लिस्ट व स्मिथ या दोघांचे उद्दिष्ट्य एकच होते ते साध्य करण्याचे दोघांचे मार्ग त्यांच्या देशातील परिस्थितीमुळे भिन्न आहेत व ही भिन्नता सोडली तर लिस्टचे सिद्धांत व सनातनवाद्यांचे सिद्धांत यांच्यात बरेचसे साधर्म्य आहे.

३) **लिस्टची इतिहासाधिष्ठित विवेचन पद्धती :** लिस्टने आपले विचार मांडताना इतिहास आणि ऐतिहासिक घटनांचा आधार घेतलेला होता. प्रत्यक्ष परिस्थिती लक्षात घेवून आर्थिक विकासासंबंधी धोरण आखले पाहिजे व परिस्थितीत होणाऱ्या बदलाप्रमाणे त्या धोरणात वेळोवेळी बदल केला पाहिजे, असे लिस्टने प्रतिपादन केले होते. त्यामुळे लिस्टने इतिहासवादी संप्रदायाची स्थापनाकेली असे सुचविले जात असले तरी ते योग्य नाही. कारण राष्ट्रीय अर्थव्यवस्थेच्या कल्पनेचा पुरस्कार करण्यापुरताच त्याने इतिहासाचा आधार आपल्या विवेचनासाठी घेतला आहे व यामुळे त्याने केवळ ऐतिहासिक विवेचन पद्धती सुचित केली. एवढाच निष्कर्ष आपणास काढता येतो.

४) **लिस्टच्या विचारसरणीचा सार्वत्रिक प्रभाव :** लिस्टने आपला ग्रंथ प्रामुख्याने जर्मन तरुणांना उद्देशून लिहला होता. जर्मन राष्ट्राची परिस्थिती व राष्ट्राच्या गरजा यांचा तरुणांच्या मनावर परिणाम व्हावा व यातून जर्मनीने कसा मार्ग काढावा हे दाखवून देण्यासाठी लिस्टने संपूर्ण लेखन केले आहे. लिस्टने राष्ट्रासमोरच्या आर्थिक प्रश्नांचे शास्त्रीय आधारावर विवेचन केल्यामुळे त्यांच्या विचारांचा प्रभाव केवळ जर्मन राष्ट्रापुरताच मर्यादित न राहता युरोपमधील अनेक राष्ट्रांत ही त्यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. कारण युरोपमधील अनेक देशांनी लिस्टने सुचविलेल्या धोरणांचा स्वीकार करून आपला आर्थिक विकास साधण्यास सुरुवात केली.

युरोपबरोबर भारतसारख्या देशातही त्यांच्या विचारांचा प्रभाव जाणवतो. भारतातील न्यायमूर्ती रानडे सारखे विचारवंतही लिस्टच्या विचारांनी प्रभावित झाले होते. तसेच राष्ट्रीय चळवळीतील अनेक पुढाऱ्यांनी ब्रिटिश सरकारच्या निर्हस्तक्षेपाच्या धोरणाला विरोध करून भारताच्या औद्योगिक विकासासाठी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करावा असे प्रतिपादन केले.

आजच्या जगाची विभागणी विकसित देश व अविकसित देश अशी झालेली दिसते. यापैकी अविकसित देशांना आपला आर्थिक विकास साध्य करताना लिस्टच्या विचारांची शिदोरी उपयोगी पडत आहे. त्यामुळे आजच्या जगातसुद्धा लिस्टच्या विचारसरणीचे महत्त्व मान्यच करावे लागते.

## ३.३ सारांश

**१) लिस्टच्या विचारसरणीचा उगम :** लिस्ट हा जर्मनीतील एक अग्रगण्य राष्ट्रवादी अर्थशास्त्रज्ञ होय. १८४१ साली त्यांचा राष्ट्रवादी अर्थशास्त्र नावाचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. सनातनवाद्यांनी प्रतिपादन केलेल्या खुल्या व्यापारी धोरणाचे खंडन करणे हा त्यांच्या ग्रंथाचा प्रमुख उद्देश होता. तसेच औद्योगिक क्षेत्रातील इंग्लंडचे महत्त्व कमी करून जर्मनीच्या संदर्भात परिस्थितीसापेक्षा आर्थिक धोरणाच्या उपयुक्ततेविषयी आग्रह धरला.

लिस्टला जर्मनीच्या विकासाची तळमळ लागलेली होती. त्यामुळे जर्मनीचे औद्योगिकीरण घडवून आणण्यासाठी जर्मन तरुणांमध्ये प्रेरणा निर्माण व्हावी हाही दृष्टिकोण डोळ्यासमोर ठेवून लिस्टने आपल्या ग्रंथाची रचना केली. लिस्टने आपल्या ग्रंथाद्वारे (आर्थिक राष्ट्रवाद) संरक्षणाच्या धोरणाचा पुरस्कार केला आहे.

**२) लिस्टच्या काळातील जर्मन परिस्थिती :** लिस्टच्या विचारसरणीच्या उगम तत्कालीन जर्मनीच्या परिस्थितीतून झाला असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. कारण सनातनवाद्यांनी खुल्या व्यापाराचा व निर्हस्तक्षेपी धोरणाचा पुरस्कार केला होता व हे धोरण सर्वकाळी सर्व ठिकाणी उपयुक्त ठरते असे म्हटले होते. परंतु लिस्टला सनातनवाद्यांचे हे धोरण मान्य नव्हते. कारण या धोरणाने जर्मनीच्या आर्थिक विकासाला पायबंद बसून इंग्लंडच्याच आर्थिक विकासास खतपाणी घातले जात होते. हे लिस्टच्या लक्षात आल्याने त्याने जर्मनीच्या आर्थिक विकसासाठी संरक्षणाच्या धोरणाचा पुरस्कार केला.

१९ व्या शतकात जर्मन हा मागासलेला व शेती हा प्रमुख व्यवसाय असणारा देश होता. आर्थिक व राजकिय दृष्ट्याही जर्मन एकसंघ नव्हता. याउलट, इंग्लंड व फ्रान्स हे देश त्या काळी प्रगत अवस्थेत होते. सनातनवाद्यांच्या खुल्या धोरणामुळे इंग्लंडच्या मालापुढे जर्मनतील उद्योगातील मालाची विक्री होवू शकत नव्हती. उलट जर्मनतील अंतर्गत जकातीमुळे जर्मन माल महाग होता. इंग्लंडच्या स्वस्त व सुंदर मालापुढे जर्मनतील महाग मालाची विक्री होत नव्हती. या सर्वांमुळे जर्मनतील आर्थिक विकासाला खीळ बसत होती व इंग्लंडचे उखळ पांढरे होत होते. याच काळात अमेरिका व फ्रान्स यांनी संरक्षण धोरणांचा स्वीकार केल्याने त्यांची आर्थिक प्रगती घडून येत होती. अशावेळी जर्मनीतील तत्कालीन परिस्थितीचा विचार करता जर्मनीने खुल्या धोरणाचा स्वीकार न करता देशाच्या आर्थिक विकासासाठी संरक्षण धोरणाचा स्वीकार करावा असे लिस्टने जोरदार समर्थन केले.

**३) सनातनवादी विचारसरणीतील लिस्टला आढळून आलेले दोष :**

(अ) सनातनवाद्यांनी व्यक्तिस्वातंत्र्याच्या कल्पनेला महत्त्व दिले.

(ब) व्यक्तिहिताच्या प्रश्नाकडून एकदम विश्वहिताच्या प्रश्नाकडे सनातनवाद्यांनी झेप घेतली.

(क) सनातनवाद्यांनी भौतिकवादी दृष्टिकोणातून मांडलेली विचारसरणी.

वरील तिन्ही मुद्द्यांचे लिस्टने जोरदार खंडन करण्याचा प्रयत्न केला व त्यातूनच त्याने स्वतंत्र कल्पनांची मांडणी केली.

४) **लिस्टची राष्ट्रवादी भूमिका :** लिस्टच्या मते, सनातनवाद्यांनी व्यक्तिहितास अवास्तव महत्त्व दिल्याने व व्यक्तिहितावरून एकदम विश्वहिताच्या कल्याणावर भर दिल्याने 'राष्ट्र' नावाच्या महत्त्वाच्या दुव्याकडे सनातनवाद्यांनी दूर्लक्ष केले. लिस्टच्या मते, राष्ट्राराष्ट्राच्या प्रगतीचा इतिहास म्हणजे मानवी सुधारणेचा इतिहास होय. प्रत्येक व्यक्ती एखाद्या राष्ट्राचा घटक या नात्यानेच जीवन जगत असते.

५) **आर्थिक विकासाच्या अवस्था :** ज्या देशात शेतीबरोबर मोठ्या प्रमाणात उद्योगधंद्यांची वाढ झालेली असते ते अधिक विकसित देश असतात व अशा विकसित अर्थव्यवस्थेपर्यंत कोणताही देश एकदम पोहचू शकत नाही याची लिस्टला स्पष्ट जाणीव होती. त्यामुळे त्याने आर्थिक विकासाच्या पाच वेगवेगळ्या अवस्था स्पष्ट केल्या आहेत. त्यापैकी शेवटीच अवस्था ही आदर्श अवस्था होय व या अवस्थेपर्यंत पोहचणे (शेती-कारखानदारी-व्यापार) हेच प्रत्येक राष्ट्रांचे आर्थिक उद्दिष्ट्ये असते व हे उद्दिष्ट साध्य करताना प्रत्येक अवस्थेला अनुसरून देशाने आर्थिक व व्यापारी धोरण स्वीकारावे असे लिस्टचे मत आहे. म्हणूनच आपण कोणत्या अवस्थेत आहे हे पाहूनच देशाने पुढच्या अवस्थेपर्यंत सहज जाता येईल, असेच धोरण स्वीकारावे.

जगातील सर्व देशांची आर्थिक विकास पातळी एकच असेल तर एकाच प्रकारचे आर्थिक व व्यापारी धोरण हितावह ठरते. परंतु वस्तुस्थिती तशी नसते म्हणून प्रत्येक राष्ट्राने आपल्या राष्ट्राची गरज लक्षात घेऊनच आर्थिक धोरण स्वीकारावे.

६) **संरक्षणनीतीचा पुरस्कर्ता :** पहिल्या अवस्थेपासून तिसऱ्या अवस्थेपर्यंत खुले धोरण स्वीकारावे असे लिस्टचे मत आहे. परंतु शेतकी अवस्थेपासून शेवटच्या आदर्श अवस्थेपर्यंत पोहचण्यासाठी स्वदेशी उद्योगांना संरक्षण देणे व उद्योगांच्या वाढीसाठी अनुकूल वातावरण तयार करावे यासाठी लिस्टने संरक्षण धोरणाचा जोरदार पुरस्कार केला व स्मिथच्या खुल्या धोरणावर टीका केली.

यावरून लिस्ट हा संपूर्ण संरक्षणवादी होता असे नव्हे, कारण एखाद्या देशाने विकासाच्या शेवटच्या अवस्थेत प्रवेश केल्यास खुले धोरणच स्वीकारावे असे लिस्टचे मत आहे. यावरून विकासाच्या शेवटच्या अवस्थेपर्यंत संरक्षणधोरण एक साधन आहे. आर्थिक विकास हेच प्रत्येक देशाचे अंतिम उद्दिष्ट आहे. खुले धोरण व संरक्षण धोरण हे या ध्येयाप्रत जाण्याचे दोन मार्ग आहेत, असे लिस्टने प्रतिपादन केले.

## ३.४ पारिभाषिक शब्द

**संप्रदाय** - पंथ

**तात्वीक** - वैचारिक

**साकल्याने** - सखोल, परिपूर्ण

| | | |
|---|---|---|
| **बाल्यावस्था** | - | प्रथमावस्था |
| **निरपेक्ष** | - | सबंध नसलेला |
| **चिरकाल** | - | कायम |
| **दूवा** | - | संबंध |
| **राष्ट्रवादी** | - | राष्ट्रीयत्त्वाची भावना, उद्योगधंद्यावर राष्ट्राची सत्ता असणे हे तत्व |
| **निर्हस्तक्षेप** | - | संबंध विरहित, हस्तक्षेपाशिवाय |
| **डंपिंग** | - | बाजारपेठ मिळविण्यासाठी आपल्या देशातील वस्तूंच्या किमतीपेक्षा परदेशात त्याच वस्तूची किंमत कमी करणे |
| **उत्क्रांती** | - | उगम / हळूहळू बदल घडून येणे |
| **उपक्रमशीलता** | - | नाविण्याचा शोध, कार्यप्रवणता, नवीन काही शिकणे |
| **मिरासदारी** | - | वर्चस्व, वतनदारी |
| **विश्व्यापी** | - | जागतिक, वैश्विक |
| **इतिहासाधिष्ठित** | - | ऐतिहासिक आधार |

## ३.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

**अ) एका वाक्यात उत्तरे लिहा.**

१) सनातनवाद्यांनी कोणत्या व्यापारी धोरणाचे समर्थन केले होते ?

२) लिस्टचा आर्थिक राष्ट्रवाद नावाचा ग्रंथ कोणत्या साली प्रसिद्ध झाला ?

३) लिस्टच्या आर्थिक उत्क्रांतीच्या सिद्धांताची शेवटची अवस्था कोणती ?

४) लिस्टने आर्थिक विकासाच्या पहिल्या तीन अवस्थांसाठी कोणते धोरण योग्य असल्याचे प्रतिपादन केले ?

५) लिस्टच्या मते व्यक्ति व विश्व यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा कोणता ?

**ब) गाळलेल्या जागी योग्य शब्द भरा.**

१) सनातनवादी संप्रदायावर टीका करणारा .......... हा पहिला अर्थशास्त्रज्ञ होय.

अ) रिकार्डो  ब) मार्क्स  क) लिस्ट

२) लिस्टचा 'Outline of American Political Economy' हा ग्रंथ .......... साली प्रसिद्ध झाला.

अ) १८२० ब) १८२७ क) १८३२

३) 'आर्थिक राष्ट्रवाद' नावाचा ग्रंथ .......... यांनी लिहला.

अ) स्मिथ ब) रिकार्डो क) फ्रेडरिक लिस्ट

४) लिस्टच्या मते संपत्तीच्या .......... पेक्षा संपत्तीच्या निर्मितीची प्रक्रिया महत्त्वाची असते.

अ) मागणी ब) पुरवठा क) साठा

५) सनातनवाद्यांच्या मते जगातील सर्व राष्ट्रे आर्थिक विकासाच्या .......... पातळीवर असतात.

अ) विषम ब) समान क) वरच्या

**क) पुढील विधाने चूक की बरोबर ते सांगा.**

१) लिस्टने संरक्षणाच्या धोरणाचा आग्रह धरला होता.

२) लिस्टच्या आर्थिक विकासाच्या सिद्धांताच्या चार अवस्था आहेत.

३) लिस्टच्या मते लहान राष्ट्रांनी संरक्षणाच्या धोरणाचा स्वीकार करावा.

४) प्रो. ग्रे यांच्य मते लिस्ट हा संपूर्ण संरक्षणवादी नव्हता.

५) लिस्टच्या मते इंग्लंडच्या बाबतीत खुले आर्थिक धोरण योग्य आहे.

## ३.६ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे :

**अ)** १) सनातनवाद्यांनी खुल्या व्यापारी धोरणाचे समर्थन केले होते.

२) लिस्टचा राष्ट्रवादी अर्थशास्त्र नावाचा ग्रंथ १८४१ साली प्रसिद्ध झाला.

३) लिस्टच्या आर्थिक उत्क्रांतीच्या सिद्धांताची शेवटी अवस्था शेती-कारखानदारी-व्यापार ही होय.

४) लिस्टने आर्थिक विकासाच्या पहिल्या तीन अवस्थांसाठी खुले व्यापारी धोरण योग्य असल्याचे प्रतिपादन केले.

५) लिस्टच्या मते व्यक्ती व विश्व यांना जोडणारा महत्त्वाचा दुवा म्हणजे राष्ट्र होय.

**ब)** १) लिस्ट २) १८२७

३) लिस्ट ४) साठा ५) समान

**क)** १) बरोबर

२) चूक

३) चूक

४) बरोबर

५) बरोबर

## ३.७ सरावासाठी स्वाध्याय

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) सनातनवाद्यांच्या विचारसरणीवर लिस्टने केलेल्या टीका स्पष्ट करा.

२) फ्रेडरिक लिस्टच्या आर्थिक विकासाच्या अवस्था किंवा टप्पे स्पष्ट करा.

३) फ्रेडरिक लिस्टच्या संरक्षणधोरणाचे मुल्यमापन करा.

४) लिस्टचा आर्थिक राष्ट्रवाद स्पष्ट करा.

५) लिस्टच्या आर्थिक विचारांचे परिक्षण करा.

**ब) टीपा लिहा.**

१) लिस्टच्या काळातील तत्कालीन जर्मन परिस्थिती

२) लिस्टच्या आर्थिक उत्क्रांतीच्या सिद्धांताचे परीक्षण

३) फ्रेडरिक लिस्टच्या संरक्षण धोरणाची वैशिष्ट्ये

४) लिस्ट हा संपूर्ण संरक्षणवादी होता काय ? चर्चा करा.

५) लिस्टच्या विचारांचे मूल्यमापन.

## ३.८ अधिक वाचनासाठी पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| १) | Ericl Roll | - | History of Economic thought - fourth Edition (Revised & Enlarged) Oxford Uni. - Pres. Delhi, Bombay, Madras |
| २) | H. L. Bhalia | - | History of Economics though |
| ३) | Desai S. M. | - | History of Economics though |
| ४) | S. K. Srivastava | - | History of Economics thought fourth Edi. S. Chand & Company Ltd., New Delhi 1992 |
| ५) | प्रा. रा. ग. गोखले | - | अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे. जुलै, १९७० |
| ६) | प्रा. के. बी. काटे | - | अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास अजब पुस्तकालय, प्रथमावृत्ती १९७९-८० |
| ७) | प्रा. स. श्री. मु. देसाई आणि प्रा. चि. त्र्य. येवलेकर | - | आर्थिक विकासांचा इतिहास ढोकळ प्रकाशन, पुणे दुसरी आवृत्ती - १९७१ |
| ८) | प्रा. के. एच. ठक्कर | - | आर्थिक विचारांचा विकास परिमल जरोहा - जमनादास अँड कंपनी प्रथमावृत्ती १९७९-८० |
| ९) | संपादक - प्रा. डॉ. जे. एफ. पाटील | - | आर्थिक विचारांचा इतिहास फडके प्रकाशन, कोल्हापूर (२००५) |

◈ ◈ ◈

## घटक क्र. : ४

# कार्ल मार्क्स

**अनुक्रमणिका**


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रास्ताविक

४.२ विषय विवेचन

- ४.२.१ कार्ल मार्क्स यांचा जीवन परिचय
- ४.२.२ सामाजिक परिवर्तनाचे गतीशास्त्र
  - ४.२.२.१ विरोध विकासाधिष्ठित भौतिकवाद
  - ४.२.२.२ इतिहासाची भौतिकवादी मीमांसा
- ४.२.३ मूल्य सिद्धांत
- ४.२.४ अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत
- ४.२.५ नफ्याचा घटता दर

४.३ सारांश

४.४ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

४.५ स्वयंअध्ययन प्रश्न

४.६ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

४.७ सरावासाठी स्वाध्याय

४.८ क्षेत्रीय कार्य

४.९ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासाची उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

- कार्ल मार्क्स यांचा जीवनपट संक्षिप्तात समजून घेता येईल.
- शास्त्रीय समाजवाद स्पष्ट करता येईल.
- सामाजिक परिवर्तनाचे गतीशास्त्र समजून घेता येईल.
- कार्ल मार्क्स यांचा मूल्य सिद्धांत स्पष्ट करता येईल.
- कार्ल मार्क्स यांचा अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत स्पष्ट करता येईल.
- मार्क्स यांचे नफ्याच्या घटत्या दराविषयीचे आणि भांडवलशालीच्या भवितव्याविषयीचे विचार समजून घेता येतील.

## ४.१ प्रास्ताविक

आतापर्यंतच्या घटकांमध्ये आपण व्यापारवादी व निसर्गवादी विचारसरणीचा अभ्यास केला. तसेच युरोपीय देशात औद्योगिक क्रांती घडून येण्याच्या काळातील सनातनवादी अर्थशास्त्रीय विचारांचा अभ्यास केला आहे. सनातनवादी अर्थशास्त्रीय विचार हे उद्योन्मुख औद्योगिक भांडवलशाहीच्या विकासासाठी पूरक असे होते. या विचारांचा प्रभाव युरोपातील अनेक राष्ट्रावर दीर्घकाळपर्यंत होता. परंतु औद्योगिक क्रांती पुर्णत्त्वाकडे जात असताना भांडवलशाहीच्या विकासाबरोबर आर्थिक विषमता, कामगारांचे शोषण व हालअपेष्टा, आर्थिक अरिष्ट इत्यादी प्रश्न निर्माण होत गेले. भांडवलशाहीमुळे समाजातील काही लोकांच्या संपत्तीत प्रचंड वाढ होत होती तर बहुसंख्य लोक दु:ख व दारिद्र्यात खितपत पडले होते. त्यामुळे सनातनवादी अर्थशास्त्रीय विचारसरणीवर टीका करण्यात येऊ लागली. त्यापैकी राष्ट्रवादी संप्रदायातील प्रमुख विचारवंत फ्रेंडरिक लिस्ट यांनी सनातन अर्थशास्त्रीय विचारावर केलेल्या टीकेचा आपण अभ्यास केला आहे. सनातन अर्थशास्त्रीय विचारावर टीका करणारा दुसरा महत्त्वाचा संप्रदाय म्हणजे समाजवादी संप्रदाय होता. सेंट सायमन, सिस्माँडी, रॉबर्ट ओवेन, लुई ब्लँक, चार्लस फोरिअर इत्यादींचा त्यामध्ये समावेश होतो. त्यांनी भांडवलशाही अर्थव्यवस्थेने निर्माण केलेल्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी काही उपाय सुचविले व काही कल्पना मांडून प्रयोग केले. परंतु त्यांचे हे प्रयोग अयशस्वी ठरले. त्यांचे विचार मनुष्याच्या चांगूलपणावर विश्वास ठेवणारे होते. समाजातील श्रीमंत लोकांना, भांडवलदारवर्गाला परोपकारी वृत्ती शिकविली, त्यांचे हृदयपरिवर्तन केले तर सध्याच्या युगातील दु:खे संपतील असे त्यांना वाटले. त्यांनी केवळ स्वप्नरंजन करून आदर्शसमाज कसा असावा याबद्दलचे विचार मांडले. त्यांच्या विचारात शास्त्रशुद्धपणा नव्हता. प्रत्यक्ष सामाजिक परिवर्तन कसे करायचे याबद्दलची सिद्धांतिक मांडणी त्यांनी केली नव्हती. म्हणून त्यांच्या विचारांचा उल्लेख स्वप्नाळू समाजवाद असा केला जातो आणि त्यांना स्वप्नाळू किंवा प्रारंभीचे समाजवादी विचारवंत असे म्हटले जाते.

कार्ल मार्क्सने शास्त्रीय समाजवाद मांडण्याचे महत्त्वाचे कार्य केले. समाजरचनेत बदल कसे घडवून आणावेत, असे बदल घडवून आणणारी शक्ती कोणती याविषयीचे विवेचन केले. भांडवलशाही अर्थव्यवस्थेच्या कार्यप्रणालीचा अत्यंत चिकित्सक असा शास्त्रशुद्ध विचार मांडून भांडवलशाहीपेक्षा अधिक प्रगत अशी समाजवादी अर्थव्यवस्था कशी आणता येईल याचा विचार मांडला. मार्क्स यांच्या विचारात स्वप्नरंजनापेक्षा शास्त्रीयता अधिक आढळून येते. म्हणून कार्ल मार्क्स यांनी मांडलेल्या समाजवादाला शास्त्रीय समाजवाद असे म्हणतात. आता आपण या घटकात मार्क्स यांचा हा शास्त्रीय समाजवाद समजून घेणार आहोत.

## ४.२ विषय विवेचन

### ४.२.१ कार्ल मार्क्स (१८१८-१८८३) यांचा जीवन परिचय :

मार्क्स यांचे विचार समजून घेण्यापुर्वी त्यांचा जीवन परिचय लक्षात घेणे गरजेचे आहे. कार्ल मार्क्स यांचा जन्म प्राशियाच्या हाईन प्रातांतील ट्रायर या शहरात ५ मे १८१८ रोजी झाला. त्यांचे वडील वकील होते. १८३० ते १८३५ पर्यंत मार्क्स ट्रायर जिर्म्नॅशियममध्ये शिकत होते. आपल्या शालांत परीक्षेसाठी त्यांनी **व्यवसाय निवडीबाबत एका तरूणाचे विचार** हा निबंध लिहिला होता. मानवजातीची नि:स्वार्थ सेवा हाच आपल्या जीवनाचा हेतू आहे ही जाण या सतरा वर्षाच्या तरूणाला आली होती हे त्या निबंधावरून दिसून येते. मार्क्सने प्रथम बॉन आणि नंतर बर्लिन विद्यापीठात कायद्याचा अभ्यास केला. त्यांनी न्यायशास्त्र हा विषय निवडला होता. पण त्याचबरोबर तत्वज्ञान आणि इतिहास याबद्दल त्यांना अत्यंत आस्था होती.

मार्क्सनी डॉक्टरेट पदवीसाठी **'डेमोक्रिटसचे प्रकृतीवादी तत्वज्ञान आणि एपिक्युरसचे प्रकृतीवादी तत्वज्ञान यामधील फरक'** या विषयावरील प्रबंध येना विद्यापीठास सादर केला. एप्रिल १८४१ मध्ये वयाच्या २३ व्या वर्षी मार्क्सला तत्वज्ञानातील डॉक्टरेटची पदवी मिळाली. विद्यापीठाचा अभ्यासक्रम संपविल्यानंतर बॉन मध्ये प्राध्यापक म्हणून काम करण्याचा मार्क्सचा मनोदय होता. परंतु पुरोगामी प्राध्यापकाची विद्यापीठातून हकालपट्टी करण्याच्या प्रशियन सरकारच्या प्रतिगामी धोरणामुळे प्रशियन विद्यापीठामध्ये पुरोगामी चिकित्सक विचारांना स्थान नाही याची मार्क्सला खात्री पटली. एप्रिल १८४२ मध्ये `Rheinische Zeitung` या वृत्तपत्रात मार्क्स दाखल झाले आणि ऑक्टोबरमध्ये ते त्याचे संपादक बनले. या वृत्तपत्रातून जर्मनीतील तत्कालीन दडपशाहीच्या राजवटीविरूद्ध त्यानी बेडर मोहिम सुरू केली. मार्क्सनी आपल्या अनेक लेखातून बहुजनसमाजाच्या आर्थिक हितसंबंधाचा कैवार घेतला. मार्क्सला या वृत्तपत्रीय अनुभवातून जर्मनीतील राजकीय आणि श्रमजीवी जनतेच्या परिस्थितीविषयी अधिक चांगले ज्ञान झाले. वृत्तपत्रातील कामामुळे मार्क्सला अर्थशास्त्राच्या अभ्यासाकडे वळण्याची प्रेरणा मिळाली. या वृत्तपत्राच्या एकूण विचारधारेमुळे आणि त्याच्या वाढत्या प्रभावामुळे प्रशियन सरकारने ते वृत्तपत्र बंद करण्याचे फर्मान जानेवारी १८४३ मध्ये काढले. तेंव्हा बाहेरून जर्मनीत पाठविता येईल असे एखादे क्रांतीकारक नियतकालिक सुरू करण्याच्या उद्देशाने परदेशात जाण्याचा निर्णय मार्क्सनी घेतला. जर्मनी सोडण्यापूर्वी मार्क्सने आपली बालपणीची मैत्रीण जेनी फोन वेस्टफालेन हिच्याशी विवाह केला.

अर्नोल्ड रूगे यांचे बरोबर सुरू केलेल्या त्यांच्या `Deutsche Franzosische Johrbucher` या नियतकालिकाचा फक्त एक अंक प्रसिद्ध झाला. त्याचे जर्मनीत गुप्तपणे वितरण करण्यातील अडचण आणि रूगे यांचेशी झालेल्या मतभेदामुळे त्यांचे प्रकाशन थांबले. १८४४ सप्टेंबरमध्ये फ्रेडरिक एंगल्स्‌ची मार्क्सशी भेट झाली. तेंव्हापासून ते मार्क्स यांचे अतिशय निकटचे मित्र बनले. त्या दोघांनी पॅरिसमधील क्रांतीकारक गटांच्या खळबळजनक जीवनात अत्यंत सक्रिय भाग घेतला. त्यावेळी प्रुधाँ यांचा `Philosophy of Poverty` (दारिद्र्याचे तत्वज्ञान) हा ग्रंथ खूप प्रसिद्ध झाला होता. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी मार्क्सने `Poverty of Philosophy` (तत्वज्ञानाचे दारिद्र्य) हा ग्रंथ १८४७ मध्ये प्रसिद्ध केला. १८४५ मध्ये मार्क्स यांना अत्यंत धोकेबाज क्रांतिकारक म्हणून पॅरिसमधून हद्दपार केल्यामुळे ते ब्रुसेल्स्‌ येथे गेले. मार्क्स व एंगल्सनी 'कम्युनिस्ट लीग' या गुप्त प्रचार संघात प्रवेश केला. लीगच्या दुसऱ्या कॉंग्रेसमध्ये त्यांनी भाग घेतला आणि कॉंग्रेसच्या विनंतीवरून सुप्रसिद्ध **'कम्युनिस्ट जाहीरनामा'** तयार केला. तो फेब्रुवारी १८४८ मध्ये प्रसिद्ध झाला. वर्गलढा आणि  एका नव्या कम्युनिस्ट समाजाच्या निर्मितीतील कामगार वर्गाच्या जागतिक ऐतिहासिक क्रांतीकारक भूमिकेच्या विचारप्रणालीचा त्यामध्ये समावेश होता. फेब्रुवारी १८४८ मध्ये क्रांतीला तोंड फुटताच बेल्जीयममधून मार्क्स यांची हकालपट्टी झाली. ते पॅरिसला गेले आणि नंतर मार्चमध्ये जर्मनीत भांडवलदारी क्रांतीचा भडका उडाल्यानंतर जर्मनीत कलोन येथे गेले. तेथे मार्क्सच्या संपादकत्वाखाली `Neue Rheinische Zeitung` हे वर्तमानपत्र १ जून १८४८ ते १९ मे १८४९ पर्यंत प्रसिद्ध झाले १८४८-४९ मधील क्रांतीकारक घटनामुळे नवी विचारप्रणाली अत्यंत सुरेखपणे सिद्ध झाली आणि पुढे जगातील सर्व देशात कामगारवर्गीय व लोकशाहीवादी चळवळीना मार्गदर्शन ठरली. प्रतिक्रांतीकारकांनी पुन्हा मार्क्सला जर्मानीतून हद्दपार केले. त्यामुळे मार्क्स लंडनला गेले व मृत्यूपर्यंत तेथेच राहिले.

राजकीय हद्दपारीचे मार्क्स यांचे जीवन अतिशय खडतर होते. त्यांच्या कुटुंबाला दारिद्र्याने ग्रासले होते. फ्रेडरिक एंगल्सने मार्क्सला सतत नि:स्वार्थीपणाने आर्थिक सहाय्य केले. मार्क्सने राजकीय अर्थशास्त्राच्या अभ्यासाला स्वत:ला वाहून घेऊन 'राजकीय अर्थशास्त्राच्या मीमांसेविषयी (१८५९), भांडवल या ग्रंथाचा पहिला खंड (१८६७) हे ग्रंथ प्रकाशित केले.' भांडवल ग्रथांचे उर्वरित दोन खंड एंगल्सने मार्क्सच्या मृत्यूनंतर १८८५ व १८९४ मध्ये प्रकाशित केले. १८६४ मध्ये मार्क्स पुन्हा प्रत्यक्ष कार्याकडे वळले. त्यांनी १८६४ मध्ये 'पहिल्या इंटरनॅशनलची' स्थापना केली. विविध देशातील मजूर चळवळीत ऐक्य घडविण्यासाठी, बिगर कामगारवर्गीय, मार्क्सवादपुर्व समाजवादाच्या विविध प्रकाराना एका संयुक्त कार्यात मार्गस्थ करण्यासाठी एकसंघ डावपेच आखला. इंटरनॅशनलच्या कामाच्या असह्य तणामुळे व सततच्या अभ्यासाच्या ताणामुळे मार्क्सची प्रकृती ढासळली आणि १४ मार्च १८८३ रोजी मार्क्स यांचे निधन झाले. परंतु मार्क्स यांच्या क्रांतीकारी शास्त्रीय समाजवादाच्या विचारामुळे ते अजरामर झाले. २१ व्या शतकात प्रवेश करताना इंग्लंडमध्ये दुसऱ्या सहस्त्रकातील सर्वात प्रभावशाली व्यक्तिमत्व कोणते? याविषयी जनमत घेण्यात आले. आणि त्याचे उत्तर कार्ल मार्क्स हे आले. यावरून मानवी समाजाच्या प्रगतशील परिवर्तनासाठी मार्क्सने यांनी केलेले योगदान आधोरेखित होते. त्यामुळेच जगभरच्या अब्जावधी श्रमिक जनतेचे मार्क्सवादी विचार हे प्रेरणास्थान राहिले आहे.

### ४.२.२ सामाजिक परिवर्तनाचे गतीशास्त्र (Dynamics of social Change)

मार्क्सपुर्वी अनेक विचारवंतांनी भांडवलशाही समाजव्यवस्थेतील त्रुटी - विषमता, शोषण, बेरोजगारी इत्यादीबाबत आपले विचार मांडले होते. अनेकांनी या जगाचा अर्थ लावण्याचा प्रयत्न केला होता. त्याबाबत मार्क्स यांनी असे मत व्यक्त केले होते की 'जगाचा अर्थ म्हणजेच जग कसं आहे हे सांगण्याचा प्रयत्न अनेकानी केला. परंतु खरा मुद्दा आहे तो जग बदलण्याचा.' त्यामुळे त्यांनी समाज बदलाचे गतीशास्त्र मांडण्यासाठी आपले आयुष्य खर्ची घातले. मार्क्स यांनी सांगितलेला समाज बदलाचा शास्त्रीय विचार मार्क्सवादी विचार आपल्याला आता समजून घ्यावयाचा आहे.

मार्क्सवादी विचार म्हणजे मार्क्स यांच्या शिकवणीची एक पद्धती आहे. अभिजात जर्मन तत्वज्ञान, अभिजात इंग्रजी राजकीय अर्थशास्त्र आणि फ्रेंच समाजवाद या तीन प्रमुख सैद्धांतिक विचार प्रवाहांचा संगम मार्क्स यांनी केला. मार्क्स यांचे विचार ज्या दोन प्रमुख तत्त्वावर आधारित आहेत ते म्हणजे विरोधविकासाधिष्ठित भौतिकवाद आणि इतिहासाची भौतिकवादी मीमांसा हे होत. आता आपण ही दोन तत्त्वे समजून घेणार आहोत.

मार्क्स यांनी मांडलेला आधुनिक भौतिकवाद आणि शास्त्रशुद्ध समाजसत्तावाद जगातील सर्व देशातील कामगारवर्गीय चळवळीची विचार प्रणाली व कार्यक्रम बनला आहे. मार्क्स याचे विचार ज्या दोन प्रमुख तत्त्वावर आधारित आहेत ते म्हणजे विरोधविकासाधिष्ठित भौतिकवाद आणि इतिहासाची भौतिकवादाची मीमांसा हे होत. आता आपण ही दोन तत्त्वे समजून घेणार आहोत.

**४.२.२.१ विरोधविकासाधिष्ठित भौतिकवाद** (Diualectical Materialism) **:** मानवी समाजामध्ये परिवर्तन कसे घडून येते, त्यामागे कोणते घटक आणि शक्ती असते याचा अभ्यास करण्यामध्ये मार्क्स यांना खास रस होता. समाज एका अवस्थेतून दुसऱ्या प्रगत अवस्थेत कसा जातो म्हणजेच समाजाचे परिवर्तन कसे होते याचे शास्त्रीय विश्लेषण मार्क्स यांना करायचे होते. त्यासाठी त्यांनी भौतिकवादी विचार आणि विरोधविकासाचे तत्त्व यांच्या सहाय्याने विरोध विकासाधिष्ठित भौतिकवाद हे तत्त्व मांडले.

जगाकडे पाहण्याचे दोन दृष्टीकोण आहेत. हे सर्व जग सर्वशक्तीमान परमेश्वराने निर्माण केले आणि या जगाचा नियन्ता तोच आहे. सृष्टीचे चमत्कार 'देवाजीच्या करूणेचे फळ' आहे. तर सामाजिक दुःखे त्याच्या अवकृपेचे फळ आहे. ब्रह्म सत्यम जगत मिथ्या ! याचा अर्थ ब्रह्म हे नित्य, अपरिवर्तनीय, निर्विशेष आहे. तर जग मिथ्या आहे म्हणजे बदलणारे आहे. त्याला उत्पत्ती स्थिती आणि लय या अवस्था आहेत. भौतिक जगाला मिथ्या किंवा गौण मानणारा हा दृष्टीकोन अध्यात्मवादी दृष्टीकोन होय. भौतिक जग आणि मानवी प्रयत्न याबाबत औदासीन्य किंवा तुच्छभाव निर्माण करणे हा अध्यात्मावादाचा अपरिहार्य परिणाम आहे. कारण एकदा जग मिथ्या किंवा गौण मानले की ते समजून घेण्याचे किंवा बदलण्याचे प्रयत्नही मिथ्या व गौण ठरतात. अध्यात्मवाद जगाकडे पाठ फिरवण्यास शिकवतो. शास्त्रीय ज्ञानाबद्दल आणि क्रांतीकारक

चळवळीबद्दल उदासीन राहण्यास शिकवितो. एवढेच नव्हे तर आत्मबलाची उपासना करण्याऐवजी शास्त्रीय प्रगती किंवा सामाजिक क्रांती यासारख्या भौतिक उद्योगामागे लागल्यामुळेच मानवजात दु:खी झाली आहे असा समज अध्यात्मवादामुळे निर्माण होतो. हा समज क्रांतीविरोधक धनिक वर्गाच्या पथ्यावर पडणारा आहे. त्यामुळेच धनिक आणि शासनकर्त्या वर्गाने अध्यात्मवादाला नेहमीच उत्तेजन दिले आहे.

याउलट भौतिकवाद सारे जग हे सत्य, आद्य आणि ज्ञेय आहे असे सांगतो. हे विश्व भौतिक वस्तूंनी बनलेले आहे आणि सर्व भौतिकवस्तू सत्य आणि परिवर्तनशील आहेत. सर्व वस्तु निसर्ग नियमानुसार बदलत जातात. अणूच्या आंतरंगातील सूक्ष्मतम कणापासून विश्वातील अफाट तारा मंडळापर्यंत कुठेही पहा हाच अनुभव येतो. कोणतीही वस्तू स्थिर नाही तर निरनिराळ्या अवस्थेतून सतत बदलत जाते. मानव समाजाचाही तोच नियम आहे. अनेक स्थित्यंतरानंतर तो आजच्या अवस्थेप्रत पोहचला आहे. विश्वातील सर्व प्रपंचाचा अर्थ वस्तूगत निसर्ग-नियमानुसार लावता येतो. हे नियम शोधून काढणे व त्या आधारे निसर्गाचे स्वत: नियमन करणे हे मानवाचे कार्य आहे. जगाविषयीचे ज्ञान हे आपल्या ज्ञानेंद्रियामुळे होते. जेथे ही ज्ञानेंद्रिये तोकडी पडतात तेथे स्वनिर्मित साधनांची मदत मानव घेतो. उदा. दुर्बिणीच्या सहाय्याने माणूस २५० कोटी प्रकाशवर्षे दूर असलेल्या तारामंडळात काय चालले आहे याचा वेध घेतो. थोडक्यात सर्व मानवी ज्ञान ज्ञानेंद्रियामार्फत प्राप्त होते. मानवी बुद्धी त्यावरून निष्कर्ष काढते व ते निष्कर्ष पुन्हा प्रयोग निरीक्षणाद्वारे पडताळून पाहते. अशा रितीने प्राप्त होणारे ज्ञान अपूर्ण असेल, प्रसंगी सदोष असेल पण त्यातच सत्यांश आहे. आणि तोच मानवी कर्तृत्वाचा आधार आहे.

मार्क्सने हा भौतिकवादी दृष्टीकोन स्वीकारला आणि त्याआधारे समाज बदलाचे गतीशास्त्र मांडले. त्यासाठी मार्क्सने या भौतिवादाला विरोध विकासाचे तत्व जोडून विरोधविकासाधिष्ठित भौतिकवाद (द्वंद्वात्मक भौतिकवाद - `Dialelctical Materialism`) मांडला.

जर्मन तत्वज्ञ हेगेल यानी विरोध विकासाचे तत्व मांडले. हेगेलच्या मते समाजामध्ये जे परिवर्तन घडून येते त्यामागील प्रमुख कारण म्हणजे प्रखर विरोध करणाऱ्या तत्वांचा संघर्ष निर्माण होतो. या विरोधातून पुढे समन्वय घडून येतो आणि नवीन तत्वाची निर्मिती होते. या मध्ये प्रथम एक कल्पना मांडली जाते. तिला `Thesis` असे म्हणतात. या कल्पनेला विरोध करणारी दुसरी कल्पना मांडली जाते. तिला प्रतिकल्पना (Anti-thesis) असे म्हणतात. या दोन परस्परांविरोधी कल्पनांचा संघर्ष होऊन नवीन तिसरी कल्पना मांडली जाते. तिला सुसंवादी कल्पना (Synthesis) म्हणतात.

हेगेलने विचारक्रियेला कल्पना या नावाखाली स्वतंत्र कर्तृत्व बहाल केले आहे. त्याच्यामते विचारक्रिया हीच वास्तविक जगाची निर्माती आहे. कल्पनासृष्टीत बदल घडून येत असतात आणि त्याचा परिणाम म्हणून भौतिक परिस्थितीत बदल घडून येतात असे हेगेलने प्रतिपादन केले. थोडक्यात आधिविचार किंवा कल्पना बदलतात आणि त्यानुसार भौतिक परिस्थितीत बदल घडून येतात. असे हेगेलने सांगितले.

मार्क्सने हेगेलची विरोधविकास पद्धती स्वीकारली. म्हणजेच विरोधातून/संघर्षातून विकास होतो हे तत्त्व मार्क्सने स्वीकारले. परंतु त्याने आधि कल्पनासृष्टीत बदल होतात आणि नंतर भौतिक परिस्थितीत बदल

होतात हा हेगेलचा विचार स्वीकारला नाही. कारण विचारक्रिया आणि जाणिव या गोष्टी मानवी मेंदूने निर्माण केल्या आहेत. मानव स्वत: निसर्गाची निर्मिती आहे व त्याची प्रगती भोवतालच्या परिस्थितीत आणि परिस्थितीबरोबर झाली आहे. यावरून मानवी मेंदूतून निर्माण झालेल्या गोष्टी निसर्गाचीच निर्मिती असल्याने त्या निसर्गाच्या अन्य अंतरसंबंधाशी विरोधी असू शकत नाहीत. मानवी मन हे भौतिक विकासक्रमाचे अत्युच्च फळ आहे. त्याचे भौतिक मूळ व स्वरूप निर्विवाद आहे. मनातील प्रत्यय, कल्पना, विचार आदी सर्वात बाह्य व वास्तव जगाचे प्रतिबिंब पडते. त्यामुळे मार्क्सने कल्पना किंवा विचार ऐवजी भौतिक सृष्टी विचारात घेतली. या भौतिक दृष्टीत विरोध विकासानुसार बदल होतात आणि त्यानुसार कल्पनेत किंवा विचारात बदल होतात असे मार्क्सने प्रतिपादन केले. याचा अर्थ मानवसमाजही परिवर्तनशील आहे. कोणतीही समाजव्यवस्था नित्य किंवा शाश्वत नाही. ती बदलणे अपरिहार्य आहे. समाजव्यवस्थेतील उत्पादन पद्धती आणि उत्पादन संबंध यामध्ये जी विरोधाची बीजे असतात त्यातून वर्ग संघर्ष निर्माण होतो आणि त्यातून समाजाचा विकास घडून येतो. यावरून हे स्पष्ट होते की मार्क्सने विरोध विकास ही पद्धती स्वीकारली परंतु त्याचा उपयोग हेगेलच्या तत्त्वाच्या विरोधी विचार मांडण्यासाठी केला. म्हणून असे म्हटले जाते की हेगेलचे तत्वज्ञान डोक्यावर उभे होते ते मार्क्सने पायावर उभे केले.

**४.२.२.२ इतिहासाची भौतिकवादी मीमांसा** (Materialistic Interpretalion of Hlistory) **:** मानवी समाजाचा विकास कसा झाला. मानवी समाज विकासाच्या एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत कसा गेला याविषयी मार्क्सपुर्वीच्या विचारवंतानी काही मीमांसा केली होती. त्यांनी मानवी समाज विकासाच्या एका अवस्थेतून दुसऱ्या अवस्थेत येण्याची कारणे खालीलप्रमाणे सांगितली आहेत.

१) राज्यपद्धती आणि राज्याच्या स्वरूपात होणारे बदल

२) धार्मिक स्वरूपाचे बदल

३) निसर्गनियमात होणारे बदल

४) श्रेष्ठ व्यक्तीकडून केले जाणारे कार्य इत्यादी.

मार्क्सने वरील सर्व कारणे नाकारली आणि आपल्या विरोधविकासाधिष्ठित भौतिकवादाच्या आधारे मानवी समाजाच्या विकासाचे स्पष्टीकरण दिले. यालाच मार्क्सने इतिहासाची केलेली भौतिकवादी मीमांसा असे म्हणतात. जग गतीमान आणि परिवर्तनशील आहे. त्याचप्रमाणे समाजही गतीमान व परिवर्तनशील आहे. मानवी समाजाचा आजपर्यंतचा इतिहास पाहिला तर तो निरनिराळ्या अवस्थातून गेला आहे आणि यापुढेही तो बदलत जाणार आहे.

अन्न, वस्त्र, निवारा इत्यादी मानवाच्या मूलभूत गरजा आहेत. त्या भागविण्यासाठी मानवी समाजाला उत्पादन करावे लागते. समाजाचे अस्तित्व या उत्पादनावर अवलंबून आहे. या उत्पदानाची साधने आणि ती साधने वापरणारी माणसे या समाजाच्या उत्पादक शक्ती होत. या साधनांच्या द्वारे उत्पादन करीत असताना

समाजामध्ये माणसामाणसात विशिष्ट संबंध तयार होत असतात. हे संबंध म्हणजे उत्पादनसंबंध होत. उत्पादनपद्धती उत्पादनसाधनांवर अवलंबून असते आणि उत्पादनसंबंध किंवा वर्गसंबंध उत्पादनपद्धतीवर अवलंबून असतात.

उत्पादनसाधने स्थिर नाहीत, त्यात बदल होत जातो आणि उत्पादनपद्धती बदलत जाते. हे बदल जुन्या समाजाच्याच पोटात किंवा जुन्या उत्पादन संबंधाच्या चौकटीत होत असतात. परंतु कालांतराने हे बदल एवढे स्पष्ट होतात की जुनी सामाजिक चौकट बदललेल्या उत्पादनपद्धतीला अनुरूप राहत नाही. मग ती बदलण्याचा काळ येतो. समाज ती चौकट बदलतो आणि पुन्हा नव्या बदललेल्या उत्पादनपद्धतीला अनुरूप अशी उत्पादन संबंधाची किंवा वर्गसंबंधाची नवी चौकट तयार होते.

गती किंवा बदल दोनप्रकारे होतात. हळूहळू सूक्ष्म बदल होत होत वस्तू बदलत जाणे, वाढणे किंवा लोप पावणे हा एक प्रकार झाला. असे छोटे बदल वस्तूच्या रूपात मूलगामी परिवर्तन घडवीत नाहीत. तर त्याच्या गुणधर्मात क्रमश: बदल घडवीत जातात. त्यांना संख्यात्मक बदल असे म्हणतात. पण हेच संख्यात्मक बदल विशिष्ट अवस्थेपर्यंत होत राहिले की त्या वस्तूचे स्वरूपात आमूलाग्र बदल घडतो. त्याला गुणात्मक बदल असे म्हणतात. हा दुसऱ्या प्रकारचा बदल स्फोटासारखा जलद होतो. पाणी तापवण्याचे एक साधे उदाहरण घेऊन याचे अधिक स्पष्टीकरण देता येईल. पाणी गरम करताना त्याचे उष्णतामान सतत बदलत - वाढत जाते व त्याच्या गुणधर्मात बदल होत असतात, पण पाणी पाणीच राहते. हा संख्यात्मक बदल होय. परंतु पाण्याचे उष्णतामान १०० अंशापर्यंत आल्यानंतर ते उकळू लागते, त्याची वाफ होते. म्हणजे पाण्याची अवस्थाच बदलते. या बदलाला गुणात्मक बदल असे म्हणतात.

कोणतीही वस्तू एकजिनसी नाही, तिच्यामध्ये विरोधी तत्वांचा संघर्ष सतत चाललेला असतो व संघर्षात गतीचे रहस्य आहे. पाणी म्हणजे $H_2O$ होय. याचा अर्थ पाणी म्हणजे हायड्रोजन व ऑक्सिजन यांनी मिळून बनलेले असते. या दोन घटकामध्ये परस्परविरोधी आणि एकत्र राहण्याची प्रवृत्ती असते. उष्णतामान वाढत गेले की परस्परविरोधी म्हणजेच एकमेकांपासून अलग होण्याची प्रवृत्ती वाढायला लागते आणि १०० अंश सेल्सियस तापमानास ते एकमेकापासून अलग होतात म्हणजेच पाण्याची वाफ होते.

मानवी समाजामध्ये जेंव्हा उत्पादन पद्धतीत वर्ग निर्माण होतात तेंव्हा वर्गसंघर्ष निर्माण होतो. वर्ग ही संकल्पना उत्पादन साधनांच्या मालकी हक्काशी निगडीत आहे. ज्यांच्याकडे उत्पादन साधनांची मालकी आहे तो आहेरे वर्ग आणि ज्यांच्याकडे उत्पादन साधनांची मालकी नाही तो नाहीरे किंवा सर्वहारावर्ग होय. भांडवलशाहीच्या संदर्भात वर्ग स्पष्ट करायचे झाल्यास भांडवलदार वर्ग आणि कामगार वर्ग असे करता येते. मार्क्सच्यामते या वर्गामध्ये एकमेकांच्या विरोधी हितसंबंधामुळे जो संघर्ष होतो त्यातून मानवीसमाज बदलतो. त्यामुळे मार्क्सने असे म्हटले आहे की, 'आजपर्यंत अस्तित्वात आलेल्या समाजांचा समग्र इतिहास म्हणजे वर्ग लढ्याचाच इतिहास होय. मानवी समाजाच्या विकासाच्या आवस्था मार्क्सने पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत.'

१)	**आदिम-साम्यवाद** (Primitive Communism) **:** या अवस्थेतील सर्वच समाज-प्राचीन असो किंवा आधुनिक असो, निसर्गाने आयते पैदा केलेले अन्न मिळवून आपला उदरनिर्वाह करीत असत. शिकार करणे, मासे मारणे, कंदमुळे-फळे गोळा करणे, क्वचित रानटी धान्य, मध जमा करणे ही त्यांच्या उपजिविकेची साधने होती. त्यांची आयुधे अत्यंत प्राथमिक अवस्थेतील होती. अन्नाच्या पुरवठ्यासाठी ते सर्वस्वी निसर्गाच्या कृपेवर अवलंबून होते. या समाजाच्या मागासलेल्या उत्पादन साधनामुळे समाजातील प्रत्येक व्यक्तीने कष्ट केल्याखेरीज सर्वांचा निर्वाह होणे कठीण होते. या समाजाच्या श्रमातून त्याचा उदर निर्वाह होऊन नियमित काही शिल्लक पडण्याची शक्यता नव्हती. त्यामुळे दुसऱ्यांच्या श्रमावर जगणारा वर्ग या समाजात अस्तित्वात येणेच शक्य नव्हते. प्रत्येकाने यथाशक्ती श्रम केलेच पाहिजेत हा त्यांचा मागासलेल्या उत्पादन तंत्राने लादलेला धर्मच होता. त्यामुळे समाजात वर्गभेद नव्हते, खाजगी मालकी नव्हती, उच्चनीच भावना नव्हती.

प्रत्येक व्यक्तीच्या संरक्षणाची व पोषणाची जबाबदारी सर्व समाजावर होती. श्रम सामुदायिक असत त्याप्रमाणे श्रमाच्या फलाचा उपभोगही सामुदायिक असे. राजा, सरकार, कायदा, न्यायालये, पोलीस, सैन्य या संस्थाचे प्रयोजन नव्हते व अस्तित्वही नव्हते. सर्व व्यक्ती-स्त्री-पुरुष समान होते. असे असले तरी शिकार, लढाई, धार्मिक आचार इत्यादीमध्ये नेत्यांची गरज असे. पण हे नेतृत्व जन्मसिद्ध नव्हते. तर ते ज्ञान आणि कौशल्य यावर अवलंबून होते. नेत्यांची निवड गणाची सभा करीत असे. हा समाज मातृसत्ताक होता. परंतु त्याकाळची उत्पादनाची साधने आजच्यासारखी विकसित झालेली नव्हती. त्यांचा विकास फारच खालच्या पातळीवर होता म्हणून तेंव्हाचा समाज फारच गरीब होता. मात्र त्या समाजात भेद नव्हते. उत्पादनाची साधने व प्रत्यक्ष उत्पादन या सर्वांवर सर्वांचा म्हणजे सामुदायिक अधिकार होता. म्हणून मार्क्सने त्याला आदिम साम्यवाद असे संबोधले.

२)	**गुलामगिरीची अवस्था :** शेती, पशूपालनादी शोधामुळे परिस्थितीत आमूलाग्र बदल होऊ लागले. या नव्या उत्पादनतंत्राने माणसाची उत्पादनशक्ती अनेकपटीने वाढली. आता माणसाला जमीन तुडवत फळे, कंदमुळे शोधीत फिरण्याची गरज नव्हती. त्याची शेती त्याच्या पोटाची गरज भागवून थोडी शिल्लक टाकू शकत होती. मांसासाठी दिवसभर श्रम घेऊन शिकार करण्याची गरज नव्हती. त्याचे पाळीवप्राणी त्याला हवे तेवढे मांस वर्षानुवर्षे पुरवू शकत होते, दुधदुभते देत होते, वस्त्राची गरजही भागवीत होते आणि त्याचा बोजा हलका करीत होते. काही माणसांनी कष्ट केले की त्याचा निर्वाह त्यावर भागून काही शिल्लक राहण्याची शाश्वती निर्माण झाली. त्यामुळे सर्वच माणसे अन्नोत्पादनात गुंतून राहण्याची गरज नव्हती. काहींनी इतर व्यवसायात जाणे शक्य होते. इतर गणातील लोकांशी शिल्लकेच्या जोरावर देवाण-घेवाण करणे शक्य झाले. त्यातून हळूळळू इतरांच्या श्रमावर जगणारा एक वरिष्ठ वर्ग निर्माण झाला. सामुदायिक शिल्लकीवर आता गणनायकांचा ताबा येऊ लागला. पाऊस, विजेचा गडगडाट, महापूर, अवर्षण इत्यादी घटना अज्ञात व गूढ होत्या. मंत्र, प्रार्थना, बळी इत्यादींच्या सहाय्याने या सर्वातून समाजास निभावून नेण्याचे आश्वासन देणाऱ्या मांत्रिकांचे महत्त्व कायम होते. प्रत्यक्ष उत्पादन कार्यात भाग न घेण्याची सवलत असणारा पहिला व्यावसायिक हा मांत्रिक/पुरोहित वर्ग असावा. त्यातून उच्चवर्गीयत्वाची सुरूवात, खाजगी मालकी, वारसा हक्क, नेतृत्वाची मक्तेदारी इत्यादीची सुरूवात झाली.

आता मानवी श्रमशक्ती स्वत:च्या निर्वाहापेक्षा अधिक उत्पादन करू शकत होती. एखाद्या परकीय माणसाला ठेवून घेणे पुर्वीप्रमाणे धोक्याचे नव्हते तर फायद्याचे होते. नदीकाठचा एकादा झाडीमय प्रदेश साफ करून घेताना इतरांना सहकार्याच्या किंवा जबरदस्तीच्या नात्याने कामाला लावणे उपयुक्त होते. या स्थितीत लढाईत पराभूत झालेल्या शत्रूला ठार करण्याऐवजी त्याला जिवंत ठेवून त्यांच्याकडून काम करून घेणे लाभदायक होते. त्यामुळे लढाईत पकडलेले कैदी हे पहिले गुलाम होत. लढाईत पकडलेल्यांना गुलाम करण्याची सुरूवात झाल्यानंतर गुलाम मिळविण्यासाठी कमजोर टोळ्याशी लढाई करणे हे ओघाने आलेच. श्रमशक्तीचे महत्त्व आणि गरज वाढू लागली की मग केवळ परकीयांनाच गुलाम करून उच्चवर्गीयांनी थांबण्याचे कारण नव्हते. त्यामुळे पुर्वीच्या गणसमाजातील समानतेचे नाते लयास जाऊन गणसमाजातील स्वतंत्र व्यक्तींच्या नशिबी देखील गुलामगिरी आली. अशारितीने गुलामांचे मालक आणि गुलाम असा वर्णभेद असणारा वर्ग समाज उदयास आला. या नव्या समाजात नव्या समस्या निर्माण झाल्या. हा समाज एकजिनसी नव्हता. मूठभर उच्चपदाधिष्ठित श्रीमंत, बहुसंख्य राबणारे श्रमिक आणि गुलामांची वाढती संख्या यामध्ये त्याची विभागणी होत होती. वरिष्ठ वर्गातही योद्धावर्ग, पुरोहितवर्ग, व्यापारी असा भेद होतेच. यातून निर्माण होणारे संघर्ष हाताळण्यास जुनी व्यवस्था असमर्थ होती. उच्चवर्णीयांचे अधिकार अबाधित राखणारी, श्रमिकांना, गुलामांना त्यांच्या जागी दडपून ठेवणारी नवी संस्था आवश्यक होती. या गरजेतून राज्यसंस्था उदयास आली. आक्रमण-संरक्षणाची कार्ये आता शस्त्रधारी समाजाची राहिली नाहीत तर ती राज्यसंस्थेची झाली. गणसमाजाच्या अलिखित परंपरागत नियमांची जागा आता या राज्य संस्थेने तयार केलेल्या दंडविधानाने, कायद्याने घेतली. समाजाचे नियमन आता या कायद्यानुसार आणि राज्य संस्थेच्या दंडूक्याच्या जोरावर सुरू झाले. थोडक्यात नव्या वर्ग समाजाचे नियमन करण्यासाठी त्यातील संघर्ष आटोक्यात ठेवण्यासाठी वरिष्ठ वर्गाचे हत्यार म्हणून राज्यसंस्था जन्माला आली.

या वर्गसमाजात श्रमिकांची-गुलामांची स्थिती पशुसारखी होती. स्वत:चे उत्पादन, स्वत:चे शरीर, स्वत:चे कुटुंब कशावरही त्याचा अधिकार नव्हता. गुलामांना कामाबद्दल कसलीच आपुलकी नव्हती. अत्यंत अवजड आणि ओबडधोबड अवजारांचा वापर आणि तोही चाबकाच्या सहाय्याने केला जात होता. त्यामुळे गुलाममालक आणि गुलाम यांच्यामध्ये विरोध निर्माण होणे स्वाभाविक होते. गुलाम या हीन अवस्थेतून निसटण्याचा, पळून जाण्याचा प्रयत्न करीत. प्रसंगी बंडही करीत. गुलामीसमाजातील पिळवणूक अधिक तीव्र व जाचक होत गेली. बहुसंख्य जनतेच्या हालअपेष्टा वाढत गेल्या आणि वर्गसंघर्षही वाढत गेला.

३) **सरंजामशाही :** गुलामगिरी समाज व्यवस्थेतील वर्गसंघर्ष तीव्र होत जाऊन गुलामी व्यवस्थेचा अंत झाला आणि सरंजामशाही व्यवस्था निर्माण झाली. सरंजामशाहीमध्ये श्रमिक स्वत:च्या शरीराचा व उत्पादन साधनाचा मालक होता. स्वत:चा जमिनीचा तुकडा, स्वत:ची उत्पादन साधने, आणि उत्पादनाचा ठराविक वाटा स्वत:कडे राहण्याची शाश्वती यामुळे त्याला गुलामापेक्षा कितीतरी अधिक स्वारस्य वाटणे स्वाभाविक होते. उत्पादन कार्यात तो सुधारलेली उपकरणे वापरून उत्पादन वाढवू शकत होता. लोखंड शुद्ध करण्याच्या तंत्राची प्रगती झाल्यामुळे लोखंडाचा वापर आणि प्रसार झाला. नांगर, हातमाग यात सुधारणा, शेती, फळ

बागायत व दुधदुभत्याचा धंदा यामध्ये प्रगती झाली. हस्त व्यवसायाचा विकास व कारखान्यांची सुरूवात झाली.

श्रमिकांच्या शरीरावर व उत्पादनावर सरंजामदाराची संपूर्ण मालकी नसली तरी त्यांच्या श्रमावर उत्पादनावर त्यांचा अग्रहक्क असे. जे काही उत्पादन होईल त्यातून सरंजामदाराचा वाटा प्रथम घेतला जाई. परिस्थितीनुसार हा वाटा कमी-अधिक असे. पण जशी सरंजामदारांची संख्या वाढे किंवा अधिक गरज भासेल तेंव्हा प्रस्थापित नियम बाजूला ठेवून ते अधिक वाटा वसूल करीत. सरंजामशाहीतील उत्पादन बहुतांशी स्थानिक गरजा भागविण्यापुरते होते. राजा त्याचा दरबार व फौजफाटा याभोवती जी शहरे उभी होत त्यांच्यासाठी व्यापाराची गरज होती. यामुळे शहरे कुशल कामगारांची केंद्रे बनत गेली. परदेशाशी होणारा व्यापार मुख्यत: वरिष्ठ वर्गाच्या गरजांपुरता होता.

प्रांताप्रांतातील सरंजामदार आपापल्या प्रदेशात सत्ताधीश होते. मध्यवर्ती सत्तेला शांततेच्यावेळी वसुली देणे, युद्धाच्यावेळी फौज व द्रव्य पुरविणे ही जबाबदारी त्यांचेवर होती. मध्यवर्ती सत्ता कमकुवत झाली की ते तीही जबाबदारी टाकून स्वतंत्र राज्ये स्थापित. सरंजामी सत्ता जनतेच्याबाबतीत एकच कर्तव्य पार पाडीत ती म्हणजे पाटबंधारे कालवे आणि रस्ते यांची व्यवस्था ठेवणे.

सरंजामशाही मध्येही सरंजामदार वर्ग आणि शेतकरी श्रमिक यांच्यात अंतर्विरोध होता. सरंजामशाहीतील उत्पादनाच्या विकासाबरोबर त्यांच्यातील वर्गसंघर्ष तीव्र होत गेला. ज्यापद्धतीने गुलामगिरीची व्यवस्था नाहीशी करून सरंजामशाही पद्धती आली त्यापद्धतीने सरंजामशाहीच्या पोटातूनच भांडवलशाहीची पद्धती तयार होऊन तिने सरंजामशाहीची जागा पटकावली.

४) **भांडवलशाही :** सरंजामशाहीमध्ये कारागीर प्रामुख्याने स्थानिक गरजा भागवण्यापुरते उत्पादन करीत व ते स्वत:च्या मालकीच्या उत्पादन-साधनांनी करीत. नव्या वाढत्या व्यापाराची गरज ते भागवू शकत नव्हते. भांडवलदारांनी या श्रमिकांना एका कारखान्यात आणले आणि आपल्या साधनांवर त्यांना कामास लावले. श्रमविभागणीचा अवलंब करून कारखान्यात उत्पादन सुरू झाले. उत्पादन वाढविण्यासाठी निरनिराळ्या यंत्रांचा शोध लावण्यात आला. अशारितीने आधुनिक भांडवलदारी उत्पादनाचा विकास झाला.

परंतु या विकासासाठी भांडवल आणि कामगार आवश्यक होते. अमेरिकेतून आणि पौर्वात्य देशातून लुटीच्या मार्गाने अफाट संपत्ती युरोपात येत होती. व्यापारातूनही नफा मिळत होता. या धनातून प्राथमिक भांडवलाची गरज भागली. उत्पादन आणि चरितार्थ ह्या दोहोंच्या साधनापासून श्रमिकाला तोडल्याखेरीज कारखान्यांसाठी कामगार मिळणे शक्य नव्हते. त्यासाठी सरंजामशाहीची चौकट मोडणे आवश्यक होते. उदयोन्मुख भांडवलदार वर्गाने सरंजामशाहीतील गांजलेल्या शेतकरी-कारागीरांच्या मदतीने सरंजामशाहीचा पाडाव केला.

उत्पादनाची कारखानापद्धती, यंत्राचा वापर यामुळे प्रचंड उत्पादन होऊ लागले. युरोपात भांडवलशाहीचा विकास होत असताना कारखान्यातील आपला स्वस्त माल आणि तोफा, दारूगोळा,

यांत्रिक शिस्तीच्या फौजा घेऊन युरोपीय भांडवलशाही आशिया व इतर खंडात उतरली. मागासलेले देश जिंकून स्वत:साठी हुकमी बाजारपेठ आणि स्वस्त कच्चामालाचा पुरवठा हस्तगत केला. युरोपात भांडवलशाहीचा पुरेसा विकास झाल्यानंतर अधिक नफ्याच्या शोधात भांडवलाचा ओघ या वसाहतीकडे वळला.

भांडवलशाहीने उत्पादन शक्तीचा मोठ्या प्रमाणात विकास घडवून आणला. भांडवलशाही समाज हा सरंजामशाही समाजापेक्षा प्रगत समाज आहे. परंतु भांडवलशाही समाजामध्येही भांडवलदारवर्ग आणि कामगार वर्ग अशी समाजाची वर्गवारी अस्तित्वात आली. भांडवलशाहीमध्ये राबणारे असंख्य कामगार संपत्तीचा सतत वाढता डोंगर निर्माण करतात. परंतु त्यांना त्यामधील केवळ आपल्या चरितार्थापुरता वाटा मिळतो. राहिलेला प्रचंड भाग अतिरिक्त मूल्याच्या (नफ्याच्या) रुपात भांडवलदाराकडे जातो. त्यातून भांडवलाचे प्रचंड केंद्रीकरण आणि मक्तेदारी यांचा विकास होतो. बहुसंख्य श्रमिक जनतेचे उत्पन्न मर्यादित असते. त्यामुळे एका बाजूला प्रचंड उत्पादन व दुसऱ्या बाजूला मर्यादित मागणी यामुळे आर्थिक अरिष्टे उद्‌भवतात. त्याचा भार आधिच शोषण होत असलेल्या कामगार वर्गावर पडतो. त्यामुळे भांडवलदारवर्ग आणि कामगार वर्ग यांच्यातील वर्गसंघर्ष तीव्र होत जातो. थोडक्यात भांडवलशाहीने उत्पादनाला सामुदायिक स्वरूप दिले परंतु त्यावर मालकी भांडवलदार वर्गाची ठेवली. भांडवलशाहीतील ही मूलभूत विसंगती आर्थिक अरिष्टे, विषमता, पिळवणूक, साम्राज्यवाद, युद्धे यासारख्या प्रश्नांना कारणीभूत ठरते. भांडवलशाहीची ही चौकट आता मानवसमाजाच्या पुढच्या विकासाला अडथळा ठरते. त्यामुळे भांडवलदारी मालकीची चौकट मोडून सामाजिक मालकी प्रस्थापित केल्याखेरीज समाजाची पुढची प्रगती होणे शक्य नाही. म्हणून मार्क्सने असे भाकित केले की कामगारवर्ग इतर श्रमिकांच्या मदतीने भांडवलशाही उलथवून टाकील आणि समाजवादी अर्थव्यवस्था प्रस्थापित करेल.

थोडक्यात सामाजिक परिवर्तनाचा पाया समाजाच्या आर्थिक उत्पादन पद्धतीमधील परिवर्तन हा आहे. आर्थिक उत्पादनाच्या पायात झालेल्या बदलामुळे समाजावर येणारे दडपण मानवी विचारात व्यक्त होते आणि त्यामुळे अपरिहार्य झालेले सामाजिक बदल मानवी कर्तृत्वानेच सिद्ध होतात. हे कर्तृत्व तोकडे पडले तर ते बदल लांबणीवर पडतात आणि नव्या समाजाचा जन्म अधिक कष्टमय होतो. अशारितीने मार्क्सने आपल्या ऐतिहासिक भौतिकवादाच्या आधारे समाजव्यवस्था स्थिर व शाश्वत नाही तर ती बदलत आली आहे. ज्या गतीनियमानुसार ती बदलत आली त्याच नियमानुसार आजची भांडवलदारी व्यवस्था बदलून समाजवादी व्यवस्था अस्तित्वात येईल असे प्रतिपादन केले.

### ४.२.३ मार्क्सचा मूल्यसिद्धांत (Marxian Theory of Value)

भांडवलशाही समाजामध्ये उत्पादन केलेली वस्तू कुणाच्या तरी हाती उपभोगासाठी पोहचण्यापूर्वी तिला एक अपरिहार्य टप्पा पार करावा लागतो. तिच्या खरेदी-विक्रीचा व्यवहार व्हावा लागतो. त्यातूनच ती क्रयवस्तू बनते. सर्व क्रयवस्तूंचा समान गुणधर्म म्हणजे त्यांना किंमत असणे होय. मार्क्सच्यामते क्रयवस्तूला

दोन प्रकारची मूल्ये असतात. एक म्हणजे उपयोगिता मूल्य (Value in use) आणि दुसरे म्हणजे विनिमय मूल्य (Exchange Value). भांडवली समाज किंमतीत व्यक्त होणाऱ्या विनिमय मुल्याभोवतीच फिरत असतो. त्यामुळे अर्थशास्त्र एक प्रश्न निश्चितच विचारते तो म्हणजे वस्तूची किंमत म्हणजेच विनिमय मूल्य कशावरून ठरते?

अर्थशास्त्रातील वेगवेगळे विचारप्रवाह या प्रश्नाचे उत्तर वेगवेगळे देतात. मार्क्सही आपल्या प्रतिपादनाची सुरूवात या प्रश्नापासून करतो. परंतु मार्क्स या प्रश्नाचे उत्तर देत या प्रश्नाआड दडलेल्या दुसऱ्या एका महत्त्वाच्या प्रश्नाच्या उत्तराकडे पोहचतो. तो म्हणजे मूळात वस्तूंना किंमत प्राप्त होते याचाच अर्थ काय? किंवा भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कामगारांचे शोषण कसे होते? आता आपण मार्क्सचे हे स्पष्टीकरण अभ्यासू.

**४.२.३.१ :** मार्क्सच्या मूल्य सिद्धांताचा अभ्यास करण्यापूर्वी इतर अर्थशास्त्रज्ञांनी दिलेले उत्तर आणि त्यासंबंधी मार्क्सचे म्हणणे समजून घेऊ.

१) **मागणी पुरवठ्याचे स्पष्टीकरण :** वस्तूचे बाजारातील विनिमय मूल्य तिच्या बाजारपेठेतील मागणी आणि पुरवठ्यावरून ठरते असे एक स्पष्टीकरण दिले जाते. वस्तूचा बाजारातील पुरवठा कमी झाला की किंमत वाढते आणि पुरवठा जास्त झाला की किंमत घटते. किंवा वस्तूची मागणी कमी झाली की किंमत कमी होते व मागणी जास्त झाली की किंमत वाढते. याचा अर्थ वस्तूच्या मागणी-पुरवठ्यातल्या मेळा वरून किंमत ठरते. परंतु खरे पाहता मागणी-पुरवठ्याचे हे उत्तर एखाद्या वस्तूच्या सरासरी किंमतीभोवती होणाऱ्या चढ उताराबद्दल सांगू शकते. पण खुद्द सरासरी किंमतीबद्दल काही स्पष्टीकरण देऊ शकत नाही.

२) **उपयुक्ततेचे स्पष्टीकरण :** वस्तूंना काही ना काही उपयोग असतो. दुसऱ्या शब्दात सांगावयाचे झाल्यास वस्तूला उपयोगिता मूल्य असते. त्यामुळे वस्तूंचे मूल्य वस्तूच्या उपयोगितेवरून ठरते असे एक उत्तर दिले जाते. वरवर बघता हे खरेही वाटते. परंतु खोलवर जाऊन विचार केला तर लक्षात येते की हे खरे नाही. तसे असते तर ज्या वस्तूंनी भागविलेली गरज अत्यंत निकडीची त्या वस्तूंची किंमत जास्त असायला हवी. पण तसे नसते. माणसे ज्याच्याशिवाय सहज जगू शकतात त्या सोन्याचांदीला प्रचंड किंमत असते आणि माणसं ज्याच्याशिवाय जगूच शकत नाहीत त्या हवेला किंमतच नसते. सीमांत उपयोगितेचा सिद्धांत असे प्रतिपादन करतो की ग्राहकाने विकत घेतलेल्या वस्तूच्या शेवटच्या नगापासूनची उपयोगिता आणि विक्रेत्याने लावलेली किंमत ज्याठिकाणी समान होतात त्या ठिकाणी किंमत स्थिरावते व मागणी पुरवठ्याचा मेळ घातला जातो. पण हे सगळे व्हायचे असेल तर विविध प्रकारच्या वस्तूंची उपयोगिता-'सीमांत उपयोगिता मोजता आली पाहिजे. जे प्रत्यक्षात काटेकोरपणे मोजणे शक्य नाही. शिवाय उपयोगिता ही व्यक्तिनिष्ठ बाब असते. उपयोगिता मूल्य सिद्धांताने उपयोग मूल्यावरून किंमत कशी ठरते याबद्दल काहीच सांगितलेले नसते. खरे तर येथे मागणी पुरवठ्याचे जुनेच समर्थन केवळ नव्या रूपात सांगितले जाते.'

३)    **दुर्मिळतेचे स्पष्टीकरण :** भांडवली अर्थशास्त्रानुसार वस्तूंना किंमत येण्यासाठी त्या दुर्मिळ असल्या पाहिजेत. वस्तू दुर्मिळ असणे म्हणजे ती विनासायास प्राप्त न होणे. दुर्मिळता हा क्रयवस्तूंचा आवश्यक गुणधर्म मानणे याचाच अर्थ क्रयवस्तूमध्ये काहीएक मानवी श्रम, सामाजिक श्रम ओतले गेलेले असतात याला संमती देणे होय. उदा. श्वासोच्छवासासाठी लागणारा हवेतील प्राणवायू अजिबात दुर्मिळ नसतो. कारण तो मुद्दाम उपलब्ध करावा लागत नाही. तो उपलब्ध करण्यासाठी सामाजिक श्रम घालावे लागत नाहीत. परंतु तोच प्राणवायू द्रवरूप करून सिलिंडरमधून वेल्डिंगकामासाठी किंवा रुग्णाला वापरायचा असेल तर तो एकदम दुर्मिळ बनतो. या दुर्मिळतेमागे हे वास्तव असते की आता तो प्राणवायू सिलिंडरमध्ये भरण्यासाठी सामाजिक श्रम ओतणे आवश्यक असते.

४)    **श्रममूल्य सिद्धांत :** क्रयवस्तूचे विनिमयमूल्य कसे ठरते याचे ॲडम स्मिथ आणि डेव्हिड रिकार्डो यांनी स्पष्टीकरण दिले. त्यांनी श्रममूल्य सिद्धांत मांडला. परंतु त्यांना तो परिपूर्ण स्वरूपात मांडता आला नाही. मार्क्सने तो विकसित करून परिपूर्ण स्वरूपात मांडला. याठिकाणी हे लक्षात घेतले पाहिजे की; मार्क्स हा सुधारित रिकार्डो नाही. 'वस्तूची किंमत त्यांच्यात केलेल्या श्रमकाळावरून ठरते' याच्या पलीकडे जाऊन मार्क्सने मूळात वस्तूंना किंमत येणे याचा अर्थ स्पष्ट केला आहे. त्यामागे दडलेल्या सामाजिक संबंधांचे विश्लेषण केले आहे.

**४.२.३.२ मार्क्सचा मूल्य सिद्धांत :** सगळ्या क्रयवस्तूंना किंमत असते त्याअर्थी किंमत ही त्या सर्व क्रयवस्तूमध्ये असणाऱ्या कोणत्या तरी गुणधर्मावरून ठरत असली पाहिजे. त्याचबरोबर ही किंमत त्यांचे आपापसातले विनिमयाचे एक निश्चित प्रमाण देखील ठरवत असते. हा गुणधर्म कोणता याची भांडवली उत्तरे आपण पाहिली आहेत. उपयोगमुल्य, सीमांत उपयुक्तता, दुर्मिळता इत्यादीमुळे विनिमयमूल्य ठरत नाही. त्यामुळे याचे एकच उत्तर राहते ते म्हणजे मानवी श्रम होय. म्हणून वस्तूचे मूल्य तिच्या निर्मितीसाठी आवश्यक असणाऱ्या श्रमावरून ठरते असे प्रतिपादन करून मार्क्सने श्रममूल्य सिद्धांत मांडला. वस्तूच्या उत्पादनासाठी श्रमाची गरज असते. तशीच भांडवलाचीही गरज असते. भांडवलामध्ये यंत्रे, कच्चामाल, अवजारे यांचा समावेश केला जातो. मार्क्सने याबाबतीत एक महत्त्वाचा विचार मांडला की या भांडवलाची निर्मिती भूतकाळात कोणीतरी श्रम केल्यामुळे झालेली असते. म्हणून भांडवल म्हणजे भूतकाळातील संचित श्रम असतात. याचा अर्थ वस्तूच्या उत्पादनात वर्तमान श्रमाबरोबरच संचित श्रमाचा वापर केला जातो. यावरून वस्तूचे विनिमय मूल्य वस्तूत समाविष्ट झालेल्या चालू काळातील श्रम आणि भूतकाळातील संचित श्रम यावरून ठरते. परंतु नुसता 'मानवी श्रम' असा शब्द वापरून आपल्याला फारसा बोध होत नाही. कारण मानवी श्रम ही एक गुंतागुतीची गोष्ट आहे. म्हणून मार्क्सने मानवी श्रमाचे दुहेरी स्वरूप असते असे महत्त्वाचे प्रतिपादन केले आहे.

**४.२.३.३ मूर्त आणि अमूर्त श्रम :** क्रयवस्तूमध्ये घातले जाणारे मानवी श्रम मूर्त आणि अमूर्त असे दोन प्रकारचे असतात. माणसे जेंव्हा श्रमातून वस्तू निर्माण करीत असतात तेंव्हा ती मूर्त स्वरूपात श्रम

करीत असतात. ती कापड विणत असतात, लाकडाला आकार देत असतात, लोखंड घडवीत असतात, नांगरट करीत असतात. विणकाम, सुतारकाम, लोहारकाम, शेतीकाम हे वेगवेगळ्या प्रकारचे श्रम असतात. यापैकी प्रत्येक प्रकारचे श्रम जी वस्तू बनवायची आहे तिच्या मूर्त स्वरूपाशी, ती ज्यापासून बनवायची त्या कच्चामालाशी, अवजाराशी आणि आवश्यक त्या विशिष्ट कसबाशी निगडीत असतात. विणकामाची जागा सुतारकाम घेऊ शकत नाही. याचा अर्थ प्रत्येक प्रकारचे मूर्त श्रम हे गुणात्मकरित्या विशिष्ठ असतात. मूर्त श्रम श्रमसाधनांच्या सहाय्याने कच्च्यामालाला विशिष्ट आकार देत माणसांची गरज भागविण्याची वेगवेगळी वैशिष्ट्यपूर्ण क्षमता वस्तूमध्ये निर्माण करीत असतात. म्हणजेच मूर्त श्रम वस्तूमध्ये उपयोगिता मूल्य निर्माण करीत असतात.

क्रयवस्तूमधील श्रमांना एक अमूर्त पैलू देखील असतो. एका उदाहरणाने याचे अधिक स्पष्टीकरण देता येईल. उदा. दोन हा आकडा घ्या. दोन ही एक अमूर्त संकल्पना आहे. प्रत्यक्षात तुम्हाला दोन कधीच सापडणार नाहीत. सापडतील त्या कोणत्याही दोन वस्तू. दोन आंबे, दोन पेरू, दोन किलो तांदूळ, दोन हॉर्सपॉवरचे इंजिन इत्यादी. या सर्वांना समान असा गणिती गुणधर्म प्रतिबिंबित करण्याची क्षमता असलेली 'दोन' ही एक अमूर्त संकल्पना आहे. दोन वस्तूंच्या गठ्ठ्यांमधील वस्तूंची वैशिष्ट्ये नजरेआड केली, त्यांचे मूर्त स्वरूप नजरेआड केले तर त्या गठ्ठ्यांमध्ये जे समान उरते ते म्हणजेच 'दोन' ही संकल्पना किंवा दोन हा आकडा. त्याचप्रमाणे आपण विविध क्रयवस्तूमध्ये केलेल्या विविध प्रकारच्या मानवी श्रमामधील मूर्त वैशिष्ट्ये नजरेआड केली तर या सर्व मानवी श्रमामध्ये जे समान उरते ते अमूर्त श्रम या संकल्पनेत व्यक्त होते.

आपल्यासमोर जे निरनिराळे मूर्त स्वरूपाचे श्रम आहेत त्यांच्याशी निगडीत मूर्त वैशिष्ट्ये बाजारपेठेत किंमतीसाठी नजरेआड केली जातात. ते विणकाम आहे, सुतारकाम आहे का लोहारकाम आहे ते सर्व बाजूला ठेवले जाते. हे श्रम त्या वस्तूच्या प्रत्यक्ष उत्पादकांनी स्वेच्छेने केले की जबरीने केले, हे श्रम करताना त्यांना आनंद झाला की दुःख झाले, त्यांचे हेतू सफल झाले की नाही अशा सर्व गोष्टी बाजूला ठेवून जे उरते ते अमूर्त श्रम. उरते ते निखळ श्रम आणि असे श्रम करण्यासाठी माणसांनी खर्च केलेला वेळ. माणसे समाजात राहून श्रम करीत असतात. काही एका सामाजिक रचनेचा घटक म्हणून तिच्या मार्फतच श्रम करीत असतात. त्यांनी श्रम करण्यात खर्च केलेला काळ समाजाकडील श्रमकाळाच्या साठ्याचा खर्च दर्शवीत असतो. म्हणजेच सामाजिक श्रमकाळ दर्शवीत असतो. हाच सामाजिक श्रमकाळ विनिमय मूल्याचा किंवा किंमतीचा आधार असतो.

**४.२.३.४ कामगारांच्या कार्यक्षमतेतील फरक :** वस्तूचे विनिमय मूल्य श्रमावरून ठरते हे निश्चित झाल्यानंतर एक प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे कामगारांची कार्यक्षमता एकसारखी नसते. काही कामगारांची कार्यक्षमता अधिक असते तर काहींची कमी असते. ही अडचण दूर करण्यासाठी मार्क्सने सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमवेळेची कल्पना मांडली. मार्क्सच्यामते क्रयवस्तूमध्ये घातला जाणारा श्रमकाळ आणखी एका दृष्टीने अमूर्त असतो. अमूर्त श्रम हे श्रमकाळाच्या प्रत्येक तुकड्याचे सरासरीच्या न्यायाने

आवश्यक श्रमकाळात रूपांतर करीत असतात. एका पुढील उदाहरणाने याचे स्पष्टीकरण देता येईल. समजा एक लाख चप्पलजोड चार लाख श्रमतासांच्या सहाय्याने निर्माण होतात. याचेच एक अमूर्त माप बनले तर प्रत्येक चप्पलजोडामागे चार श्रमतास हे सरासरीच्या न्यायाने इतर कोणत्याही वैशिष्ट्यांचा विचार न करता लागतात, असे जेंव्हा आपण म्हणतो तेंव्हा प्रत्येक सामाजिक श्रमकाळाच्या तुकड्याचे अमूर्त श्रमात रूपांतर झालेले असते. एकादा कामगार काही शारीरिक वैगुण्यामुळे एक चप्पलजोड सहा तासात तयार करीत असेल तर दुसरा एकादा अनुभवी धट्टाकट्टा कामगार एक चप्पलजोड तीन तासात तयार करीत असेल. परंतु क्रयवस्तूंच्या विनिमयाच्यादृष्टीने या पडद्याआडच्या फरकाना काहीच महत्व नसते. या दोन्ही कामगारांनी तयार केलेल्या चप्पलजोडावर ते जेंव्हा बाजारात येतात तेंव्हा त्याची काही निशाणी नसते. तेंव्हा एक लाख चप्पलजोडांवर चार लाख श्रमतासांचा श्रमकाळ सरासरीच्या न्यायाने समानपणे पसरतो. बाजारपेठेत हे श्रम कसे, का घडले याला काडीचेही महत्व नसते. ज्या कामगारांनी कमी कुशलतेमुळे किंवा आळशीपणामुळे चप्पलजोडामध्ये सहा श्रमतास घातलेले असतात त्यांच्या सहा श्रमतासांचे बाजारपेठेमार्फत चार श्रमतास आवश्यक श्रमकाळामध्ये रूपांतर झालेले असते. तसेच दुसऱ्या कामगाराच्या तीन श्रमतासांचेही त्याच न्यायाने चार श्रमतासात रूपांतर झालेले असते. अशारितीने सर्वसाधारण मानवी श्रम हे क्रयवस्तूंच्या माध्यमातून एक अमूर्त माप बनलेले असतात व प्रत्येक श्रमकाळाच्या तुकड्याचे सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळात रूपांतर करत असतात.

प्रत्येक क्रयवस्तूमध्ये असा अमूर्त श्रमकाळ साठलेला असतो. ती क्रयवस्तू तयार करताना प्रत्यक्षपणे त्याचे उत्पादन करणारी जी माणसे जो श्रमकाळ घालतात तो तर त्यांच्यात साठलेला असतोच. पण त्याचबरोबर तिच्या उत्पादनासाठी वापरात येणाऱ्या इतर क्रयवस्तूमार्फत त्यांच्यात पूर्वी साठवलेला श्रमकाळ या नव्याने बनविलेल्या वस्तूत साठत असतो. त्यामुळे क्रयवस्तूच्या निर्मितीत गेलेल्या एकंदर आवश्यक सामाजिक श्रमकाळावरून वस्तूचे विनिमय मूल्य ठरते. एका उदाहरणाने याचे अधिक स्पष्टीकरण देता येईल. आपण खिळे बनविण्याचे उदाहरण घेऊ. समजा एक कामगार लोखंडी तारेपासून एका तासात २०० खिळे बनवितो. त्यामुळे या २०० खिळ्यात १ श्रमतास इतका श्रमकाळ साठलेला असतो. पण त्याचबरोबर खिळ्याकरिता कच्चामाल म्हणून लोखंडाची तारही खर्च होत असते. या २०० खिळ्यांच्या निर्मितीसाठी २ किलो लोखंडाची तार खर्च होते असे समजू. या २ किलो लोखंडी तारेत साठविलेला श्रमकाळ २ श्रमतास आहे असे मानू. खिळे तयार करण्यासाठी लागणारी खिळा बनविण्याचा साचा, हातोडी, ऐरण, इत्यादी श्रमसाधनांचे आयुष्य ठरलेले असते. ही श्रमसाधने झीज होत होत निकामी होईपर्यंत १ लाख खिळे तयार करण्याच्या कामी येतात आणि त्यांच्यात साठविलेला एकंदर श्रमकाळ ५०० श्रमतास आहे असे मानू. याचा अर्थ एक खिळा तयार करण्यासाठी या श्रमसाधनाच्या रूपाने ०.००५ श्रमतास इतका श्रमकाळ खर्ची पडतो. म्हणजेच २०० खिळ्यासाठी १ श्रमतास खर्ची पडतो. (२०० x ०.००५ = १ श्रमतास).

थोडक्यात या २०० खिळ्यांमध्ये साठलेला एकूण श्रमकाळ म्हणजे कामगाराने ओतलेला श्रमकाळ + कच्चामालातील श्रमकाळ + श्रमसाधनांच्या झीजेच्या रूपाने खर्ची पडलेला श्रमकाळ होय. म्हणजेच १+२+१=४ श्रमतास इतका असतो. हा श्रमकाळच त्या खिळ्यांचे विनिमय मूल्य निर्धारित करीत असतो.

अशारितीने मूल्य म्हणजे अमूर्त बनलेला क्रयवस्तूच्या निर्मितीत गेलेला एकंदर आवश्यक सामाजिक श्रमकाळ असतो. एकाद्या क्रयवस्तूमध्ये साठलेला असा सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळ म्हणजेच त्या क्रयवस्तूचे मूल्य होय. परंतु ते श्रमकाळ म्हणून सरळ व्यक्त होत नाही. तर ते व्यक्त होते विनिमयामध्ये, वस्तूंचे आपापसातील बदलाचे प्रमाण म्हणून किंवा विनिमय मूल्य या रूपात आणि पैशाच्या भाषेत हे विनिमय मूल्य सांगायचे तर ते किंमतीच्या रूपात व्यक्त होते.

अशारितीने मार्क्स यांनी आपल्या मूल्यसिद्धांतात वस्तूचे विनिमय मूल्य हे वस्तूच्या निर्मितीसाठी लागलेल्या सामाजिकदृष्ट्या आवश्यक श्रमकाळावरून ठरते हे स्पष्ट केले. रिकार्डो यांनी श्रममूल्याचा सिद्धांत मांडला. आपला भांडवली विचार न टाकता हा सिद्धांत जितका म्हणून काटेकोरपणे पुढे नेता येईल तितका रिकार्डोने नेला. मार्क्सने मात्र भांडवली विचारांची कात टाकून श्रममूल्य सिद्धांतांची मांडणी केली. त्याने बाजारपेठेत घडणाऱ्या घडामोडींच्या वर्णनापलीकडे जाऊन उत्पादनसंबंध स्पष्ट केले. मूल्यसिद्धांताच्या आधारे भांडवलशाहीत श्रमिकांचे शोषण कसे होते याचे मार्क्सने स्पष्टीकरण दिले. त्यांच्यामूल्य सिद्धांतावरून भांडवलशाहीच्या  पलीकडे झेपावणारी त्यांची क्रांतीकारक दृष्टी दिसून येते.

**४.२.३.५ मार्क्सच्या मूल्यसिद्धांतावरील टीका (आक्षेप) :** मार्क्स यांनी आपला मूल्यसिद्धांत अतिशय शास्त्रशुद्धपणे मांडला. तरी काही अर्थशास्त्राज्ञांनी मार्क्सच्या मूल्यसिद्धांतावर काही आक्षेप घेतले. त्यापैकी प्रमुख आक्षेप खालीलप्रमाणे आहेत.

१) **उपयोगितेकडे दुर्लक्ष :** मार्क्स यांनी आपल्या मूल्यसिद्धांतात विनिमय मूल्यावरच लक्ष केंद्रीत करून उपयोगिता मूल्याकडे दुर्लक्ष केले अशी टीका काही विचारवंतांनी केली आहे. त्यांच्यामते कोणत्याही वस्तूस विनिमय मूल्य प्राप्त होण्यासाठी त्या वस्तूमध्ये उपयोगिता असणे गरजेचे आहे. परंतु खरे पाहता मार्क्स यांनीही उपयोगिता मूल्यांचे महत्व नाकारलेले नाही. फक्त त्यांनी असे प्रतिपादन केले की उपयोगिता मूल्य हे विनिमय मूल्याचा आधार होऊ शकत नाही. कारण तसे असते तर ज्या वस्तूंनी भागवलेली गरज जास्त निकडीची त्या वस्तूंची किंमत जास्त असायला पाहिजे. पण तसे नसते.

२) **मागणीकडे दुर्लक्ष :** मार्क्स यांनी वस्तूचे विनिमय मूल्य कसे ठरते याचे विवेचन करताना केवळ पुरवठ्याची बाजू लक्षात घेतली आणि मागणीकडे दुर्लक्ष केले. अशी टीका करण्यात आली. परंतु मार्क्स यांनी असे म्हटले आहे की विनिमय मूल्याबाबतचे मागणी पुरवठ्याचे स्पष्टीकरण सरासरी किंमतीभोवती होणाऱ्या चढउताराबद्दल सांगू शकते पण खुद्द सरासरी किंमतीबद्दल काही सांगू शकत नाही.

३) **दुर्मिळतेकडे दुर्लक्ष :** मार्क्सने आपल्या मूल्यसिद्धांतात वस्तूच्या विनिमय मूल्यावर दुर्मिळता या गुणधर्माचा किती व कसा प्रभाव पडतो याचे स्पष्टीकरण दिले नाही अशी टीका करण्यात आली. वस्तूला मूल्य प्राप्त होण्यासाठी ती दुर्मिळ असणे आवश्यक आहे ही जी अट भांडवली अर्थशास्त्र सांगते तिच्यामागे सामाजिक श्रम लपलेले असतात. मार्क्सच्यामते दुर्लभता हा क्रयवस्तूंचा आवश्यक गुणधर्म मानणे याचाच

अर्थ क्रयवस्तूमध्ये काहीएक मानवी श्रम, सामाजिक श्रम ओतले गेलेले असतात याला संमती देणे असा होतो.

४) **सर्व वस्तूंना श्रमामुळे मूल्य प्राप्त हे चुकीचे :** मार्क्सने सर्व वस्तूंना श्रमामुळे मूल्य प्राप्त होते असे सांगितले. टीकाकारांच्यामते हे चुकीचे आहे. टीकाकारांच्या मते निसर्गत: निर्माण होणाऱ्या वस्तूंना कोणत्याही प्रकारचे मूल्य द्यावे लागत नाही. मार्क्सच्या मते हे बरोबर आहे. ज्या वस्तू प्राप्त करण्यासाठी मानवी श्रम लागत नाहीत उदा. हवा त्यांना विनिमय मूल्य द्यावे लागत नाही. पण खनिजे जमिनीतून शोधून, उत्खनन करून काढावी लागली तर त्यासाठी मानवी श्रम लागतात त्यामुळे त्यांना किंमत द्यावी लागते.

५) **भांडवलाला योग्य स्थान नाही :** मार्क्सने आपल्या मूल्यसिद्धांतात भांडवलाला योग्य स्थान दिले नाही अशी टीका करण्यात आली आहे. मार्क्सने भांडवल म्हणजे संचित श्रम असे म्हटले आहे. आणि वस्तूच्या विनिमय मूल्यात संचित श्रमाचा समावेश असतो असे मार्क्सने म्हटले आहे.

६) **वस्तूच्या निर्मितीला अनेकांच्या श्रमाचा वापर :** टीकाकारांच्यामते सध्याच्या कोणत्याही वस्तूचे उत्पादन हे अनेक कामगारांच्या श्रमातून होत असते. त्यामुळे एका वस्तूच्या निर्मितीमध्ये प्रत्येक कामगाराचे किती श्रमखर्ची पडले हे सांगणे अवघड असते. परंतु मार्क्सच्यामते प्रत्येक कामगाराचे श्रम मोजण्याची गरज नसते तर वस्तूच्या निर्मितीस गेलेल्या सामाजिक दृष्ट्या आवश्यक अमूर्त श्रमावरून वस्तूचे मूल्य ठरते.

मार्क्सच्या मूल्य सिद्धांतावर वरीलप्रमाणे आक्षेप नोंदविलेले असले तरी ते सर्व मुद्दे तांत्रिक आहेत. वस्तूचे मूल्य कसे ठरते याची ॲडम स्मिथपासून सुरू झालेली मीमांसा मार्क्सने शास्त्रशुद्धपणे पुर्ण केली. मार्क्सने केवळ विनिमयमूल्य कसे ठरते याचेच स्पष्टीकरण दिले नाही तर विनिमय व्यवहारामागे दडलेल्या मानवी संबंधाचे व भांडवलशाहीतील श्रमिकांच्या शोषणाचे स्पष्टीकरण दिले.

### ४.२.४ मार्क्सचा अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत (Theory of surplws value)

भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कामगारांचे शोषण होते असे काही विचारवंतानी मार्क्सपूर्वी म्हटले होते. परंतु हे शोषण नेमके कसे होते याविषयी शास्त्रशुद्ध स्पष्टीकरण दिले नव्हते. कार्ल मार्क्स यांनी आपल्या मुल्यसिद्धांताच्या आधारे अतिरिक्त मूल्यसिद्धांत मांडून भांडवलशाहीत कामगारांचे शोषण कसे होते हे याचे स्पष्टीकरण दिले. भांडवलशाही व्यवस्थेत भांडवलदार कामगारांच्या श्रमातून जेवढे मूल्य निर्माण करून घेतो त्याचा अल्पसा भाग त्यांना वेतन म्हणून देतो आणि राहिलेला भाग तो स्वत: नफा म्हणून ठेवून घेतो. कामगाराने प्रत्यक्षात निर्माण केलेले मूल्य आणि त्याला मिळणारे वेतन यामधील फरक म्हणजेच अतिरिक्त मूल्य (Surplus value) होय. आता आपण अतिरिक्त मूल्य कसे निर्माण होते याचे मार्क्सने दिलेले उत्तर पहाणार आहोत.

अतिरिक्त मूल्य कोठून निर्माण होते या प्रश्नाचे मार्क्सने दिलेले उत्तर आज जगजाहीर आहे. मार्क्सच्या समर्थकांना आणि विरोधकांनाही माहीत आहे की अतिरिक्त मूल्याची न आटणारी गंगा कामगारांच्या

शोषणातून वाहते हे मार्क्सचे उत्तर आहे. पण मार्क्सचे महत्व केवळ या निष्कर्षात नाही, तर तो या निष्कर्षापर्यंत का व कसा पोहचतो याच्यात आहे. मार्क्सने मांडलेल्या मूल्य, उपयोग मूल्य, मूर्त व अमूर्त श्रम यासारख्या मूलभूत संकल्पना मार्क्सच्या या निष्कर्षाचा जैव आधार आहेत.

**४.२.४.१ : श्रमप्रक्रिया :** अतिरिक्त मूल्य निर्मिती समजून घेण्यासाठी सुरूवातीला श्रमप्रक्रिया समजून घेणे गरजेचे आहे. श्रमप्रक्रिया म्हणजे उपयोगी वस्तूमधून, मूर्तश्रमाच्या सहाय्याने इतर उपयोगी वस्तू निर्माण करण्याची प्रक्रिया होय. श्रमप्रक्रिया ही सर्व समाज व्यवस्थांमध्ये सामाजिक उत्पादनाचा आधार असते. ती पार पाडण्यासाठी आवश्यक त्या किमान अटी व निकष प्रत्येक उत्पादन व्यवस्थेला पार पाडावेच लागतात. भांडवली उत्पादनालाही साहजिकच या अटी पार पाडाव्या लागतात. परंतु भांडवली उत्पादनाची केवळ ही एकच बाजू नसते. मूल्यसंबंधाशी निगडीत अशी एक दुसरी बाजूही असते. ती म्हणजे सुरूवातीच्या भांडवलाच्या मूल्यातून त्यापेक्षा जास्त मूल्य निर्माण करण्याची प्रक्रिया म्हणजेच अतिरिक्त मूल्य निर्मितीची प्रक्रिया होय.

**श्रम प्रक्रियाचे तीन घटक :** श्रमप्रक्रिया घडायची, उपयोगी वस्तूचे उत्पादन व्हायचे तर श्रमप्रक्रियेचे निरनिराळे घटक एकत्र यावे लागतात. या घटकांचे तीन प्रकार पाडता येतात. **पहिला घटक म्हणजे श्रमविषय किंवा कच्चामाल.** ज्या गोष्टीवर काम करून त्यांना उपयोगी वस्तूंचे स्वरूप दिले जाणार आहे त्या सगळ्या श्रमविषयात मोडतात. उदा. एकादे टेबल बनवताना लागणारे लाकूड, खिळे, सरस, पॉलिश, रंग इत्यादी. या सर्व गोष्टी शेवटी संपूर्णपणे टेबलाचा भाग बनतात. एकाद्या विशिष्ट श्रमप्रक्रियेचा विचार केला तर श्रमविषय हा कधी इतर श्रमप्रक्रियामधून आलेला असतो, तर कधी तो निसर्गाने आयता उपलब्ध करून दिलेला असतो.

श्रमप्रक्रियेचा **दुसरा घटक म्हणजे श्रमसाधने होत.** श्रमविषयाला विशिष्ठ उपयोगी आकार देण्यासाठी अनुरूप अशी साधने आवश्यक असतात. उदा. टेबल बनवायचे असेल तर करवत, रंधा, पटाशी, हातोडा, पालिश, रंग देण्यासाठी ब्रश इत्यादी साधने टेबल तयार करण्यासाठी वापरावी लागतात. ही सर्व प्रत्यक्ष श्रमसाधने होत. त्याचबरोबर जमीन, इमारत इत्यादी आवश्यक असतात. या साधनांचा वस्तूला आकार देण्याशी सरळ संबंध नसला तरी श्रमप्रक्रिया ही शेवटी माणसांनी केलेली प्रक्रिया असल्याने अशी काही ना काही श्रमसाधने आवश्यक ठरतातच. ही सर्व साधने अप्रत्यक्ष श्रमसाधनामध्ये मोडतात.

श्रमविषय व श्रमसाधने मिळून ज्या गोष्टी आहेत त्याना आपण श्रमसामुग्री म्हणू. श्रमसामुग्री म्हणजे श्रमप्रक्रियेतील निर्जिव घटकांची गोळाबेरीज.

श्रमप्रक्रियेचा **तिसरा घटक म्हणजे माणसांची श्रमशक्ती होय.** हा घटक श्रमप्रक्रियेच्या इतर घटकापेक्षा वेगळा म्हणजेच सजीव असतो. श्रमसाधनांच्या सहाय्याने श्रम विषयाला अगोदर योजलेल्या कोणत्या तरी उपयोगी वस्तूचा आकार देण्याची माणसाच्या अंगची शारीरिक व मानसिक कुवत म्हणजे श्रमशक्ती होय. माणसे आपली श्रमशक्ती दुसऱ्याला देऊ शकत नाहीत. त्यामुळे श्रमशक्ती उपलब्ध असणे

म्हणजेच श्रमशक्ती अंगी असणारी माणसे काम करण्यासाठी हजर असणे. श्रमशक्तीचा वापर म्हणजेच मूर्त श्रम होत. उत्पादन हे या तीन घटकांच्या मेळातून घडणारी प्रक्रिया आहे.

**४.२.४.२ अतिरिक्त मूल्याची निर्मिती :** कारखान्यातून उत्पादन व्हायचे असेल तर भांडवलदाराकडे श्रमप्रक्रियेचे तिन्ही घटक उपलब्ध असावे लागतात. क्रयवस्तूंच्या व्यवहाराच्याबाबतीत उपलब्ध असणे याचा अर्थ ते बाजारात विक्रीसाठी असणे व खरेदीद्वारा उपलब्ध होणे. भांडवलदार श्रमप्रक्रियेचे घटक त्याच्या मालकाकडून विकत घेतो. भांडवलदार श्रमविषय (कच्चामाल) व श्रमसाधने त्यांच्या मालकाकडून खरेदी करून त्या मालकांना तिथेच सोडून ही श्रमसामुग्री आपल्या कारखान्यात आणतात. परंतु श्रमशक्तीचे मात्र जरा वेगळे असते. कामगार हे श्रमशक्तीचे मालक असतात. भांडवलदार कामगाराकडून श्रमशक्ती विकत घेतात परंतु कामगारांना तिथेच न सोडता त्यांना कारखान्याच्या गेटच्या आत आणतात. कारण कामगारांची श्रमशक्ती ही त्याच्यापासून वेगळी काढता येत नाही.

आता तुमच्या मनात एक प्रश्न निर्माण झाला असेल व तो रास्तच आहे. तो म्हणजे कामगार श्रमशक्ती विकतात की श्रम विकतात? मार्क्स 'कॅपिटल' या ग्रंथामध्ये श्रमशक्ती आणि श्रम यांच्यातला भेद स्पष्टपणे, काटेकोरपणे व सातत्याने पाळतो. मार्क्सने देखील हा फरक बऱ्याच उशीरा केला. १८५८-५९ मध्ये 'कॅपिटल' या ग्रंथाची पुर्वतयारी म्हणून लिहिलेल्या आणि 'ग्रुंड्रिस' या नावांने इंग्रजीत उपलब्ध असलेल्या लिखाणात याचा प्रथम उल्लेख आढळतो. मार्क्सच्या मते कामगार भांडवलदारांना श्रमशक्ती विकतात आणि श्रमशक्तीत गेलेल्या संचित श्रमाचा मोबदला देणे जरूरीचे असते. म्हणजे कामगारांना लागणाऱ्या उपजिविकेच्या साधनांचे मूल्य द्यावे लागते. कोणत्याही क्रयवस्तूचे मूल्य दिले की तिचे उपयोगमूल्य ताब्यात येते. याचा अर्थ कामगाराला त्याच्या श्रमशक्तीचे मूल्य दिले की त्याचे श्रम भांडवलदाराला प्राप्त होते. हे सर्व क्रयवस्तूंच्या नियमांना धरूनच होते, त्यांचा भंग करून नव्हे क्रयवस्तूंचे नियम हे या व्यवस्थेचेच नियम असतात आणि कोणत्याही शोषणावर आधारित व्यवस्थेतील शोषण हे त्या नियमांना धरूनच होत असते. ते शोषण तिच्या नियमाप्रमाणे वैध ठरते हाच त्या शोषक व्यवस्थेचा आधार असतो. थोडक्यात मार्क्सच्या मते कामगारांच्या शोषणाला खुद्द क्रयवस्तूंचे नियमच जबाबदार असतात. कारण कामगारांच्या श्रमातून विनाश्रम मोबदला उचलण्याचा अधिकार भांडवलदारांना तेच बहाल करतात. या सुसंगत दृष्टीकोनातून कामगारांचे शोषण नाहीसे करण्याचा मार्ग म्हणजे क्रयवस्तूंच्या व्यवहारांचे उच्चाटन करणे हा असतो, तो व्यवहार सुधारणे नव्हे. श्रमशक्ती ही मार्क्सची संकल्पना मार्क्समध्ये अविभाज्यपणे नांदणाऱ्या वैज्ञानिक व क्रांतीकारक प्रेरणांचे फळ ठरते.

आता अतिरिक्त मूल्याची निर्मिती कशी होते ते पाहू. भांडवलदारांनी श्रमप्रक्रियेचे घटक विकत घेतले आहेत. श्रमसामुग्री व श्रमशक्ती यांचे मिळून मूल्य म्हणजे भांडवलदाराचे भांडवल असते. अतिरिक्त मूल्य निर्मितीची प्रक्रिया स्पष्ट करण्यासाठी आपण सोपे उदाहरण म्हणजे टेबले तयार करण्याचा कारखाना चालविणाऱ्या भांडवलदाराचे उदाहरण घेऊ.

असे समजू की प्रत्येक टेबलासाठी लागणाऱ्या लाकूड, खिळे, सरस इत्यादी श्रमविषयाचे मूल्य ६ श्रमतास आहे. एका कामगाराला टेबल बनविण्यासाठी लागणाऱ्या श्रमसाधनांचे मूल्य ५००० श्रमतास आणि त्याला लागणाऱ्या अप्रत्यक्ष श्रमसाधनांचे मूल्य १०,००० श्रमतास धरू. आणि त्याच्या एका दिवसाच्या कामासाठी लागणाऱ्या श्रमशक्तीचे मूल्य ४ श्रमतास धरू. श्रमप्रक्रियेचे हे सर्व घटक एकत्र झाले आहेत. श्रमप्रक्रिया सुरू झाली आहे. तेंव्हा दिवसभराच्या प्रक्रियेत काय होते त्याचा तपशील पहावा लागेल.

कामगारांनी घातलेल्या मूर्त श्रमांमुळे श्रमविषयाला टेबलाचा आकार येतो. लाकूड, खिळे इत्यादीचे उपयोगमूल्य नाहीसे होते. त्याऐवजी आता उत्पादित वस्तूमध्ये नवे उपयोग मूल्य निर्माण होते. कामगारांच्या मूर्त स्वरूपातील श्रमामुळे श्रमविषयांचे उपयोग मूल्य नष्ट होवून त्याची जागा एक गुणात्मकदृष्ट्या वेगळे असणारे उपयोग मूल्य घेते. आपल्या उदाहरणात दर दोन तासांना एक याप्रमाणे एक कामगार दिवसभराच्या आठ तासामध्ये ४ टेबले तयार केली. तर त्या चार टेबलासाठी लागणारे श्रमविषयांचे मूल्य म्हणजे ४ x ६ = २४ श्रमतास हे टेबलाच्या एकूण मूल्याचा भाग बनते.

आता एक प्रश्न निर्माण होतो तो म्हणजे श्रमविषयांचे (कच्चामाल वगैरे) नव्या वस्तूत (टेबल) साठणारे मूल्य हे त्यांच्या पुर्वीच्या मूल्यापेक्षा जास्त असू शकते का? याचे उत्तर नाही असे आहे. कारण श्रमविषय जेंव्हा कारखान्याच्या गेटजवळ येतात तेंव्हाच त्याच्यात किती श्रम गेलेले आहेत ते निश्चित झालेले असते. आता या श्रमविषयांचे मूल्य कमी किंवा जास्त न होता जसेच्या तसे उत्पादित मालामध्ये - टेबलामध्ये साठते. त्यामुळे अतिरिक्त मूल्य श्रमविषयांमधून निर्माण होऊ शकत नाही.

**४.२.४.३ श्रमसाधनामधून अतिरिक्त मूल्य निर्माण होते का? :** जे श्रमविषयाबद्दल होते तेच श्रमसाधनांबद्दलही होते. श्रमसाधनांचे मूल्य मूर्त श्रमामुळे त्याच पद्धतीने उत्पादित मालामध्ये साठते. परंतु ते त्यांच्या संपूर्ण आयुष्यात निर्माण केलेल्या सर्व क्रयवस्तूमध्ये साठते. त्यामुळे एकाच क्रयवस्तूवर नजर ठेवली तर त्या वस्तूत श्रमसाधनांच्या मूल्याचा त्या प्रमाणातील तुकडा साठतो. आपल्या टेबले तयार करण्याच्या उदाहरणातील प्रत्यक्ष श्रमसाधनांचे आयुष्य ५००० टेबले बनविण्याइतके आणि अप्रत्यक्ष श्रमसाधनांचे आयुष्य १०,००० टेबले बनविण्याइतके धरले तर त्यांचे ५००० श्रमतास आणि १०,००० श्रमतास मूल्य हे अनुक्रमे ५००० टेबले व १०,००० टेबलांवर विखुरले जातील. त्यामुळे प्रत्येक टेबलांमध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष श्रमसाधनामधील मूल्यांपैकी एकेक श्रमतासाचे मूल्य जाईल. दुसऱ्या शब्दात सांगायचे झाल्यास प्रत्येक टेबलामागे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष श्रमसाधनांचे खर्ची पडणारे एकेक श्रमतास मूल्य जसेच्या तसे टेबलामध्ये जाईल. थोडक्यात प्रत्येक टेबलामध्ये २ श्रमतास इतके श्रमसाधनांचे मूल्य साठते.

श्रमसाधनांना आधी होते त्यापेक्षा जास्त मूल्य या प्रक्रियेतून उत्पादित वस्तूमध्ये जाऊ शकेल का? या प्रश्नाचे उत्तर श्रमविषया संबंधीच्या उत्तरासारखेच आहे. कारण श्रमसाधने कारखान्याच्या गेटच्या आत आली तेंव्हाच त्यांच्यात गेलेले श्रम निश्चित झालेले असतात. आणि ते जसेच्यातसे क्रयवस्तुमध्ये साठणारच.

फक्त किती क्रयवस्तूमार्फत साठणार यात बदल होवू शकतो. थोडक्यात यंत्रे कितीही उत्पादक असली तरी यंत्रातून अतिरिक्त मूल्य निर्माण होऊ शकत नाही.

**४.२.४.४ स्वत:च्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य देणारी श्रमशक्ती :** कोणत्याही क्रयवस्तूच्या वापरातून जो लाभ होतो तो उठवायचा असतो क्रयवस्तूच्या मालकांनी. भांडवलदार कामगारांची श्रमशक्ती खरेदी करतात. जसा विकत घेतलेल्या लाकडाचा वापर करण्याचा त्याला पूर्ण अधिकार असतो तसाच श्रमशक्ती वापरण्याचा असतो. त्यामुळे लाकडाच्या वापरातून जे तयार होते त्यावर त्याचा जसा अधिकार पोहचतो तसाच श्रमशक्तीच्या वापरातून जे अमूर्त श्रम मिळतात त्यांच्यावर भांडवलदाराचाच अधिकार असतो.

आपल्या उदाहरणामध्ये कामगार दिवसभरात म्हणजे ८ तासामध्ये श्रम विषयातून श्रमसाधनांच्या सहाय्याने ४ टेबले तयार करतो. हे श्रम त्यावेळी अमूर्त श्रम असल्यामुळे ८ श्रमतास एवढे मूल्य ४ टेबलामध्ये जाते किंवा प्रत्येक टेबलामध्ये २ श्रमतास मूल्य साठेल. म्हणजे आता श्रमशक्तीच्याबाबतीत काय दिसते? श्रमशक्तीचे मूल्य म्हणजे क्रयवस्तूंच्या नियमानुसार ठरणारे मूल्य जे आपण ४ श्रमतास धरले आहेत. याचा अर्थ श्रमशक्ती या क्रयवस्तूचे ४ श्रमतास एवढे रास्त किंवा वैध मूल्य देऊन ती खरेदी करणाऱ्या भांडवलदाराने तिच्यातून ८ श्रमतास मिळविले आहेत. म्हणजे ४ श्रमतास एवढे अतिरिक्त मूल्य काढले आहे.

भांडवलदाराच्यादृष्टीने एका कामगाराच्या दिवसभराचा ताळेबंद खालीलप्रमाणे असेल. दिवसाचे कामगाराने केलेले उत्पादन ४ टेबले इतके आहे.

| श्रमप्रक्रियेचा घटक | त्यासाठी खर्ची पडणारे मूल्य | त्या घटकामार्फत उत्पादनात साठणारे मूल्य |
|---|---|---|
| श्रमविषय | २४ श्रमतास | २४ श्रमतास |
| श्रमसाधने | ८ श्रमतास | ८ श्रमतास |
| श्रमशक्ती | ४ श्रमतास | ८ श्रमतास |
| एकूण | ३६ श्रमतास | ४० श्रमतास |
| अतिरिक्त मूल्य | ४ श्रमतास | |
| | ४० श्रमतास | |

अशारितीने भांडवलदाराने ३६ श्रमतास खर्ची पडलेल्या भांडवलातून, क्रयवस्तूंच्या नियमांचे व्यवस्थित पालन करून त्यापेक्षा जास्त म्हणजे ४० श्रमतासांचे मूल्य मिळविले आहे. या अतिरिक्त मूल्याची निर्मिती म्हणजेच कामगारांचे शोषण किंवा पिळवणूक होय.

**४.२.४.५ आवश्यक श्रम आणि अतिरिक्त श्रम :** मार्क्सने कामगार जे श्रम करतात त्याचे आवश्यक श्रम आणि अतिरिक्त श्रम या विभागात वर्गीकरण केले आहे. आवश्यक श्रम म्हणजे असे श्रम की ज्यातून कामगाराचे स्वत:चे वेतनाइतके मूल्य निर्माण होते. आपल्या वरील उदाहरणात श्रमशक्तीचे मूल्य ४ श्रमतास धरले आहे कामगार दिवसभराच्या ८ श्रमतासापैकी ४ तास स्वत:च्या श्रमशक्तीच्या मूल्याइतके मूल्य निर्माण करण्यात घालतात. त्यामुळे ४ श्रमतास हे आवश्यक श्रम होत. त्यापुढील सर्व श्रम हे अतिरिक्त श्रम होत. आपल्या उदाहरणात आवश्यक श्रमापुढील ४ श्रमतास हे अतिरिक्त श्रम होत. हे अतिरिक्त श्रम कामगार स्वत:साठी नव्हे तर भांडवलदारासाठी करीत असतात. श्रमशक्तीचे मूल्य निश्चित झाल्यानंतर अतिरिक्त श्रम किती असणार हे कामाच्या तासावर आधारित राहणार. उदा. कामाचे तास ८ ऐवजी १० असतील तर वरील उदाहरणात अतिरिक्त श्रम ४ ऐवजी ६ श्रमतास राहतील.

**४.२.४.६ निरपेक्ष आणि सापेक्ष अतिरिक्त मूल्य** (Absolute and Relative Surplus Value) **:** मार्क्सने अतिरिक्त मूल्याचे निरपेक्ष अतिरिक्त मूल्य व सापेक्ष अतिरिक्त मूल्य असे दोन प्रकार सांगितले आहेत. कामगारांचे कामाचे तास वाढवून मिळणाऱ्या अतिरिक्त मूल्याला निरपेक्ष अतिरिक्त मूल्य असे नाव मार्क्स देतो व अशा पद्धतीला तो म्हणतो निव्वळ अतिरिक्त मूल्याची पद्धती. निरपेक्ष अतिरिक्त मूल्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्यामुळे श्रमप्रक्रियेच्या घटकांमध्ये, त्याच्या जुळणीमध्ये, त्यांच्या सामाजिकतेमध्ये काहीही बदल होत नाही. ना उत्पादकता वाढते, ना श्रमप्रक्रियेतील विज्ञानाचा वापर वाढतो. फक्त श्रमप्रक्रियेचा काळ वाढतो. श्रमप्रक्रिया व तंत्र जसेच्या तसे राबवले जाते. कामगारांचे काम वाढते पण श्रमप्रक्रियेचा विकास होत नाही.

निरपेक्ष अतिरिक्त मूल्य हा भांडवलशाहीचा अतिरिक्त मूल्य मिळविण्याचा ऐतिहासिक आधार असतो. भांडवलदाराला मूळात अतिरिक्त मूल्य मिळते ते आवश्यक श्रमाच्या पलीकडे कामाचे तास वाढविण्याच्या अधिकारातून. त्यामुळे निरपेक्ष अतिरिक्त मूल्य हा भांडवलशाहीचा अतिरिक्त मूल्य मिळविण्याचा 'शॉर्टकट' असतो. यामधून भरडून निघणारा कामगारवर्ग जितक्या प्रमाणात हा शॉर्टकट अडवून उभा राहतो. तितक्याच प्रमाणात भांडवलशाहीला अतिरिक्त मूल्य मिळविण्याचे व वाढविण्याचे इतर मार्ग शोधावे लागतात.

**सापेक्ष अतिरिक्त मूल्य** (Relative Surplus Value) **:** भांडवलदाराला कामगारांच्या कामाच्या तासात वाढ करता येणे शक्य नसेल म्हणजेच कामगारांच्या कामाच्या तांसाची मर्यादा आधिच घातली गेली असेल तर अतिरिक्त मूल्य वाढविण्याचा कोणता मार्ग भांडवलदाराकडे राहतो? यापरिस्थितीत भांडवलदाराकडे एकच मार्ग असतो तो म्हणजे आपल्या समाजात उपभोग्य क्रयवस्तूंच्या रूपात मान्यताप्राप्त झालेला राहणीमानाचा निकष न मोडता श्रमशक्तीचे मूल्य कमी करणे. कामगारांच्या राहणीमानात ज्या वस्तूंचा समावेश असतो त्यांचे मूल्य कमी झाले. म्हणजेच या क्रयवस्तूंच्या निर्मितीमध्ये जाणारा एकंदर सामाजिक श्रमकाळ कमी झाला तर हा निकष न मोडता देखील श्रमशक्तीचे मूल्य कमी होऊ शकते. इतकेच नव्हे तर हे

राहणीमान वाढत असूनसुद्धा श्रमशक्तीचे मूल्य कमी होऊ शकते. एका उदाहरणाने याचे अधिक स्पष्टीकरण देता येईल.

समजा राहणीमानाच्या निकषावरून ८ तासांच्या श्रमशक्तीचे मूल्य २ किलो तांदूळ असे ठरले आणि आणि तांदळाचे मूल्य २ श्रमतास प्रति किलो असे आहे. तर ८ तासांच्या श्रमशक्तीचे मूल्य ४ श्रमतास होईल. आता जर तांदळाचे मूल्य २ श्रमतासावरून १ श्रमतास झाल्यास८ तासांच्या श्रमशक्तीचे मूल्य ४ श्रमतासावरून २ श्रमतास होईल. पुढे असेही समजू की वेतन आयोगामुळे असे ठरले की ८ तासांच्या श्रमशक्तीचे मूल्य २ किलो ऐवजी ३ किलो तांदूळ करण्यात आले. यामुळे राहणीमान वाढले. परंतु पूर्वी श्रमशक्तीचे मूल्य ४ श्रमतास होते ते आता ३ श्रमतास  होते. श्रमशक्तीचे मूल्य अशा रीतीने कमी करून जे वाढीव अतिरिक्त मूल्य मिळते त्याला मार्क्स सापेक्ष अतिरिक्त मूल्य असे म्हणतो.

तसेच कामगारांची उत्पादकता वाढवून श्रमशक्तीचे मूल्य एवढे उत्पादन मूल्य निर्माण करण्यासाठी लागणारा श्रमकाळ कमी करूनजादा अतिरिक्त मूल्य मिळविता येते. याचा अर्थ कामगारांचे आवश्यक श्रम कमी करून त्यांचे अतिरिक्त श्रम वाढविण्यातून वाढीव अतिरिक्त मूल्य मिळविता येते, असे जादाचे अतिरिक्त मूल्य म्हणजे सापेक्ष अतिरिक्त मूल्य होय. त्यासाठी भांडवलदार, उत्पादन यंत्र, यंत्रसामग्री यामध्ये प्रगती घडवून आणतात. एखादा भांडवलदार जेंव्हा असे बदल घडवून आणतो तेंव्हा तो इतर भांडवलदारांच्या तुलनेत अतिरिक्त मूल्याचा जादा हिस्सा मिळवत असतो. परंतु प्रतिस्पर्धी भांडवलदार काही गप्प बसत नाहीत. त्यांच्या कारखान्यातही असे नवे उत्पादन तंत्र, यंत्रे आणतात. हे तंत्र सार्वत्रिक झाले की जादा वरकड मूल्याचा आधार नाहिसा होतो. परंतु तरीही ज्या क्रयवस्तूंचे मूल्य कमी झालेले असते त्या क्रयवस्तू जर श्रमशक्तीचे मूल्य ठरविणाऱ्या राहणीमानाच्या निकषात मोडत असतील तर त्या प्रमाणात एकंदर श्रमशक्तीचे मूल्य कमी होऊन कामगारांच्या श्रमाचा भांडवलदारांच्या हातात येणारा हिस्सा वाढतो. म्हणजेच अतिरिक्त मूल्य वाढते. असे वर्गीय पातळीवर वाढवून मिळणारे अतिरिक्त मूल्य म्हणजे सापेक्षा अतिरिक्त मूल्य होय.

श्रमाच्या उत्पादकतेतील वाढीशी संबंधित सापेक्ष वरकड मूल्याची प्रवृत्ती हे भांडवलशाहीचे एक खास वैशिष्ट्य आहे. त्यामुळे श्रमप्रक्रियेचा चेहरामोहरा बदलतो. उत्पादनाच्या क्षमता प्रचंड प्रमाणात तयार होतात. जितक्या प्रमाणात सापेक्ष वरकड मूल्याला आधारभूत ठरतील अशा उत्पादनक्षमता वाढत जातात तितक्या प्रमाणात कामगारांचे शोषण वाढते. परंतु त्याचवेळी माणसांच्या सुखसोयींचा पाया बनू शकणाऱ्या क्षमता फोफावलेल्या असतात. मार्क्सच्यामते या प्रचंड उत्पादनक्षमता कम्युनिस्ट समाजाचा पाया ठरू शकतात. आपल्या उपजिविकेची सामग्री शक्य तेवढ्या थोडक्या श्रमात मिळवून सर्वांच्या कुवतीचा जास्तीत जास्त भाग हा स्वत:च्या मानवी क्षमतांचा विकास व अविष्कार करण्यामध्ये लावण्याचे स्वप्न पाहणे या क्षमतामुळे शक्य होते.

**४.२.४.७ पैशाचा वापर आणि अतिरिक्त मूल्य :** मार्क्सच्या मते, भांडवलशाही अर्थव्यवस्थेत पैसा अतिरिक्त मूल्य निर्माण करण्यास मदत करतो. विनिमय व्यवहारातील पैशाचा वापर कसा बदल घडवून आणतो ते पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

१. **वस्तू-वस्तू** (Commodity-Commodity - C-C) **:** वस्तू वस्तूमधील देवघेव म्हणजेच वस्तूविनिमय होय. वस्तू विनिमय पद्धतीत आपल्याजवळील वस्तू देऊन त्याच्या मोबदल्यात आपल्याला हवी असणारी दुसरी वस्तू मिळवायची असते. त्यामागे आपल्या विविध गरजा भागविणे हा उद्देश असतो. म्हणजे या प्राथमिक स्वरूपाच्या विनिमय व्यवहाराचे स्वरूप खालीलप्रमाणे असते.

क्रयवस्तू १ ⟷ क्रयवस्तू २ (Commodity ⟷ Commodity)

२. **वस्तू-पैसा-वस्तू** (Commodity-Money-Commodity : C-M-C) **:** वस्तुविनिमयातील अडचणी दूर करण्यासाठी पैसा अस्तित्वात येतो. आता वस्तूविनिमय व्यवहारात पैसा मध्यस्थी करतो. या विनिमय व्यवहारामध्ये वस्तू देऊन त्या वस्तूच्या मोबदल्यात पैसा मिळवायचा आणि त्या पैशाच्या साहाय्याने दुसऱ्या प्रकारच्या वस्तू मिळवायच्या असा उद्देश असतो. मार्क्सने त्याचे सूत्ररूपाने वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

C-M-C = Commodity-Money-Commodity

या व्यवहारात पैशाचा उपयोग विनिमयाचे माध्यम हाच असतो.

३. **पैसा-वस्तू-पैसा** (Money-Commodity-Money = M-C-M) **:** भांडवलशाही अर्थव्यवस्थेत उत्पादन करण्याचा मूळ हेतू नफा प्राप्त करणे हा असतो. मार्क्सच्या मते, या अवस्थेत पैशाचा वापर श्रमिकांचे शोषण करण्यासाठी केला जातो. भांडवलदार प्रथमत: स्वत:जवळील पैसा भांडवल म्हणून खर्च करतात. या खर्चाच्या साहाय्याने ते वस्तू (श्रमसामुग्री व श्रमशक्ती) खरेदी करतात आणि उत्पादित वस्तू विकून मूल्य मिळवितात. अशा विनिमय व्यवहाराचा मार्क्सने खालीलप्रमाणे उल्लेख केला.

Money-Commodity-Mondy (M-C-M)

या समीकरणातील दुसरा M हा पहिल्या M पेक्षा जास्त असला पाहिजे. मार्क्सच्यापुढे असा प्रश्न निर्माण झाला की भांडवल म्हणून वापरलेल्या पैशामध्ये (M) संख्येच्यादृष्टीने वाढ का होते आणि विनिमय व्यवहारात ती नेमकी कुठे होते?

वास्तविक पाहता या विनिमय व्यवहाराचे स्वरूप पैसा-क्रयवस्तू-क्रयवस्तू-पैसा असे असते. यापैकी कोणत्या भागात अतिरिक्त मूल्य निर्माण होते? क्रयवस्तू-पैसा (C-M) या भागात त्याची निर्मिती होत नाही. कारण तिथे क्रयवस्तूच्या मूल्याचे पैशात रूपांतर होते. याचा अर्थ अतिरिक्त मूल्याची निर्मिती पैसा-क्रयवस्तू (M-C) यामध्ये होते. भांडवलदार पैसा देऊन अशी एक वस्तू खरेदी करीत असतो की जिच्यापासून अतिरिक्त मूल्य प्राप्त होते. ती वस्तू म्हणजेच श्रमशक्ती होय. श्रमशक्ती खरेदी करण्यासाठी भांडवलदार जेवढे पैसे (श्रमतास) खर्च करतो त्यापेक्षा कितीतरी जास्त मूल्य श्रमशक्तीच्या वापरातून म्हणजेच श्रमातून निर्माण होते.

**४.२.४.८ स्थिर भांडवल आणि बदलते भांडवल :** मार्क्सने भांडवलाचे स्थिर भांडवल व बदलते भांडवल असे दोन गटात वर्गीकरण केले. खर्ची पडलेल्या श्रमसामुग्रीच्या मूल्याला मार्क्स 'स्थिर भांडवल' (Constant Capital) असे म्हणतो. उदा. यंत्रे, अवजारे, इंधन, कच्चामाल इत्यादीसाठी केलेला खर्च म्हणजे स्थिर भांडवल होय. स्थिर भांडवल हे दोन अर्थांनी स्थिर असते. एकतर या भांडवलातले जुने मूल्यच कायम राखले जात असते. दुसरे म्हणजे श्रमसामुग्रीचे मूल्य निश्चित होताच कायम भांडवलही निश्चित होते. कारण ते जेवढ्यास तेवढेच सरळ उत्पादित क्रयवस्तूमध्ये साठत असते. म्हणजेच संख्यात्मकदृष्टीने ते कायम राखले जात असतो. त्यापासून अतिरिक्त मूल्य निर्माण होत नाही. याउलट, श्रमशक्तीच्या मूल्यासाठी खर्ची पडलेल्या मूल्याला मार्क्सने बदलते भांडवल (Variable Capital) असे म्हटले आहे. उदा. श्रमशक्ती खरेदी करण्यासाठी भांडवलदारने केलेला खर्च म्हणजे बदलते भांडवल होय. तेही दोन अर्थांनी बदलते असते. एक म्हणजे जुने मूल्य जाऊन त्याची जागा त्या जुन्या मूल्यापेक्षा जास्त नवे मूल्य घेत असते. भांडवलदाराच्या हातातील भांडवलाचे जूने मूल्य व श्रमप्रक्रियेतून हाती येणारे नवे मूल्य यामधील बदलाला फक्त श्रमशक्तीत गुंतलेले त्याचे भांडवलच जबाबदार असते. दुसरे म्हणजे श्रमशक्ती या घटकाचे मूल्य निश्चित घेऊनसुद्धा त्यातून मिळणारे हे जादा मूल्य बदलते असू शकते.

**४.२.४.९ अतिरिक्त मूल्याचा दर** (Rate of surplus value) **शोषणाचा दर** (Rate of Exploitation) **:** मार्क्सच्या मते श्रमशक्तीच्या वापरातून अतिरिक्त मूल्य निर्माण होते. त्यामुळे अतिरिक्त मूल्याचा दर काढण्याचे सूत्र खालीलप्रमाणे आहे.

$$\text{अतिरिक्त मूल्य दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{बदलते भांडवल किंवा श्रमशक्तीचे मूल्य}} \times १००$$

$$\text{Rate of surplus value} = \frac{\text{Surplus Value}}{\text{Variable Capital}} \times 100$$

आपल्या उदाहरणात अतिरिक्त मूल्य ४ श्रमतास व श्रमशक्तीचे मूल्य म्हणजेच बदलते भांडवल ४ श्रमतास आहे. यावरून

$$\text{अतिरिक्त मूल्यचा दर} = \frac{\text{४ श्रमतास}}{\text{४ श्रमतास}} \times १०० = १००\%$$ इतका येतो.

याचा अर्थ भांडवलदार कामगाराचे १००% शोषण करतो. थोडक्यात, अतिरिक्त मूल्याचे बदलत्या भांडवलाशी असलेले शेकडा प्रमाण म्हणजे अतिरिक्त मूल्याचा दर होय.

### ४.३.५ नफ्याचा दर घसरण्याची प्रवृत्ती (The tendency of falling rate of profit) :

भाडवलशाही अर्थव्यवस्थेमध्ये नफ्याचा सर्वसाधारण दर कमी होण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती असते हा मार्क्सने आपल्या भांडवलशाहीच्या विश्लेषणातून काढलेला सर्वांत महत्त्वाचा निष्कर्ष आहे. आता आपण मार्क्सच्या या निष्कर्षाचा अभ्यास करणार आहोत.

मार्क्सने अतिरिक्त मूल्याचा दर आणि नफ्याचा दर यामध्ये फरक असल्याचे सांगितले. अतिरिक्त मूल्याचे बदलत्या भांडवलाशी असणारे प्रमाण म्हणजे अतिरिक्त मूल्याचा दर होय. याउलट, नफ्याचा दर म्हणजे अतिरिक्त मूल्याचे एकूण भांडवलाशी असणारे प्रमाण होय. एकूण भांडवलामध्ये स्थिर भांडवल आणि बदलते भांडवल यांचा समावेश होतो. यावरून नफ्याच्या दराचे सूत्र पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहे.

$$\text{नफ्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{स्थिर भांडवल + बदलते भांडवल}} \times १००$$

एका काल्पनिक उदाहरणाच्या साहाय्याने याचे अधिक स्पष्टीकरण देता येईल. समजा, भांडवलदारांचे उत्पादन प्रक्रियेत एकूण ४०० रुपये इतके भांडवल वापरले. त्यामधील ३०० रु. स्थिर भांडवल आणि १०० रु. बदलते. भांडवल आहे. या उत्पादन प्रक्रियेतून त्याला १०० रु. अतिरिक्त मूल्य / नफा मिळतो.आता नफ्याचा दर सूत्रानुसार पुढीलप्रमाणे काढता येईल.

$$\text{नफ्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य (S)}}{\text{स्थिर भांडवल (C) + बदलते भांडवल (V)}} \times १००$$

**सर्वसाधारण नफ्याचा दर घटण्याची शक्यता :** भांडवलशाहीचा विकास होत असताना सर्वसाधारण नफ्याच्या दरात घट होण्याची प्रवृत्ती आढळून येते. सर्वसाधारण 'नफ्याचा दर' याचा मार्क्सला अभिप्रेत असणारा अर्थ म्हणजे सामाजिक पातळीवरील एकूण नफा व गुंतलेले एकून भांडवल यामधील संबंध होय. हा दर घसरण्याचा संबंध हा भांडवलाचे आंगिक प्रमाण किंवा भांडवलाची घटनात्मक रचना याचेशी असतो. भांडवलाची घटनात्मक रचना म्हणजे एकूण भांडवलातील स्थिर भांडवलाचे बदलत्या भांडवलाशी असणारे प्रमाण होय. भांडवलाची घटनात्मक रचना सूत्ररूपाने पुढीलप्रमाणे दाखविता येते.

$$\text{भांडवलाची घटनात्मक रचना} = \frac{\text{स्थिर भांडवल}}{\text{बदलते भांडवल}}$$

एकूण भांडवलातील स्थिर भांडवलाची वाढ बदलत्या भांडवलातील वाढीपेक्षा जास्त मोठ्या प्रमाणात झाली की भांडवलाची घटनात्मक रचना बदलते. एका काल्पनिक उदाहरणाने याचे अधिक स्पष्टीकरण देता येईल. समजा एकूण भांडवल ३०० को. रुपये आहे. त्यापैकी २०० कोटी रु. स्थिर भांडवल आणि १०० कोटी रु. बदलते भांडवल आहे आणि अतिरिक्त मूल्य १०० को. रु. आहे असे मानू. आता भांडवलाची घटनात्मक रचना पुढीलप्रमाणे येईल.

$$\text{भांडवलाची घटनात्मक रचना} = \frac{\text{स्थिर भांडवल}}{\text{बदलते भांडवल}} = \frac{२००}{१००} = २:१$$

या परिस्थितीत नफ्याचा दर पुढीलप्रमाणे येईल.

$$\text{नफ्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{स्थिर भांडवल + बदलते भांडवल}} \times १००$$

$$= \frac{१००}{२०० + १००} \times १००$$

$$= \frac{१००}{३००} \times १००$$

$$= \frac{१}{३} \times १०० = ३३.३३\%$$

भांडवलशाहीमध्ये उत्पादन हे नफ्याच्या प्रेरणेने केले जाते. भांडवलदारांचे उद्दिष्ट जास्तीत जास्त नफा मिळविणे हे असते. त्यासाठी ते अतिरिक्त मूल्यातून भांडवलसंचय करतात आणि भांडवल गुंतवणूक वाढवितात. नफ्याचा हेतू आणि भांडवलदारामधील स्पर्धा यामुळे भांडवलशाहीचा विकास होताना नवनवीन शोध आणि यंत्राची निर्मिती केली जाते. मोठ्या प्रमाणावर उत्पादन केले जाते. त्यामुळे अर्थव्यवस्थेतील एकूण भांडवल वाढत जाते. परंतु एकूण भांडवलातील स्थिर भांडवलाचे प्रमाण वाढत जाते. कारण वाढत्या यांत्रिकीकरणाबरोबर श्रमशक्तीचा वापर वेगाने वाढत नाही. म्हणजेच बदलत्या भांडवलात वेगाने वाढ होत नाही. परिणामी, भांडवलाची घटनात्मक रचना बदलत जाते आणि नफ्याच्या दरात घट होते. कारण अतिरिक्त मूल्य निर्माण करणाऱ्या बदलत्या भांडवलात मोठी वाढ होत नसल्यामुळे अतिरिक्त मूल्यात मोठी वाढ होत नाही. भांडवलाचे आंगिक प्रमाण वाढणे ही भांडवली स्वरूपातील श्रमप्रक्रियेच्या विकासाची सर्वसाधारण प्रवृत्ती ठरते.

आपल्या वरील उदाहरणात एकूण भांडवल ३०० को. रू. आहे. ते आता ८०० को. रु. झाले. त्यामध्ये स्थिर भांडवल ६०० कोटी व बदलते भांडवल २०० को. रु. आणि अतिरिक्त मूल्य २०० कोटी रुपये झाले असे मानू. तर आता भांडवलाची घटनात्मक रचना आणि नफ्याचा दर पुढीलप्रमाणे येईल.

$$\text{भांडवलाची घटनात्मक रचना} = \frac{\text{स्थिर भांडवल}}{\text{बदलते भांडवल}} = \frac{६००}{२००} = ३:१$$

याचा अर्थ भांडवलाची घटनात्मक रचना २:१ ऐवजी ३:१ अशी झाली आहे.

$$\text{नफ्याचा दर} = \frac{\text{अतिरिक्त मूल्य}}{\text{स्थिर भांडवल + बदलते भांडवल}} \times १००$$

$$= \frac{२००}{६०० + २००} \times १००$$

$$= \frac{२००}{८००} \times १००$$

$$= \frac{१}{४} \times १०० \qquad = २५\%$$

अशारितीने सर्वसाधारण नफ्याचा दर ३३.३३ टक्क्यावरून २५टक्यापर्यंत खाली येतो. हा निष्कर्ष सामाजिक पातळीवरील नफ्याच्या दराला लागू होतो. भांडवलशाहीच्या मक्तेदारी अवस्थेनंतर निरनिराळ्या विभागासाठी निरनिराळा सर्वसाधारण दर तयार होतो. एकंदर सर्वसाधारण दर आणि इतर विभागांचा दर घसरत असूनही प्रभुत्वस्थानी असणाऱ्या विभागांचा नफ्याचा दर वाढता असू शकतो. परंतु सर्वसाधारण नफ्याचा दर घसरतो आणि त्यातून भांडवलशाहीमध्ये आर्थिक अरिष्ट निर्माण होते.

या अरिष्टाची चाहूल लागताच भांडवलशाहीमध्ये निरनिराळे उपाय करण्याचे प्रयत्न सुरु होतात. सर्वप्रथम कामगारवर्गावर हल्ला सुरु हातो. कामाचे तास वाढविले जातात, सक्तीचा ओव्हरटाईम सुरू होतो, वेतन कपात होते, सुट्ट्या, रजा यामध्ये कपात केली जाते. थोडक्यात कामगार वर्गाकडून निव्वळ अतिरिक्त मूल्य काढले जावू लागते. बोनस, भत्ते इत्यादीमध्ये कपात करणे किंवा बंद करण्याचा प्रयत्न केला जातो. त्यामुळे कामगार वर्गाच्या हालअपेष्टा वाढत जातात.

त्याचवेळी नफ्याचा दर घसरल्यामुळे भांडवलसंचय, भांडवल गुंतवणूक आणि पर्यायाने श्रमसामुग्रीच्या मागणीला फटका बसतो. अशा परिस्थितीत अनेक उद्योगांचे दिवाळे निघते. श्रमसामुग्रीखेरीज इतर क्रय वस्तूंची निर्मिती करणाऱ्या उद्योगावरही असाच परिणाम होतो. बेरोजगारी वाढत जाते आणि आर्थिक अरिष्ट तीव्र होत जाते. अरिष्टांच्या काळात कामगार वर्गावर होणारा हल्ला तीव्र होतो. भांडवलशाहीचे खरे भीषण स्वरूप उघडे पडते. भांडवलशाहीचा मर्मभेद करण्याची साधने दृश्य व उघड स्वरूपात कामगार वर्गाच्या हाताशी असतात. क्रांतीकारक लढ्याला व शिक्षणाला अनुकूल भूमी या अरिष्टाने तयार होत असते.

या अनुकूल भूमीवर लढून देखील त्या कालखंडापूरता कामगार वर्गाचा निर्णायक पराभव झाला तर मात्र अरिष्ट स्वत:च विरोधी प्रवृत्तीना एकत्र आणते व त्यातून भांडवलशाही पुनर्घटित होऊन अरिष्टातून बाहेर पडते. अरिष्टातून बाहेर पडताना भांडवलशाहीमध्ये अनेकदा मोठेमोठे तांत्रिक बदल, तंत्रवैज्ञानिक क्रांती झालेली असते. भांडवलदार वर्गाच्या अंतर्गत विभागांचे आपापसातील संतुलन बदलते. भांडवलाचे केंद्रीकरण व घनीकरण झालेले असते. मक्तेदारीने नवी क्षेत्रे व्यापलेली असतात.

ही पुनर्घटित भांडवलशाही नव्या उंचावलेल्या नफ्याच्या दराच्या पातळीपासून पुन्हा प्रवास सुरू करते. अरिष्टाचा दबाव संपला की विरोधी प्रवृतीला एकत्र बांधून ठेवणारे माध्यमही सुटते. परिणामी विरोधी प्रवृत्ती पुन्हा अपघाती व विनासूम पद्धतीने काम करू लागतात आणि भांडवलशाही अर्थव्यवस्था पुन्हा पुढच्या अपरिहार्य अरिष्टाकडे वाटचाल करू लागते.

भांडवलशाही अर्थव्यवस्था अशा अरिष्टातूनच लयाला जाईल, असे मार्क्सने म्हटले आहे. परंतु आर्थिक अरिष्टामुळे भांडवलशाही आपोआप कोसळून पडेल असे माकर्स म्हणत नाही. तर भांडवलशाहीतील आर्थिक अरिष्टामुळे कामगारावर्गाच्या क्रांतीकारक लढ्याला अनुकूल भूमी वारंवार तयार होणे अपरिहार्य ठरते. कामगार वर्गाच्या क्रियाशील व जाणीवपूर्वक आघाताशिवाय भांडवलशाही कोसळू शकत नाही. कामगारवर्गाचा असा आघात हा भांडवलशाहीविरोधी क्रांतीचे केवळ निमित्त नसते तर त्या क्रांतीची एक निर्णायक अट असते.

## ४.४ सारांश

१) मार्क्सने समाजाचे परिवर्तन कसे होते याचे शास्त्रीय विवेचन केले. त्यासाठी भौतिकवादी विचार आणि विरोधकविकासाचे तत्व यांच्या सहाय्याने विरोध विकासाधिष्ठित भौतिकवाद ही संकल्पना मांडली.

२) मानवसमाज परिवर्तनशील आहे, कोणतीही सामाजिक व्यवस्था स्थिर किंवा शाश्वत नाही, ती बदलणे अपरिहार्य आहे. मानवी समाजाचा आजपर्यंतचा इतिहास हा वर्गसंघर्षाचा इतिहास आहे. मानवी समाजाचे आजपर्यंत आदिम साम्यवाद, गुलामगिरीची अवस्था, सरंजामशाहीची अवस्था, भांडवलशाहीची अवस्था असे स्थित्यंतर झाल्याचे सांगून भांडवलशाहीच्या पुढील विकासाची अवस्था समाजवादी व्यवस्था राहील असे मार्क्सने प्रतिपादन केले.

३) वस्तूचे विनिमय मूल्य कसे ठरते याविषयी मार्क्सच्या पुर्वीच्या अर्थशास्त्रज्ञांनी दिलेली स्पष्टीकरणे मार्क्सने नाकारली. त्याने आपला परिपूर्ण स्वरूपातील श्रममूल्य सिद्धांत मांडला आणि वस्तूच्या विनिमय मूल्याच्यामागे दडलेल्या सामाजिक संबंधाचे विश्लेषण केले.

४) मार्क्स यांनी आपल्या मूल्य सिद्धांतात वस्तूचे विनिमय मल्य हे वस्तूच्या निर्मितीसाठी लागलेल्या सामाजिक दृष्ट्या आवश्यक श्रमकाळावरून ठरते हे स्पष्ट केले. मार्क्सने आपल्या मूल्यसिंद्धांतात बाजारपेठेत घडणाऱ्या घडामोडींच्या वर्णनापलीकडे जाऊन उत्पादन संबंध स्पष्ट केले.

५) भांडवलशाही अर्थव्यवस्थेत कामगारांचे शोषण कसे होते याचे स्पष्टीकरण मार्क्सने आपल्या अतिरिक्त मूल्य सिद्धांतातून दिले. भांडवलशाहीमध्ये भांडवलदार कामगारांच्या श्रमातून जेवढे मूल्य निर्माण होते त्याचा अत्पसा भाग त्यांना वेतन म्हणून देतो आणि राहिलेला भाग नफा म्हणून स्वत: ठेवून घेतो. याचा अर्थ कामगाराने प्रत्यक्षात निर्माण केलेले मूल्य आणि त्याला मिळणारे वेतन यामधील फरक म्हणजेच अतिरिक्त मल्य होय.

६) कोणत्याही शोषणावर आधारित व्यवस्थेतील शोषण हे त्या व्यवस्थेच्या नियमांना धरुनच असते. कामगाराला त्याच्या श्रमशक्तीचे मूल्य दिले की त्याचे श्रम भांडवलदाराला प्राप्त होतात ते क्रयवस्तूच्या नियमानुसारच आणि त्या श्रमातूनच अतिरिक्त मूल्य मिळते. मार्क्सच्या मते कामगारांच्या शोषणाला खुद्द क्रयवस्तूंचे नियमच जबाबदार असतात. कारण कामगारांच्या श्रमातून विनाश्रम मोबदला उचलण्याचा आधिकार भांडवलदारांना तेच नियम बहाल करीत असतात. म्हणून कामगारांचे शोषण नाहीसे करण्याचा मार्ग म्हणजे क्रयवस्तूंच्या व्यवहाराचे उच्चाटन करणे हा असतो. तो व्यवहार सुधारणे नव्हे.

७) मार्क्सने कामगारांच्या श्रमाचे आवश्यक श्रम व अतिरिक्त श्रम असे दोन भाग केले आहेत. कामगार स्वत:च्या वेतनाइतके मूल्य निर्माण करण्यासाठी जितके श्रमतास घालतात ते म्हणजे आवश्यक श्रम होत. त्यापुढील सर्व श्रम म्हणजे अतिरिक्त श्रम होत. अतिरिक्त श्रमातूनच अतिरिक्त मूल्याची निर्मिती होते. अतिरिक्त मूल्य वाढविण्यासाठी भांडवलदाराकडे कामगारांच्या कामाच्या तासात वाढ करणे किंवा श्रमिकांची उत्पादकता वाढविणे हे मार्ग असतात.

८) माकर्सने अतिरिक्त मूल्याचा दर किंवा कामगारांच्या शोषणाचा दर काढण्याचे सूत्र दिले आहे. अतिरिक्त मूल्यांचे बदलत्या भांडवलाशी असलेले शेकडा प्रमाण म्हणजे शोषणाचा किंवा अतिरिक्त मूल्याचा दर होय.

९) भांडवलशाही अर्थव्यस्थेतील नफ्याचा सर्वसाधारण दर कमी होण्याची सर्वसाधारण प्रवृत्ती असते असा मार्क्सने निष्कर्ष काढला आहे. 'सर्वसाधारण नफ्याचा दर' याचा मार्क्सला अभिप्रेत असणारा अर्थ म्हणजे सामाजिक पातळीवरील एकूण नफा आणि एकूण भांडवल यामधील संबंध होत. हा दर घसरण्याचे कारण म्हणजे भांडवलांच्या आंगिक प्रमाणात किंवा भांडचलाच्या घटनात्मक रचनेतील बदल हे असते.

१०) भांडवलाचे आंगिक प्रमाण म्हणजे एकूण भांडवलातील स्थिर भांडवलाचे बदलत्या भांडवलाशी असणारे प्रमाण होय. भांडवलशाहीच्या विकासाबरोबर भांडवलाचे आंगिक प्रमाण वाढत जाते. त्यामुळे नफ्याच्या दरात घट होते आणि आर्थिक अरिष्ट निर्माण होते. नफ्याचा दर घसरल्यामुळे भांडवलसंचय, भांडवल गुंतवणूक कमी होते, उद्योगाचे दिवाळे निघते, बेरोजगारी वाढत जाते.

११) आर्थिक अरिष्टाच्या काळात कामगार वर्गावर होणारा हल्ला तीव्र होतो. कामगार - श्रमिक वर्गाच्या हालअपेष्टा वाढतात. कामगारांच्या क्रांतीकारक लढ्याला व शिक्षणाला अनुकूल भूमी या अरिष्टामुळे तयार होते. या अनुकूल भूमीवर लढूनदेखील त्या कालखंडापूरता कामगार वर्गाचा निर्णायक पराभव झाला तर मात्र अरिष्ट स्वत:च विरोधी प्रवृत्तींना एकत्र आणून, भांडवलशाही पुर्नघटित होऊन अरिष्टातून बाहेर पडते.

१२) या पुनर्घटित भांडवलशाहीमध्ये मोठमोठे तांत्रिक बदल, वैज्ञानिक क्रांती झालेली असते, भांडवलाचे केंद्रीकरण व घनीकरण झालेल असते. मक्तेदारी नवी क्षेत्रे व्यापलेली असतात. पुनर्घटित भांडवलशाही नव्या उंचावलेल्या नफ्याच्या दराच्या पातळीवरून पुन्हा प्रवास सुरु करते तो पुढच्या अपरिहार्य अरिष्टाकडे.

१३) भांडवलशाही अर्थव्यवस्था अशा अरिष्टातूनच लयाला जाईल आणि तिची जागा समाजवादी अर्थव्यवस्था घेईल असे मार्क्सने प्रतिपादन केले आहे. परंतु भांडवलशाही अरिष्टामुळे आपोआप कोसळून पडेल असे मार्क्स म्हणत नाही. कामगार वर्गाच्या क्रियाशील व जाणीवपूर्वक आघाताशिवाय भांडवलशाही कोसळू शकत नाही. कामगारवर्गाचा असा आघात ही भांडवलशाहीविरोधी समाजवादी क्रांतीची एक निर्णायक अट असते.

## ४.६ स्वयं अध्ययन प्रश्न

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.**

१) मार्क्सने शालांत परिक्षेसाठी .......... हा निबंध लिहिला होता.

२) मार्क्सने डॉक्टरेट पदवीसाठी .......... या विषयावरील प्रबंध सादर केला होता.

३) प्रुधाँ यांच्या 'दारिद्र्याचे तत्त्वज्ञान' या सुप्रसिद्ध ग्रंथात प्रत्युत्तर म्हणून मार्क्सने .......... हा ग्रंथ प्रसिद्ध केला.

४) .......... हा भांडवलशाहीचा अतिरिक्त मूल्य मिळविण्याचा शॉर्टकट असतो.

५) श्रमशक्तीच्या मूल्यासाठी खर्ची पडणाऱ्या मूल्याला मार्क्सने .......... भांडवल असे म्हटले.

६) नफ्याचा दर म्हणजे अतिरिक्त मूल्याचे .......... शी असणारे प्रमाण होय.

**ब) खालील विधाने बरोबर की चूक आहेत ते लिहा.**

१) मूर्त श्रम वस्तूमध्ये उपयोगिता मूल्य निर्माण करीत असतात.

२) मानवी मन हे भौतिक विकासक्रमाचे अत्युच्च फळ आहे.

३) हेगेलचे तत्त्वज्ञान डोक्यावर उभे होते ते मार्क्सने पायावर उभे केले.

४) गुलामगिरीची व्यवस्था ही शोषणावर आधारलेली नव्हती.

५) मार्क्सच्या मते वस्तूचे विनिमयमूल्य हे उपयोगितेवरून ठरते.

६) उत्पादन पद्धती उत्पादन साधनावर आणि उत्पादनसंबंध हे उत्पादनपद्धतीवर अवलंबून असतात.

७) आजपर्यंत अस्तित्वात आलेल्या समाजांचा समग्र इतिहास म्हणजे वर्गलढ्याचाच इतिहास होय.

८) भांडवली समाज हा सरंजामशाहीपेक्षा प्रगत समाज आहे.

९) श्रमविषयाचे (कच्चामाल) नव्या वस्तूत साठणारे मूल्य हे त्यांच्या पुर्वीच्या मूल्यापेक्षा जास्त असू शकते.

१०) भांडवलशाही अर्थव्यवस्था आर्थिक अरिष्टांमुळे आपोआप कोसळते.

११) मार्क्सने अतिरिक्त मूल्याचा दर आणि नफ्याचा दर यामध्ये फरक केला नाही.

१२) भांडवलशाहीच्या विकासाबरोबर भांडवलाची घटनात्मक रचना वाढत जाते.

**क) योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करा.**

१) मार्क्सच्या 'दास कॅपिटल' या ग्रंथाचा पहिला खंड ........ मध्ये प्रकाशित करण्यात आला.

अ) १८५९ ब) १८६७ क) १८६४ ड) १८८३

२) विरोध विकासाचे तत्त्व ........ यांनी मांडले होते.

अ) प्रुधाँ ब) एंगल्स क) हेगेल ड) रॉबर्ट ओवेन

३) ........ हे श्रमप्रक्रियेचे घटक आहेत.

अ) श्रमविषय ब) श्रमसाधने क) श्रमशक्ती ड) वरील सर्व

४) भांडवलदार कामगाराकडून ........ खरेदी करतात.

अ) श्रम ब) श्रमशक्ती क) नफा ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

५) ........ हा घटक उत्पादित वस्तूच्या मूल्यामध्ये स्वत:च्या मूल्यापेक्षा जास्त मूल्य टाकतो.

अ) श्रमसाधने ब) श्रमशक्ती क) श्रमविषय ड) वरील सर्व

६) ........ मुळे भांडवलशाहीतील श्रमप्रक्रियेचा चेहरामोहरा बदलतो.

अ) निरपेक्ष अतिरिक्त मूल्याची प्रवृत्ती ब) सापेक्षा अतिरिक्त मूल्याची प्रवृत्ती

क) 'अ' आणि 'ब' दोन्ही ड) वरीलपैकी कोणतेही नाही.

७) ........ या विनिमयव्यवहारात अतिरिक्त मूल्य निर्माण होणे शक्य असते.

अ) वस्तू-वस्तू ब) वस्तू-पैसा-वस्तू

क) पैसा-वस्तू-पैसा ड) वरीलपैकी एकही नाही.

## ४.७ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

**अ)** १) व्यवसाय निवडीबाबत एका तरुणाचे विचार

२) डेमोक्रिटसचे प्रकृतीवादी तत्त्वज्ञान आणि एपिक्युरसचे प्रकृतीवादी तत्त्वज्ञान यामधील फरक

३) तत्त्वज्ञानाचे दारिद्र्य

४) निरपेक्ष अतिरिक्त मूल्य

५) बदलते

६) एकूण भांडवल.

**ब)** १) बरोबर २) बरोबर ३) बरोबर ४) चूक ५) चूक ६) बरोबर ७) बरोबर

८) बरोबर ९) चूक १०) चूक ११) चूक १२) बरोबर.

**क)** १) ब २) क ३) ड ४) ब

५) ब ६) ब ७) क

## ४.८ सरावासाठी स्वाध्याय

**अ) थोडक्यात उत्तरे लिहा.**

१) विरोध विकासाधिष्ठित भौतिकवाद

२) मूर्त श्रम आणि अमूर्त श्रम

३) अतिरिक्त मूल्याचा दर

४) नफ्याचा दर

५) निरपेक्ष अतिरिक्त मूल्य आणि सापेक्ष अतिरिक्त मूल्य.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१) मार्क्सने सांगितलेले सामाजिक परिवर्तनाचे गतीशास्त्र स्पष्ट करा.

२) मार्क्सचा मूल्यसिद्धांत स्पष्ट करा.

३) मार्क्सचा अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत स्पष्ट करा.

४) नफ्याचा दर घसरण्याच्या प्रवृत्तीचे मार्क्सने केलेले विवेचन लिहा.

## ४.९ क्षेत्रीय कार्य :

१) आपल्या भागातील कामगार चळवळीच्या नेत्यांना भेटून त्याच्या चळवळीविषयी माहिती जमा करा.

२) आपल्या भागातील उद्योजकांना भेटून भांडवलाच्या घटनात्मक रचनेविषयी माहिती जमा करा.

## ४.१० अधिक वाचनासाठी पुस्तके

| | | | |
|---|---|---|---|
| १) | कार्ल मार्क्स | - | दास कॅपिटल, खंड १, २, ३ |
| २) | मॉरिस कॉर्नफोर्थ | - | समाजवादाचे तत्त्वज्ञान, मागोवा प्रकाशन, पुणे. |
| ३) | लेनिन | - | कार्ल मार्क्स आणि त्याची शिकवण,<br>प्रगती प्रकाशन, मास्को. |
| ४) | संझगिरी प्रभाकर | - | मानवाची कहाणी,<br>मुंबई श्रमिक संघ, क्वारी रोड,<br>भांडूप, मुंबई. |
| ५) | दास कॅपिटल-सुबोध परिचय | - | सुहास परांजपे,<br>शंकर ब्रह्मे समाजविज्ञान, ग्रंथालय, पुणे. |
| ६) | येवगेनिया स्तेपानोवा | - | कार्ल मार्क्स-संक्षिप्त चरित्र |
| ७) | शिव वर्मा | - | कम्युनिस्टांना काय हवय?<br>विश्वभारती प्रकाशन, धनवटे चेंबर्स,<br>सीताबर्डी, नागपूर. |

◈◈◈

# घटक : १

# नव-सनातनी आर्थिक विचार - अल्फ्रेड मार्शल

**(New-Classical Economic Thoughts - Alfred Marshall)**

## अनुक्रमणिका


१.० उद्दिष्ट्ये

१.१ प्रास्ताविक

१.२ विषय विवेचन

१.२.१ मूल्य सिद्धांत

१.२.२ प्रतिनिधिक उद्योगसंस्थेची संकल्पना

१.२.३ मागणीची लवचिकता

१.२.४ आभासी खंड

१.३ सारांश

१.४ पारिभाषीक शब्द व अर्थ

१.५ स्वयं अध्ययन प्रश्नांची उत्तरे

१.६ सरावासाठी स्वाध्याय

१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके (संदर्भ ग्रंथ)


## १.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास खालील बाबींचे आकलन होऊ शकते.

१. नव-सनातनी अल्फ्रेड मार्शल यांच्या मुल्यविषयक विचारांची स्पष्ट कल्पना येईल.

२. मार्शलच्या प्रतिनिधीक उद्योगसंस्थेच्या संकल्पनेचे योग्य आकलन होईल.

३.	मागणीच्या लवचिकते विषयीचे मार्शल यांचे विचार स्पष्ट होतील.

४.	मार्शल यांची आभासी खंडाची संकल्पना स्पष्ट होईल.

## १.१ प्रास्ताविक

केंब्रीज विद्यापीठात काम करीत असताना डॉ. अल्फ्रेड मार्शल यांनी सन १८८५ मध्ये केंब्रीज संप्रदायाची निर्मिती केली. त्यांनी सन १८९० मध्ये "Principles of Economics" हा प्रमुख ग्रंथ लिहला. या ग्रंथात त्यांनी आपले आर्थिक विचार मांडले आहेत. ॲडम स्मिथ, डेव्हिड रिकार्डो, थॉमस माल्थस इ. प्रमुख सनातनी अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विचारांची उपयुक्तता १९ व्या शतकाच्या शेवटी घटत जात असल्याचे दिसून येत होते. त्यांच्या सनातनी विचारसरणीतील विविध अडथळे, दोष प्रामुख्याने दिसून येत होते. म्हणजेच सनातनी विचारसरणी बाजूला सरकत असल्याचे चित्र होते. तसेच राष्ट्रवादी व समाजवादी विचारसरणी उदयास येवू लागली होती. अशा स्थितीत मार्शल यांनी जुन्या सनातनी व नव्या आर्थिक विचारांचा समन्वय साधण्याचे महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. मार्शल यांनी सनातनी अर्थशास्त्रीय विचारांची व सिद्धांतांची फेरतपासणी करून अर्थशास्त्राला नवे रूप प्राप्त करून दिले आहे. तसेच त्यांनी बदललेल्या स्थितीच्या संदर्भात सनातनी आर्थिक विचारांची पुनर्बांधणी करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. त्यांनी व्यक्तिनिष्ठ व वस्तूनिष्ठ या दोन दृष्टीकोनात समन्वय साधण्याचे उपयुक्त कार्य केले आहे.

प्रस्तूत घटकात नव-सनातनी अल्फ्रेड मार्शल यांच्या आर्थिक विचारांचे स्पष्टीकरण केले आहे. यामध्ये मार्शल यांच्या मुल्य सिद्धांत, प्रतिनिधीक उद्योगसंस्थेची संकल्पना, मागणीची लवचिकता व आभास खंड या आर्थिक विचारांचे स्पष्टीकरण केले आहे.

## १.२ विषय विवेचन

प्रस्तूत घटकात अल्फ्रेड मार्शल यांच्या प्रमुख आर्थिक विचारांचे स्पष्टीकरण केले आहे. यात मार्शल यांचे मुल्यविषयक विचार, त्यांची प्रतिनिधीक उद्योगसंस्थेची संकल्पना, मागणीची लवचिकता व आभास खंड इ. प्रमुख आर्थिक विचारांचा परामर्ष घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### १.२.१ मुल्य सिद्धांत

मार्शल यांनी वस्तूनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ दृष्टिकोनातून मुल्य सिद्धांताची मांडणी केली आहे. मुल्यविषयक सनातनी विचार प्रवाह व उपयोगितावाद्यांचा विचारप्रवाह यांच्यात समन्वय साधन्याचा प्रयत्न मार्शल यांनी केला. म्हणूनच मार्शल यांच्या विभिन्न आर्थिक संकल्पनांमध्ये मुल्यविषयक विचारांना महत्त्व आहे. सनातनवादी

अर्थशास्त्रज्ञांनी व उपयोगितावादी अर्थशास्त्रज्ञांनी मुल्यविषयक विचार मांडले. ते विचार वेगवेगळे होते. मार्शल यांनी या वेगवेगळ्या विचारांमध्ये समन्वय साधण्याचा प्रयत्न केला. म्हणून मार्शल यांचे मुल्यविषयक विचार सविस्तरपणे अभ्यासणे महत्त्वाचे ठरते. सनातन मतप्रवाहवादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते, वस्तूच्या मुल्यासंदर्भात वस्तूचा पुरवठा व उत्पादन खर्च यांचा विचार होणे क्रमप्राप्त आहे. मुल्य ठरविण्यामध्ये वस्तूचा पुरवठा व वस्तूचा उत्पादन खर्च हा अत्यंत महत्त्वाचा आहे. तर उपयोगितावादी अर्थशास्त्रज्ञांच्या मते वस्तूचे मुल्य ठरविताना वस्तूची मागणी व वस्तूची उपयोगिता यांना महत्त्व आहे. या दोन भिन्न विचारसरणीमध्ये मार्शल यांनी समन्वय साधण्याचा प्रयत्न केला आणि आपले मुल्यविषयक विचार व्यक्त केले. मार्शल यांनी वस्तूची मागणी व वस्तूचा पुरवठा यांच्यात समन्वय साधून मुल्य सिद्धांताची योग्य मांडणी केली आहे.

मार्शल यांचा मुल्यसिद्धांत खालील गृहितांवर आधारित आहे.

१. पूर्ण स्पर्धा अस्तित्वात असते.

२. वस्तूची किंमत स्थिर असते.

३. पैशाची सीमांत उपयोगिता कायम असते.

४. वस्तूचा साठा बदलत नाही.

सनातनी अर्थशास्त्रज्ञांनी मांडलेल्या मुल्य सिद्धांताचा मुख्य गाभा विचारात घेवून मार्शल यांनी वस्तूची मुल्य निश्चिती कशी होते हे स्पष्ट केले आहे. वस्तूचे मुल्य हे त्या वस्तूपासून मिळणाऱ्या उपयोगितेवर अवलंबून असते हा मुळ गाभा विचारात घेवून मुल्यविषयक विचार आधुनिक रूपात मांडण्याचा प्रयत्न मार्शल यांनी केला आहे. वस्तूचे मुल्य हे वस्तूची मागणी व वस्तूचा पुरवठा यांच्या संतुलनाने निर्धारित होते. त्यामुळे मुल्य निर्धारण प्रक्रियेमध्ये वस्तूची मागणीची बाजू व वस्तूच्या पुरवठ्याची बाजू या दोन्ही बाबींना महत्त्व आहे. तसेच वस्तूच्या मूल्य निर्धारणामध्ये मार्शल यांनी कालखंडाचा समावेश केला आहे. यामध्ये अल्पकाळातील मूल्यनिर्धारण कसे होते व दीर्घकालीन सर्वसाधारण किंमत निश्चिती कशी होते या दोन्हींच्या बाबतीत समतोल कसा साधला जातो याचे ही स्पष्टीकरण मार्शल यांनी मूल्यनिश्चिती मध्ये केले आहे.

**मुल्यनिश्चितीचे स्पष्टीकरण**

मार्शल यांनी मुल्यनिश्चितीचे स्पष्टीकरण खालील दोन बाबींच्या सहाय्याने केले आहे.

१) वस्तूची मागणी व पुरवठा समतोल.

२) कालखंड

## १) वस्तूची मागणी व पुरवठा समतोल

वस्तूची मागणी व पुरवठा यांच्यातील समतोलाने मुल्यनिर्धारण होते असे मार्शल यांनी स्पष्ट केले आहे. वस्तूच्या मागणीचे विवेचन करताना त्यांनी एकूण उपयोगिता, सीमांत उपयोगिता, घटती सीमांत उपयोगिता, मागणीचे कोष्टक व मागणीची लवचिकता इ. बाबींचा आधार घेतला आहे. या बाबींना आधारभूत मानून मागणीचे विश्लेषण केलेले असल्याने ते अधिक वस्तूनिष्ठ बनले आहे. वस्तूच्या पुरवठ्याचे विश्लेषण करताना मार्शल यांनी लोकसंख्यावाढीची अवस्था, अर्थव्यवस्थेची उत्पादनक्षमता, उत्पादन संघटनांचे सद्यस्वरूप, श्रमविभागणी इ. बाबींचा विचार केला आहे.

मार्शल यांच्या मते, वस्तू अथवा सेवेमध्ये मनुष्याची एखादी विशिष्ट गरज पूर्ण करण्याची जी शक्ती असते त्या शक्तीला त्या वस्तूमधील उपयोगिता म्हणतात. वस्तूमध्ये असलेली उपयोगिता उपभोक्त्याच्या मनात असली पाहिजे म्हणजे उपयोगिता ही वस्तूनिष्ठ संकल्पना नसून ती व्यक्तिनिष्ठ संकल्पना आहे. उपयोगिता ही पैशाच्या सहाय्याने मोजता येते असे मार्शल यांनी नमूद केले आहे. एखाद्या उपभोक्त्याने उपभोग घेतलेल्या एखाद्या वस्तूच्या सर्व नगांपासून मिळालेल्या उपयोगितांची बेरीज म्हणजे एकूण उपयोगिता होय. तसेच उपभोक्त्याला त्याच्या उपभोगातील शेवटच्या नगापासून जी उपयोगिता मिळते त्यास सीमांत उपयोगिता असे म्हणतात. व्यक्तीजवळ असणाऱ्या वस्तूच्या साठ्यात जशी वाढ होत जाते तशी उपयोगिता घटत जाते त्यास घटती सीमांत उपयोगिता असे म्हणतात. वस्तूच्या किंमतीच्या विरूद्ध दिशेने मागणीत बदल होतो म्हणजे वस्तूची किंमत वाढली की वस्तूची मागणी घटते याउलट वाढते. वस्तूच्या किंमतीत किती बदल झाला त्याचा परिणाम मागणीत किती बदल होते हे स्पष्ट करणे म्हणजे वस्तूची मागणीची लवचिकता होय. या वेगवेगळ्या बाबींचा विचार मार्शल यांनी वस्तूच्या मागणीचे विश्लेषणासाठी केला आहे. वस्तूच्या पुरवठ्याच्या विश्लेषणासाठी मार्शल यांनी श्रमविभागणी, उत्पादनक्षमता, उत्पादन संघटना, लोकसंख्या वाढ इ. बाबींचा विचार केला आहे. मार्शल यांच्या मते वस्तूची मागणी व वस्तूचा पुरवठा यांच्या संतुलनाने मुल्य निश्चिती होते.

## २) कालखंड

अल्फ्रेड मार्शल यांच्या मुल.य निर्धारणामध्ये वस्तूची मागणी व वस्तूचा पुरवठा या दोन घटकांबरोबर त्यांनी कालखंड हा देखील घटक विचारत घेतला आहे. मार्शल यांचे कालखंडविषयक विश्लेषण मुल्यनिश्चितीत अत्यंत महत्त्वाचे मानले जाते. मुल्यनिर्धारणामध्ये कालखंडाचे खालील प्रकार पाडले आहेत.

**अ) अत्यल्पकाळ (Very Short Period) :** काही तासांच्या काळाला मार्शल यांनी अत्यल्प काळ मानले आहे. या काही तासच्या अत्यल्प काळात विक्रेत्यास पुरवठ्यात बदल करता येत नाही. अशा स्थितीत वस्तूच्या किंमत निश्चितीत वस्तूच्या मागणीला अधिक महत्त्व प्राप्त होते. म्हणजेच अशा स्थितीत

वस्तूची किंमत तिच्या मागणीवरून निश्चित होते. जर वस्तूच्या मागणीत वाढ झाली तर तिची किंमत वाढते या उलट घटते.

**ब) अल्पकाळ (Short Period) :** अल्पकाळात विक्रेता पुरवठ्यात काही प्रमाणात बदल करू शकतो. त्यामुळे अल्पकाळात वस्तूची किंमत ही तिच्या मागणी व पुरवठ्यावरून निश्चित होत असते.

**क) दीर्घकाळ (Long Period) :** दीर्घकाळात वस्तूची मागणी व वस्तूचा पुरवठा यांच्या समतोलातून मुल्यनिर्धारण होते. या दीर्घकाळात विक्रेता यंत्र व तंत्रात योग्यदिशेने बदल घडवून आणून मागणीप्रमाणे पुरवठ्यात बदल घडवून आणतो.

**ड) अतिदीर्घकाळ (Very Long Period) :** अतिदीर्घकाळ हा सामान्यपणे ४० ते ५० वर्षाचा असतो. याकाळात अनेक मुलभूत बदल घडून येतात. उत्पादन तंत्र, भांडवल, संघटन, देशाची लोकसंख्या इ. बाबींमध्ये आमुलाग्र बदल घडून येतात. अतिदीर्घकालीन वस्तूची किंमत ही वस्तूच्या दीर्घकालीन सरासरी खर्चा इतकी असते. या स्थितीत विक्रेत्यास सामान्य नफ्याची प्राप्ती होते.

अल्फ्रेड मार्शल यांनी आपले मुल्यविषयक विचार मांडताना वस्तूची मागणी, वस्तूचा पुरवठा व कालखंड यांच्ये स्पष्टीकरण केलेले आहे आणि या सहाय्याने मुल्य निर्धारण कसे होते याचे विवेचन केलेले आहे. हे मुल्य निर्धारण स्पष्टीकरण अधिक संयुक्तीक व उपयुक्त वाटते.

## स्वयंअध्ययन प्रश्न - १

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१) मार्शल यांनी मुल्यसिद्धांताची मांडणी ............ या दृष्टीकोनातून केली.

अ) वस्तूनिष्ठ ब) व्यक्तिनिष्ठ

क) वस्तूनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ ड) आधुनिक

२) मार्शल यांच्या मते ......... च्या समतोलाने मुल्यनिर्धारण होते.

अ) किंमत व मागणी ब) मागणी व पुरवठा

क) पुरवठा व खर्च ड) खर्च व किंमत

३) मार्शल यांनी मुल्य सिद्धांताचे स्पष्टीकरण करताना .......... हे गृहित विचारात घेतले आहे.

अ) मक्तेदारी स्पर्धा असते ब) किंमत स्पर्धा असते

क) पूर्ण स्पर्धा असते ड) मक्तेदारीयुक्त स्पर्धा असते

४) अत्यल्पकाळात मुल्यनिश्चिती ........... वरून निश्चित होते.

अ) वस्तूचा पुरवठा ब) वस्तूची मागणी

क) मागणी व पुरवठा ड) वस्तूची किंमत

५) दीर्घकाळात मुल्य निर्धारण हे ................. वरून होते.

अ) वस्तूचा पुरवठा ब) वस्तूची किंमत

क) वस्तूची मागणी ड) मागणी व पुरवठा

## १.२.२ प्रतिनिधीक उद्योगसंस्थेची संकल्पना

मार्शल यांच्या आर्थिक विचारांच्या योगदानामध्ये मुल्य सिद्धांताला जसे महत्त्व आहे तसेच त्यांच्या प्रतिनिधीक उद्योगसंस्थेच्या संकल्पनेलाही तितकेच महत्त्व आहे. प्रतिनिधीक उद्योगसंस्थेची संकल्पना प्रथम मांडण्याचे संपूर्ण श्रेय डॉ. मार्शल यांना जाते. त्यांनी सर्वप्रथम ही संकल्पना अर्थशास्त्रात मांडली आहे. मार्शल यांनी आपले उत्पादन विषयक विचार व्यक्त केले आहेत. त्या विचारांमध्ये प्रतिनिधीक उद्योगसंस्था ही संकल्पना त्यांनी विस्ताराने मांडली आहे आणि या संकल्पनेला उत्पादन प्रक्रियेत अत्यंत महत्त्व आहे असे त्यांनी नमूद केले आहे. मार्शल यांनी आपल्या मुल्य सिद्धांतात कालखंडाचे स्पष्टीकरण केले आहे. या कालखंडाचा अभ्यास त्यांनी आपल्या या संकल्पनेतही केला आहे. मार्शल यांच्या उत्पादनविषयक विचारामध्ये त्यांची प्रतिनिधीक उद्योगसंस्थेची संकल्पना दडलेली आहे. मार्शल यांच्या मते उत्पादनाचे तीन घटक असतात ते म्हणजे भूमी, श्रम व भांडवल हे होत. संघटक हा उत्पादनाचा घटक असला तरी त्याचा उत्पादन प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग नसतो. म्हणून अर्थव्यवस्थेत उत्पादनाचे कार्य हे भूमी, श्रम व भांडवल या प्रमुख तीन घटकांच्या कार्यक्षमतेवर अवलंबून असते. श्रम हा उत्पादन कार्यातील महत्त्वाचा घटक आहे. त्याच्या वापराबद्दल दिला जाणारा मोबदला हा त्याच्या किमान वाजवी राहणीमान खर्चाइतका असावा असे मार्शल यांना वाटते. भूमिच्या वापराबद्दल मिळणारे उत्पन्न म्हणजे खंड होय हे त्यांनी रिकार्डोच्या खंडसिद्धांतावरून मान्य केले आहे. मार्शल यांनी आभास खंडाची संकल्पना मांडली. उत्पादन प्रक्रियेतील भांडवलाचे महत्त्व मार्शल यांनी मान्य केले आहे. त्याच्या वापराचा मोबदला म्हणजे व्याज होय. अशा प्रकारे मार्शल यांनी आपले उत्पादनाविषयक विचार व्यक्त केले आहेत. या विचारामध्ये त्यांनी आपली प्रतिनिधीक उद्योगसंस्थेची संकल्पना विशद केली आहे.

मार्शल यांच्या मते, दीर्घकाळात वस्तूची किंमत ही वस्तूच्या सरासरी खर्चाशी संबंधित असते. तसेच उत्पादन खर्च ही संकल्पना प्रत्येक उद्योगसंस्थेच्या बाबतीत वेगवेगळी असते. त्यामुळे दीर्घकाळखंडात कोणती उद्योगसंस्था जास्त कार्यक्षम व कोणती कमी कार्यक्षम याचे उत्तर त्यांनी प्रतिनिधीक उद्योगसंस्थेच्या माध्यमातून दिले आहे. थोडक्यात प्रतिनिधीक उद्योगसंस्था म्हणजे, सर्व उद्योगसंस्थांना मार्गदर्शक असणारी

उद्योगसंस्था होय. दीर्घकालीन सरासरी खर्च हा वेगवेगळ्या उद्योगसंस्थाच्या अल्पकालीन सरासरी खर्चांना समाविष्ट करून घेणारा असतो. या दीर्घकालीन सरासरी खर्चाचा संबंध वस्तूच्या किंमत निर्धारणामध्ये असतो. मार्शल यांनी अर्थव्यवस्थेत पूर्ण स्पर्धेची स्थिती असते असे गृहित धरले आहे. त्यामुळे पूर्ण स्पर्धेच्या स्थितीत उद्योगसंस्थेचा सरासरी खर्च किमान राहिल याकडे लक्ष प्रतिनिधिक उद्योगसंस्था देत असते. दीर्घकाळात कोणत्याही उद्योगसंस्थेस अतिरिक्त नफ्याची प्राप्ती होत नाही तर त्यांना केवळ सामान्य नफा मिळत असतो. अशा सामान्य नफ्याच्या स्थितीत सरासरी खर्चाबरोबर किंमत असते. प्रचलित उत्पादनतंत्र व व्यवस्थापन कौशल्य यांचा विचार करता प्रतिनिधीक उद्योगसंस्था आपला सरासरी खर्च किमान करते. ज्या उद्योगसंस्थेच्या सरासरी खर्च किमान असतो त्याच उद्योगसंस्था दीर्घकाळात उत्पादन प्रक्रियेत टिकाव धरू शकतात. प्रतिनिधीक उद्योगसंस्थेचा सरासरी खर्च किमान असतो त्यामुळे अशा उद्योगसंस्था इतर संस्थांचे प्रतिनिधीत्व करतात.

प्रतिनिधीक उद्योगसंस्थेचा सरासरी खर्च दीर्घकाळात किमान पातळीवर राहतो त्यामुळे त्या संस्थेस काही प्रकारचे लाभ होतात. हे लाभ खालील प्रमाणे -

१) **तांत्रिक लाभ :** प्रतिनिधीक उद्योगसंस्थेचा उत्पादन खर्च कमी असतो. मोठ्या उत्पादन तंत्राचा वापर अधिक झाल्याने उत्पादन खर्च कमी होतो. तसेच आकारमानाने मोठ्या उद्योगसंस्थेस अनेक तांत्रिक लाभ प्राप्त होतात.

२) **भांडवली लाभ :** मोठ्या उद्योगसंस्था भांडवल उभारणी अगदी कमी खर्चात करतात. कमी खर्चात भांडवल उभारणी केल्याने त्या उद्योगसंस्थेस भांडवली लाभ प्राप्त होतात.

३) **व्यवस्थापकीय लाभ :** आकारमानाने मोठी उद्योगसंस्था असल्याने तसेच तीचा सरासरी खर्च किमान असल्याने ती उद्योगाच्या व्यवस्थापनाचे कार्य योग्य व कुशल होण्यासाठी तज्ज्ञ व कुशल लोकांची नेमणूक केली जाते. त्याचा फायदा त्या उद्योगसंस्थेस होतो.

४) **क्रय-विक्रय लाभ :** मोठ्या उद्योगसंस्थेस मोठ्या प्रमाणाावर खरेदी-विक्री करता येणे सोपे जाते त्यामुळे क्रय-विक्रयाचे लाभ प्राप्त होतात. क्रय-विक्रयामध्ये अनेक सुधारणा करता येतात.

वरील प्रमाणे प्रतिनिधीक उद्योगसंस्थेला दीर्घकाळात तिचा सरासरी खर्च किमान असल्यामुळे विविध अंतर्गत लाभ प्राप्त होतात. या अंतर्गत लाभा बराबरोच काही बाह्य लाभ ही प्राप्त होतात. प्रतिनिधीक उद्योगसंस्थेला विशेषीकरण, विघटन, केंद्रीकरण, स्थानियीकरण इ. बाह्य लाभही प्राप्त होतात. म्हणजेच प्रतिनिधीक उद्योगसंस्थेला अंतर्गत लाभाबरोबरच काही बाह्य लाभही प्राप्त होतात. प्रतिनिधीक उद्योगसंस्थेला तिच्या चांगल्या व्यवस्थापनेमुळे तिला सरासरी खर्च किमान पातळीवर ठेवणे सोपे जाते. दीर्घकाळात सरासरी खर्च किमान पातळीवर राहिल्यामुळेच उद्योगसंस्थेस इतर उद्योगसंस्थेचे प्रतिनिधित्व मिळते.

मार्शल यांच्या प्रतिनिधिक उद्योगसंस्थेच्या संकल्पनेवर काही अर्थशास्त्रज्ञांनी टीका केल्या आहेत. कारण आधुनिक काळात पूर्ण स्पर्धेची स्थिती कोणत्याही अर्थव्यवस्थेत नसते.

## स्वयंअध्ययन प्रश्न- २

**खालीलपैकी पर्याय निवडा**

१) प्रतिनिधीक उद्योगसंस्थेची संकल्पना ........ यांनी मांडली.

अ) ॲडम स्मिथ | ब) फेडरिक लिस्ट

क) मार्शल | ड) रिकार्डो

२) मार्शल यांच्या मते उत्पादनाचे ........... घटक आहेत.

अ) एक | ब) दोन

क) चार | ड) तीन

३) ............. या घटकाचा उत्पादन प्रक्रियेत प्रत्यक्ष सहभाग नसतो.

अ) भूमी | ब) श्रम

क) भांडवल | ड) संघटक

४) सर्व उद्योगसंस्थाना मार्गदर्शक ठरणारी उद्योगसंस्था म्हणजे ....... होया.

अ) प्रतिनिधीक उद्योगसंस्था | ब) लहान उद्योगसंस्था

क) मोठी उद्योगसंस्था | ड) पूरक उद्योगसंस्था

५) प्रतिनिधीक उद्योगसंस्थेचा सरासरी खर्च .......... असतो.

अ) कमाल | ब) लहान

क) किमान | ड) पूरक

### १.२.३ मागणीची लवचिकता

मागणीत होणाऱ्या बदलाचे मात्रात्मक प्रमाण मोजण्यासाठी डॉ. मार्शल यांनी मागणीची लवचिकता ही संकल्पना मांडली आहे. मागणीची लवचिकता म्हणजे किंमतीत झालेल्या बदलामुळे मागणीत होणाऱ्या बदलाचे प्रमाण होय. वस्तूच्या किंमतीतील बदलामुळे वस्तूच्या मागणीत होणाऱ्या विस्ताराची अथवा संकोचाची गती म्हणजे मागणीची लवचिकता होय. डॉ. मार्शल यांच्या मते, ''मागणीची लवचिकता म्हणजे किंमतीतील फेर बदलांमुळे मागणीत घडून येणाऱ्या बदलाचे प्रमाण होय.''

**मागणीच्याा लवचिकतेचे प्रकार :**

मागणीच्या लवचिकतेचे पुढील तीन प्रमुख प्रकार आहेत. त्याचे विवेचन मार्शल यांनी केले आहे.

१) मागणीची किंमत लवचिकता

२) मागणीची उत्पन्न लवचिकता

३) मागणीची तिरकस (छेदक) लवचिकता

## १) मागणीची किंमत लवचिकता (Price Elasticity of Demand)

वस्तूच्या किंमतीतील बदलाच्या प्रमाणात मागणीच्या प्रमाणात होणारे बदल म्हणजे मागणीची किंमत लवचिकता होय. म्हणजेच वस्तूच्या किंमतीत किती प्रमाणात बदल झाल्यास मागणीत किती प्रमाणात बदल होतो हे सांगणे म्हणजे मागणीची किंमत लवचिकता होय. डॉ. मार्शल यांनी मागणीची लवचिकता मोजण्याचे पुढील सुत्र सांगितले आहे.

$$\text{मागणीची किंमत लवचिकता} = \frac{\text{वस्तूंच्या मागणीतील शेकडा बदल}}{\text{वस्तूंच्या किंमतीतील शेकडा बदल}}$$

मार्शल यांनी मागणीच्या किंमत लवचिकतेचे खालील प्रकार सांगतिले आहेत.

१) **पूर्ण लवचिक मागणी :** वस्तूंच्या किंमतीत अल्पशी घट अथवा वाढ झाल्यास वस्तूच्या मागणीत प्रचंड प्रमाणात वाढ अथवा घट होते तेव्हा त्यास पूर्ण लवचिक मागणी म्हणतात. पूर्ण लवचिक मागणीचा वक्र हा अक्ष अक्षाला समांतर असतो.

२) **पूर्ण अलवचिक मागणी :** वस्तूच्या किंमतीत कितीही बदल झाला तरी मागणीत कोणताही बदल होत नाही तेव्हा त्यास पूर्ण अलवचिक मागणी असे म्हणतात. पूर्ण अलवचिक मागणीचा वक्र हा अ अक्षाला समांतर असतो.

३) **एकक लवचिकता :** ज्या प्रमाणात वस्तूच्या किंमतीत बदल होतो त्याच प्रमाणात जर मागणीत बदल होत असेल तर त्यास एकक लवचिकता असे म्हणतात.

४) **एकापेक्षा अधिक लवचिक मागणी :** वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलाच्या तुलनेत वस्तूच्या मागणीत होणारे बदल जर अधिक असतील तर त्यास एकपेक्षा अधिक लवचिक मागणी म्हणतात.

५) **एकापेक्षा कमी लवचिक मागणी :** वस्तूच्या किंमतीत होणाऱ्या बदलाच्या तुलनेत वस्तूच्या मागणीत होणारे बदल जर कमी असतील तर त्यास एकापेक्षा कमी लवचिक मागणी म्हणतात.

वरील प्रमाणे वस्तूची किंमत लवचिकता व तिचे विभिन्न प्रकार स्पष्ट केले आहेत. वस्तूच्या मागणीची किंमत लवचिकता मोजण्याच्या पद्धती खालील प्रमाणे सांगता येतील.

१) गुणोत्तर पद्धती

२) एकूण खर्च पद्धती

३) भूमितीय पद्धती

या प्रमुख तीन पद्धतीच्या सहाय्याने मागणीची किंमत लवचिकता मोजली जाते. मागणीच्या किंमत लवचिकतेवर जीवनावश्यक वस्तू, चैनीच्या वस्तू, सवयीच्या वस्तू, सुखसोईच्या वस्तू, पूरक वस्तू, पर्यायी वस्तू, टिकाऊ वस्तू, नाशवंत वस्तू, किंमतपातळी, कालावधी इ. घटकांचा परिणाम होतो.

## २) मागणीची उत्पन्न लवचिकता (Income Elasticity of Demand)

उत्पन्नातील बदलाचे मागणीतील बदलाशी असणारे प्रमाण म्हणजे मागणीची उत्पन्न लवचिकता होय. वस्तूची किंमत व इतर घटकांत कोणताही बदल न होता केवळ उत्पन्नात होणाऱ्या बदलामुळे जर वस्तूच्या मागणीत बदल होत असेल तर त्यास वस्तूच्या मागणीची उत्पन्न लवचिकता असे म्हणतात.

मागणीची उत्पन्न लवचिकता खालील सुत्राच्या सहाय्याने मोजता येते.

$$\text{मागणीची उत्पन्न लवचिकता} = \frac{\text{वस्तूंच्या मागणीतील शेकडा बदल}}{\text{उत्पन्नातील शेकडा बदल}}$$

वस्तूच्या मागणीतील शेकडा बदल व उत्पन्नातील शेकडा बदल यांचे गुणोत्तर म्हणजे मागणीची उत्पन्न लवचिकता होय. मागणीच्या उत्पन्न लवचिकतेचे प्रकार खालील प्रमाणे स्पष्ट करता येतील.

**१) शुन्य उत्पन्न लवचिकता :** उपभोक्त्याच्या उत्पन्न पातळीत वाढ अथवा घट होऊनही मागणीत कोणताही बदल होत नसेल तर उत्पन्न लवचिकता शुन्य आहे असे म्हटले जाते.

**२) एकक उत्पन्न लवचिकता :** उपभोक्त्याच्या उत्पन्नात ज्या प्रमाणात बदल होतो त्याच प्रमाणात जर मागणीत बदल होत असेल तर त्यास एकक उत्पन्न लवचिकता असे म्हणतात.

**३) एककापेक्षा कमी उत्पन्न लवचिकता अथवा धन लवचिकता :** उपभोक्त्याच्या उत्पन्नातील वाढीपेक्षा मागणीत झालेली वाढ जर कमी असेल तर त्यास एककापेक्षा कमी उत्पन्न लवचिकता असे म्हणतात.

**४) एककापेक्षा जास्त उत्पन्न लवचिकता :** उपभोक्त्याच्या उत्पन्नातील वाढीपेक्षा मागणीत झालेली वाढ जर जास्त असेल तर त्यास एककापेक्षा जास्त उत्पन्न लवचिकता असे म्हणतात.

५) **ऋण (उणे) उत्पन्न लवचिकता :** उपभोक्त्याच्या उत्पन्नातील बदलाच्या विरूद्ध अथवा व्यस्त दिशेने मागणीत बदल होत असतील तर त्यास ऋणात्मक उत्पन्न लवचिकता असे म्हणतात.

## ३) मागणीची तिरकस अथवा छेदक लवचिकता (Cross Elasticity of Demand)

मागणीच्या तिरकस लवचिकतेस प्रतिस्थापन लवचिकता असेही म्हणतात. विशिष्ट वस्तूच्या मागणीवर पर्यायी वस्तूंच्या किंमतीतील बदलांचा परिणाम होतो. परस्पर पूरक अथवा पर्यायी असणाऱ्या वस्तूंच्या बाबतीत एका विशिष्ट वस्तूची किंमत स्थिर राहुनही पर्यायी वस्तूच्या किंमतीत बदल झाल्यामुळे तिच्या मागणीत बदल होतो हा बदल म्हणजे त्या वस्तूची तिरकस लवचिकता होय. उदा. चहाची किंमत बदलते तेव्हा कॉफीच्या मागणीत बदल होत असतो. म्हणजेच X वस्तूची किंमत स्थिर असूनही Y वस्तूच्या किंमतीतील बदलामुळे X वस्तूची मागणी बदलते तेव्हा त्यास तिरकस / छेदक लवचिकता असे म्हणतात. अशा स्थितीत X व Y या दोन्ही वस्तू एकमेकांना परस्पर पूरक अथवा पर्यायी वस्तू असतात. मागणीची छेदक लवचिकता खालील सुत्राच्या सहाय्याने मोजाली जाते.

$$\text{मागणीची छेदक/तिरकस लवचिकता} = \frac{X \text{ वस्तूच्या मागणीतील शेकडा बदल}}{Y \text{ वस्तूच्या किंमतीतील शेकडा बदल}}$$

मागणीच्या छेदक लवचिकतेचे प्रमुख प्रकार पुढीलप्रमाणे आहेत.

१) अनंत लवचिकता

२) धन लवचिकता

३) ऋण लवचिकता

मागणीच्या लवचिकतेवर काही घटकांचा परिणाम होत असतो. ते घटक म्हणजे, किंमतविषयक धोरण, उद्योगसंस्थेचे संतुलन, कर विषयक धोरण, आंतरराष्ट्रीय व्यापार, उद्योगसंस्थेचे आकारमान इ. घटक होत.

## स्वयंअध्ययन प्रश्न - ३

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडा.**

१) वस्तूच्या किंमतीतील बदलाच्या प्रमाणात मागणीच्या प्रमाणात होणारे बदल म्हणजे मागणीची ........... लवचिकता होय.

अ) उत्पन्न ब) किंमत

क) तिरकस ड) पुरवठा

२) ज्या प्रमाणात वस्तूच्या किंमतीत बदल होतो त्याच प्रमाणात जर मागणीत बदल होत असेल तर त्यास .......... लवचिकता म्हणतात.

अ) एकक ब) पूर्ण

क) अपूर्ण ड) धन

३) वस्तूच्या मागणीतील शेकडा बदल आणि उपभोक्त्याच्या उत्पन्नातील शेकडा बदल यांचे गुणोत्तर म्हणजे मागणीची .......... लवचिकता होय.

अ) किंमत ब) उत्पन्न

क) छेदक ड) एकक

४) उपभोक्त्याच्या उत्पन्न पातळीत वाढ अथवा घट होऊनही मागणीत कोणताही बदल होत नसेल तर त्यास उत्पन्न लवचिकता ......... आहे असे म्हणतात.

अ) धन ब) ऋण

क) शुन्य ड) एकक

५) वस्तूच्या किंमतीत वाढ अथवा घट झाली तरी वस्तूच्या मागणीत कोणताही बदल होत नसेल तर त्यास ............ असे म्हणतात.

अ) पूर्ण लवचिकता मागणी ब) पूर्ण अलवचिक मागणी

क) एकक लवचिक मागणी ड) एकपेक्षा कमी लवचिक मागणी

### १.२.४ आभास खंड

अल्फ्रेड मार्शल यांनी आभास खंडाची संकल्पना मांडली आहे. मार्शल यांच्या अतिअल्पकाळ या कालखंड विश्लेषणात याचे स्पष्टीकरण केलेले आहे. त्यांच्या मते अतिअल्पकाळात पुरवठ्यात बदल करता येत नाही. म्हणून अतिअल्पकाळात एखाद्या वस्तूची मागणी अचानकपणे वाढली तर पुरवठा त्या प्रमाणात वाढविता येत नाही. त्यामुळे वस्तूच्या किंमतीत अधिक वाढ होते. त्यामुळे वाढलेल्या मागणीला पुरवठा होईपर्यंत त्या वस्तूला तात्पुरते जादा उत्पन्न मिळते. या तात्पुरत्या मिळणाऱ्या जादा उत्पन्नाला डॉ. मार्शल यांनी ''आभास खंड'' असे म्हटले आहे. या आभास खंडाला तात्पुरता खंड असेही म्हणतात. तसेच त्याला खंड सदृश्य उत्पन्न असेही म्हणतात.

डॉ. मार्शल यांच्या मते, ''आभास खंड म्हणजे जवळ-जवळ खंडासारखा असतो परंतु अगदी बरोबर खंड नव्हे.'' आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या मते, उत्पादन घटकांच्या दुर्मीळतेमुळे त्यांना खंडाची प्राप्ती होत असते. भूमिचा पुरवठा हा मर्यादित अथवा दुर्मिळ असल्यामुळे खंडाची निर्मिती होते या कल्पनेवर डॉ. मार्शल यांची आभास खंडाची संकल्पना आधारलेली आहे. डॉ. अल्फ्रेड मार्शल यांच्या मते अतिअल्पकाळात (Very Short Period) उत्पादनाच्या घटकांचा (श्रम, भांडवल व भूमी) पुरवठा वाढविता येत नाही. त्यामुळे या उत्पादन घटकांची मागणी जर वाढली तर त्यांना अल्पकाळासाठी अतिरिक्त उत्पन्न मिळेल या अल्पकालीन अतिरिक्त उत्पन्नास आभास खंड असे म्हणतात. या घटकांची अल्पकाळात दुर्मिळता असते म्हणून त्यांचा पुरवठा अल्पकाळात वाढविता येत नाही त्याचा परिणाम त्यांना अतिरिक्त उत्पन्न मिळते. या दुर्मिळ घटकांचा पुरवठा जर वाढला तर हे मिळणारे अतिरिक्त उत्पन्न संपुष्ठात येते. म्हणून याला आभास अथवा तात्पुरता खंड असे म्हणतात.

जमिनीचा पुरवठा वाढविता येत नाही त्यामुळे जमिनीस मिळणारा मोबदला म्हणजे खंड हा कायमस्वरूपाचा असतो. मात्र उत्पादनाच्या इतर घटकांचा पुरवठा वाढविता येत असल्याने त्यांना मिळणारा खंड हा तात्पुरता असतो. दीर्घकाळात उत्पादन घटकांचा पुरवठा वाढविता येतो त्यामुळे दीर्घकाळात आभास खंड कोणत्याही घटकास प्राप्त होत नाही. आभास खंड हा केवळ तात्पुरते अधिक्यरूपी उत्पन्न असते. डॉ. अल्फ्रेड मार्शल यांनी आभास खंडाची संकल्पना स्पष्ट करताना आकाशातून पडणाऱ्या उल्कांपासुन तयार झालेल्या दगडांचे उदाहरण दिले आहे. त्यांच्या मते, समजा, काही भागात उल्कांचा वर्षाव झाला आणि त्यापासून तयार झालेले सर्व दगड सारखे असतील तसेच ते हिऱ्यापेक्षाही कठीण व टिकाऊ असतील तर अशा स्थितीत त्यांची मागणी वाढली तर पुरवठा वाढविता येत नाही. तेव्हा त्या भागातील मालकांना उल्कापासून तयार झालेल्या दगडाचे मिळणारे उत्पन्न हे आभास खंड होय. परंतु दीर्घकाळात असे पुन्हा घडून आल्यास उल्कापासून तयार झालेल्या दगडांचा पुरवठा वाढून त्यांची किंमत कमी होईल आणि हे अल्पकालीन अतिरिक्त उत्पन्न म्हणजेच खंडसदृश उत्पन्न नष्ट होईल. म्हणजेच मार्शल यांच्या मते आभास खंड हे अल्पकालीन खंड सदृश अधिक्य होय जे दीर्घकाळात पुरवठा वाढीमुळे नाहीसे होते. दीर्घकाळात उत्पादन वाढत असल्याने पुरवठा वाढून आधिस्वरूपी उत्पन्न संपुष्टात येते.

## स्वयंअध्ययन प्रश्न - ४

**खालीलपैकी योग्य पर्याय निवडा**

१) .......... यांनी आभास खंडाची संकल्पना मांडली.

अ) ॲडम स्मिथ ब) डॉ. मार्शल

क) रिकार्डो ड) श्रीमती रॉबिन्सन

२) अतिअल्पकाळात मिळणारे अतिरिक्त उत्पन्न म्हणजे ............. होय.

अ) आभास खंड ब) भेदजन्य खंड

क) बदली उत्पन्न ड) वैकल्पीक उत्पन्न

३) मार्शल यांच्या मते अतिअल्पकाळात उत्पादन घटकांचा पुरवठा वाढविता येत नाही त्यामुळे त्यांना ............ मिळतो.

अ) खंड ब) व्याज

क) नफा ड) भांडवल

४) दीर्घकाळात उत्पादन घटकांचा पुरवठा वाढल्याने आभास खंड ........ होतो.

अ) नष्ट ब) वाढतो

क) घटतो ड) स्थिर

५) आभास खंड हा ........... या काळात मिळतो.

अ) दीर्घकाळ ब) अतिदीर्घकाळ

क) अल्पकाळ ड) अतिअल्पकाळ

## १.३ सारांश

प्रस्तुत घटकामध्ये अल्फ्रेड मार्शल यांचे प्रमुख व महत्त्वाचे आर्थिक विचार स्पष्ट केले आहेत. मार्शल यांचा मुल्यसिद्धांत, प्रतिनिधीक उद्योगसंस्थेची संकल्पना, मागणीची लवचिकता व आभास खंड या प्रमुख घटकांचे स्पष्टीकरण केले आहे. डॉ. मार्शल यांच्या मते मुल्यनिर्धारण हे वस्तूची मागणी व वस्तूचा पुरवठा यांच्या संतुलनाने होत असते. प्रतिनिधीक उद्योगसंस्थेबाबत त्यांनी असे म्हटले आहे की, प्रतिनिधीक उद्योगसंस्थेचा सरासरी खर्च हा तिच्या किंमतीबरोबर असतो आणि अशा परिस्थितीत त्या उद्योगसंस्थेस

सामान्य नफ्याची प्राप्ती होते. त्यामुळे अशी उद्योगसंस्था दुसऱ्या उद्योगसंस्थेचे प्रतिनिधीत्व करीत असते. ही उद्योगसंस्था आकाराने मोठी असल्यामुळे तिस अंतर्गत व बाह्य लाभ होत असतात. तसेच प्रस्तूत घटकात मागणीची लवचिकता स्पष्ट केली आहे. मागणीच्या लवचिकतेत किंमत लवचिकता, उत्पन्न लवचिकता व छेदक लवचिकता या संकल्पना स्पष्ट केल्या आहेत. वस्तूच्या किंमतीत किती प्रमाणात बदल झाल्यामुळे वस्तूच्या मागणीत किती प्रमाणात बदल होतो हे प्रमाण सांगणे म्हणजे त्या वस्तूची किंमत लवचिकता होय. मागणीच्या लवचिकतेबरोबर डॉ. मार्शल यांची आभास खंडाची संकल्पना ही या घटकात स्पष्ट केली आहे. डॉ. अल्फ्रेड मार्शल यांच्या मते, उत्पादन घटकांच्या दुर्मिळतेमुळे अथवा त्यांच्या अतिअल्पकाळात पुरवठा वाढविता येत नसल्यामुळे त्यांना जे अतिरिक्त उत्पन्न मिळते ते म्हणजे आभास खंड होय. दीर्घकाळात उत्पादन घटकांचा पुरवठा वाढल्याने आभास खंड दीर्घकाळात संपुष्टात येतो.

## १.४ पारिभाषीक शब्द व अर्थ

| | | | |
|---|---|---|---|
| १. | उपयोगिता | : | वस्तू अथवा सेवेमध्ये मनुष्याची गरज पूर्ण करण्याची शक्ती. |
| २. | वस्तूची मागणी | : | विशिष्ट काळात विशिष्ट किंमतीला एखाद्या वस्तूचे किती नग खरेदी केले जाऊ शकतात हे सांगणे. |
| ३. | उत्पादन खर्च | : | वस्तूचे उत्पादन करण्यासाठी विविध उत्पादन घटकांवर केला गेलेला खर्च. |
| ४. | सीमांत उपयोगिता | : | शेवटच्या नगापासून मिळणारी उपयोगिता होय. |
| ५. | उत्पादन घटक | : | वस्तूचे उत्पादन करण्यासाठी वापरलेले सर्व प्रकारचे घटक. |
| ६. | प्रतिनिधीक उद्योगसंस्था | : | वेगवेगळ्या उद्योगसंस्थेचे प्रतिनिधीत्व करणारी उद्योगसंस्था. |
| ७. | सरासरी खर्च | : | एक नगासाठी येणारा खर्च. |
| ८. | क्रय-विक्रय | : | खरेदी विक्री |
| ९. | मागणीची लवचिकता | : | किमतीतील बदलामुळे मागणीत होणारा बदलाचा गुणधर्म |
| १०. | आभास खंड | : | अतिअल्पकाळात घटकांच्या पुरवठ्याच्या दुर्मिळतेमुळे मिळणारे अतिरिक्त उत्पन्न |

## १.५ स्वयंअध्ययन प्रश्नांची उत्तरे

**स्वयंअध्ययन प्रश्न - १**

१) क

२) ब

३) क

४) ब

५) ड

**स्वयंअध्ययन प्रश्न - २**

१) क

२) ड

३) ड

४) अ

५) क

**स्वयंअध्ययन प्रश्न - ३**

१) ब

२) अ

३) ब

४) क

५) ब

**स्वयंअध्ययन प्रश्न - ४**

१) ब

२) अ

३) अ

४) अ

५) ड

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**प्रश्न - १ : खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.**

१. डॉ. मार्शल यांचे कालखंड स्पष्टीकरण

२. प्रतिनिधीक उद्योगसंस्था

३. किंमत लवचिकतेचे प्रकार

४. मागणीची छेदक लवचिकता

५. आभास खंड.

**प्रश्न - २ : खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

१. डॉ. मार्शल यांच्या मुल्य सिद्धांताचे सविस्तर स्पष्टीकरण करा.

२. मागणीची उत्पन्न लवचिकता म्हणजे काय सांगून तिचे प्रकार स्पष्ट करा.

३. मागणीची लवचिकता म्हणजे काय ? तीचे प्रकार स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके (संदर्भ ग्रंथ)


१. Bhatia H.L. (1982) : History of Economic Thoughts, Vikas Publishing House Pvt. Ltd., New Delhi.

२. Marshall Alfred (1977) : Principles of Economics, The English Language Book Society and Macmillan Press Ltd. ELBS, Edition, London.

३. भोसले के. एम. आणि काटे के. बी. (१९९८) : निवडक देशांचा आर्थिक इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

४. पाटील कृ. ए. (१९९८) : उच्चतर आर्थिक सिद्धांत, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर.

५. पाटील जे. एफ. (२००९) : आर्थिक विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

६. भोसले के. एम. आणि काटे के. बी. (२००५) : अंशलक्षी अर्थशास्त्र, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

७. Koutsoyiannis (1979) : Modern Microeconomics (Second edition), Macmillan Press, London, (Fourth Reprint, 2003).


❑ ❑ ❑

# घटक २

# भारतीय आर्थिक विचारवंत

# (अ) महात्मा ज्योतिबा फुले (सन १८२७ ते १८९०)

## २.अ.१ उद्दिष्ट्ये

१. या घटकाच्या माध्यमातून आपल्याला महात्मा ज्योतिबा फुले यांचा जीवन परिचय होईल.

२. महात्मा ज्योतिबा फुले यांचे शेतीविषयक विचार समजावून घेता येतील.

३. महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षणविषयक विचार समजावून घेता येतील.

## २.अ.१ प्रस्तावना

महाराष्ट्रातील श्रेष्ठ समाजसुधारक, श्रमजीवी वर्गाच्या शोषणाची व सामाजिक परिस्थितीची मीमांसा करणारा क्रांतिकारक विचारवंत, शिक्षणाचा जनक, भारतीय स्त्रियांचे हक्क व स्वातंत्र्य, मानवी समानतेची घोषणा करणारा पहिला लोकनेता म्हणून महाराष्ट्रात व संपूर्ण भारतात महात्मा ज्योतिबा फुलेना ओळखतात.

## २.अ.२ जीवन व कामगिरीचा परिचय

महात्मा ज्योतिबा फुले यांचा जन्म १८२७ मध्ये पुणे येथे झाला. त्यांच्या पूर्वजांचे मूळ गाव सातारा जिल्ह्यातील कटगुण हे होते. वडील गोविंद व आई चिमणाबाई. गोविंदरावांचे भाजीपाल्याचे दुकान होते. गोविंदरावांना दोन मुले - राजाराम व ज्योति. आई चिमणाबाईंचे ज्योतीबांच्या लहानपणी निधन झाले. वडील गोविंदरावांनी दुसरे लग्न न करता स्वत: राजाराम व ज्योति यांचे संगोपन केले.

शिक्षण ही ब्राह्मणांखेरीज इतर जातीने संपादन करावयाची गोष्ट नव्हे अशी समजून त्या काळी होती. त्या काळात भारतात ग्रामीण भागात प्राथमिक शाळाही नव्हत्या. इंग्रजांनी सन १८१३ मध्ये शिक्षण सर्वांसाठी सुरू केले. त्यामुळे शिक्षण घेणे सर्वांना सोयीचे झाले.

१८३६ मध्ये सरकारने स्वखर्चाने पुणे जिल्ह्यामध्ये प्रयोगादाखल ग्रामशाळा सुरू केल्या. या शाळामध्ये लेखन व वाचन शिकवले जात असे. पुढे १८६२ मध्ये या शाळा बंद करण्यात आल्या. १८२४ मध्ये पुण्यात ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी मराठी शाळा काढल्या.

ज्योतिरावांना ७ व्या वर्षी प्राथमिक मराठी शाळेत घातले. ज्योतिरावांची अभ्यासात चांगली प्रगती होती. परंतु शिक्षणामुळे ज्योतिराव शेतीमध्ये काम करणार नाही असे वडिलांच्या मनावर इतरांनी ठसविल्याने त्यांचे शिक्षण बंद केले. शाळा सोडल्यानंतर ज्योतिराव फावडे, कुदळ घेऊन आपल्या शेतीमध्ये मदत करू लागले. वयाच्या १३ व्या वर्षी त्यांचा विवाह झाला. परंतु त्यांची शिक्षणाची ओढ संपली नाही.

गफार बंग मुन्शी व दुसरे लीजीट साहेब या ख्रिस्ती धर्मोपदेशकांनी आपल्या मुलास शिक्षण देण्याची कशी गरज आहे हे गोविंदरावांना पटवून दिले. त्याचा परिणाम म्हणून १८४१ मध्ये एका स्कॉटिश मिशनच्या शाळेत ज्योतिरावांना घातले. ज्योतिराव हुशार व करारी वृत्तीचे होते. ते मन लावून अभ्यास करीत. त्यामुळे परीक्षेत प्रथम श्रेणीचे गुण मिळवीत. २६ नोव्हेंबर १८९० रोजी म. फुले यांचे निधन झाले.

## २.अ.३ अर्थशास्त्रीय लेखन

१. गुलामगिरी १८७३

२. दीन बंधू १८७७

३. दीन मित्र १८८१

४. शेतकऱ्यांचा आसूड १८८३

## २.अ.४ विषय विवेचन

१. **शेतीविषयक विचार –** राष्ट्रामध्ये शेतीला महत्त्वाचे स्थान आहे. भारतासारख्या कृषी प्रधान देशात तर अधिक महत्त्वाचे आहे. ज्या राष्ट्रातील लोकांचा प्रमुख व्यवसाय शेती असतो त्या राष्ट्राचा विकास शेतीवर अवलंबून असतो. भारतीय शेतकऱ्यांचे प्रश्न अनेक आहेत. भारतीय शेती निसर्गावर अवलंबून आहे. त्यामुळे उतारा कमी आहे. शेतकरी सुखी, समाधानी नाही. तो कर्जबाजारी आहे. दारिद्र्यात कसं तरी जीवन जगतो. शेतकरी सैनिक आणि प्रशासकीय वर्ग या तीन आधारस्तंभावर देशातील सुस्थिती अवलंबून असते. या तीन घटकांपैकी सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून शेतकरी या घटकाचा उल्लेख करावा लागतो. या घटकाची निकृष्ठ अवस्था होती. तर सर्वात उत्कृष्ट अवस्था प्रशासकीय वर्गाची होती. सैनिकांना पगार मिळत असे आणि सरकारी अधिकाऱ्यांना पगाराबरोबर अनेक सवलती मिळत. परंतु देशाचा महत्त्वाचा आधारस्तंभ तो शेतकरी त्याची मात्र दयनीय अवस्था होती. तो कर्जाच्या दुष्ट चक्रात अडकलेला होता. त्याचे जीवन कर्ज फेडीत जात

असे. त्याचा अंतही दारिद्र्यातच होत असे. म. फुले यांनी भारतीय शेतकऱ्यांच्या दारिद्र्याची पुढीलप्रमाणे कारणे सांगितली आहेत -

१. संस्थानिकांचा अस्त - भारतात ब्रिटीश येण्यापूर्वी संस्थानिकांच्या पदरी मोठे सैन्य असे. या सैन्याचा खर्च मोठा असे. तो खर्च संस्थानिक भागवीत असे. शेतकऱ्यांवर त्याचा भार पडत नसे. परंतु संस्थानिकांचे राज्य गेल्यावर मराठी सैन्यातील लोक घरी बसले. परिणामी शेतजमिनीवरील भार वाढला. वाजवीपेक्षा जास्त लोक जमिनीवर काम करू लागल्यामुळे शेतीचे उत्पन्न कमी झाले.

२. जमिनीचे विभाजन - भारतातील वारसा हक्काच्या कायद्यामुळे जमिनीचे लहान लहान तुकडे पडत गेले. अशा लहान तुकड्यावर जमीन कसणे, उदर निर्वाह चालवणे अशक्य होई. तुकडीकरणामुळे उदरनिर्वाहाचे साधन गेले. त्यामुळे अशा जमिनी सावकाराकडे गहाण ठेवण्यात आल्या.

३. ब्रिटनमधून वस्तूंची केली जाणारी आयात - ब्रिटनमध्ये तयार होणाऱ्या वस्तू भारतात विकल्या जावू लागल्यामुळे भारतीय सुतार, लोहार यांना पूर्वीसारखे काम राहिले नाही. त्यांना विपन्नावस्था निर्माण झाली.

४. शेतकऱ्यांचे शोषण - शेतकऱ्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन शेतकऱ्यांचे शोषण केले जात असे. ब्रिटीश सरकारने शेतसारा मोठ्या प्रमाणात वाढविला. या शिवाय १८७७-७८ मध्ये दुष्काळ व जागतिक महामंदीमुळे शेतमालाचे दर कमी झाले. त्यांना आपला उदरनिर्वाह चालविण्यासाठी गुरेढोरे विकावी लागली, शेती गहाण ठेवावी लागली. वेठबिगारी म्हणून काम करावे लागले. याचा फायदा सावकारांनी घेतला. त्यांनी सर्व बाजूनी अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्याच्या जमिनी ताब्यात घेतल्या.

५. जागतिक मंदी - सन १८९० नंतर जागतिक बाजार पेठेत मंदीची परिस्थिती निर्माण झाली. शेतमालाच्या किंमती एकदम घसरल्या. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न कमी झाले. परंतु सरकारने शेतसारा माफ केला नाही.

६. जनावरांची हत्या - दुष्काळामुळे गुरांची चाऱ्याअभावी उपासमार होऊन व लाळीच्या रोगासारखे साथीचे रोग अद्भवल्याने जनावरांची हत्या होऊ लागल्या. त्यामुळे शेतीच्या मशागतीसाठी बैलाची कमतरता जाणवू लागली. त्यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होऊ लागले.

७. शेतीत सुधारणा करण्यासाठी उपाय - शेतीची उत्पादकता वाढावी, उत्पादन वाढावे, शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती सुधारावी यासाठी शेतकऱ्याला पाणीपुरवठा करावा. पावसाचे वाया जाणारे पाणी अडविले पाहिजे असे म. फुले यांनी सांगितले. टेकड्यांवर तलाव बांधावेत, नद्यांवर धरणे बांधावीत, नदीचे पाणी विहिरीत साठवावे. शेतकरी सरकारी मदतीशिवाय विहीर खोदतात त्यांना आर्थिक मदत करावी. शेतकऱ्यांच्या मुलांना शेतीविषयक शिक्षण द्यावे. खेडोपाड्यात कृषीरक्षक

योजना राबवावी. शेतीची कामे संपली की रिकाम्या वेळेत एकत्र येऊन उत्पादन वाढीवर चर्चा करावी. शेतकऱ्यांना शेती संदर्भातील पुस्तके मोफत द्यावीत, शेती विकासाकरिता कमी व्याजाने पैसे द्यावेत, पीक संरक्षणासाठी सरकारने त्यांना बंदुकी वापरण्यास परवानगी द्यावी.

## २.अ.५ शिक्षण विषयक विचार

कोणत्याही समाजात द्रुतगतीने स्थित्यंतरे घडवून आणण्यासाठी शिक्षणाचा प्रसार होणे आवश्यक असते असे म. फुले यांनी म्हंटले आहे. दीर्घ विचाराअंती मुलींकरीता शाळा काढावी असे त्यांनी ठरविले. स्त्रियांना आपल्या कर्तव्याची जाणीव योग्य प्रकारे झाली तर समाजाची व देशाची प्रगती झपाट्याने होईल असे त्यांना वाटत होते. म. फुलेंनी आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिकविले. सन १८४८ मध्ये पुणे येथे भिडेवाड्यात मुलींकरीता शाळा सुरू केली. तीत महार, मांग इ. जातीच्या मुली शिकत. मुलींना शिकविण्याचे काम सावित्रीबाई करीत. सावित्रीबाईंना शाळेत येता जाता त्रास दिला जाई. १७ सप्टेंबर १८५१ मध्ये मुलींची दुसरी शाळा व १५ मार्च १८५२ मध्ये तिसरी शाळा काढली. शेतकऱ्यांना आणि त्यांच्या मुलांना शिक्षण देण्यासाठी त्यांनी पुढील उपाय सुचविले -

१. शेतकऱ्यांच्या मुला-मुलींकरीता मोफत शिक्षण द्यावे.

२. मुलां-मुलींकरीता वसतीगृहे काढावीत.

३. मुलां-मुलींकरीता शिकविण्यासाठी कनिष्ठ वर्गातले शिक्षक नेमावेत.

४. कनिष्ठ वर्गातील शिक्षकांना प्रशिक्षण द्यावे.

५. शेतकऱ्यांच्या मुलां-मुलींना मोफत पाठ्य-पुस्तके द्यावीत.

६. शेतकऱ्यांच्या सुशिक्षित मुलां-मुलींना विलायतेतील शेतकी शाळामध्ये स्वखर्चाने शिकवावे इ.

## २.अ.६ सारांश

म. फुले यांच्या विचारांचा अभ्यास केल्यावर आपल्याला असे लक्षात येते की, शेतकऱ्यांसाठी सुचविलेल्या योजना, शेतीची उत्पादकता वाढविण्यासाठी सुचविलेले उपाय आजही उपयुक्त आहेत. आपल्या सरकारच्या योजना म. फुले यांनी सुचविलेल्या उपायावरच आधारित आहेत असे वाटते. शेतकऱ्यांचे अज्ञान दूर करण्यासाठी शिक्षणाचे महत्त्व सांगितले ते आजही उपयुक्त आहेत. म. फुले यांनी शेती, शिक्षण इत्यादी बाबत मांडलेल्या विचारावरून त्यांची दूरदृष्टी दिसून येते.

## २.अ.७ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके

१. व्ही. बी. पाटील व के. सागर पब्लिकेशन, पुणे, सप्टेंबर १९९८.

२. आर्थिक विचारांचा इतिहास - प्रा. ए. आर. रायखेलकर विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपुरा, औरंगाबाद, २००५.

३. डॉ. विजय कवीमंडन, १९९०.

४. मराठी विश्वकोश.

## २.अ.८ अभ्यासासाठी प्रश्न

१. म. फुले यांनी भारतीय शेतीविषयी मांडलेले विचार सांगा.

२. म. फुले यांनी भारतीय शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी सुचविलेले उपाय सांगा.

## २.अ.९ लघुत्तरी प्रश्न

१. शिक्षणविषयक विचार.

# (ब) छत्रपती शाहू महाराजांचे आर्थिक विचार

**अनुक्रमणिका**

२.ब. ० उद्दिष्ट्ये

२.ब. १ प्रस्तावना

२.ब. २ विषय विवेचन

२. ब. २.१ शाहू महाराजांचे आर्थिक विचार

२. ब. २.२ शाहू महाराजांचे शेती व जल व्यवस्थापन विषयक विचार

२.ब. ३ सारांश

२.ब. ४ पारिभाषीक शद्बांचे अर्थ

२.ब. ५ स्वयंम् अध्ययनासाठी प्रश्न

२.ब. ५.१ अ) गाळलेले शब्द भरा.

२.ब. ५.२ ब) चूक की बरोबर ते सांगा.

२.ब. ६ स्वयंअध्ययनाची उत्तरे

२.ब. ७ सरावासाठी प्रश्न

२.ब. ८ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.ब. ० उद्दिष्ट्ये

१) शाहू महाराजांचे आर्थिक विचार अभ्यासणे.

## २. ब. १ प्रस्तावना

राजर्षी शाहू महाराजांचा जन्म कागलच्या घाटगे घराण्यात २६ जुलै, १८७४ मध्ये झाला. त्यांच्या वडिलांचे नाव जयसिंगराव उर्फ आबासाहेब घाटगे होते. सन १८८४ मध्ये वयाच्या १० व्या वर्षी ते कोल्हापूरच्या राजघराण्यात दत्तक गेले व पुढे शाहू छत्रपती बनले. सुरुवातीला त्यांचे शिक्षण गुजरातमधील राजकोट येथे राजकुमार विद्यालयात झाले. राज्यरोहणानंतर त्यांच्या शिक्षणाची विशेष सोय करण्यात आली. तेथे सर्वसामान्य विषयाबरोबरच राज्य कारभाराला उपयुक्त अशा सर्व प्रकारच्या शिक्षणाची व्यवस्था होती.

शाहू महाराज हे १९ व्या शतकात बहुजन समाजत शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक क्रांती घडवून आणणारे लोकोत्तर राजपुरुष होते. तत्कालीन बहुजन समाज धार्मिक व सामाजिक रूढी व परंपरा, अज्ञान, अडाणीपणा, शिक्षणाचा अभाव, दारिद्र्य, जातींची उतरंड यासारख्या विविध बंधनामध्ये अडकलेला होता. परिणामी तो आर्थिक व सामाजिकदृष्ट्या मागासलेला होता. या विविध प्रकारच्या बंधनातून, समस्यामधून बहुजन समाजाची सुटका केली तरच त्यांची आर्थिक व सामाजिक प्रगती घडून येईल हे विचारात घेऊन त्यांनी कार्य केले. त्यामागे एक विशिष्ट तत्त्वज्ञान, आर्थिक व सामाजिक विचारप्रणाली होती. त्यांचा मृत्यू वयाच्या ४८ व्या वर्षी सन १९२२ मध्ये झाला.

## २.ब. २ विषय विवेचन

### २.ब. २.१ शाहू महाराजांचे आर्थिक विचार

शाहू महाराजांच्या आर्थिक विचारात पुढील विचारांचा समावेश होतो.

१) शाहू महाराजांचे शेतीविषयक व जल व्यवस्थापन विषयक विचार (Shahu's thought regarding the Agriculture)

### २.ब.२.२ शाहू महाराजांचे शेतीविषयक व जल व्यवस्थापन विषयक विचार

भारत हा शेतीप्रधान देश आहे. शेती हा भारताचा परंपरागत मुख्य व्यवसाय आहे. शेती क्षेत्राचा विकास झाल्यास शेतकरी, शेतमजूर व शेतीवर अवलंबून असणाऱ्या इतर लोकांच्या उत्पन्नात वाढ होऊन त्यांचे जीवनमान उंचवण्यास मदत होते. बहुसंख्य लोकांचे आर्थिक कल्याण होते. हे विचारात घेऊन त्यांनी करवीर संस्थानात अनेक शेतीविषयक सुधारणा राबविल्या. लोकांचे उत्पन्न व रोजगार वाढविण्यासाठी शेतीचे आधुनिकीकरण केले पाहिजे असे त्यांचे विचार होते. शेतीबाबत एका भाषणात शाहू महाराज म्हणतात, ''खेड्यातील शेतकऱ्याचे त्याच्या शेतीवर पोट भरत नाही म्हणून तो शहराकडे धाव घेऊन कारखान्यातील कामगार बनतो... म्हणून खेड्यातील शेतकीचा व्यवसाय हा आधुनिक व अधिक प्राप्तीचा झाला पाहिजे.''

या त्यांच्या विचारातून स्पष्ट होते की शेती व्यवसाय मागासलेला असल्यामुळे शेतीत शेतकऱ्यांना पुरेसे उत्पन्न मिळत नाही, परिणामी उपजिविकेसाठी ग्रामीण भागातील कामगार शहरीभागात स्थलांतर करतात. (Rural - Urban Migration) **(ग्रामीण-शहरी स्थलांतर)**. हे स्थलांतर रोखण्यासाठी शेती व्यवसाय उत्पादक झाला पाहिजे. त्यासाठी शेती व्यवसायाचे आधुनिकीकरण केले पाहिजे असे त्यांनी म्हटले.

भारतीय शेतीत सुधारणा घडवून आणण्यासाठी पाश्चिमात्य देशातील आधुनिक तंत्रज्ञानावर आधारित शेतीचे अवलोकन करून आपल्या राज्यात तशा प्रकारची शेती पद्धती राबविली पाहिजे, असे त्यांचे मत होते. त्यांचे हे विचार पुढील उदाहरणावरून व त्यांच्या कृतीतून दिसून येतात. सन १९०२ मध्ये सातव्या एडवर्ड बादशहाच्या राज्यारोहण समारंभासाठी शाहू महाराजांना इंग्लंडला जावयाचे होते तेव्हा त्यांनी १७ एप्रिल, १९०२ रोजी 'सर क्लॉड हिल' यांना पत्र लिहिले. त्या पत्रात ते म्हणतात, ''आमच्या राहण्याचे ठिकाण असे असावे की, ज्या ठिकाणी शेतकीच्या जनावरांची व कोंबडी, बदकांची पैदास, दुधदुभत्याची उत्पत्ती इत्यादी बाकीचे धंदे लहान मोठ्या प्रमाणावर चालले आहेत.''

त्यांच्या या विचारातून स्पष्ट होते की शेतीविषयक आधुनिक ज्ञान, तंत्रज्ञान व जोडधंद्याची माहिती करून घेणे व करवीर संस्थानात शेतीविषयक नवनवीन प्रयोग राबवून शेती उत्पादन वाढीला चालना देणे व शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी **नवनवीन क्षेत्रे** शोधण्याचा त्यांचा प्रयत्न होता.

शाहू महाराजांनी शेती क्षेत्राचे महत्त्व विशद करताना श्रमाला प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांचे श्रम प्रतिष्ठेचे विचार त्यांच्या एका भाषणातून स्पष्ट होतात. शेतीचे महत्त्व विशद करतानाते म्हणतात, ''कृषीकर्म इतके पवित्र आहे की वैदिक काळात वर्षातून एकदा चक्रवर्ती राजा व त्याचा मंत्रीही नांगर हाकीत असत. ज्यांच्या योगाने भूमीमध्ये एक दाना टाकून हजारो दाणे मिळतात व ज्या कृषीकर्मावर सारी मनुष्यजात उपजिवीका करते ते कृषीकर्म हलके अथवा वाईट असे मी मुळीच मानीत नाही.... आपल्याला माहिती आहे की, कृषीकर्मापासून मनुष्य जातीला सुख मिळते... कृषीकर्म करताना क्षात्रधर्माला बाधा येते असे नाही. त्यावर समाजाची सुव्यवस्था व उन्नती अवलंबून आहे हे कर्म करणारे नीच आहेत. शुद्र आहेत हे म्हणने मला मुळीच पटत नाही.''

वरील भाषणातून त्यांनी **श्रम प्रतिष्ठेचे** महत्त्व पटवून दिले, तसेच शेती हा उत्पादक व्यवसाय आहे व संपत्ती निर्मितीचा तो प्रमुख स्रोत आहे असे त्यांचे विचार होते. भूमीमध्ये एका दाण्यापासून हजारो दाणे निर्माण होतात असे जे त्यांनी म्हटले याचा अर्थ असा होतो की एका पासून अनेक निर्माण करण्याची शक्ती म्हणजे संपत्ती निर्माण करण्याची शक्ती शेती व्यवसायात आहे. शेतीत श्रम केल्यास श्रमातून संपत्ती निर्माण होते असे त्यांचे विचार होते. त्यांच्या या विचाराशी **फ्रान्समधील निसर्गवादी विचारवंतांनी** मांडलेली **आर्थिक वाढाव्याची संकल्पना (Economic Surplus)** साधर्म्य दर्शविते. तसेच त्यांची शेतीतील श्रमातून संपत्ती निर्माण होते ही कल्पना अ‍ॅडम स्मिथ, रिकार्डो व कार्ल मार्क्स यांच्या श्रममूल्य सिद्धांताशी मिळतीजुळती आहे.

शेती उत्पादन वाढीसाठी शाहू महाराजांनी करवीर संस्थानात अनेक उपाययोजना केल्या. पाणी पुरवठ्याच्या सोयी, सुधारित बी बियाणे, पीक पद्धतीत बदल, शेती संशोधनाला चालना, कृषी प्रदर्शने व त्यामधून शेतीविषयक माहितीची देवाणघेवाण इत्यादी प्रयोग त्यांनी आपल्या संस्थानात केले.

सन १८९६ च्या दुष्काळात शेतकऱ्यांना पिण्याचे पाणी उपलब्ध व्हावे व सिंचन क्षेत्रात वाढ व्हावी म्हणून गावोगावी विहिरी, तलाव खोदले. नदी, नाले, ओढे यावर गावकऱ्यांच्या सहाय्याने बंधारे बांधून शेतीला पाणी उपलब्ध करून दिले. हे बंधारे त्यांनी गावकऱ्यांच्या सहकार्याने बांधून ग्रामीण भागात **'श्रम सहकाराची संकल्पना'** राबविली. शाहू महाराजांनी कोल्हापूर इलाख्यात जे बंधारे बांधले त्यावरून आजच्या काळात महाराष्ट्र सरकार बंधारे बांधते. कोल्हापूर पद्धतीचे बंधारे ही शाहू महाराजांची आधुनिक महाराष्ट्राला दिलेली देणगी होय. दुष्काळावर कायमस्वरूपी मात करण्यासाठी राधानगरी धरणाचे बांधकाम सुरू करून करवीरची भूमी सुजलाम् सुफलाम् करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. शाहू महाराजांच्या या प्रयत्नातून करवीर संस्थानात उस शेती वाढली. त्यामधूनच आधुनिक महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारीचा पाया घातला गेला. महाराष्ट्रातील **कृषी-औद्योगिक क्रांतीचे** ते जनक ठरतात.

शेती उत्पादनवाढीसाठी शाहू महाराजांनी आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला. त्यासाठी शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धतीचे ज्ञान व्हावे, माहितीची देवाण घेवाण व्हावी म्हणून करवीर संस्थानात कृषी प्रदर्शने भरवून नवनवीन शेतीची तंत्रे, अवजारे, जनावरे यांची प्रदर्शने भरविली जाते. स्पर्धा लावल्या जात असत. बक्षिसे दिली जात असत. एप्रिल, १९१४ मध्ये पहिले शेती विषयक प्रदर्शन भरले होते. त्याच्या उद्घाटनप्रसंगी शाहू महाराज म्हणाले, ''माझ्या प्रदेशात अशा तऱ्हेचे पहिलेच मोठे प्रदर्शन भरत आहे, त्या प्रदर्शनाचा शेतकरी वर्गावर व त्याच्या कृषीकर्म पद्धतीवर सुपरिणाम घडून येईल अशी मला आशा आहे.'' शेती उत्पादन वाढीसाठी नव्या शेती अवजारांची गरज ओळखून त्यांनी एके ठिकाणी म्हटले, ''.......... देशाचे कल्याण ज्यांना करावयाचे आहे. त्यांनी प्रथमत: आपल्या शेतीच्या सुधारणेकडे लक्ष दिले पाहिजे. इतर देशांच्या मानाने आपल्या शेतीचे उत्पन्न सरासरीने पुष्कळ कमी आहे......... शेतकी सुधारणेस सुधारलेल्या औतांची फार जरुरी आहे.'' त्यांच्या या विचारावरून स्पष्ट होते की, शाहू महाराज **शेतीविषयक नव्या तंत्रज्ञानाचे पुरस्कर्ते** होते.

शेती उत्पादन वाढीसाठी शेतजमिनीचे आकारमान मोठे असावे की ज्यामुळे शेतकऱ्यांना किफायतशीर धारणाक्षेत्र उपलब्ध होऊन त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल. याबाबत त्यांनी माणगाव परिषदेमध्ये म्हटले की, ''मी सर्व बलूतेदारास व वतनदारास अशी विनंती केली की, अशी लहान लहान बलूती व वतने यांच्या मागे तुम्ही लागू नका, ती सोडून द्या व विशेष करून....... लोकांना अशी विनंती केली की तुम्ही माणशी दहा एकर जमीन वाट्याला येईल...... असे तुकडे करा व हे उत्पन्न तुमच्यातील जे वडील असतील त्यांच्याकडे...... चालवा...... असे झाल्याने बाकीच्या..... लोकांस गावात अगर बाहेर गावी धंदा करण्यास मोकळीक होईल आणि सर्वांनीच जे अर्धपोटी रहावयाचे ते ही वाचेल.'' त्यांचे हे विचार शेती उत्पादनवाढीसाठी शेतजमीनीचे मोठे व किफायतशीर धारणक्षेत्र असावे असे स्पष्ट करतात. तसेच लहान लहान शेत जमीनीचे एकत्रीकरण

करावे असे सूचित करतात. स्वातंत्र्योत्तर काळातील शेतजमीनीच्या एकत्रिकरण कायद्याचे **(Consolidation of Land Act)** प्रतिबिंब शाहू महाराजांच्या विचारात पडलेले दिसून येते.

शेती उत्पन्नवाढीसाठी शेतकऱ्यांची पीक पद्धतीत बदल करावा म्हणून शाहू महाराजांनी करवीर संस्थानात नवीन पिकांचे प्रयोग केले. शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ व्हावी म्हणून पन्हाळा व भुदरगड तालुक्यात पारंपरिक पिकांऐवजी चहा, कॉफी, वेलदोडे, कोको, रबर, राळ, बटाटे, कंबोडियन कापूस यासारख्या व्यापारी व नगदी पिकांची लागवड केली व **नवी पीक पद्धती** अंमलात आणली.

शाहू महाराजांनी शेती उत्पादन वाढीसाठी शेतकऱ्यांना १८९६ च्या दुष्काळात अल्प मुदतीची ''**तगाई**'' कर्जे उपलब्ध करून दिली. शेती सुधारण करणे, बैल, अवजारे, बीयाणे, खते, यांची खरेदी करणे, विहिरी खोदणे ही अल्पमुदतीची कर्जे दिली. सन १८९७-९८ मध्ये ३६२०१ रु., १९०६-०७ मध्ये १२५०० रु. व २६७६८ रुपयांची कर्जे दिली. शेतकऱ्यांची परिस्थिती पाहून बीन व्याजी अथवा अल्प व्याज दराची कर्जे दिली.

सन १९१२ मध्ये शाहू महाराजांनी आपल्या संस्थानात सुधारित शेती पद्धतीचा प्रसार करण्यासाठी ''**किंग एडवर्ड ॲग्रिकल्चरल इंन्स्टिट्यूट**'' ही संस्था स्थापन केली. शेती संशोधनासाठी कोल्हापूरमध्ये ''**आदर्श शेती विभाग**'' **(Model Farm)** सुरू केला. तेथे शेतीविषयक वेगवेगळे प्रयोग केले जात असत. बी-बीयाणे, खते, अवजारे याविषयी हे प्रयोग केले जात असत व ते यशस्वी झाल्यानंतर त्याची माहिती शेतकऱ्यांना दिली जात असे. बॉम्बे ॲग्रिकल्चरल डिपार्टमेंटकडून प्रकाशित होणारी पत्रके विकत घेऊन ती वेळोवेळी शेतकऱ्यांना वाटली जात असत.

शाहू महाराजांचे शेतीबाबतचे विचार व कार्ये विचारात घेऊन भारतातील **हरितक्रांतीचे (Green Revolution) जनकत्व शाहू महाराजांकडे** जाते. भारतात स्वातंत्र्यानंतर १९६०-६१ मध्ये हरितक्रांतीची सुरुवात झाली. शाहू महाराजांनी सन १८९६ च्या दुष्काळातच करवीर प्रांतात हरितक्रांतीचे प्रयोग करण्यास सुरुवात केली होती. सुधारित बी-बियाणे, खते, पाणी पुरवठ्याच्या सोयी, भांडवल पुरवठा, पीक पद्धतीत बदल, शेती संशोधन ही आजच्या हरितक्रांतीची अंगे होत. या प्रकारच्या सुधारणा त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच करवीर संस्थानात घडवून आणल्या. म्हणून खऱ्या अर्थाने **हरितक्रांतीचे जनकत्व शाहू महाराजंकडे** जाते.

## २.ब.३ सारांश

शाहू महाराज हे कोल्हापूर संस्थानचे अधिपती होते. त्यांनी १९ व्या शतकाच्या उत्तरार्धात व २० व्या शतकाच्या प्रारंभी बहुजन समाजाच्या आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, विकासासाठी मोलाचे कार्य केले. त्यांनी बहुजन समाजाच्या सर्वांगिण प्रगतीसाठी आपल्या भाषणातून व कृतीतून शेती, उद्योगधंदे,

व्यापार, दारिद्र्य निर्मूलन इत्यादीसाठी जे विचार मांडले व त्यांची अंमलबजावणी केली त्यामागे एक विशिष्ट प्रणाली होती. त्यांचे हे विचार अनेक पाश्चिमात्य विचारवंतांच्या विचारांशी साधर्म्य दर्शवितात.

**१) शेती विषयक व जल व्यवस्थापन विचार :** शाहू महाराजांनी आपल्या शेतीविषयक विचारात श्रम-प्रतिष्ठेचा विचार मांडून शेतीच्या उत्पन्नात वाढ झाल्यास शेतकरी, शेतमजूर व ग्रामीण भागातील लोकांचे उत्पन्न वाढेल व त्यांच्या राहणीमानात वाढ होईल असे म्हटले. तसेच शेती विकासामुळे ग्रामीण-शहरी स्थलांतरास आळा बसेल. परिणामी शहरीकरणाच्या समस्यांना आळा बसेल असे म्हटले. शेतीत आधुनिक तंत्र, सिंचन सोयी, सुधारित बीयाणे, शेती संशोधन, सुधारित अवजारांचा वापर, कृषी प्रदर्शने भरविणे, कर्जपुरवठा वगैरे सोयी करवीर संस्थानात उपलब्ध करून दिल्या त्यामुळे ते भारतातील हरितक्रांतीचे जनक ठरतात. त्यांनी शेती उत्पादन वाढीसाठी जमिनीच्या धारणाक्षेत्राचे मोठे आकारमानाचा पुरस्कार केला. तगाई कर्जे शेतकऱ्यांना दिली, आदर्श शेती विभाग कोल्हापूर येथे स्थापन केला.

## २.ब.४ पारिभाषीक शब्दांचे अर्थ

१) ग्रामीण शहरी स्थलांतर = रोजगारासाठी ग्रामीण भागातून शहरात कामगारांनी जाणे.

२) श्रम सहकार = सामुदायिकरित्या काम (श्रम) करणे

४) हरित् क्रांती = शेती उत्पादनवाढीसाठी नवे तंत्रज्ञान व पद्धतींचा वापर

५) उद्योगांचे विकेंद्रीकरण = वेगवेगळ्या ठिकाणी उद्योगधंदा स्थापन करणे

६) वार्ता = देशाची अर्थव्यवस्था

## २.ब. ५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न :

**अ) गाळलेले शब्द भरा.**

१) शेती व्यवसाय .......... झाला पाहिजे असे शाहू महाराजांनी म्हटले.

२) शेती क्षेत्राचे महत्त्व विशद करताना शाहू महाराजांनी ........... विचार मांडला.

३) शेतीला पाणी उपलब्ध करून देण्यासाठी १८९६ च्या दुष्काळात शाहू महाराजांनी बंधारे बांधताना ........... संकल्पना राबविली.

**उत्तरे :** (१) उत्पादक (२) श्रमप्रतिष्ठा (३) श्रम सहकार

**ब) चूक की बरोबर ते सांगा.**

१) खेड्यातील शेतकऱ्यांचे त्यांच्या शेतीवर पोट भरत नाही म्हणून ते शहरी भागात स्थलांतर करतात असे शाहू महाराजांनी म्हटले.

२) शाहू महाराजांनी शेती विकासासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला नाही.

३) शेती उत्पन्न वाढीसाठी शाहू महाराजांनी नवीन पीक पद्धतीचा पुरस्कार केला.

४) भारतातील हरितक्रांतीचे जनकत्व शाहू महाजारांकडे जाते.

**उत्तरे :** (१) बरोबर (२) चूक (३) बरोबर (४) बरोबर

## २.ब.६ सरावासाठी प्रश्न

१) शाहू महाराजांचे शेतीविषयक विचार स्पष्ट करा.

२) शाहू महाराजांचे जल व्यवस्थापन विषयक विचार सांगा.

## २.ब.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


१) S. K. Srivastava - 'History of Economic Thought', S. Chand & co. Ltd., New Delhi.

२) T. N. Najela - History of Economics Though, Shiva Lal Agrawal & Co., Agra - 3

३) Kautilya - 'The Arthastra'

४) देसाई एस. एम. - आर्थिक विचारांचा विकास

५) कृ. गो. सुर्यवंशी - 'राजर्षी शाहू महाराज - राजा व माणूस.' ग. ल. ठोकळ प्रकाशन, १००४ बुधवर पेठ, पुणे २

६) डॉ. जयसिंग पवार - 'राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ', महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी कोल्हापूर, जाने. २००१

७) संपादक मंडळ - राजर्षी शाहू गौरव ग्रंथ, शिक्षण व सेवा योजन विभाग, महाराष्ट्र राज्य मंत्रालय, मुंबई.


◈◈◈

# (क) डॉ. बी. आर. आंबेडकर

**अनुक्रमणिका**

२.क.० उद्दिष्ट्ये

२.क.१ प्रस्तावना

२.क.२ जीवन आणि कामगिरीचा संक्षिप्त परिचय

२.क.३ विषय विवेचन

२.क.३.१ डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे शेती धोरणविषयक विचार

२.क.३.२ जल धोरणविषयक विचार

## २.क.० उद्दिष्ट्ये

या घटकाच्या अभ्यासातून आपल्याला :

- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन परिचय होईल
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कामगिरीचा आढावा घेता येईल.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शेतीविषयक विचार समजावून घेता येतील.
- डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे जल धोरणविषयक विचार समजावून घेता येतील.

## २. क. १ प्रस्तावना

प्रत्येक महापुरूष त्या त्या काळाची निर्मिती असते. तत्कालिन समाज व्यवस्थेतील ज्वलंत प्रश्नांचा वेध घेऊन त्यांचे निराकरण करण्याकरिता असे महापुरूष स्वत:चे जीवन समर्पित करीत असतात. डॉ. भिमराव रामजी आंबेडकर हे असेच भारतातील एक थोर महापुरूष आहेत. आधुनिक भारताच्या संदर्भात सामाजिक क्रांतीचा विचार मांडून त्या दिशेने कृती करणारे राजकीय नेते आणि तत्त्वज्ञ म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्थान निर्विवाद आहे. जातीचा प्रश्न, समाजपरिवर्तनाच्या लढ्यात केंद्रस्थानी आणण्याचे कार्य करणारे आणि समाजाने हीन, मागास, अस्पृश्य म्हणून सतत अन्याय केलेल्या मागासवर्गाला न्याय मिळवून देणारे एक समाजक्रांतीकारक म्हणून डॉ. आंबेडकरांना ओळखले जाते. पण या कार्याबरोबरच त्यांचे भारतीय

राज्यघटनेतील योगदान आणि विविध आर्थिक प्रश्नांचा वेध घेऊन त्यावर धोरणात्मक उपाय सुचविण्याचे कार्य देखील खूप मोलाचे आहे. वर्तमानकालीन शेतीच्या दयनीय अवस्थेची व त्यास जबाबदार असणाऱ्या जलसिंचन सुविधांची अपर्याप्तता यांची कारणमीमांसा व त्यावरील प्रभावी उपाययोजना याविषयावर त्यांनी अतिशय स्पष्टपणे स्वत:ची भूमिका स्वातंत्र्यपूर्व काळातच मांडलेली होती. म्हणून इथे आपण डॉ. बी. आर. आंबेडकर यांचे शेतीविषयक आणि जल धोरण विषयक विचार समजावून घेणार आहोत.

## २.क.२ जीवन आणि कामगिरीचा संक्षिप्त परिचय :

डॉ. भीमराव रामजी आंबेडकर यांचा जन्म १४ एप्रिल, १८९१ रोजी मध्य प्रदेशातील महू येथे झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण सातारा हायस्कूल, सातारा येथे व त्यापुढील शिक्षण एल्फिन्स्टन हायस्कूल, मुंबई येथे झाले. सयाजीराव गायकवाड महाराजांनी देऊ केलेल्या शिष्यवृत्तीमधून त्यांनी बी. ए. पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. पुढे छत्रपती शाहू महाराजांनी दिलेल्या अर्थसहाय्यामधून त्यांनी 'लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पोलिटिकल सायन्स'मध्ये प्रवेश घेऊन १९२१ मध्ये त्यांनी अर्थशास्त्र विषयातील एम. एस्सी पदवी मिळविली. १९२२ मध्ये बॅरिस्टरची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर, १९२३ मध्ये लंडन विद्यापीठाने त्यांना 'डॉक्टर ऑफ सायन्स' ही पदवी बहाल केली.

पुढे १९२५ मध्ये कोलंबीय विद्यापीठास सादर केलेल्या 'द इव्होल्युशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया' या प्रबंधास त्यांना पीएच.डी. पदवी प्राप्त झाली.

डॉ. बी. आर. आंबेडकर त्या काळात अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या महार जातीत जन्माला आलेले असल्याने त्यांना आयुष्यभर अस्पृश्यतेचे चटके सहन करावे लागले. म्हणूनच त्यांनी अस्पृश्य समाजाचे प्रश्न सोडविण्यासाठी आणि त्यांचे प्रबोधन करण्यासाठी आयुष्यभर स्वत:च्या बुद्धीसामर्थ्याचा उपयोग केला. त्यांचा सामाजिक व्यवस्था व समस्या, कायदाशास्त्र, पत्रकारिता, शिक्षण, राजकीय व्यवस्था मानववंशशास्त्र आणि अर्थशास्त्र अशा अनेक विषयांमधील सखोल व प्रदीर्घ अभ्यास आणि त्याबाबतचे स्पष्ट विचार मांडण्याचे धैर्य, यांचे प्रतिबिंब त्यांच्या लेखनातून, भाषणांमधून आणि त्यांच्या राज्यघटनेच्या जडणघडणीतील अत्यंत महत्त्वपूर्ण भूमिकेतून जागोजागी व्यक्त होते. विशेषत: सैद्धांतिक व व्यावहारिक आर्थिक प्रश्न या दोन्ही बाबतीत त्यांनी अत्यंत दर्जेदार अर्थशास्त्रीय लेखन केले आहे.

त्यांच्या या सर्वंकष कार्याचा आढावा घेऊनच भारत सरकारने त्यांना १९९० मध्ये भारतातील सर्वोच्च सन्मानाची 'भारतरत्न' ही पदवी बहाल करून सन्मानित केले. ६ डिसेंबर, १९५६ रोजी दलितांच्या या महान उद्धारकर्त्याचे बुद्धचरणी महानिर्वाण झाले.

### २.१ डॉ. आंबेडकरांचे अर्थशास्त्रीय लेखन :

समाजकारण, राजकारण, धर्मकारण, पत्रकारिता आणि कायदाशास्त्र या क्षेत्रांवरील त्यांचे चिंतन आणि लेखन सामर्थ्य वादातीत असले तरी या सर्वांमध्ये त्यांचे अर्थशास्त्रीय विचार व त्यावरील लेखन यांची

व्याप्ती मोठी आहे. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे निष्णात अर्थशास्त्रज्ञ होते. त्यांचे अर्थशास्त्रावरील काही निवडक लिखान पुढीलप्रमाणे आहे.

१) ॲडमिनिस्ट्रेशन ॲन्ड फायनान्स ऑफ इस्ट इंडिया कंपनी (१९१५)

२) स्मॉल होल्डिंग्ज इन इंडिया ॲन्ड देअर रेमडीज (१९१८)

३) दि इव्होल्युशन ऑफ प्रोव्हिन्शियल फायनान्स इन ब्रिटिश इंडिया (१९२५)

४) द प्रॉब्लेम ऑफ द रूपी : इटस् ओरिजिन अँड इटस् सोल्यूशन (१९३२)

५) स्टेटस् अँड मायनॉरिटीज (१९४७)

## २.क. ३ विषय विवेचन

### २.३.१ डॉ. आंबेडकरांचे शेती विषयक विचार (धोरण) :

### ३.१ प्रस्तावना :

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मांडलेल्या आर्थिक विचारांचे सार्वजनिक आयव्यय विषयक विचार, चलनविषयक विचार, शेती व पाणी धोरण विषयक विचार आणि इतर आर्थिक विचार असे वर्गीकरण केले जाते. भारतीय शेतीक्षेत्रामधील विविध समस्या आणि त्यावरील उपाय याविषयीचे त्यांचे चिंतन अत्यंत मूलगामी असून वर्तमान काळातील भारतीय शेती क्षेत्रातील समस्या सोडविण्यास मार्गदर्शक असे आहे. डॉ. आंबेडकरांनी तत्कालीन भारतीय शेती क्षेत्राचा अत्यंत तपशिलवार अभ्यास केला होता. त्यांनी चालविलेल्या वर्तमान पत्रांमध्ये स्वत: लिहिलेल्या काही लेखांच्या आधारे तसेच त्याच्या भाषणांच्या आधारे, त्यांच्या भारतातील शेतीविषयक विचारांवर प्रकाश टाकता येतो.

'भारतातील शेतजमिनीची लहान धारण क्षेत्रे आणि त्यावरील उपाय' हा 'जनरल ऑफ द इंडियन इकॉनॉमिक सोसायटी' या मासिकात लिहिलेला लेख (१९१८), 'बहिष्कृत भारत' या वर्तमान पत्रातील 'महार व त्यांचे वतन' (दि. २, १६, ३० सप्टेंबर, १९२७) आणि खोती उर्फ 'शेतकरी वर्गाची गुलामगिरी' (३ मे, १९२९) हे अग्रलेख तत्कालीन भारतीय शेती क्षेत्रातील समस्या व त्यावरील धोरणात्मक उपाय यांचा पद्धतशीरपणे आढावा घेतात. त्यांच्या या लिखाणाच्या आधारे त्यांच्या शेतीविषयक विचारांचा घोषवारा पुढीलप्रमाणे घेता येतो.

### ३.२ शेतीची लहान धारण क्षेत्रे व त्यावरील उपाय

भारतातील शेतीच्या लहान धारण क्षेत्रामुळे निर्माण होणाऱ्या समस्या व त्यावरील उपाय याविषयीचे त्यांचे विचार म्हणजे भारतीय शेतीवरील अत्यंत मूलभूत अशा प्रकारचे भाष्य मानले जाते. या विचारांची दखल घेऊनच एफ. जी. एच. ॲन्डरसन यांनी त्यावेळी (१९२७) मुंबई कायदेमंडळात 'अल्पभूधारक मदत

विधेयक' मांडले. पुढे १९५० च्या दशकात विविध राज्यांनी संमत केलेले जमीन सुधारणा कायदे आणि १९६७-६८ मधील हरित क्रांती कार्यक्रम, डॉ. आंबेडकरांच्या विचारांवरच आधारित होते.

लहान धारण क्षेत्र म्हणजे अनेक लहान-लहान तुकड्यांमध्ये विभागलेली शेतजमिन होय. त्यालाच मोठ्या धारण क्षेत्राचे विखंडन असेही म्हणतात. भारतीय शेतीमध्ये लहान धारण क्षेत्रे का निर्माण होतात ? तसेच किफायतशीर धारण क्षेत्र कसे ठरवायचे ? आणि लहान धारण क्षेत्राच्या शेतीच्या समस्या कशा सोडविता येतील ? या तीन प्रश्नांची डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सविस्तर चर्चा केली आहे. त्यांच्या मते केवळ वारसा हक्कामुळे शेतीचे लहान लहान तुकडे होतात असे नाही. खरे तर शेतीवरील लोकसंख्येचा भार (ओझे) वाढल्याने आणि उपजिविकेचे इतर कोणतेही साधन नसल्याने शेतीचे धारण क्षेत्र लहान-लहान होत जाते. किफायतशीर धारण क्षेत्र कसे ठरवायचे? या प्रश्नाचे उत्तर देताना डॉ. आंबेडकर असे म्हणतात की, शेतीची कार्यक्षमपणे मशागत करण्यासाठी शेतकऱ्यांकडे आवश्यक असणारी साधनसामग्री आणि संबंधित शेतीचे धारण क्षेत्र यात मेळ बसत असेल तर ते जमिनीचे धारण क्षेत्र किफायतशीर आहे, असे मानता येईल. भारतातील लहान धारण क्षेत्राच्या समस्येवरील उपाय म्हणजे देशात औद्योगिकरण घडवून आणणे होय. औद्योगिकरणामुळे शेती क्षेत्रामधील श्रमिकांना कारखानदारी क्षेत्रात सामावून घेतले जाईल. त्यामुळे शेतीवरील लोकसंख्येचा भार कमी होऊन शेतीचे पुढे होणारे विभाजन व विखंडन टाळता येईल.

भारतातील शेतीमधील लहान धारण क्षेत्राच्या प्रश्नावर डॉ. आंबेडकरांनी स्वातंत्र्यपूर्व काळातच किती मूलभूत व परिणामकारक उपाय सुचविले होते, याचे प्रत्यंतर यातून मिळते.

### ३.३ सहकारी शेती :

भारतातील शेतीची समस्या सोडविण्यासाठी त्यांनी सहकारी पद्धतीने शेती करणे हा उपाय सुचविला आहे. त्यांच्या मते, सहकारी शेती पद्धतीद्वारे शेतकऱ्यांचा जमिनीवरील मालकी हक्क अबाधित ठेवता येतो. तसेच मुख्य म्हणजे छोट्या शेतकऱ्यांना विनाशापासून वाचविता येते. सहकारी शेती पद्धतीद्वारे शेतजमिनीचे प्रमाणित आकारमान वाढविता येते.

### ३.४ सामुदायिक शेती :

भारतीय शेती क्षेत्रातील समस्या सोडविण्यासाठी सहकारी शेती पद्धतीप्रमाणेच सामुदायिक शेती पद्धतीचा स्वीकार करणे उपयुक्त ठरेल, असे डॉ. आंबेडकर यांना वाटते. सामुदायिक शेती पद्धती म्हणजे, सरकारने जमिनी ताब्यात घेऊन, तिचे ठराविक आकाराचे भाग करून ते गावातील रहिवाश्यांना कसण्यासाठी देणे होय. अशी सामुदायिक शेती पद्धती आणल्यास कुणीही जमिनदार असणार नाही आणि कुणीही कूळ अथवा शेतमजूर असणार नाही. त्यामुळे सर्व जातीच्या लोकांना सामुदायिक शेतीमध्ये सामावून घेतले जाईल.

सामुदायिक शेतीचा प्रयोग कसा राबविता येईल, याविषयी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सविस्तर स्पष्टीकरण दिले आहे. कुळ कायद्यांची अंमलबजावणी करून आणि जमिनदारी पद्धतीचे उच्चाटन केल्यानंतर

उपलब्ध होणारी शेतजमिन शेतकऱ्यांच्या व्यक्तिगत मालकीची न करता, ती सरकारच्या मालकीची करावी आणि अशा जमिनी भुमिहिनांना सांघिकपणे सामुदायिक तत्त्वावर कसण्यासाठी द्याव्यात. त्याच्या मते, अशा सामुदायिक शेतीच्या प्रयोगाद्वारे शासनसंस्थेचा आर्थिक व्यवहारामधील हस्तक्षेप वाढविता येईल. आंबेडकरांच्या या योजनेला (विचारांना) 'शासकीय समाजवाद' (State Socialism) असे नाव दिले जाते.

### ३.५ महार वतन :

इंग्रजांच्या राजवटीत एक वतन कायदा अस्तित्वात होता. त्यात गावचे पाटील, कुलकर्णी व महार हे गाव कामगार मानले जात असत. पैकी महार जातीच्या लोकांना पाटील व कुलकर्णी सांगतील ते काम करावे लागे. त्यात महारांवर अनेक पद्धतीने अन्याय केला जात असे. हे थांबावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मुंबई विधीमंडळात १९२८ मध्ये महार वतन कायद्यात दुरूस्ती सुचविली. त्यानुसार गावपातळीवरील महार वतन खालसा करावे असे त्यांनी सुचविले. तसेच पुढे १९३९ मध्ये महारांच्या वतनी जमिनी रयतवारी जमिनी कराव्यात, महारांना सरकारी नोकराचा दर्जा द्यावा, त्यांना मासिक वेतन द्यावे, महार वतनी कायदा व वतनी पद्धती ही भारतीय राज्यघटनेच्या तरतूदीस अनुसरून नाही म्हणून तो रद्द करावा अशा मागण्या केल्या.

सामाजिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणण्याच्या मार्गातील एक उपाय या दृष्टिकोनातून आंबेडकरांनी महार वतन कायद्यात सुधारणा करण्याचा आग्रह धरला होता.

### ३.६ खोती पद्धती :

मुंबई इलाख्यातील (रत्नागिरी, ठाणे, कुलाबा) काही भागातील खोती पद्धतीच्या शेतीला विरोध करून ती रद्द करण्यासाठी डॉ. आंबेडकरांनी १९३७ मध्ये मुंबई कायदेमंडळात एक विधेयक मांडले. तत्कालीन खोती पद्धती व रयतवारी पद्धतीमधील फरक त्यांनी विषद केला. खोती पद्धतीमध्ये खोत जमीन महसूल वसूल करून तो सरकारला भरत असे. पण त्यात तो जमीन करणाऱ्यांवर अन्याय करीत असे. शेतकऱ्यांकडून स्वत:च्या शेतीची कामे करवून घेत असे. त्यांचे शोषण करीत असे. म्हणून खोती पद्धतीचे समूळ उच्चाटन झाले पाहिजे असे त्यांचे मत होते. खोती पद्धती रद्द केल्याने शासन व शेतकरी यांचा प्रत्यक्ष संबंध प्रस्थापित होईल, असे त्यांना वाटत होते.

आंबेडकरांचे खोती पद्धती रद्द करण्याविषयीचे विधेयक म्हणजे स्वातंत्र्योत्तर काळात देशात करण्यात आलेल्या जमीन सुधारणा विषयक कायद्यांची सुरुवात मानली जाते.

### ३.७ सारांश :

भारतातील शेती क्षेत्रामधील अनेक महत्त्वाच्या तसेच प्रादेशिक पातळीवरील समस्यांचा डॉ. आंबेडकरांनी बारकाईने अभ्यास केला होता. शेती क्षेत्रातील प्रश्न व शेतजमिन सुधारणा विषयक त्यांचा दृष्टिकोन आर्थिक व सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याच्या बाबतीत महत्त्वाचा मानला जातो. 'शेती

समस्यांवर औद्योगिकीकरण घडवून आणणे हा खात्रीलायक उपाय आहे' असे त्यांनी प्रतिपादन केले, ते अनेक अर्थाने महत्त्वपूर्ण होते.

## ४.क.४ सारांश :

स्वतंत्र भारताचे जलविषयक धोरण कसे असावे ? याबाबत डॉ. आंबेडकरांनी मांडलेले विचार सरकारला खपूच मार्गदर्शक आहेत. भारताच्या जलविषयक धोरणावर डॉ. आंबेडकरांच्या शास्त्रीय, वस्तुनिष्ठ, अभ्यास तरीदेखील मूलत: मानवतावादी दृष्टिकोनाचा प्रभाव होता. याविषयी श्री. सी. एच. भाभा (१९४६) आणि प्रा. एच. सी. हर्ट यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांविषयी गौरवपूर्ण उद्‌गार व्यक्त केले आहेत.

## ४.क.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न :

अ) डॉ. आंबेडकरांच्या शेतीविषयक विचारांचा आढावा घ्या.

◈◈◈

# (ड) श्री दादाभाई नौरोजी

## २.ड.० उद्दिष्ट्ये

१. या घटकांच्या अभ्यासातून आपल्याला दादाभाई नौरोजी यांचा जीवन परिचय होईल.

२. दादाभाई नौरोजी यांनी मांडलेला निस्सारण सिद्धांताचा अभ्यास करता येईल.

## २.ड.१ प्रस्तावना

भारतीय राष्ट्रीयत्वाचे जनक आणि भारतात स्वयंशासन पद्धतीचे समर्थक म्हणून त्यांना ओळखले जाते. भारतीयांत सामाजिक आणि राजकीय सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टीने त्यांनी अनेक संस्था स्थापन केल्या. नौरोजी यांनी आपल्या भाषणातून व लिखाणांतून भारतातील ब्रिटीश राज्यकारभारातील उणिवांची जाणीव ब्रिटीशांना करून दिली.

### जीवन आणि कामगिरीचा संक्षिप्त परिचय

भारतीय स्वातंत्र्य संग्रामातील एक अग्रणी नाव म्हणून त्यांचे नाव घेतले जाते. दादाभाई नौरोजी यांचा जन्म ४ सप्टेंबर १८२५ रोजी मुंबई येथे एका गरीब पारशी कुटुंबात झाला. त्यांचे वडील लहानपणी वारले. मोठ्या कष्टाने आईने त्यांना वाढविले. त्यांचे प्राथमिक शिक्षण मुंबईमधील नेटिव्ह एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत झाले. या शाळेत मोफत शिक्षण दिले जात होते. पारशी लोकांच्या प्रथेनुसार दादाभाई नौरोजी यांचा विवाह वयाच्या १२ व्या वर्षी, सोराबजी शरीफ यांच्या ७ वर्षीय कन्या गुलबाई यांच्याशी झाला. १८४५ साली ते एलफिन्स्टन महाविद्यालयातून ते पदवीधर झाले. या महाविद्यालयात ते गणित व तत्वज्ञान या विषयाचे सहाय्यक प्राध्यापक होते. महाविद्यालयीन शिक्षण घेत असताना त्यांना अनेक पुरस्कार मिळाले. इंग्लडंच्या लोकसभेसाठी (पार्लमेंट) निवड होणारे पहिले भारतीय होते. ते वित्त आयोगाचे सदस्य म्हणून काम करणारे पहिले भारतीय होते. त्यांनी कांही काळ बडोदा संस्थानचे दिवाण म्हणून कार्य केले.

१८७५ मध्ये मुंबई नगरपालिकेचे सभासद होते व सन १८८६, १८९३ व १९०३ ही तीन वर्ष राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष होते. नौरोजी यांनी आपल्या भाषणातून आणि लिखाणातून ब्रिटीश राज्यकारभारातील उणीवांची जाणीव करून दिली. नौरोजी यांनी लघु उद्योगांच्या व शेतीच्या विकासासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे असे सांगितले. भारतीय शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारावी यासाठी सरकारने जमिनीवर आकरलेला कर कमी करावा तसेच सिंचनांच्या सोयीत वाढ करावी असे विचार मांडले. सन १९१६ मध्ये

मुंबई विद्यापीठाने दादाभाई नौरोजी यांना डॉक्टर ऑफ लॉ (Doctor of Law) ही पदवी बहाल केली. २३ ऑगस्ट १९१७ मध्ये अल्पशा आजाराने दादाभाई मरण पावले.

### अर्थशास्त्रीय लेखन

**1) Poverty and British Rule in India (1901)**

दादाभाई नौरोजी यांचे आर्थिक विचार

दादाभाई नौरोजी यांचे व्यक्तिमत्व चौफेर होते. त्यांनी अर्थकारण, राजकारण इ. बाबत विचार मांडले. त्यांनी मांडलेल्या निस्सारण सिद्धांताचा आपणास अभ्यास करावयाचा आहे.

### निस्सारण सिद्धांत (Drain Theory)

दादाभाई नौरोजी यांनी मांडलेल्या सिद्धांतातील सर्वात महत्त्वाचा हा सिद्धांत आहे. हा सिद्धांत मांडून त्यांनी इंग्रजांची राज्यकारभार पद्धती भारताला कशी हानीकारक आहे हे स्पष्ट केले. इंग्रजांच्या राज्यकारभाराचा खर्च हीच मोठी भारताच्या साधनसामुग्रीला लागलेली गळती होय. इंग्रजांनी आकारलेले कर, येथील परराष्ट्रीय व्यापार आणि भारतातील मुलकी सेवांचे स्वरूप यांचे शास्त्रीय विश्लेषण करून नौरोजी यांनी आर्थिक शोषणाचे स्वरूप स्पष्ट केले. ज्याप्रमाणे एखाद्या ठिकाणी जमा असलेले पाणी वाहून जाने त्याप्रमाणे भारताची संपत्ती इंग्लड मध्ये नेली जात होती. म्हणूनच या प्रक्रियेला नौरोजी यांनी गळती किंवा निस्सारण असे नाव दिले.

### आर्थिक गळतीची व्याख्या

भारताला कोणताही लाभ न देता भारताच्या आयात-निर्याती मधील अधिक वाढावा, फक्त केवळ ब्रिटीशांच्या फायद्यासाठी वापरण्याच्या धोरणास आर्थिक गळती असे म्हणतात.

### निस्सारणाचे स्वरूप

दादाभाई नौरोजींच्या मते कोणत्याही देशात सरकार द्वारे जे उत्पन्न उभारले जाते ते पूर्णपणे लोकानाच परत केले जात असल्याने देशातच राहते. त्यामुळे देशातील उत्पादन त्यावर अवलंबून असते ते भांडवल कमी होत नाही. भारतात मात्र इंग्रजांचे राज्य असल्यामुळे असे घडत नव्हते. भारतात दरवर्षी उभारल्या जाणाऱ्या ५ कोटी पौंड उत्पन्नापैकी साधारण २ कोटी पौंड उत्पन्न इंग्लडमध्ये जात होते. त्यामुळे भारताची उत्पादनक्षमता कमी होत चालली होती. ही संपत्ती इंग्लंडमध्ये जाण्याची क्रिया वर्षानुवर्षे चालू असल्याने भारताचे भांडवल दिवसेंदिवस कमी होत होते आणि भारतात मात्र दारिद्र्य वाढत होते.

**गळतीची कारणे**

भारतातून विविध प्रकारे संपत्ती कशी वाहत जाते याची कारणे दादाभाई नौरोजी यांनी सांगितली आहेत. ती पुढीलप्रमाणे -

**१) भारतातून होणारी निर्यात**

दादाभाई नौरोजींच्या मते १८४९-५० ते १८९४-९५ या काळात भारतातून ५२.६७ कोटी पौंड किंमतीची निर्यात होत होती. या निर्यातीमध्ये चहा, कॉफी, मसाल्याचे पदार्थ, कोको इत्यादींचा समावेश असे. या निर्यात होणाऱ्या वस्तूंच्या बदल्यात आपणाला कांहीच मिळत नसे.

**२) परदेशात जाणारा नफा**

भारतातून प्राथमिक वस्तूंची इंग्लडला निर्यात केली असे. या निर्याती मधून मिळणारा नफा इंग्लडला मिळत होता. १०% दराने हिशोब केला तरी ही रक्कम २८.५० कोटी पौंड होती.

**३) इंडिया ऑफीस खर्च (गृहखर्च)**

भारता आणि इंग्लड या दोन देशातील राजकीय, प्रशासकीय आणि व्यापारी संबंध ठेवण्याचा खर्च भारत सरकारला करावा लागत असे. दोन देशातील परस्पर संबंध ठेवण्यासाठी भारत सरकारला दरवर्षी कराव्या लागणाऱ्या खर्चास गृहखर्च असे म्हणतात. सामान्यपणे भारत सरकारला दरवर्षी भारताच्या आयात-निर्याती मधील आधिक्याचा / वाढण्याचा उपयोग गृहखर्चासाठी करावा लागत असे. त्या काळात भारताची निर्यात-आयातीपेक्षा सतत जास्त होती. तरी देखील भारताला या आधिक्याचा / वाढण्याचा उपयोग आर्थिक विकासासाठी करता आला नाही.

**४) ब्रिटीश अधिकाऱ्याचे पगार व निवृत्तीवेतन**

सुखी संपन्न व सोन्याचा धूर निघणारा भारत त्यांनी हेतुपूरस्पर दरिद्री नबविला. ईस्ट इंडिया कंपनी व ब्रिटीश सरकार भारतातील राज्य चालविण्यासाठी प्रशासन खात्यात आणि लष्करी खात्यात ब्रिटीश नागरिकांची मोठ्या प्रमाणात नियुक्ती करीत असे. अशा ब्रिटीश आधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना अधिक सोयी सवलती देण्याचे ब्रिटीश सरकारचे धोरण होते. या सोयी सवलतीचा आर्थिक भार भारतातील जनतेवर पडत असे त्यामध्ये ,

१. ब्रिटीश कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या संगोपनासाठी व शिक्षणासाठी खास मदत भारत सरकारला करावी लागत असे.

२. भारतातील ब्रिटीश कर्मचाऱ्यांचा पगार, निवृत्ती वेतन व इतर भत्ते भारत सरकारला पौंड, स्र्टर्लींग या चलनात द्यावे लागत असे.

३. ब्रिटीश कर्मचाऱ्यांची बचत पौंड, स्टर्लींगच्या स्वरूपात ब्रिटनमध्ये वाढविण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली होती.

### ५) युद्ध खर्चात झालेली वाढ

ब्रिटीशांनी केलेल्या युद्धामध्ये मैसूरचे युद्ध, मराठा युद्ध, अफगाणिस्तान बरोबरचे युद्ध इ. चा समावेश होतो. या युद्धातील खर्च भारतावरच लादण्यात आला.

### ६) सेवा खर्च

सेवा मध्ये रेल्वे, जहाज भाडे, बंदरे इ. चा समावेश होतो. रेल्वे, जहाज, भाडे व बंदरे इत्यादींमधून मिळणारे भारताचे उत्पन्न इंग्लडलाच मिळे.

याशिवाय कर्जावरील व्याज, व्यापारी धोरणातून मिळविलेला प्रचंड नफा, ब्रिटीश भांडवली गुंतवणूक ही कारणे होत.

वरील कारणांमधून आर्थिक शोषण केले जात असे.

### निस्सारणाचे आर्थिक परिणाम

भारतामधून इंग्लडला झालेल्या संपत्तीच्या निस्सारणा मुळे अनेक वाईट परिणाम घडून आले. त्यांना निस्सारणाचे आर्थिक परिणाम असे म्हणतात.

आर्थिक शोषनाने भारताच्या दारिद्र्यात वाढ झाली. बरेच लोक बेकार झाले. भारत देश दरिद्री बनला. भारतातील हस्त उद्योग नष्ट झाला. त्यामुळे शेतीवर अवलंबून असणारी लोकसंख्या वाढली. भारत कच्चा माल निर्यात करणारा व पक्का माल आयात करणारा देश बनला. त्यामुळे भारतीय उद्योगधंदे नष्ट झाले. उद्योगांचे आधुनिकरण झाले नाही. औद्योगिक विकास थांबला. विकास दर मंदावला, उत्पादन क्षमता वाढली नाही. थोडक्यात, ब्रिटीशांनी भारताचे आर्थिक शोषण मोठ्या प्रमाणात केले. त्यामुळे भारत देश दरिद्री बनला.,

## सारांश

ब्रिटीश सरकार भारताची जी अधिकृतपणे लूट करीत होते तीच भारताच्या दारिद्र्याचे एकमेव कारण आहे असे परखड मत दादाभाई नारोजी यांनी मांडले.

## स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) गाळलेले शब्द भरा.**

१. दादाभाई नौरोजी यांचा जन्म ........... साली झाला.

२. १९१६ मध्ये .......... विद्यापीठाने दादाभाई नौरोजी यांना डॉक्टर ऑफ लॉ ही पदवी दिली ?

३. इंग्रजांचा राज्यकारभाराचा खर्च हीच मोठी भारताच्या साधनसामुग्रीला लागलेली .......... होय.

४. दादाभाई नौरोजी यांनी .............. मांडलेला सर्वात महत्त्वाचा सिद्धांत होय.

**उत्तरे :** १) १८२५, २) मुंबई, ३) गळती, ४) निस्सारण सिद्धांत

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. दादाभाई नौरोजी यांच्या निस्सारण सिद्धांताचे स्पष्टीकरण करा.

**क) लघुत्तरी प्रश्न**

१. आर्थिक गळती म्हणजे काय ?

२. गळतीची कारणे सांगा.

३. निस्सारणीचे आर्थिक परिणाम सांगा.

◈◈◈

# घटक ३

# महात्मा गांधी (१८६९-१९४७)

## अनुक्रमणिका


३.१ उद्दिष्ट्ये

३.२ प्रस्तावना

३.३ जीवन आणि कामगिरीचा संक्षिप्त परिचय

३.४ महात्मा गांधीचे अर्थशास्त्रीय लेखन

३.५ विषय लेखन

१. खेड्यांच्या विकासाची संकल्पना

२. विकेंद्रीकरणाचे महत्त्व

३. व्यक्तिमत्व विकासाची तत्वे

४. ग्रामस्वराज्य

३.६ सारांश

३.७ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


## ३.१ उद्दिष्टे

या घटकाच्या अभ्यासातून आपल्याला -

१. महात्मा गांधींचा जीवन परिचय होईल.

२. महात्मा गांधींचे खेड्यांचा विकास हे विचार समजावून घेता येतील.

३. महात्मा गांधींचे केंद्रीकरण विषयक विचार समजावून घेता येतील.

४. महात्मा गांधींचे विकासाची मूलभूत तत्वे समजावून घेता येतील.

५. महात्मा गांधींचे ग्राम स्वराज्य विषयक विचार समजावून घेता येतील.

## ३.२ प्रस्तावना

आधुनिक भारतीय आर्थिक विचारसरणीत महात्मा गांधींचे स्थान महत्त्वाचे आहे. गांधींचे आर्थिक विचार त्यांच्या लिखाणातून व भाषणामधून स्पष्ट होतात, ते विखुरलेले आहेत.

## ३.३ जीवन आणि कामगिरीचा संक्षिप्त परिचय

महात्मा गांधींचे पूर्ण नाव मोहनदास करमचंद गांधी असे आहे. त्यांचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ रोजी गुजरातमधील पोरबंदर येथे झाला. त्यांचे विद्यार्थी जीवन फारसे उज्ज्वल नव्हते. कोणत्या शाळेत घातले होते ते सुद्धा आठवत नव्हते. त्यांना कसेबसे काही पाढे येत होते. सन १८८७ मध्ये मैट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांच्या बंधूनी त्यांना इंग्लंडला पाठवले. त्यानंतर त्यांच्या जीवनाला नवीन दिशा मिळाली. त्यांनी कायद्याची पदवी घेतली. महात्मा गांधी यांच्या आर्थिक विचारावर ना. गोखले, जॉन रस्कीन यांच्या ग्रंथांचा व भगवतगीता या ग्रंथांचा प्रभाव होता. टॉलस्टॉय, रस्कीन आणि ओरो यांचा त्यांना जवळऊन परिचय होता. ते अहिंसेचे पुजारी होते. दक्षिण आफ्रिकेतील हिंदी लोकांना न्याय मिळवून त्यांचे सर्व प्रयत्न म्हणजेच सत्याचे प्रयोग होते. दक्षिण आफ्रिकेत वर्षभर राहण्याच्या इराद्याने तेथे गेलेले गांधी २० वर्षे राहिले. या कालावधीत अहिंसात्मक लढ्यामुळे गांधींचे नेतृत्व प्रस्थापित झाले.

पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीच्यावेळी गांधीजीनी भारतीय राजकारणात प्रवेश केला. 'जालीयनवाला बाग हत्याकांड' व 'रौलेट कायदा' या प्रकरणी ब्रिटीश सरकार विरूद्ध १९२१ साली केलेल्या असहकाराच्या अहिंसात्मक आंदोलनाने देशात नवचैतन्याची लाट उसळली. भारतात गांधीजीनी पद्धतशीरपणे व सूत्रबद्धरित्या चळवळ उभी करण्याचा प्रयत्न केला. १९३० साली दांडी यात्रा, १९४० मध्ये सविनय कायदेभंग चळवळ, १९४२ मध्ये चले जाव चळवळ आणि आंदोलनाच्या सहाय्याने १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले.

सन १९४८ मध्ये त्यांची हत्या झाली त्यामुळेच सत्य, धर्म, प्रेम अहिंसा या तत्वांनी जगभरात उसळी घेतली.

## ३.४ महात्मा गांधींचे अर्थशास्त्रीय लेखन

१. सत्याग्रह १९१९

२. 'यंग इंडिया' व 'नवजीवन' १९२०

३. माझे सत्याचे प्रयोग १९२७

४. हरिजन - १९३३.

## ३.५ विषय लेखन

या घटकांमध्ये आपण महात्मा गांधींनी जे आर्थिक विचार मांडले आहेत त्यांचा सखोल अभ्यास करणार आहोत. महात्मा गांधीनी पुढील प्रमुख विचार मांडले आहेत -

### १) खेड्यांच्या विकासाची संकल्पना

खरे म्हणजे आम्हाला शहरी आणि ग्रामीण यापैकी एकाला निवडावे लागेल. भारताच्या आर्थिक प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना हे माहित आहे की प्राचीन भारतात खेडी स्वयंपूर्ण होती. या खेड्यातील शेती समृद्ध होती. खेड्यातील उद्योगाद्वारे लोकांच्या गरजांची पूर्तता होत असे. ग्रामीण भागातील लोक कामासाठी शहरी भागाकडे जाणे-येणे असा प्रकार त्या काळात नव्हता. याचाच अर्थ लोकांचे जीवन परिपूर्ण होते म्हणूच महात्मा गांधी असे म्हणत की खरा भारत खेड्यात नांदतो. म्हणूनच खेड्याकडे चला असा संदेश गांधीजींनी दिला.

गांधीनी खेड्यांच्या उत्क्रांत होण्याकडे लक्ष केंद्रित केले. त्यांची या संदर्भात सर्वोदय ही संकल्पना विचारात घेणे महत्त्वाचे आहे. खेड्यांची रचना पूर्णत: आरोग्यदायी असावी. सर्व झोपड्यांतून भरपूर हवा व सूर्यप्रकाश खेळत रहावा. ५ मैलाच्या (८ कि.मी.) परिसरात प्राप्त होणाऱ्या साधनांच्या सहाय्याने झोपड्या बांधल्या जाव्यात. त्यांच्या पुढेमागे पुरेसे अंगण रहावे. गुरे बांधण्याची आणि स्वत:चा भाजीपाला उगवण्याची सोय राहील. वाटांवर धूळ नसावी. पुरेशा विहिरी आणि तळी सर्वांना खुली असावीत. सर्वांसाठी प्रार्थना मंदिर, सभागृह इत्यादी असावे.

भारताचा विकास होण्यासाठी प्रत्येक खेडी ही आर्थिक दृष्ट्या संपन्न व्हावीत. त्यासाठी खेड्यांची रचना नियोजनबद्ध व व्यवस्थाबद्ध असावी. खेड्यामध्ये धर्मशाळा असावी. आरोग्य विषयक सुविधा पुरविणारे दवाखाने असावेत. खेडी अन्न, वस्त्र, निवारा या बाबत स्वयंपूर्ण असावीत. प्रत्येक खेड्यात मूलभूत शिक्षण सुविधा असाव्यात. शिक्षण सक्तीचे असावे. वाहतूक व दळणवळण साधने विकसित व्हावीत. स्वच्छ पाणी पुरवठा व्हावा, करमणूक केंद्रे असावीत, सांडपाण्याचा निचरा व्यवस्थित व्हावा. सर्व व्यवहार सहकारी तत्वानुसार चालवले जावेत. प्रत्येक खेड्यातील जातीव्यवस्था नष्ट व्हावी. खेड्यातील उत्पादन स्थानिक बाजारपेठेत उपलब्ध व्हावे. असे झाले तरच भारतातील खेड्यांचा विकास होईल असे महात्मा गांधीचे मत होते. परंतु आदर्श खेडी निर्माण करणे म्हणावे तितके सोपे नसल्यामुळे खेड्यांचे पुनर्जीवन व्हावयास हवे असे ते म्हणत.

### २) विकेंद्रीकरणाचे महत्त्व

विकेंद्रीकरण म्हणजे वेगवेगळ्या ठिकाणी लहान प्रमाणावरील उत्पादन व लोकांच्या घरामध्ये केले जाणारे उत्पादन होय. महात्मा गांधीनी विकेंद्रीत अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला. वस्तूचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर अनेक ठिकाणी पसरलेले असावे. त्यांच्या मते उत्पादनाचे विकेंद्रीकरण झाले तर ग्राहकांची वाढ मोठ्या प्रमाणावर होईल. गांधींचा मोठ्या उद्योगांना तात्विक विरोध असला तरी त्यांनी मोठ्या उद्योगांना

मान्यता दिली होती. मोठ्या उद्योगामुळे लहान उद्योग नष्ट होणार नाहीत अशी त्यांची अट होती. यांत्रिकीकरणाला त्यांचा विरोध नव्हता. जीवनाची समृद्धी जीवनाच्या व्यापकतेने मर्यादित रहावी, अर्थकारण हे अनर्थाचे मूळ ठरू नये. ग्रामोद्योगाना संरक्षण दिले पाहिजे. आपल्या देशात भांडवलाची कमतरता असल्यामुळे कमी भांडवलामध्ये लहान उद्योग सुरू करून बेकारीचा प्रश्न दूर करू शकू असा त्यांचा विश्वास होता. लहान उद्योगांचा नियोजनपूर्वक विकास घडवून आणणे ही काळाची गरज आहे. असे त्यांचे मत होते. खेडी हा भारताचा केंद्रबिंदू आहे. या खेड्यांचा विकास होणे आवश्यक आहे. या खेड्यांच्या पुनरूज्जीवनासाठी संपन्न शेती, उद्योगांचे विकेंद्रीकरण, छोट्या सहकारी संस्था व त्यांचे व्यवस्थापन यावर भर देणे महत्त्वाचे आहे. आज लहान उद्योग ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर सुरू करण्याची गरज आहे. आपल्या देशात भांडवलाची कमतरता असल्यामुळे कृषीवर आधारित उद्योग सुरू केले जावेत. लहान-लहान उद्योगांचा नियोजनपूर्वक विकास घडवून आणणे यासाठी विकेंद्रीकरण महत्त्वाचे आहे.

### ३) व्यक्तिमत्व विकासाची तत्वे

गांधींजीचा अर्थशास्त्राचा अभ्यास हा त्यांच्या नैतिक व अध्यात्मिक सिद्धांतावर आधारलेला आहे. सर्वांच्या कल्याणात आपले कल्याण आहे. साधे अंगमेहनतीचे जीवन हेच खरे जीवन आहे असे त्यांनी सांगितले. गांधींच्या मते, प्रत्येकाने साधे जीवन जगण्याचा प्रयत्न करावा. असे केले तर सर्व प्रश्न आपोआप सुटतील, साध्या राहणीचा व उच्च विचारसरणीचा पुरस्कार गांधीनी केला. साधेपणा व समाधानाची वृत्ती अंगी बाळगली पाहिजे. भौतिक गरजा वाढवीत जाऊन त्या मिळविण्याची हाव न बाळगणे व इतरांना जे मिळत नाही ते आपल्यालाही नको अशी वृत्ती जोपासणे हे व्यक्तीच्या जीवनाचे सूत्र असले पाहिजे. सुखाची अवस्था ही मानसिक अवस्था असते. आज प्रत्येक व्यक्तीने सचोटी, प्रामाणिकपणा व संयम यात सुसंगती ठेवली पाहिजे.

सत्य आणि अहिंसा या दोन गोष्टी व्यक्तीच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. गांधीजी अहिंसा ही सर्वश्रेष्ठ ताकत मानीत.

गांधीजींच्या व्यक्तिमत्व विकासात मानवी मूल्यातील बदल अपेक्षित आहे. त्यांनी पैसा व भौतिक संपत्तीपेक्षा नैतिक व मानवी मूल्यावर अधिक भर दिला. मानवी जीवनाचा सर्वांगीण अभ्यास केला पाहिजे. माणूस सर्वोच्च विचारवंत असल्यामुळे त्याचे जीवन पैशापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे.

### ४) ग्रामस्वराज्य

ग्रामस्वराज्याची कल्पना अशी आहे की ते एक पूर्ण लोकतंत्र असेल. त्यात कोणतेही गाव आपल्या प्राथमिक गरजांबाबत शेजाऱ्यावर विसंबून असणार नाही आणि तरीही इतर गरजांसाठी जेव्हा शेजाऱ्यांचे सहकार्य आवश्यक असेल तेव्हा ते करील. प्रत्येक खेडे प्रथम स्वत:च्या गरजेपुरते खाद्य आणि वस्त्र प्रावरणाना पुरेल इतका कापूस पिकवित. गुरांना चरण्यापुरती आणि गावकऱ्यांना व त्यांच्या मुलाबाळांना खेळ आदिकरिता

जागा राखून ठेवली असेल. यानंतर जर जमीन वाचली तर ती पैसा उभारण्याकरिता, इतर उपयोगी पिकाकरीता वापरली जाईल. मात्र गांजा, अफू, तंबाखू याकरिता नव्हे.

प्रत्येक गावी त्याचे स्वत:चे नाट्यगृह, शाळा आणि सभागृह राहील. पाण्याची स्वतंत्र व्यवस्था असेल. त्यायोगे गावातील सर्वांना शुद्ध पाणी मिळेल. विहिरी आणि तलाव यांचे योग्य नियंत्रण केल्यास ते सहज साध्य होईल. शिक्षण अनिवार्य राहील. शक्य तोवर गावाची सर्व कामे सहकाराने करण्यात येतील. जातपात आणि अस्पृश्यता अशा ग्रामसमाजात आढळणार नाहीत.

सत्याग्रह आणि असहकार या शस्त्रासोबत अहिंसा व सत्याच्या आधारानेच गावाचे शासन चालेल. ग्रामसैनिकांची एक चमू गावात आळीपाळीने पहारा देईल. त्यातील लोकांची नावे एका ठिकाणी नमूद असतील. गावाचे शासन चालविण्यासाठी प्रत्येक गावात पाच पंचांची निवड करण्यात येईल. नियमान्वये विशिष्ट योग्यतेच्या प्रौढ स्त्री पुरूषांना हे पंच निवडण्याचा अधिकार राहील. या पंचायती जवळ सर्वप्रकारची आवश्यक सत्ता राहील. कायदे मंडळ, न्यायालय आणि प्रशासन यांची सर्व कामे ही पंचायत आपल्या वर्षभराच्या मुदतीच्या काळात करेल.

या ग्रामशासनात व्यक्तिगत स्वातंत्र्यावर आधारलेले पूर्ण प्रजातंत्र काम राहील. व्यक्तीच आपल्या सरकारची निर्मिती करेल. ती आणि तिचे सरकार दोघेही अहिंसेचे पालन करील. ग्रामीण जीवन यांच्याबद्दल प्रेम असणारा कोणीही व्यक्ती एका गावी जाऊन स्थाईक होऊ शकतो. गावालाच सर्वस्व मानून तो या कामात मग्न राहू शकतो.

ज्या कला व कालागिराला बाहेरील जगात पेठ असेल अशाचा खेड्यातून विकास व्हावयास हवा. खेडी जेंव्हा पूर्णत: विकसित होतील तेव्हा तेथे कलाकारांची वाण राहणार नाही. खेड्यात शिल्पकार, भाषापंडित, संशोधक सर्व असतील. थोडक्यात कोणतीही जीवनोपयोगी वस्तू गावात मिळत नाही असे होणार नाही. आजची खेडी उध्वस्त असलेली आहेत. उकिरड्यासारखी आहेत. उद्या तीच सुंदर बनतील गावकऱ्यांना लुबाडणे, त्यांचे शोषण करणे अशक्य होईल.

## ३.६ सारांश

महात्मा गांधीनी देशातील व जगातील आर्थिक चिंतनाला एक नवी दिशा दिली. आजच्या काळात खाजगीकरण, उदारीकरण व जागतिकीकरणाच्या संदर्भात गांधींचे विचार महत्त्वाचे मानावे लागतात. थोडक्यात गांधींच्या आर्थिक विचारांची आजच्या बदलत्या परिस्थितीत नितांत आवश्यकता आहे.

## ३.७ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

**अ) रिकाम्या जागा भरा.**

१. महात्मा गांधी मैट्रिकची परीक्षा ............. साली उत्तीर्ण झाले.

२. महात्मा गांधीनी १९२१ साली ......... चळवळ सुरू केली.

३. महात्मा गांधीनी ........ या अर्थव्यवस्थेचा पुरस्कार केला.

४. ग्रामीण विकास होण्यासाठी प्रत्येक खेडी ही ............... असावीत.

५. प्रत्येक खेडी अन्न, ........... निवारा या बाबतीत स्वयंपूर्ण असावीत.

**उत्तरे :** १) १८८७, २) असहकार, ३) विकेंद्रीकरण, ४) स्वयंपूर्ण, ५) वस्त्र.

**ब) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. महात्मा गांधी यांचे खेड्यांचा विकास संबंधीचे विचार सांगा.

२. महात्मा गांधी यांचे स्वयं विकासाची मूलभूत तत्त्वे सांगा.

३. गांधींच्या विचारांचे मूल्यमापन करा.

**क) लघुत्तरी प्रश्न**

१. विकेंद्रीकरणाचे महत्त्व

२. ग्रामस्वराज्य संकल्पना

## ३.८ अधिक वाचनासाठी संदर्भ पुस्तके


१. प्रा. जे. एफ. पाटील, २००९, आर्थिक विचारांचा इतिहास, फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. प्रा. ए. आर. रायखेलकर, २००५, आर्थिक विचारांचा इतिहास, विद्या पब्लिशर्स, औरंगाबाद.

३. व्ही. बी. पाटील, के सागर , १९९८, महाराष्ट्रातील समाजसुधारक, साहित्यिक, थोर भारतीय विचारवंत व अन्य महनीय व्यक्ती, के. सागर पब्लिकेशन, पुणे.

४. डॉ. विजय कवीमंडन, १९९०, आर्थिक विचारांचा इतिहास, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५. महात्मा गांधी, माझ्या स्वप्नांचा भारत (संक्षिप्त), परमधाम प्रकाशन, पवनार, वर्धा.

६. T. N. Hajela, 2009, History of Economic Thought, Ane Book Pvt., New Delhi.

# घटक : ४
# आधुनिक अर्थशास्त्रज्ञांचे आर्थिक विचार

## अनुक्रमणिका


४.० उद्दिष्ट्ये

४.१ प्रस्तावना

४.२ अभ्यास विषय

४.२.१ डी. आर. गाडगीळ - सहकारी विकास आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणावरील विचार

४.२.२ अमर्त्य सेन - सामाजिक निवड आणि कल्याण संकल्पना

४.२.३ व्ही. एम्. दांडेकर यांचे दारिद्र्यावरील विचार

४.२.४ दारिद्र्य आणि सार्वजनिक कृती यांवरील सेन यांचे विचार

स्वाध्याय - १

४.३ सारांश

४.४ संज्ञा

४.५ स्वाध्याय, उत्तरे

४.६ प्रश्नावली

४.७ पुढील अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ

## ४.० उद्दिष्ट्ये

'आधुनिक अर्थशास्त्रांचे आर्थिक विचार' या प्रकरणाची खालील उद्दिष्टे आहेत.

१. डी. आर. गाडगीळ यांचे सहकारी विकास, सहकाराचे ग्रामीण जीवनातील किंवा विकासातील स्थान यावरील विचार अभ्यासणे.

२. डी. आर. गाडगीळ यांचे सत्तेच्या विकेंद्रीकरणावरील विचार अभ्यासणे.

३. अमर्त्य सेन यांची सामाजिक निवड आणि कल्याण संकल्पना अभ्यासणे.

४. व्ही. एम्. दांडेकर यांचे दारिद्र्यावरील विचार समजून घेणे.

५. दारिद्र्य आणि सार्वजनिक निवड यांवरील सेन यांचे विचार अभ्यासणे.

## ४.१ प्रस्तावना

भारतातील आर्थिक विचारांच्या इतिहासामध्ये प्रामुख्याने महात्मा फुले, राजर्षि शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, नौरोजी यांचे विविध समस्यांवरील विविध क्षेत्रांच्या विकासावरील विचारांचा समावेश होतो. प्रकरण तीन मध्ये आपण महात्मा गांधीचे आर्थिक विचार अभ्यासले. यामध्ये आपण महात्मा गांधींना अभिप्रेत असणारा खेड्यांचा विकास, सत्तेच्या विकेंद्रीकरणाचे महत्त्व, महात्मा गांधीनी सागितलेली विकासाची मूलभूत तत्त्वे, ग्राम स्वराज्य संकल्पना यांचा समावेश होतो. महात्मा गांधींनी विविध ठिकाणी, विविध वेळी व्यक्त केलेल्या विचारांतून त्यांची स्वयंपूर्ण खेडी संकल्पना समजून येते. प्रस्तूत प्रकरणात भारताच्या सामाजिक, आर्थिक जडणघडीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास करणार आहोत. भारतातील आधुनिक अर्थशास्त्रज्ञांमध्ये डी. आर. गाडगीळ, डॉ. अमर्त्य सेन, व्ही. एम्. दांडेकर यांचा समावेश होतो. डी. आर. गाडगीळ यांनी सहकारी विकास आणि भारताच्या ग्रामीण विकासामध्ये सहकारी संस्थांचा असलेला महत्त्वपूर्ण सहभाग यावर विविध लिखाणांमधून आपले विचार व्यक्त केले आहेत. त्याचबरोबर गाडगीळ यांनी सत्तेच्या विकेंद्रीकरणावर व्यक्त केलेले विचार या प्रकरणांमध्ये अभ्यासणार आहोत. प्रस्तूत प्रकरणात आपण नोबेल विजेते डॉ. अमर्त्य सेन यांची सामाजिक निवड आणि कल्याण ही संकल्पना व दारिद्र्य आणि सामाजिक कृती यांवरील विचार अभ्यासणार आहोत. त्याचबरोबर व्ही. एम्. दांडेकर यांचे भारतातील दारिद्र्यावरील विचारही अभ्यासणार आहोत.

## ४.२ अभ्यासविषय

भारताच्या स्वातंत्र्योत्तर काळात देशाच्या आर्थिक जडणघडणीत आधुनिक अर्थशास्त्रज्ञांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिलेली आहे. आधुनिक अर्थशास्त्रज्ञांमध्ये नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन, जगदीश भगवती, डी. आर. गाडगीळ, व्ही. एम्. दांडेकर या अर्थशास्त्रज्ञांचा समावेश होतो.

### ४.२.१ डी. आर. गाडगीळ - सहकारी विकास आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणावरील विचार

भारताच्या व महाराष्ट्राच्या आर्थिक, सामाजिक व राजकीय जडणघडणीत प्रा. धनंजयराव रामचंद्र गाडगीळ तथा डी. आर. गाडगीळ यांचे योगदान मोलाचे आहे. डी. आर. गाडगीळ यांनी आपल्या लिखाणांतून, व्याख्यानांतून व धोरणांतून व कृतीतून जे विचार मांडले ते देशाच्या आणि राज्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण आहेत. त्यांनी फलप्रामाण्यवाद, हिंदी अर्थशास्त्र, सहकारी विकास, सत्तेचे विकेंद्रीकरण यावर महत्त्वपूर्ण व नाविन्यपूर्ण विचार व्यक्त केले त्यापैकी सहकारी विकास आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणावरील विचार याठिकाणी सविस्तर अभ्यासता येतील. तत्पूर्वी त्यांचा जीवन परिचय आणि त्यांनी केलेले महत्त्वपूर्ण लिखाण पाहता येईल.

**जीवन परिचय**

प्रा. धनंजयराव रामचंद्र गाडगीळ यांचा जन्म १० एप्रिल १९०१ रोजी झाला. नागपूर येथून शालेय शिक्षण पूर्ण केल्यानंतर १९१६ साली सिनियर केंब्रिज परीक्षा उत्तीर्ण होऊन ते १९१८ साली अर्थशास्त्र व इतिहास या विषयांचा पदवी अभ्यास करण्यासाठी इंग्लंडमधील केंब्रिज विद्यापीठात गेले. त्यानंतर १९२१ साली केंब्रिज विद्यापीठाची एम्. ए. अर्थशास्त्र ही पदवी प्राप्त केली. १९२२-२३ साली हिंदुस्थानचा औद्योगिक इतिहास १८५०-१९१४, या दुर्लक्षित आणि देशाच्या औद्योगिक विकासाला दिशा देणाऱ्या महत्त्वपूर्ण विषयांवरील प्रबंध केंब्रिज विद्यापीठास सादर केला व एम्. लीट. ही उच्च पदवी प्राप्त केली. भारतात परतल्यानंतर मुंबई प्रांतामध्ये वित्त विभागात अधिकारी, सुरत येथील महाविद्यालयात प्राचार्य म्हणून त्यांनी काम पाहिले. १९३० मध्ये पुणे येथे गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संस्था स्थापण्यात त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. युनोने नेमलेल्या विकसनशील देशांच्या विकास उपाययोजना तज्ज्ञ समितीचे सदस्य (१९६१), पुणे विद्यापीठाचे कुलगुरू (१९६६-६७), राज्यसभा सदस्य, भारतातील योजना आयोग व अर्थतज्ज्ञ सल्लागार समितीचे सदस्य, राष्ट्रीय योजना आयोगाचे उपाध्यक्ष (१९६७-७१) अशा विविध ठिकाणी त्यांनी आपल्या बुद्धिमान विचारांचा ठसा उमटविला. ३ मे १९७१ रोजी दिल्ली ते मुंबई रेल्वे प्रवासात असताना पालघर नजीक त्यांचे निधन झाले.

### लेखन

प्रा. डी. आर. गाडगीळ यांनी इंग्रजी व मराठी भाषेत विपुल लेखन केले. विविध ठिकणी व्याख्याने दिली. लेखन करताना व व्याख्याने देत असताना भारतातील विविध सामाजिक, आर्थिक समस्या, त्याची कारणे, त्यावरील उपाययोजना असे त्यांचे विषय असत. त्यांचे प्रकाशित झालेले महत्त्वपूर्ण ग्रंथ खालीलप्रमाणे आहेत.

१. Industrial Evolution of India In Recent Times (1924).

२. The salaries of Public Officials in India (1931).

३. हिंदुस्थानचा आर्थिक इतिहास (१९३२).

४. पुणे जिल्ह्यातील फळांची पैदास व विक्री (१९३६).

५. A survey of farm Business in Wai taluka (1940).

६. Poona - A socio-economic survey : Part I (1945), Part II (1952).

७. सहकारी लोकराज्य (१९६७).

८. Planning and Economic Policy in India (1961).

९. Women in the working force in India, Delhi (1965).

१०. Human Rights in a multinational society (1968).

### सहकार विकास

डी. आर. गाडगीळ यांनी सहकार विकास आणि सत्तेच्या विकेंद्रीकरणावर विचार व्यक्त करत असताना समाजकारण, शिक्षण, शेती विकास, सहकारी विकास, राज्यघटना, भाषावार प्रांतरचना, सत्तेचे विकेंद्रीकरण, लोकशाही, ग्रामदान, समाजवाद, औद्योगिक विकास, आर्थिक नियोजन आणि लोकाभिमुख आर्थिक विकास या विषयावर त्यांच्या विविध ग्रंथात आणि व्याख्यानात मते स्पष्ट केलेली आहेत. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांचे सहकार विकास यांवरील विचार खालील मुद्यांच्या आधारे स्पष्ट करता येतील.

१. सहकारी लोकराज्य

२. सहकार चलवळीची गरज किंवा महत्त्व

३. सहकारी संस्थांची त्रिस्तरीय रचना.

४. सहकार शिक्षण.

५. पीक कर्ज योजना.

६. कृतीशील विचारवंत.

## १) सहकारी लोकराज्य

भारतातील दुर्बल घटकांचा विकास करण्यासाठी किंवा अशक्त लोकांना सशक्त करण्यासाठी प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी सहकारी लोकराज्य ही संकल्पना मांडली. भांडवलशाही मध्ये आर्थिक विषमता आणि कामगारांची पिळवणूक मोठ्या प्रमाणावर दिसून येते. त्यामुळे देशाच्या सर्वांगीण आर्थिक प्रगतीसाठी सहकाराचाच मार्ग योग्य आहे असे प्रतिपादन त्यांनी केले. त्यासाठी सहकारी लोकराज्याची तत्त्वे प्रामाणिकपणे राबविण्याची गरज व्यक्त केली. १९५९-६० या वर्षात पंजाब विद्यापीठात स्व. प्रा. ब्रिज नारायण स्मृती व्याख्यानमालेत प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी 'Towards Co-operative Commonwealth' या विषयावर तीन व्याख्याने दिली. या तिन्ही व्याख्यांनामधून त्यांनी देशाच्या आर्थिक व सामााजिक प्रगतीसाठी सहकार हाच एकमेव मार्ग आहे असे ठामपणे सांगितले. या व्याख्यानांतून त्यांनी सहकारी लोकराज्य या संकल्पनेचे विवेचन केले. १९६१ मध्ये पंजाब विद्यापीठाने ती व्याख्याने पुस्तकरूपाने प्रकाशित केली.

पहिल्या व्याख्यानात त्यांनी परदेशातील सहकारी चळवळीचा उगम, त्याची कार्यपद्धती, त्या देशात सहकारी चळवळ यशस्वी होण्यामागील कारणे यांचा उल्लेख केला आहे. दुसऱ्या व्याख्यानांत भारतातील सामाजिक, आर्थिक व राजकीय परिस्थिती आणि या परिस्थितीत सहकाराचा विकास आणि त्यामधील शासनाची भूमिका या विषयांवर विवेचन केले. तिसऱ्या व्याख्यानांत आदर्श समाजव्यवस्था निर्माण करण्यासाठी सहकारी लोकराज्य ही संकल्पना मांडली. त्यांनी सांगितलेल्या संकल्पनेत तीन आधारभूत तत्त्वे आहेत.

अ) लहान किंवा दुर्बल आर्थिक घटकांची अंगभूत कार्यक्षमता विविध मार्गांनी शासनाच्या सहकार्यने विकसित करणे.

ब) शहरी व ग्रामीण भागातील विविध सहकारी संस्थांनी परस्पर सहकार्यातून मोठ्या प्रमाणात लाभ मिळविणे आणि त्याचा समाजातील विविध घटकांच्या उद्धारासाठी उपयोग करणे.

क) दुर्बलातील दुर्बल घटकांच्या आर्थिक व सामाजिक न्यायासाठी सहकाराचा मार्ग महत्त्वाचा आहे.

प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या मते, सहकारी लोकराज्याची तत्त्वे प्रामाणिकपणे राबविल्यास किंवा अवलंबिल्यास निश्चित भारतासारख्या विकसनशील देशाचा सर्वांगिण विकास साध्य करता येईल.

## २) सहकारी चळवळीचे महत्त्व

प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी देशातील दुर्बल घटकांच्या प्रगतीसाठी सहकारी चळवळीची आवश्यकता प्रतिपादीत केली. अर्थव्यवस्थांच्या विविध क्षेत्राचा विकास आणि त्या विकासाचा देशातील

सर्वसामान्य लोकांना लाभ होण्यामध्ये सहकारी व्यवस्था महत्त्वाची भूमिका बजावते. देशामध्ये सहकारी चळवळीचे महत्त्व आधोरेखित करतात. प्रा. गाडगीळ खालील मुद्दे मांडतात.

अ) देशात मोठ्या प्रमाणात असणाऱ्या लहान शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सहकारी शेतीचा अवलंब करून शेती विकासाला चालना देता येईल.

ब) गरजू व दुर्बल शेतकऱ्यांची सावकाराच्या व खाजगी व्यापाराच्या जाचक अटींतून व तावडीतून सुटका करण्यासाठी सहकारी पतपुरवठा व सहकारी विषणन संस्था उभारून मदत करता येईल.

क) शेतकऱ्याने शेतीतून उत्पादित केलेल्या मालाची किंमत व ग्राहकाने दयावयाची किंमत यामध्ये मोठे अंतर असते याचाच अर्थ असा की मध्यस्थ मोठ्या प्रमाणावर कमिशन घेतात. हे टाळण्यासाठी उत्पादन घेणारा शेतकरी व ग्राहक यांचे हितसंबंध जपण्यासाठी सहकार चळवळ सशक्त करणे गरजेचे आहे असे प्रा. धनंजयराव गाडगीळ यांचे मत होते.

ड) देशामध्ये कृषी व औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी सहकारी पतपुरवठा व खरेदी-विक्री यंत्रणा उभी करणे. ग्राहक सहकारी संस्थांचे जाळे उभे करणे.

इ) भारत हा खेड्यांचा देश आहे. भारताची बहुसंख्य लोकसंख्या खेड्यात राहत असल्यामुळे या भागाचा आणि पर्यायाने या भागातील लोकांचा आर्थिक विकास करण्यासाठी सहकाराच्या मार्गाने त्या भागामध्ये शेती, उद्योग, व्यापार, शिक्षण, वाहतूक यांचा विकास साधता येईल.

ई) विविध मार्गाने म्हणजेच विविध प्रकारच्या सहकारी संस्था उभारून ग्रामीण भागातील दुर्बलांच्या आर्थिक परिस्थितीत सुधारणा करता येते असे गाडगीळांचे मत होते.

उ) देशाचा शाश्वत विकास होण्यासाठी पर्यावरण संरक्षण गरजेचे आहे. देशातील नैसर्गिक साधनसामुग्री सांभाळण्यामध्ये सहकार संघटन महत्त्वाची भूमिका बजावू शकते.

ऊ) एकंदर देशाच्या सर्वसमावेशक विकास, देशातील विविध स्तरातील लोकांची उन्नती, आर्थिक समानता सहकारी तत्त्वज्ञानाच्या साहाय्याने शक्य आहे असे गाडगीळांचे विचार होते.

### ३) सहकारी संस्थांची त्रिस्तरीय रचना

सहकारी संस्थांची कार्यक्षमता वाढणे, सहकारी संस्थांचा समाजातील विविध घटकांना लाभ होणे यासाठी देशामध्ये सहकारी संस्थांची त्रिस्तरीय रचना असावी असे गाडगीळांचे मत होत. म्हणजेच सध्या आस्तित्वात असलेली ग्राम पातळीवरील प्राथमिक शेती सहकारी संस्था, जिल्हा स्तरावरील जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका व राज्य स्तरावर राज्य सहकारी बँका त्यांना अभिप्रेत होती. प्राथमिक स्तरावरील संस्थांच्या विकासासाठी देशाच्या मध्यवर्ती बँकेने भारतीय रिझर्व्ह बँकेने वेगळे धोरण आखावे असे प्रा. धनंजयराव गाडगीळांना वाटत होते.

### ४) सहकारी शिक्षण

समाजातील दुर्बल घटकांची उन्नती करण्यासाठी सहकारी चळवळ यशस्वी होणे गरजेचे आहे आणि सहकारी चळवळ यशस्वी होण्यासाठी सहकारी संस्थामधील लोकांचा क्रियाशील सहभाग वाढला पाहिजे. त्यासाठी सहकारी संस्थांचे सभासद, कर्मचारी आणि व्यवस्थापन करणारे संचालक, धोरण ठरविणारे सहकारी नेतृत्व यांचे शिक्षण व प्रशिक्षण होणे नितांत गरजेचे आहे असे प्रा. गाडगीळांचे मत होते.

### ५) पीक कर्ज योजना

देशाच्या ग्रामीण भागांमध्ये लहान व सीमांत शेतकऱ्यांमध्ये कर्जबाजारीपणाचे प्रमाण मोठे होते. बहुतांश शेतकरी सावकारांच्या जाचक अटीत अडकले होते. त्यामुळे शेतकऱ्यांचा 'कर्जात जन्म, कर्जात जीवन व कर्जात मृत्यू' अशी अवस्था झाली होती. या संकटातून देशाच्या व्यवस्थेतील एका महत्त्वपूर्ण घटकाला सोडविण्यासाठी सहकारी पतसंस्था उभ्या करण्यात आल्या. ग्रामीण भागामध्ये पतपुरवठा करण्यासाठी सहकारी पतपुरवठा संस्थांचे जाळे विणण्यात आले. यातूनच पीक कर्ज योजना विकसित झाली. पीक कर्ज योजनेमध्ये कर्ज वसूलीसाठी पतसंस्था व खरेदी-विक्री संस्था एकमेकांस जोडण्यात आल्या. परिणामी, सावकारांवरील अवलंबित्व कमी झाले.

### ६) कृतीशील विचारवंत

प्रा. धनंजयराव गाडगीळ हे कृतीशील विचारवंत होते. त्यांनी सहकाराच्या विकासासाठी फक्त विचारच मांडले नाहीत, तर देशामध्ये विशेषत: महाराष्ट्र राज्यामध्ये सहकारी संस्था उभ्या करण्यात पुढाकार घेतला. पुणे जिल्ह्यात मध्यवर्ती सहकारी बँक, सहकारी खरेदी-विक्री संघ आणि अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर सहकारी साखर कारखाना उभारणीत (१९४९) महत्त्वाचा पुढाकार घेतला. यातून हे दिसून येते की, ते क्रियावान सहकार पंडित होते.

## सत्तेचे विकेंद्रीकरण

स्वातंत्र्यानंतर देशाचा नियोजनबद्ध आर्थिक आणि सामाजिक विकास करण्यासाठी पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या नेतृत्वाखाली नियोजनाचा स्वीकार केला. नियोजनाच्या यशस्वीतेसाठी नियोजन मंडळ, राष्ट्रीय विकास परिषद, वित्त आयोग अशा रचनात्मक धोरणांना सुरूवात केली गेली. देशात कल्याणकारी व्यवस्था निर्माण करणे आणि लोकशाही व्यवस्था बळकट करण्यासाठी त्रिस्तरीय शासकीय रचना मान्य करण्यात आली. त्यामध्ये केंद्रीय स्तरावर केंद्र सरकार, राज्य स्तरावर राज्य सरकारे आणि स्थानिक पातळीवर स्थानिक स्वराज्य संस्था अशी रचना केली गेली. सत्ता आणि अधिकाराच्या बाबतीत या तिन्ही स्तरांवर सत्तेचे विकेंद्रीकरण करण्यात आले. भारतासारख्या विविधता असलेल्या देशात देशाचा आर्थिक विकास करण्यामध्ये सत्तेचे विकेंद्रीकरण महत्त्वाची भूमिका पार पाडते असे प्रा. धनंजयराव गाडगीळ यांचे मत होते.

सत्ता विकेंद्रीकरण हे लोकशाहीतील महत्त्वाचे तत्त्व मानले जाते. प्रत्येक स्तरावरील निर्णय घेण्याची सत्ता व अधिकार तेथील लोकांना, प्रतिनिधींना किंवा अधिकाऱ्यांना देणे म्हणजे विकेंद्रीकरण होय. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी संघराज्य पद्धतीचा पुरस्कार केला. शासन व्यवस्थेच्या प्रत्येक पातळीवर सत्ता व अधिकाराच्या बाबतीत संबंधित घटकाला स्वातंत्र्य असणे व त्यातूनच निर्णय घेणे व निर्णयाची परिणामकारकपणे अंमलबजावणी करणे याला लोकशाहीतील सत्ता विकेंद्रीकरण असे म्हटले जाते. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी लोकशाहीतील सत्ता विकेंद्रीकरणाचा पुरस्कार केला.

प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या मते, भारतासारख्या विकसनशील देशात लोकशाही पद्धतीने सत्ता विकेंद्रीकरणाची संकल्पना स्वीकारल्यामुळे लोकशाही शासन व्यवस्था मजबूत होण्यास मदत होते. त्याचे काही फायदे होतात ते पुढीलप्रमाणे -

१. सत्ता व अधिकाराचा प्रत्यक्षरीत्या वापर करीत असताना गाव, तालुका, जिल्हा याठिकाणी ग्रामपंचायत, पंचायत समिती, जिल्हा परिषदा तसेच नगरपालिका, महानगरपालिका अशा सर्व स्तरावरील स्थानिक जनतेला विकासाच्या प्रक्रियेमध्ये सहभागी करून घेता येते. त्यामुळे नियोजनाची परिणामकारक अंमलबजावणी शक्य होते.

२. लोकांच्या हातात सत्ता दिल्याने समाजातील विविध घटकांच्या विकासासाठी सत्तेचा वापर कसा करावा याचे ज्ञान त्यांना प्राप्त होते.

३. ग्रामीण विकासाच्या दृष्टीने कृषी आणि संबंधित क्षेत्रात उत्पादन आणि रोजगार वाढविण्यासाठी कोणते कार्यक्रम हाती घेता येतील याची पाहणी करता येते.

४. ग्रामीण विकास कार्याचा वेग वाढविण्याच्या दृष्टीने योग्य कार्यपद्धती वापरता येणे आणि स्थानिक शासनावर यातून कोणत्या जबाबदाऱ्या टाकता येतील याचा अभ्यास करणे, योग्य निर्णय घेणे आणि त्याची अंमलबजावणी करणे शक्य होते.

५. शासकीय विकास योजनांच्या बाबतीत खर्चामध्ये काटकसर करता येणे शक्य होते.

६. लोकशाही पद्धतीने सर्वांगीण विकास करणे सत्तेच्या विकेंद्रीकरणामुळे शक्य होते.

यासारख्या मुद्यांचा विचार करता देशाच्या विकासासाठी सत्तेचे विकेंद्रीकरण आवश्यक आहे असे प्रतिपादन प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी केले.

### ४.२.२ अमर्त्य सेन - सामाजिक निवड आणि कल्याण संकल्पना

अर्थशास्त्राचे जनक ॲडम स्मिथ यांनी १७७६ मध्ये लिहिलेल्या An enquiry into the Nature and Causes of Wealth of Nations या ग्रंथात राष्ट्रांच्या संपत्तीचे स्वरूप व संपत्ती निर्मितीची प्रक्रिया

यांचा अभ्यास केला. त्यांच्या मते, राष्ट्राच्या संपत्ती निर्मितीची प्रक्रियाच समाजाचे अधिक कल्याण करू शकते. त्याचबरोबर सामाजिक कराराच्या (Social Contract) माध्यमातून व्यक्ती जेव्हा एखादी व्यक्ती इतरांचे हक्क व स्वातंत्र्यावर अतिक्रमण न करता स्वार्थासाठी काम करते तेव्हा त्या व्यक्तीच्या आर्थिक कमालीकरणा बरोबरच उर्वरित समाजाचेही कल्याण वाढत जाते. ॲडम स्मिथ, रिकार्डो, माल्थस, जे. एस्. मिल व नंतर मार्शल या अभिजात ते नवअभिजातवादी (Classical and Neo-Classical) अर्थशास्त्रज्ञांनी भांडवलशाही आर्थिक विचारसरणीचा प्रसार व प्रचार केला व ती व्यवस्था बळकट होण्यास मदत केली. परंतु संपत्तीची वाढ झाली म्हणजे सामाजिक कल्याणात वाढ होईलच असे नाही. कल्याणकारी राज्य स्थापन करण्यासाठी शासनाचा समाजाच्या आर्थिक जीवनात अनेक स्वरूपात, अनेक क्षेत्रात कमी अधिक हस्तक्षेप गरजेचा आहे असे सैद्धांतिक समर्थन लॉर्ड केन्स यांनी आपल्या The General Theory of Employment, Interest and Money - 1936 (रोजगार, व्याज दर आणि पैशा संबंधीचा सर्वसाधारण सिद्धांत) या क्रांतीकारक ग्रंथात आग्रहपूर्वक केले. त्यांच्या मते, सामाजिक कल्याणात वाढ करण्यासाठी सरकारने मौद्रिक धोरण व राजकोषीय धोरणाच्या माध्यमातून प्रयत्न करणे गरजेचे असते. या सर्व प्रक्रियेत सर्वच प्रकारच्या विकसनशील राष्ट्रांतून दारिद्र्याचे आस्तित्त्व अधिक गंभीर स्वरूपात दिसून येऊ लागले. दारिद्र्याच्या कारणांमध्ये फक्त अन्नाचा अभाव हे एकमेव कारण न राहता शिक्षणाचा अभाव, कौशल्याचा अभाव, आरोग्य सेवांचा अभाव, योग्य निवासाचा, युद्ध, पाण्याचा अभाव यांचाही समावेश दिसू लागला. यामुळे प्रा. ए. सी. पिगू यांनी सुरू केलेल्या कल्याणाच्या अर्थशास्त्राला अधिक मानवतावादी स्वरूप येऊ लागले. यामध्ये हिक्स, टिबू, डाऊन्स, बुकॅनन, रॉल्स, सॅम्युअलसन, केनेथ ॲरो या अर्थशास्त्रज्ञांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. नोबेल पारितोषिक विजेते डॉ. अमर्त्य सेन यांनी अलीकडच्या काळात मोठे संशोधन करून सामाजिक निवड व कल्याण या संकल्पनेच्या माध्यमातून सामाजिक कल्याणाच्या क्षेत्रात मोठे योगदान दिले आहे.

**जीवन परिचय**

डॉ. अमर्त्य सेन यांचा जन्म ३ नोव्हेंबर १९३३ रोजी प. बंगाल मधील रविंद्रनाथ टागोरांच्या शांतिनिकेतन मध्ये झाला. लहानपणापासून अतिशय बुद्धिमान असलेल्या अमर्त्य सेन यांचे बालपण शांतिनिकेतन मध्ये गेले. इयत्ता सातवीत असतानाच त्यांनी 'संथाळ' या आदिवासी जमातीच्या निरीक्षणावरून लेख लिहिला होता. प्रेसिडेन्सी महाविद्यालयात पदवी शिक्षण घेतल्यानंतर पुढील शिक्षणासाठी त्यांनी केंब्रिज विद्यापीठात प्रवेश घेतला. विख्यात अर्थतज्ज्ञ श्रीमती जोन रॉबिन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी पीएच्.डी. पदवी प्राप्त केली. त्यांनी आपल्या शिक्षकी पेशाची सुरूवात १९५६ मध्ये यादवपूर विद्यापीठात केली. त्यानंतर त्यांनी दिल्ली येथील स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स, ऑक्सफर्ड विद्यापीठ, अमेरिकेतील हॉवर्ड विद्यापीठ, केंब्रिज येथील ट्रीनिटी कॉलेज याठिकाणी प्राध्यापक म्हणून काम केले. कल्याणच्या अर्थशास्त्रामध्ये केलेल्या विशेष कामगिरीबद्दल दिनांक १४ ऑक्टोबर १९९८ रोजी स्वीडिश ॲकॅडमी ऑफ सायन्सेस तर्फ अर्थशास्त्रासाठी दिला जाणारा नोबेल स्मृती पुरस्कार प्रा. अमर्त्य सेन यांना जाहीर करण्यात आला.

## लेखन साहित्य

अमर्त्य सेन यांनी २१ च्या वर पुस्तके व २२५ च्या वर संशोधन लेख लिहिले आहेत. त्यांनी अर्थशास्त्रातील विविध विषयांवर संशोधनपर लिखाण केले आहे. प्रामुख्याने कल्याणचे अर्थशास्त्र या विषयातील त्यांचे योगदान मोलाचे आहे. त्यांचे प्रकाशित झालेले महत्त्वपूर्ण ग्रंथ खालीलप्रमाणे आहेत -

1. Collective Choice and Social Welfare (1971)
2. On Economic Inequality (1973)
3. Poverty and Famines (1981)
4. Hunger and Public Action (1989)
5. Ecnomic Development and Social Opportunity (1998) जेन ड्रेझ सोबत
6. Development as Freedom

## सामाजिक निवड आणि कल्याण

अमर्त्य सेन यांनी कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये अत्यंत मोलाची भर घातली. कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये त्यांनी दिलेल्या योगदानामध्ये सामाजिक किंवा सामुदायिक निवड, सामाजिक कल्याण, आर्थिक विषमता, सामाजिक क्षमता, दारिद्रय व कल्याणाचे निर्देशांक हे मुद्दे महत्त्वाचे आहेत.

डॉ. अमर्त्य सेन यांनी आपले सामाजिक कल्याण विषयक विचार Collective Choice and Social Welfare (सामाजिक निवड आणि सामाजिक कल्याण) या ग्रंथात (१९७१) व्यक्त करून कल्याणाच्या अर्थशास्त्रात मोठे योगदान दिले आहे. सामूहिक निवड आणि समाज कल्याण यातील अंतर्गत संबंध स्पष्ट करणाऱ्या या ग्रंथाने त्यांना अधिक लौकिक मिळवून दिला. या ग्रंथात त्यांनी नोबेल पारितोषिक विजेते प्रा. केनेथ ॲरो यांनी मांडलेल्या अशक्यता सिद्धांताचे खंडन केले आहे.

आंतरव्यक्ती उपयोगितेच्या मापनातील अडचणीमुळे समाजामध्ये जेव्हा निर्णय घेतले जातात तेव्हा लोकशाही मार्गाने निर्णयाची निवड करत असताना समाजात सगळ्यात योग्य म्हणजेच सामूहिक पसंतीचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता कमी असते. म्हणजेच आर्थिक धोरणाचा सामूहिक निवड अशक्य आहे असे मत त्यांनी १९५१ मध्ये मत मांडले. त्याला अशक्यता प्रमेय (Impossibility Theorem) असे म्हटले गेले. त्यासाठी हुकुमशाहीच्या पद्धतीचा अंगीकार करून हुकुमशहाची निवड ही सामाजिक निवड ठरविली जाईल. केनेथ ॲरो यांनी मांडलेल्या या सिद्धांताचा कल्याणकारी अर्थशास्त्राशी निकटचा संबंध असल्याने डॉ. अमर्त्य सेन यांनी त्याचा प्रतिवाद केला.

प्रा. अमर्त्य सेन यांच्या मते, लोकशाही राज्यपद्धतीतही लोकांचे स्वातंत्र्य कायम ठेवून सामाजिक निवड करता येते त्यांच्या मते, व्यक्ति स्वातंत्र्य व बहुमताचे निर्णय विशिष्ट अटींत पूर्ण करून सामाजिक कल्याण साध्य करता येते. लोकशाही निर्णय होत नसेल तर त्याला हुकुमशाही हा पर्याय न ठेवता समाजाने ज्यांच्या हातात धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार दिलेले आहेत, त्यांनी तो निर्णय घ्यावा. शिवाय निर्णय घेणाऱ्यांच्या माहितीचा संग्रह वाढविला तर तो निर्णय लोकशाही तत्त्वाच्या जवळचा होईल.

प्रा. अमर्त्य सेन यांनी खालील पाच अटी पूर्ण केल्या तर आर्थिक धोरणाची सामूहीक निवड शक्य आहे असे सांगितले.

१) सामूहिक निवड अधिक पद्धतशीर करणे.

२) व्यक्तिगत पसंती अमर्याद राहू देणे म्हणजेच व्यक्तिगत पसंतीवर मर्यादा नसणे.

३) व्यक्तिगत पसंती व सामूहिक पसंती यांच्यातील साधर्म्य पाहून निर्णय घेणे.

४) 'इतरांची उपयोगिता स्थिर असताना किमान एकाची उपयोगिता वाढणे म्हणजेच सामाजिक कल्याणात वाढ होणे' हा पॅरेरोचा नियम कायम ठेवणे.

५) बहुतांशाच्या निवडी विचारात घेणे.

थोडक्यात, प्रा. अमर्त्य सेन यांच्या मते, मतभिन्नता, संघर्ष असतानाही लोक आर्थिक धोरणाबद्दल सामूहिक पसंती किंवा निवड दर्शवू शकतात. परिणामी सामाजिक कल्याण साधता येते. अमर्त्य सेन यांच्या लिखाणामुळे कल्याणकारी अर्थशास्त्र आणि सामाजिक निवड सिद्धांत यांचा वेगळ्या दृष्टिकोणातून विचार व्हायला सुरूवात झाली.

प्रा. अमर्त्य सेन यांच्या मते, कोणत्याही राष्ट्राची आर्थिक प्रगती ही वैयक्तिक व सामाजिक कल्याणाच्या महत्तम पातळीवर अवलंबून असते. भौतिक विकासाबरोबर सामाजिक विकासही होणे आवश्यक आहे. शिवाय विकास हा समाजाच्या सर्व स्तरातून व्हायला हवा. सामाजिक कल्याणाचे महत्तमीकरण करत असताना केवळ संपत्ती व वस्तूंचे हस्तांतरण करणे आणि विषमता कमी करणे उपयोगाचे नाही, तर लोकांना सबल बनविणे गरजेचे आहे. याच अर्थ असा की, महत्तम सामाजिक कल्याणासाठी दरडोई उत्पन्न हा एकमेव मापदंड नाही. तर विविध क्षेत्रात उत्पन्न मिळविण्यासाठी (रोजगारक्षम बनण्यासाठी) लोकांमध्ये आवश्यक अशी क्षमता निर्माण करणे गरजेचे आहे. प्रत्येक व्यक्तींच्या अंगी अशी क्षमता निर्माण होण्यासाठी उत्पन्नाबरोबर शिक्षण, आरोग्य व सकस आहार या मूलभूत गरजाही पूर्ण व्हायला हव्यात. समाजातील विविध गटातील लोकांच्या विकासात असमानता आढळते. त्याचे कारण म्हणजे देशामध्ये विकासाच्या समान संधी उपलब्ध असत नाहीत आणि लोकांच्या अंगी असलेल्या क्षमतेचा त्यांना पूर्ण विकास करता येत नाही. सामाजिक कल्याण वृद्धींसाठी आरोग्य व प्राथमिक शिक्षण या सुविधांचे सार्वत्रिकरण करण्याची गरज आहे. तसेच या बाबींवर अधिक लक्ष देण्यासाठी शासन संस्थेची भूमिका अधिक महत्त्वाची ठरते. प्रा. अमर्त्य सेन यांच्या

मते, खुली अर्थव्यवस्था व जागतिकीकरण यांच स्वीकार करताना समाजातील सामान्य माणूस केंद्रस्थानी ठेवला पाहिजे. त्यासाठी सरकारने सरकारी खर्च व उत्पन्न यांची फेररचना करावी.

### ४.२.३ व्ही. एम्. दांडेकर यांचे दारिद्र्यावरील विचार

भारताच्या आर्थिक विचारांच्या इतिहासामध्ये इतर आधुनिक अर्थशास्त्रज्ञांबरोबरच व्ही. एम्. दांडेकर यांचे योगदानही महत्त्वाचे आहे. स्वातंत्र्यानंतर भारतासमोर उभ्या राहिलेल्या विविध आर्थिक समस्यांवर व्ही. एम्. दांडेकर यांनी आपल्या व्याख्यानांतून, लिखाणातून नेमके भाष्य केले आणि संबंधित समस्यांवरील उपाययोजनांचा उहापोह केला व त्यावर शासनाच्या भूमिकेचाही पुरस्कार केला. व्ही. एम्. दांडेकर यांनी दारिद्र्य, भारतातील दारिद्र्य, शहरी आणि ग्रामीण दारिद्र्य,दारिद्र्याचे कारणे, त्याचे परिणाम आणि उपाययोजना यावर विविध लिखाणांतून विचार व्यक्त केले आहेत. व्ही. एम्. दांडेकर यांनी निलकंठ रथ यांच्याबरोबर १९७१ मध्ये प्रकाशित केलेल्या 'Poverty in India' (भारतातील दारिद्र्य) या महत्त्वपूर्ण पुस्तकात आपले दारिद्र्यावरील विचार व्यक्त केले आहेत.

१४५ पानांच्या या पुस्तकात एकूण आठ प्रकरणे आहेत. त्यामध्ये व्ही. एम्. दांडेकर यांनी भारतातील दारिद्र्यावर सखोल विवेचन केले आहे. त्याचे खालील मुद्यांच्या आधारे स्पष्टीकरण करता येईल-

१) १९६० च्या दशकाच्या सुरूवातीची स्थिती.

२) स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी

३) भविष्यकालीन देखावा

४) समान वितरणासाठी धोरणे

५) भूमी धोरण

६) श्रमप्रधान तंत्रज्ञान

७) लाभकारक रोजगाराचा अधिकार

वरील मुद्यांचे खालीलप्रमाणे स्पष्टीकरण करता येईल.

**१) १९६० च्या दशकाच्या सुरूवातीची स्थिती**

व्ही. एम्. दांडेकर यांनी 'Poverty in India' या पुस्तकात भारतातील दारिद्र्याच्या समस्येचा अभ्यास केला आहे. भारतामध्ये १९६० च्या दशकाच्या सुरूवातीपर्यंत मोठ्या प्रमाणात दारिद्र्याची समस्या निर्माण झाली. त्यामागे राष्ट्रीय उत्पन्नाचा कमी दर आणि त्याचे असमान वितरण, विकासाचा मंद वेग आणि कमी असलेल्या विकासाच्या लाभाचे असमान वितरण या कारणांचा समावेश होता. १९६०-६१ मध्ये ४०

टक्के ग्रामीण लोकसंख्या गरीब होती, तर ५० टक्के शहरी लोकसंख्या गरीब होती. स्वातंत्र्यानंतरच्या काळात ग्रामीण आणि शहरी भागातील गरीब लोकांचा अन्नधान्यावरचा खर्च कमी होत होता. त्याचा परिणाम म्हणून त्यांना सकस, पौष्टिक आहार घेणे शक्य नव्हते. दारिद्र्याची समस्या निर्माण होण्याचे महत्त्वाचे कारण म्हणजे कुटुंबातील कमावत्या व्यक्तींवर अवलंबून असणाऱ्या लोकांचे प्रमाण मोठे असणे. व्ही. एम्. दांडेकर यांच्या मते, जमीन संसाधनाचा अभाव असणे हे ग्रामीण भागातील दारिद्र्याचे महत्त्वाचे कारण आहे. ग्रामीण भागातील मोठ्या प्रमाणावरील कुटुंबाकडे जमीनच नसने. मजूरी करूनच ते त्यांचे जीवन जगत असतात. व्ही. एम्. दांडेकर यांच्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, ग्रामीण भागातील इतर कुटुंबापेक्षा शेतमजूर कुटुंबांच्यावर दारिद्र्याचा आघात मोठा होतो. याचा अर्थ असा होतो की, ग्रामीण भागामध्ये शेतमजूरांच्यामध्ये दारिद्र्याचे प्रमाण मोठे होते. इतर दारिद्रायाखालील लोकसंख्येमध्ये छोट्या शेतकऱ्यांचा समावेश होतो.

### २) स्वातंत्र्यानंतर भारतीय अर्थव्यवस्थेची कामगिरी

व्ही. एम्. दांडेकर यांनी केलेल्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, स्वातंत्र्यनंतर भारतीय अर्थव्यवस्थेची वाढ स्थिर नाही. त्याचे कारण म्हणजे देशाच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात शेतीचा वाटा निम्मा होता आणि वर्षानुवर्षे शेती उत्पादनात मोठ्या प्रमाणात चढ उतार होत होते. १९६३-६४ आणि १९६४-६५ या काळात देशाचे निव्वळ राष्ट्रीय उत्पन्न चांगल्या पद्धतीने वाढले कारण त्या दोन वर्षात शेती उत्पादन चांगले वाढले. त्यानंतर १९६५-६६ आणि १९६६-६७ ही दोन वर्षे भारतीय शेतीसाठी वाईट गेली. दांडेकर यांच्या मते भारतीय अर्थव्यवस्थेचा वृद्धी दर हा शेतीच्या वृध्दी दरावर अवलंबून आहे, त्यामुळे साहजिकच दारिद्र्याची अवस्था भारतीय शेतीच्या अवस्थेवर अवलंबून आहे. स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकात विकासाच्या लाभाचे असमान वितरण झाल्यामुळे गरीब आणि श्रीमंतामधील दरी वाढत गेली.

### ३) भविष्यकालीन देखावा

व्ही. एम्. दांडेकर यांनी केलेल्या अभ्यासातून हे स्पष्ट होते की, स्वातंत्र्यानंतरच्या पहिल्या दशकात देशाचा आर्थिक विकासाचा दर ३ टक्क्यांच्या काहीसा खालीच राहिला आहे. देशाच्या राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाढीचा दर हा देशातील निव्वळ गुंतवणूकीच्या आकारावर अवलंबून असतो. त्यासाठी देशातील दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाचा दर वाढला पाहिजे आणि राष्ट्रीय उत्पन्नाचा दर वाढविण्यासाठी देशातील विविध क्षेत्रातील म्हणजेच शेती, उद्योग, व्यापार या क्षेत्रातील गुंतवणूकीचा दर वाढला पाहिजे. त्यासाठी देशातील निव्वळ भांडवल निर्मितीचा दर वाढण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. दांडेकर यांच्या मते, ५० व्या दशकात देशातील भांडवल निर्मितीचा दर वाढल्याचा पुरावा सापडत नाही. देशाचे राष्ट्रीय उत्पन्न ठरविण्यासाठी दुसरा महत्त्वाचा घटक म्हणजे भांडवल उत्पादन प्रमाण (Capital Output Ratio) होय. चौथ्या योजनेच्या काळात २.० टक्के आणि त्यानंतरच्या सात वर्षामध्ये २.५ टक्के इतके भांडवल उत्पादन प्रमाण राहील असे नियोजन मंडळाने गृहीत घरले होते. दांडेकर यांच्या मते, देशातील गुंतवणूकीची रचना बदलल्यास त्याचा भांडवल उत्पादन प्रमाणावर सकारात्मक परिणाम होईल. गुंतवणूक कार्यक्रमांमधील

भ्रष्टाचार आणि अकार्यक्षमता यामुळे देशात भांडवल उत्पादन प्रमाण जास्त राहिले आहे. दांडेकर यांच्या मते, गरिबांच्या बाजूने विचार केल्यास देशाचा वृद्धीदर अधिक असण्यापेक्षा विकासाच्या लाभाचे समान वितरण होणे आवश्यक आहे.

## ४) समान वितरणासाठी धोरणे

व्ही. एम्. दांडेकर यांच्या मते, देशामध्ये शहरी आणि ग्रामीण भागात गरीबीचे प्रमाण मोठे आहे. हे प्रमाण कमी करण्यासाठी आणि गरीबांची आर्थिक स्थिती उंचावण्यासाठी नैसर्गिक, आर्थिक संसाधनाच्या समान वितरणाशिवाय देशापुढे पर्याय नाही. तत्पूर्ती देशाच्या आर्थिक विकासाचा दर वाढविण्यासाठी अधिक प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यावेळी हे लक्षात घेतले पाहिजे की, अधिकचा विकासदर म्हणजे गरीबांना त्याचा लाभ होईल. त्यासाठी शासनाची भूमिका महत्त्वाची ठरणार असते. विविध प्रकारच्या साधनसंपत्तीच्या गरीबांना अनुकूल ठरणाऱ्या वितरणासाठी धोरणे आखावयास हवीत. समान वितरणासाठी सरकारने सकारात्मक धोरणांची सुरूवात करावयास हवी. त्यामध्ये फक्त अधिकचा विकास दराचे उद्दिष्ट असणे पुरेसे नाही. उत्पन्नाच्या असमान वितरणावरील समस्येवरील उपाय आणि परिणामी दारिद्र्याच्या समस्येवरील उपायांमध्ये खालील गोष्टींकडे लक्ष द्यावयास हवे.

अ) उत्पादन साधनांचे वाटप

ब) जमिनीचे पुर्नवाटप

क) श्रमप्रधान तंत्रज्ञानाला प्राधान्य

ड) खाजगी मालकीच्या उत्पादन साधनांचे समान वाटप

इ) किमान वेतनदर

ई) लाभदायक रोजगाराचा अधिकार

## ५) भूमी धोरण

देशातील मोठ्या प्रमाणावरील लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. शेतीचा पुरवठा कमी आहे आणि तो वाढवू शकत नाही. त्यामुळे जमीनधारणांमध्ये नेहमी असमानता दिसते. पहिल्या पंचवार्षिक योजनेमध्येच एखाद्या व्यक्तीकडे किती कमाल जमीनधारणा असावी हे सूचित केले आहे. त्याचबरोबर अतिरिक्त असलेली जमीन ज्यांना जमीन नाही किंवा अतिशय कमी आहे अशांना वितरित करण्यात यावी. व्ही. एम्. दांडेकर यांच्या मते, दारिद्र्याचे प्रमाण कमी करण्यासाठी विकासात्मक योजनांबरोबर भुसुधारणा करणे गरजेचे आहे. त्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो -

अ) जमीनदारीचे उच्चाटन करणे

ब) मध्यस्थांचे उच्चाटन करणे - कमाल जमीनधारणा राबविणे

क) कुळांना संरक्षण देणे - कूळ सुधारणा राबविणे

ड) भुसुधारणा अंमलबजावणीतील समस्यांचे निराकरण करणे

इ) शेती विकासास प्राधान्य देणे.

ई) शेती विकासासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर करणे

**६) श्रमप्रधान तंत्रज्ञान**

गरिबीचे उच्चाटन करण्यासाठी व्ही. एम्. दांडेकर यांनी श्रमप्रधान तंत्रज्ञानाचा पुरस्कार केला. भारतासारख्या देशामध्ये तंत्रज्ञानाने प्रभावित झालेल्या किंवा बेरोजगार झालेल्यांना सहजासहजी पर्यायी रोजगार उपलब्ध होत नाही. पारंपारिक रोजगारातून बाहेर पडल्यानंतर एक तर ते लहान शेतकरी होतात किंवा शेतमजूर बनतात. त्यातून काहींच्या बाबतीत न्यून रोजगारी निर्माण होते. त्यासाठी व्ही. एम्. दांडेकर यांच्या मते, खेड्यातील उद्योगामध्ये आणि लघुउद्योगांमध्ये श्रमप्रधान उत्पादन तंत्राचा वापर करावयास हवा.

**७) लाभदायक रोजगाराचा अधिकार**

राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वितरण होण्यासाठी खाजगी मालकीच्या उत्पादन साधनांचे समान वितरण व्हावयास हवे आणि देशातील निम्न मध्यमवर्गीय आणि निम्न उत्पन्न स्तर असणाऱ्या लोकांना लाभदायक रोजगाराचा अधिकार (Right to Gainful Work) द्यावयास हवा. गरीब लोकांच्यामध्ये रोजगार क्षमता निर्माण करणे, त्यांना रोजगार उपलब्ध करून देणे, जेणेकरून भारतातील दारिद्र्य कमी होण्यास मदत होईल.

### ४.२.४ दारिद्र्य आणि सार्वजनिक कृती यांवरील अमर्त्य सेन यांचे विचार

प्रा. अमर्त्य सेन यांनी १९८१ मध्ये प्रकाशित केलेल्या 'दारिद्र्य आणि दुष्काळ' या ग्रंथात अविकसित देशातील दारिद्र्य आणि उपासमार यांचा सर्व अंगानी उहापोह केला आहे. त्यामध्ये त्यांनी दुष्काळ हा निसर्ग निर्मिती नसून मानव निर्मित आहे असे स्पष्ट केले. त्यांच्या मते, अन्नधान्याच्या टंचाईपेक्षा लोकांच्याकडे असलेल्या खरेदीशक्तीचा अभाव हे या समस्येचे मुळ कारण आहे. देशात हजारो लोक उपाशीपोटी मरत असताना काही देश अन्नधान्याची निर्यात करत असतात. काही देश गरज नसताना साठे करत असतात. सेन यांच्या मते, दुष्काळ जास्त करून प्रशासकीय आणि सामाजिक अकार्यक्षमतेमुळे घडतात. सार्वजनिक कृतीचा अभाव किंवा चुकीची सार्वजनिक कृती (Public Action) यामुळे ही दुष्काळ पडतात.

प्रा. अमर्त्य सेन यांच्या मते, दारिद्र्य आणि सामाजिक कल्याण यांचा निकटचा संबंध आहे. जेव्हा समाजातील जास्तीत जास्त लोक त्यांच्या किमान मूलभूत गरजा पूर्ण करू शकत नाहीत त्यावेळी त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर दारिद्र्याचे अस्तित्व असते. देशात मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य असणे हा सामाजिक

कल्याणातला मोठा अडथळा आहे. म्हणून महत्तम सामाजिक कल्याणासाठी शासन संस्थेने दारिद्र्य निर्मूलनावर लक्ष केंद्रित केले पाहिजे. दारिद्र्य निर्मूलनासाठी दारिद्र्याचे अचूक मापन करणे आवश्यक असते. दारिद्र्य मापनासाठी प्रा. अमर्त्य सेन यांनी वस्तूनिष्ठ निर्देशांक तयार केले आहेत. सेन यांच्या मते, दारिद्र्याचे निर्देशांक हे समाजाची उत्पन्नपातळी, उत्पन्न व संपत्तीचे वाटप, देशात असलेल्या मूलभूत सुविधांची उपलब्धता व त्यांचे समाजात होणारे वितरण यातून स्पष्ट होतात. सेन यांनी दारिद्र्याचे मापन करण्यासाठी लॉरेन्स वक्र, समाजातील उत्पन्न वाटपाची क्रमवारी, विषमता मापन गुणोत्तर-गिनी सहगुणक या तीन गोष्टीमधील संबंध विचारात घेतले आहेत.

दारिद्र्याचे अचूक मापन करण्यासाठी डॉ. अमर्त्य सेन यांनी पुढील सूत्र दिले आहे.

$$S = H \{ I + (1 - I) G \}$$

यामध्ये,

S = सेनचा दारिद्र्याचा निर्देशांक

H = शिरगणती गुणोत्तर (Head Count Ratio)

I = उत्पन्न तफावत (The Income Gap Ratio)

G = गिनी सहगुणक

## सार्वजनिक कृती (Public Action)

देशाच्या आर्थिक विकासामध्ये आणि देशातील लोकांना विविध सामाजिक सोयी सुविधा पुरेशा प्रमाणात आणि किफायतशीर किंमतीत प्रदान करण्यामध्ये सार्वजनिक कृती महत्त्वाची ठरत असते. प्रा. सेन यांच्या मते, कोणत्याही देशातील आर्थिक व सामाजिक परिवर्तनाचे यशापयश हे त्या देशातील लोक सार्वजनिक दायित्व, जबाबदारी कशा प्रकारे पार पाडतात यावर अवलंबून असते. शासन विविध आर्थिक आणि सामाजिक धोरण आखत असते. या सामाजिक-आर्थिक धोरणाचा समाजाच्या विविध गटांवर वेगवेगळा परिणाम होत असतो. या धोरणांवर समाजाच्या प्रतिक्रियेचा किंवा लोकांच्या कार्यतत्परतेचा अनुकूल परिणाम होत असतो. लोकांच्या सतर्कतेमुळे शिक्षण सुविधा, आरोग्यविषयक सुविधा, लसीकरण, सामाजिक सुरक्षा, पर्यावरण संरक्षण, लहान मुले, महिला यांची सुरक्षा, आरोग्य इ. कार्ये करण्यासाठी शासनावर विविध स्तरातून दबाव पडत असतो. लोकांच्या सहभागामुळे समाजाच्या कल्याणासाठी राबविण्यात आलेल्या कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी होण्यास मदत होत असते. तसेच त्यावर देखरेख आणि नियंत्रणही राहते. अशा प्रकारे प्रा. सेन यांच्या मते, महत्तम सामाजिक कल्याणासाठी लोकांनी जागरूक राहिले पाहिजे. याठिकाणी प्रसार माध्यमांची भूमिकाही महत्त्वाची ठरत असते. महत्तम सामाजिक कल्याणासाठी समाजातील सर्व गटांनी एकत्र येऊन सार्वजनिक कृती किंवा सार्वजनिक उठाव केले पाहिजे.

प्रा. अमर्त्य सेन यांनी दारिद्रय निर्मूलन, सार्वजनिक कृती व एकंदर आर्थिक कल्याणासाठी खालील उपाय सुचविले आहेत.

१) देशाची लोकसंख्या नियंत्रित करणे.

२) जमीन सुधारणा कार्यक्रमाची योग्य अंमलबजावणी करणे.

३) शिक्षण, आरोग्य यामध्ये सार्वजनिक गुंतवणूक वाढविणे.

४) समाजातील कमी उत्पन्न गटातील लोकांची क्रयशक्ती वाढविणे.

५) अन्नधान्य वितरण व्यवस्था कार्यक्षम करणे.

६) शासकीय योजनांची माहिती गरजू लोकांपर्यंत पोहचविणे.

७) देशात क्षमता वाढीसाठी समान संधी उपलब्ध करणे.

८) लोकशाही राज्यपद्धती रूजविणे.

## स्वाध्याय - १

**खालील रिकाम्या जागा भरा / प्रशनांची उत्तरे लिहा.**

१. भारतातील आधुनिक अर्थशास्त्रज्ञांमध्ये कोणत्या अर्थशास्त्रज्ञांचा समावेश होतो.

अ) डी. आर. गाडगीळ ब) अमर्त्य सेन

क) व्ही. एम्. दांडेकर ड) वरील सर्व

२. ............. या आधुनिक अर्थशास्त्रज्ञाने सहकारी विकास आणि सत्तेचे विकेंद्रीकरण यावर मूलभूत विचार मांडले.

अ) डी. आर. गाडगीळ ब) अमर्त्य सेन

क) व्ही. एम्. दांडेकर ड) वरील सर्व

३. ................ या आधुनिक अर्थशास्त्रज्ञाने सामाजिक निवड आणि कल्याण यावर मूलभूत विचार मांडले.

अ) डी. आर. गाडगीळ ब) अमर्त्य सेन

क) व्ही. एम्. दांडेकर ड) वरील सर्व

४. ......... या आधुनिक अर्थशास्त्रज्ञाने भारतातील दारिद्र्यावरील विचार आजही देशाला दारिद्र्यातून बाहेर पडण्यासाठी मार्गदर्शक आहेत.

अ) डी. आर. गाडगीळ ब) व्ही. एम. दांडेकर

क) वरील दोन्ही ड) वरीलपैकी नाही

५. ........ या आधुनिक अर्थशास्त्रज्ञाने दारिद्र्य आणि सार्वजनिक कृती यावर मूलभूत विचार मांडले.

अ) डी. आर. गाडगीळ ब) व्ही. एम्. दांडेकर

क) अमर्त्य सेन ड) वरील सर्व

६. सहकारी लोकराज्याची संकल्पना ............ या आधुनिक अर्थशास्त्रज्ञाने मांडली.

अ) डी. आर. गाडगीळ ब) अमर्त्य सेन

क) व्ही. एम्. दांडेकर ड) जगदीश भगवती

७. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांच्या मते, देशाच्या सर्वांगीण आर्थिक प्रगतीसाठी ......... चा मार्ग योग्य आहे.

अ) भांडवलशाहीचा ब) सहकाराचा

क) साम्यवादाचा ड) वरीलपैकी नाही

८. प्रा. अमर्त्य सेन यांनी आपले सामाजिक कल्याण विषयक विचार .......... या ग्रंथात (१९७१) व्यक्त करून कल्याणाच्या अर्थशास्त्रात मोठे योगदान दिले आहे.

अ) सामूहिक निवड आणि सामाजिक कल्याण (Collective Choice and Social Welfare).

ब) भारतातील दारिद्र्य (Poverty in India)

क) भारतातील नियोजन आणि आर्थिक धोरण (Planning and Economic Policy in India)

ड) वरीलपैकी नाही.

९. प्रा. अमर्त्य सेन यांनी कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये दिलेल्या योगदानामध्ये कोणता मुद्दा महत्त्वाचा आहे.

अ) सामुदायिक निवड ब) सामाजिक क्षमता

क) सार्वजनिक कृती ड) वरील सर्व

१०. भारतातील दारिद्र्य (Poverty in India) या १९७१ साली प्रकाशित झालेल्या ग्रंथाचे लेखक कोण आहेत ?

अ) व्ही. एम्. दांडेकर ब) अमर्त्य सेन

क) दोन्ही ड) वरीलपैकी नाही

११. देशातील दारिद्र्य कमी करण्यासाठी व्ही. एम्. दांडेकर यांनी कोणत्या बाबींवर जास्त भर दिला.

अ) उत्पादन साधनांचे पुनर्वाटप ब) शेती विकास

क) लाभदायक रोजगाराचा अधिकार ड) वरील सर्व

१२. दारिद्र्याचे अचूक मापन करण्यासाठी प्रा. अमर्त्य सेन यांनी विकसित केलेल्या दारिद्र्याच्या निर्देशांकामध्ये ..... बाबींचा समावेश होतो.

अ) शिरगणती गुणोत्तर ब) उत्पन्न तफावत

क) गिनी सहगुणक ड) वरील सर्व

## ४.३ सारांश

भारतातील आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विचारांमध्ये व्ही. एम्. दांडेकर, डी. आर. गाडगीळ, प्रा. अमर्त्य सेन या अर्थशास्त्रज्ञांचे विचार महत्त्वाचे आहेत. प्रस्तुत प्रकरणात आपण भारताच्या आर्थिक, सामाजिक जडणघडणीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या या आधुनिक अर्थशास्त्रज्ञांच्या आर्थिक विचारांचा अभ्यास केला. भारतातील सहकार, सहकारी संस्था, त्यांच्या समस्या, समस्यांवरील उपाययोजना, सहकारातील शासनाची भूमिका आणि देशामध्ये असलेली सत्तेच्या विकेंद्रीकरणाची गरज यावर प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी मूलभूत विचार व्यक्त केले आहेत. प्रा. गाडगीळ यांच्या मते, भारताच्या सर्वांगीण आर्थिक प्रगतीसाठी सहकाराचा मार्ग योग्य आहे. दुर्बलातील दुर्बल घटकांच्या आर्थिक व सामाजिक न्यायासाठी सहकाराचा मार्ग महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर प्रा. धनंजयराव गाडगीळ यांनी लोकशाहीतील सत्ता विकेंद्रीकरणाचा पुरस्कार केला. कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये प्रा. अमर्त्य सेन यांनी मोलाची भर घातली त्यांनी सामुदायिक निवड, सामाजिक कल्याण, सामाजिक क्षमता, दारिद्र्य व कल्याणाचे निर्देशांक यावर विस्तृत आणि महत्त्वपूर्ण लिखाण केले. व्ही. एम्. दांडेकर यांनी निलकंठ रथ यांच्याबरोबर १९७१ मध्ये प्रकाशित केलेल्या भारतातील दारिद्र्य (Poverty in India) या पुस्तकात दारिद्र्यावरील विचार व्यक्त केले आहेत. उत्पादन साधनांचे पुनर्वाटप, श्रमप्रधान तंत्राला प्राधान्य, किमान वेतनदर ठरविणे, त्याची कठोर अंमलबजावणी करणे आणि लाभदायक रोजगाराचा अधिकार ही दारिद्र्य निर्मूलनाचे उपाय आहेत. १९८१ मध्ये प्रकाशित

केलेल्या 'दारिद्र्य आणि दुष्काळ' या ग्रंथात प्रा.अमर्त्य सेन यांनी अविकसित देशातील दारिद्र्य आणि उपासमार यांचा सर्व अंगानी ऊहापोह केला आहे. त्यांच्या मते, महत्तम सामाजिक कल्याणासाठी सार्वजनिक कृती महत्त्वाची ठरते.

## ४.४ संज्ञा

| | | |
|---|---|---|
| सत्ता विकेंद्रीकरण | : | प्रत्येक स्तरावरील निर्णय घेण्याची सत्ता व अधिकार तेथील लोकांना प्रतिनिधींना किंवा अधिकाऱ्यांना देणे म्हणजे सत्ता विकेंद्रीकरण होय. |
| अशक्यता प्रमेय | : | आर्थिक धोरणाची सामूहिक निवड अशक्य आहे असे मत प्रा. केनेथ ॲरो यांनी मांडले, त्यास अशक्यता प्रमेय असे म्हंटले गेले. |

## ४.५ स्वाध्याय उत्तरे

१. ड) वरील सर्व

२. अ) डी. आर. गाडगीळ

३. ब) अमर्त्य सेन

४. ब) व्ही. एम्. दांडेकर

५. क) अमर्त्य सेन

६. अ) डी. आर. गाडगीळ

७. ब) सहकाराचा

८. अ) सामूहिक निवड आणि सामाजिक कल्याण (Collective Choice and Social Welfare)

९. ड) वरील सर्व

१०. अ) व्ही. एम्. दांडेकर

११. ड) वरील सर्व

१२. ड) वरील सर्व

## ४.६ प्रश्नावली

**अ) दीर्घोत्तरी प्रश्न**

१. प्रा. धनंजयराव गाडगीळ यांचे आर्थिक विचार स्पष्ट करा.

२. प्रा. डी. आर. गाडगीळ यांचे सहकारी विकास यावरील विचार स्पष्ट करा.

३. देशाच्या सर्वांगीण आर्थिक प्रगतीसाठी सहकाराचा मार्ग योग्य आहे असे प्रा. गाडगीळ यांनी प्रतिपादले चर्चा करा.

४. अमर्त्य सेन यांचे आर्थिक विचार स्पष्ट करा.

५. डॉ. अमर्त्य सेन यांचे कल्याणकारी अर्थशास्त्रीय विचार विशद करा.

६. डॉ. अमर्त्य सेन यांच्या सामाजिक निवड आणि कल्याण या संकल्पना विशद करा.

७. व्ही. एम्. दांडेकर यांचे दारिद्र्यावरील विचार स्पष्ट करा.

**ब) टीपा लिहा.**

१. संकल्पना डी. आर. गाडगीळांची सहकारी लोकराज्य संकल्पना.

२. गाडगीळांचे सत्तेच्या विकेंद्रीकरणावरील विचार.

३. सामूहिक निवड आणि कल्याण.

४. व्ही. एम्. दांडेकर यांचे दारिद्र्यावरील विचार.

५. दारिद्र्य आणि सार्वजनिक कृती.

## ४.७ पुढील अभ्यासासाठी संदर्भ ग्रंथ


१. पाटील जे. एफ. (२००५). 'आर्थिक विचारांचा इतिहास', फडके प्रकाशन, कोल्हापूर.

२. गोखले रामचंद्र महादेव (१९७०). 'अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास', कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.

३. काटे के. बी. (१९८०). 'अर्थशास्त्रीय विचारांचा इतिहास', अजब पुस्तकालय, कोल्हापूर.

४. पाटील जे. एफ. (संपादक) (१९९९). 'अमर्त्य सेन - कल्याणाचा कारागीर' प्रबोधन प्रकाशन ज्योती, इचलकरंजी.

५. Dandekar V. M. and Nilakantha Rath (1971). 'Poverty in India', Indian School of Poltical Economy, Poona.

६. Jean Dreze and Amartya Sen (1989, 1999). 'Hunger and Public Action', Oxford University Press.

७. Srivasthava S. K. (1970). 'History of Economic Thought', S. Chand and Co. (Pvt.) Ltd., New Delhi.

❏ ❏ ❏